
# अंधश्रद्धा निर्मूलनात समाजसुधारकांचे योगदान





संपादक : प्रा.डॉ.बी.एच.किर्दक











मुक्ता पब्लिकेशन क्रमांक : ७०

**ISBN No. :** 978-81-946091-8-6

**अंधश्रध्दा निर्मूलनात समाजसुधारकांचे योगदान**

Andhashraddha Nirmulanath
Samajsudharakanche Yogdan

**संपादक :** प्रा.डॉ. बंडू हरिभाऊ किर्दक

**प्रकाशक :** सागर बाबाराव लोडम
मुक्ता पब्लिकेशन, २०, हॉटेल सुरभिसमोर,
रणपिसे नगर, अकोला - ४४४ ००१
मो.९८५०४७१५२०

**© सौ.सविता बंडू किर्दक**
'सौम्य निवास', पुंडलिक महाराज आश्रम परिसर,
राऊतवाडी, अकोला भ्रमणध्वनी : ९७६४२५३१७१

**पहिली आवृत्ती :** २४ ऑक्टोंबर, २०२३, विजयादशमी

**मुखपृष्ठ, अक्षर जुळवणी :**
सौ.प्रियका सागर लोडम,
मुक्ता ग्राफिक्स, अकोला

**मुद्रक :** मुक्ता डिजिटल ऑफसेट प्रिंटर्स, अकोला

**मूल्य :** रू. ३४०/-

या पुस्तकातील लेखकांची मते, घटना, वर्णने ही त्या लेखकांची
असून त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अर्पणपत्रिका

ज्या संत-समाजसुधारकांनी,
थोर महात्म्यांनी संपूर्ण देशभर
अंधश्रद्धा निर्मूलनासाठी बंड पुकारले,
प्रसंगी प्राणाची बाजी लावली,
कृतिशील विचारसरणीचा भरभक्कम
वारसा मानवजातीला दिला,
त्यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याप्रती
विनम्रतापूर्वक....

# संपादकीय

अंधश्रद्धा निर्मूलन हे समाज जागृती सोबतच समाज बदलाचे आव्हानात्मक काम आहे. श्रद्धा असावी की नसावी याबाबत वाद नाही, तर त्याचे स्वरूप काय असावे? हा खरा प्रश्न आहे. बदलत्या कालप्रवाहात ज्ञानाच्या कसोटीवर आपल्याला श्रद्धा वरचेवर तपासून घेता आली पाहिजे. मानवाने विज्ञानात जी प्रचंड झेप घेतली, तो सारा प्रयत्न श्रद्धा तपासण्याचाच एक इतिहास आहे. अग्नीचा शोध, धातूचा शोध, चाकाचा शोध, यामधून जीवन उन्नत होत गेले. मानव अप्रगत अवस्थेत होता त्यावेळी सुरक्षितता ही त्याची महत्त्वाची समस्या होती. 'अस्तित्वासाठी संघर्ष' हे त्याचे ध्येय होते. खरेतर आजच्या आधुनिक मानवातही हेच ध्येय कायम राहिले. रानटी अवस्थेतील मानवाला निसर्ग नियमाचे व आश्चर्यकारक वाटणाऱ्या अनेक घटनांची उकल होत नसल्यामुळे या अवस्थेतील मानवाला अनेक प्रश्न पडत असत. जसे सूर्य एका दिशेने येऊन दुसऱ्या दिशेने कसा निघून जातो? अचानक अंधार व नंतर प्रकाश कसा निर्माण होतो? वादळे कशी येतात? आकाशात तारे कसे जमा होतात? अफाट आकाशाच्या पोकळीत पाणी कसे काय जमा होते? यासारख्या अनेक नैसर्गिक घटनांच्या घडामोडीमुळे मानवाचे दैनंदिन जीवन प्रभावित होत होते. यावेळी मानवाला नैसर्गिक बदलाचे रहस्य उघडलेले नव्हते. तेव्हा अशा घटनांचे मानव निरीक्षण व आकलन करीत होता. निसर्गातील अनाकलनीय घटनाच्या शक्ती पुढे आपण अत्यंत दुर्बल आहोत, अशी माणसाची खात्री झाली. संपूर्ण पृथ्वीवर व आकाशात काहीतरी अद्भुत अशी शक्ती असावी, की ज्यामुळे हे सर्व घडते. अशी त्याने युक्ती लढविली. यासर्व शक्तींना पंचमहाभूताच्या जागी बसविले. त्याची भीती बाळगली व त्याचा आदरही केला. दगड, लाकडी ओंडकेची देव-देवता बनवून, त्याची आराधना करायला सुरुवात केली. निसर्गाचे रुद्र भीषणता, मानवी जीवन व वर्तनाची अनाकलनीयता, वास्तवातील अज्ञान व अगतिकता

या साऱ्यातून अंधश्रद्धा जन्माला आल्यात.

आज गावची जत्रा, त्यातले मानपान, त्यातल्या जुन्या कल्पना, रीतीरीवाज, अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात जोपासताना दिसते. देवीच्या यात्रेला हजारोंनी बकरे, मेंढरे मारून त्यांचा रक्तमासाचा चिखल करण्यात धन्यता मानणारी भाविकांची गर्दी कमी झाल्याचे दिसतात नाही. उलट अशा देव, देवी, पीर, जागृत दैवते यांची गावोगावी रेलचेल वाढतच आहे असे दिसते. खेड्यात हे सुरू राहिले यात नवल नाही; पण जगताना क्षणोक्षणी विज्ञानाचा आधार घेणाऱ्या शहरातही कोपऱ्या-कोपऱ्यावर मंदिरे उभे राहू लागल्याचे दिसते. अनेक निरर्थक कर्मकांडे करणे हा जगण्याचा भाग बनून गेल्याचे दिसत आहे. भविष्य, ज्योतिष्य याची मासिके, गूढ विद्येची, तंत्रा-मंत्राची पुस्तके याची विक्री मोठ्याा प्रमाणात होताना दिसते. म्हणून 'माणसाने विज्ञानाची सृष्टी घेतली; पण दृष्टी घेतली नाही' असे म्हणता येते. आजही 'एक लोटा जल, सभी समस्योंका हल' माणणारी संस्कृती फोफावत आहे. एवढेच नाही, तर मुलाला अभ्यास न करता बेलाची पाने मध लावून शंकराच्या पिंडीला लावली की पास होण्याची हमी घेणाऱ्या बाबाचीच चालती दिसते.

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला समाज आहे. या समाजात अनेक भाषा, धर्म, पंथ व विविध जाती-जमाती समाविष्ट झालेल्या आहेत. यातील प्रत्येक जात, धर्म, पंथ यांची स्वतःची जीवन जगण्याची एक पद्धती आहे. त्यालाच आपण 'संस्कृती' असे म्हणतो. भारतीय समाजात अनेक संस्कृती दिसून येतात. प्रत्येक संस्कृतीत श्रद्धा, विधिविधान, विश्वास, मूल्ये आढळून येते. भारतीय संस्कृतीतील विश्वासाच्या संदर्भात बोलताना आपल्याला असे म्हणता येईल की, बरेच विश्वास हे अंधविश्वास आहेत, बऱ्याच श्रद्धा अंधश्रद्धा आहेत. अंधविश्वास व अंधश्रद्धेबाबत चर्चा करताना आपण असे म्हणू शकतो की, एखाद्या गोष्टीबाबत डोळेझाकपणे त्याची कुठलीही शहानिशा न करता, विवेकबुद्धी दृष्टीकोणातून चिकित्सा न करता जेव्हा आपण स्वीकारत

असतो तेव्हा ते विश्वास, तर तर्काच्या आधारावर टिकत नसतील तर ते अंधविश्वास वा अंधश्रद्धा ठरतात. भारतीय समाजात अनेक प्रकारचे अंधविश्वास प्रचलित आहेत. या अंधविश्वासामुळेच भारतीय समाजाची अपरिमित हानी झाली आहे. अंधश्रद्धेमुळे समाजाची पाहिजे त्या प्रमाणात प्रगती झालेली दिसत नाही. या सर्व अंधविश्वासाला कारणीभूत आमच्या भारतीय संस्कृतीतील अनेक प्रकारच्या श्रद्धा आहेत. या श्रद्धाची कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता, त्याची चिरफाड न करता त्या स्वीकारल्या पाहिजेत अशीच शिकवण आमच्या धर्मग्रंथात दिलेली आढळते. महात्मा फुले असे म्हणतात, 'विचार करायला शिकवते ते शिक्षण व विज्ञानाच्या कसोटीवर टिकते ते तत्त्व होय.' मात्र, आमच्या संस्कृतीतील अनेक गोष्टी विज्ञानाच्या कसोटीवर टिकत नाहीत, तरीही त्यावर विश्वास ठेवल्या जातो. आमच्या धर्मग्रंथाची शिकवण आहे की, कोणत्याही गोष्टीची चिकित्सा करू नये, त्याची चिरफाड करू नये, त्याची चिकित्सा करणे, चिरफाड करणे पाप आहे अशी शिकवण धर्माच्या माध्यमातून दिली जाते व धर्मग्रंथातील विचार सत्य आहे, त्यानुसार आचरण करावे असे सांगितले जाते. परिणामी आमच्या समाजात अंधश्रद्धा आढळून येतात. या अंधश्रद्धांमुळे आमच्या समाजाचे फार वाटोळे झालेले आहे. या अंधश्रद्धेच्या विरोधात निरनिराळ्या समाजसुधारकांनी, विचारवंतांनी, विद्वानांनी प्रहार केले व आपल्या समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केलेत.

जीवनातील चांगल्या, वाईट घटना, नशिबाचे भोग समजण्याची मानवाची धारणा आहे. हे नशीब जो-तो जन्मताच सोबत घेऊन येतो व त्याप्रमाणे चांगले, वाईट घडत असते असे सुद्धा अशिक्षितासोबतच सुशिक्षितही समजतात कुणाच्यातरी कृपाप्रसादाने एखाद्याचे नशीब उजळते, पण असा एखादा भाग्यवान वगळता सर्वांना नशिबाला नशिबाप्रमाणे सोसणे अटळच आहे अशीच भावना रूढ असते. अशी भावना एवढी रूढ होण्याचे कारण म्हणजे या कल्पनेला तत्त्वज्ञानाने सिद्धांताचे स्वरूप दिले आहे. यालाच

'कर्मविपाक सिद्धांत' म्हणतात या जन्मी माणूस सोसत असलेले दुःख, दैन्य याचे मूळ त्याच्या पूर्वजन्मीच्या करणीत आहे आणि या जन्मी माणसाने केलेल्या कर्माची फळे पुढच्या जन्मी त्याला मिळणार आहेत असा हा सिद्धांत सांगतो.

खरे तर या जन्मी केलेल्या कृत्याचे फळ, प्रायश्चित पुढच्या जन्मी मिळणे हे गृहीतकच तकलादु आहे. एक तर कुठले कृत्य चांगले, कुठले वाईट हे स्थलकालानुरूप बदलत असते. त्यामुळे एक वेळेला एके ठिकाणी एक चांगले कृत्य म्हणून त्याला पुढच्या जन्मी बक्षीस व तेच कृत्य दुसऱ्या कालखंडात दुसऱ्या ठिकाणी वाईट मानलेले. यामुळे त्याला पुढच्या जन्मी शिक्षा अशा अनेक विसंगती आढळत असल्यामुळे कर्मवीपाकाचा सिद्धांत खोटा ठरतो. तरीही तो अंधश्रद्धेला एक मजबूत आधार मिळून देतो.

भारतीय तत्त्वज्ञानातील प्रमुख सहा दर्शनात, विचारप्रणालीत आस्तिकतेपासून ते नास्तिकतेपर्यंत सर्वच छटाचे विचार मांडलेले दिसतात. कणादाचे वैश्विक दर्शन, अणूचा शोध होते, गौतमाचे न्यायदर्शन हे संगतवार वर्गीकरणावर भर देते. कपिलच्या सांख्यदर्शनामध्ये वेदांती तत्त्वज्ञानाला अमान्य अशी दोन प्रमुख तत्त्वे आहेत. एक म्हणजे द्वैत कल्पनेचा आधार आणि दुसरे म्हणजे विश्वनिर्माता आणि नियंता असा कोणीही एक ईश्वर आहे, ही भूमिका सांख्यदर्शन साफ अमान्य करते. जैमिनीच्या कर्ममिमांसेमध्ये फक्त भौतिक जगात करावयाच्या कर्मकांडाची चर्चा आहे. चार्वाकाने तर संपूर्ण नास्तिकताच मांडली आहे.

पुढे उपनिषद काळात विचारमंथन पूर्णपणे थांबले. ईश्वर, प्रार्थना, पूजा, अध्यात्म इत्यादीचे शब्दप्रमाण याचे स्तोम माजले. नवविचारनिर्मितीची प्रक्रिया थांबली. विचार, धर्म, रितीरिवाज सर्वकाही अपरिवर्तनीय झाले. शास्त्राची प्रगती थांबली. प्रवासावर निर्बंध आले. जातीव्यवस्थेची बंधने दृढ झाली व भारतात तमोयुग सुरू झाले. इ.स. ६०० ते इ.स. १८०० पर्यंतचा हा काळ वैचारिकदृष्ट्या तमोयुगच होते. या कालखंडात मराठे, रजपूत,शीख

यांच्यात काही असामान्य राजे होऊन गेलेत. भारतात राज्यसत्ता आणि धर्मपिठे या शासन करणाऱ्या संस्थात सत्तेच्या वाटणीवरून संघर्ष झालाच नाही, उलट भागीदारीच राहिली. त्यामुळे इंग्रजी सत्तेचा जम बसेपर्यंत सरंमजामशाहीच टिकून राहिली. इंग्रजी राजवटीनंतर भारतात साम्राज्याशाहीची अनुषंगिक पैदास म्हणून व्यापार, सावकारी, दलाली करणाऱ्या वर्गातून भांडवलदार वर्गाचा उदय झाला. त्यांना मध्ययुगीन विचारसरणी नष्ट करण्याची गरज वाटली नाही वा सरंजामी व्यवस्थेविरूद्ध लढावे लागले नाही. त्यामुळे भारतात वैज्ञानिक मनोवृत्ती उमगलीच नाही.

**समाजसुधारकांचे प्रयत्न :**

सरंमजामशाही, अर्थकरण व अंधश्रद्धा याविरूद्ध लढणारे काही समाजसुधारक ब्रिटिश काळात विशेषतः महाराष्ट्रात जन्माला आले. त्यांनी आधुनिक, वैज्ञानिक विचारांचा पुरस्कार केला. त्यांनी धार्मिक विचारामागचा भंपकपणा उजेडात आणला. महात्मा फुलेंनी प्रश्न विचारला, 'मुहूर्त पाहून झालेल्या आमच्याकडच्या लग्नात बालविधवा होतात आणि तिकडे परदेशात मुहूर्ताशिवाय लग्न करतात हे कसे?, काटेकोर मुहूर्त पाहून चालणारी पेशवाई बुडाली व मुहर्ताशिवाय लढणारी ब्रिटिश आमदानी रूजली हे कसे?' महात्मा फुलेंना जाऊन शंभर वर्षे झाली. ब्रिटिशही गेले. मात्र स्वातंत्र्यानंतरही भारतातील या दुहेरी शोषणाविरूद्धच्या लढाईची गरज कमी झालेली नाही. प्रबोधनाची जोरदार चळवळ स्वतंत्र्योत्तर काळात झालीच नाही. वाढ खुंटलेली भांडवलशाही, जमीनदारी अर्थव्यवस्था आणि सरंजामशाही विचार भारतात जातीव्यवस्थेच्या प्रभावामुळे अगदी खोलवर खिळलेला आहे. त्यामुळे भांडवलशाहीचा विकास झाला व शेती भांडवली पद्धतीने झाली तरी जातीव्यवस्था प्रभावीपणे टिकून असल्यामुळे भारतात आधुनिक विचारसरणी रूजू शकली नाही. धर्म श्रद्धेचा प्रभाव कमी होऊ शकला नाही. जातिव्यवस्थेची संपूर्ण रचना उच्चनिच्चता, पवित्र- अपवित्रतेच्या संकल्पनेवर उभी आहे. काहींना श्रम करणे योग्य तर, काहींना अयोग्य, मालमत्तेचा अधिकार काहींना तर काहींना मालमत्ता धारण

करण्यास मनाई अशा भौतिक आधाराची जोड आहे. संपूर्णपणे अवैज्ञानिक व अमानुष पातळीवर हे जातीयव्यवस्थेचे जोखड उभे आहे. ते फेकून दिल्याशिवाय वैज्ञानिक विचारांचा प्रसार होणार नाही. असे घडले तरच अंधश्रद्धेच्या महत्त्वाच्या मुलाधाराला धक्का बसेल. तेव्हाच संस्कृतीतील अनिष्ठतेचे उच्चाटन हळूहळू होईल. ही सर्व मांडणी महाराष्ट्रात महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केल्याचे दिसते

**धर्म नियम का पाळायचे?**

व्रतवैकल्य का करायची? या गोष्टींना काही अर्थ आहे का? असे प्रश्न उपस्थित करून हे सर्व तर्कावर व बुद्धीवर आपण पारखूण घेतले पाहिजे असा आग्रह संत व समाजसुधारकांनी समाजाला केल्याचे दिसते. मानसिक गुलामगिरीच्या अंधारात खितपत पडलेल्या समाजाला ज्ञान-विज्ञानाच्या उजेडात आणून सोडणे हे सर्वात कठीण काम होते. या गोष्टीची त्यांना जाणीव होती म्हणून अंधश्रद्धांनी झपाटलेल्या समाजाला सत्य सूर्याच्या प्रकाशात आणण्याचा या मंडळींनी पराकाष्टेचा प्रयत्न केल्याचे दिसते. अशा प्रयत्नात समाजसुधारकाचे काय योगदान आहे? हे प्रस्तुत पुस्तकातून विविध लेखकांनी मांडलेल्या विचाराच्या आधारावर स्पष्ट होते.

प्रस्तुत पुस्तकात प्रा.डॉ. नारायण कांबळे व प्रियदर्शन भवरे यांनी ‘महात्मा फुले यांचा अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार’ या लेखात प्रा. कांबळे सांगतात की, महात्मा फुले म्हणतात की, आर्यभट्टांनी कृत्रिम धर्माची रचना करून शुद्रातिशुद्रांना ज्ञानबंदी करून तेथील विषम व अन्यायी समाजव्यवस्थेला मुळासकट उखटून फेकल्याशिवाय तिच्या जागी स्वातंत्र्य, समता, बंधुता या नवमूल्यावर आधारित नवा समाज उगवताच येणार नाही. वरच्यावर थातूरमातूर सुधारणा करून भागणार नाही अशी महात्मा फुलेंची भूमिका होती. त्यामुळे जुन्या समाजाला पुष्टी येणाऱ्या सर्व अंधश्रद्धाचा त्यांनी पर्दापाश केला आहे.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कार्य' या लेखात प्रा.डॉ. कैलास वानखडे म्हणतात, बाबासाहेबांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कार्य कोणते याबाबत विचार व्यक्त करताना ते म्हणतात, बाबासाहेब आंबेडकर जेव्हा आत्मा, अवतारवाद, चमत्कारवाद, वेदप्रामाण्य इत्यादी विषयावर हल्ला चढवितात तेव्हा ते अंधश्रद्धा निर्मूलनाकरिता केलेल्या प्रबोधनाचा एक भाग असतो. ते पुढे म्हणतात, या देशात साधूसंतांनी जसे अंधश्रद्धा निर्मूलनाचे  थेट कार्य केले, समाजात जाऊन कीर्तन, भजन, पोवाडे गायन, भाषणाद्वारे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले तसे अगदी एकच विषय घेऊन बाबासाहेबांनी जरी कार्य केले नसले, तरी त्यांच्या कार्याच्या मुळाशी धर्मातील अंधश्रद्धा नष्ट करणे हेच ध्येय होते. कारण त्यावेळी समाजात अंधश्रद्धेपेक्षाही भयंकर जातीप्रथेचे निर्मूलन करणे हा त्यांच्या कार्याच्या केंद्रस्थानी असलेला विषय हा अंधश्रद्धेचाच भाग होता. कारण तो बुरसटलेल्या धर्माच्या आधारावरच पोसलेला होता.

'क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या लेखात प्रा . भीमराव उबाळे २१ व्या शतकात सुशिक्षितांकडून अंधश्रद्धेला खतपाणी कसे घातल्या जाते? याची सुंदर वर्णन केले. तसेच महात्मा जोतिबा फुले यांनी समाजातील अत्यंत सनातनी, क्रूर व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अंधश्रद्धेच्या विरोधात कसे बंड पुकारले याची माहिती दिली आहे.

'अंधश्रद्धा निर्मूलनात संत गाडगेबाबा यांचे विचार आणि समाजातील त्यांच्या विचाराची व्यवहार्यता' या लेखात डॉ. सागर बडगे लिहितात की, संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजात प्रचलित असलेली अंधश्रद्धा नष्ट करण्याचाच प्रयत्न केला. 'महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अंधश्रद्धा निर्मूलन कार्य व सुधारणा' या लेखात राजवाड्यातील अंधश्रद्धा महाराजांनी कशी बाहेर काढली ते दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अंधश्रद्धा निर्मूलन या लेखात दुतोंडे यांनी अंधश्रद्धेचे मूळ हे धर्मात आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य पाहताना

बाबासाहेबांच्या धर्म चिकित्सेचा व धर्मांतर चळवळीचा मागवा घेणे अपरिहार्य ठरते. त्यांच्या मते, सर्व अंधश्रद्धाची मुळे धर्माच्या तात्विक व व्यावहारिक स्वरूपात आहेत. डॉ. दुतोंडे पुढे म्हणतात की, डॉ. बाबासाहेबांनी अंधश्रद्धेचे शक्ती सामर्थ्य असलेल्या ईश्वरवाद, आत्मवाद, अवतारवाद, पुनर्जन्मवाद, कर्मवाद या अध्यात्मावादी प्रवृत्तीची चिकित्सा करून त्यांनी या प्रवृत्तीलाच नाकारून अंधश्रद्धेच्या मुळावरच घाव घातला. याही पुढे जाऊन अंधश्रद्धा जाणीवपूर्वक जोपासणाऱ्या, प्रसारित करणाऱ्या जातीव्यवस्थेविरूद्ध लढा उभारून भारतीय प्रबोधन चळवळीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याची अनन्यता ही आहे की अंधश्रद्धेचा पाया असलेल्या वैचारिक आणि भौतिक या दोन्ही आधारावर कृतिशील जनलढे उभारणारे ते एकमेवद्वितीय समाजसुधारक आहेत हे स्पष्ट केले.

'अंधश्रद्धा निर्मूलनात नरेंद्र अच्युत दाभोळकर यांचे योगदान' या लेखात प्रा. आशिष बरडे यांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीद्वारे कसे प्रयत्न केले आहे याचे वर्णन केलेले आहे. प्रा गणेश काकडे यांनी लिहिलेल्या 'संत तुकाराम महाराज व अंधश्रद्धा निर्मूलन' या लेखात तुकारामांनी अभंगातून अंधश्रद्धेचे, समाजातील विषमतेचे वाभाडे काढलेत.

डॉ प्रकाश कोल्हे यांनी आपल्या 'महाराजा सयाजीराव गायकवाड आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या लेखात महाराजांनी तत्कालीन कर्मठ समाजाला कर्मकांडाच्या डबक्यातून बाहेर काढण्यासाठी हजारो वर्षांच्या धर्म संस्कृतीच्या प्रवाहात उत्पन्न झालेली ही कर्मकांडे अभ्यासणे, त्यातील फोलपणा लोकांच्या लक्षात आणून देणे, लोकांना कालबाह्य गोष्टीचा त्याग करण्याची सहज प्रेरणा मिळावी यासाठी प्रयत्न करणे व लोकांना योग्य पर्याय उपलब्ध करून देणे व विज्ञानवादी न्यायाने महाराजांनी स्वतःच्या राजवाड्यातील खाजगी कारभारात बदल घडवत धर्म सुधारणेचा कार्यक्रम कसा होता हे या लेखातून दाखवून दिले. डॉ.सुधा खडके, डॉ. दयानंद राऊत, डॉ. सजाता नाईक, डॉ.

नितीन भिंगारे, डॉ. विशाखा डेरे यांनी 'गाडगे महाराज यांची अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य' कसे केले याची चित्रण केले आहे.

'अंधश्रद्धा निर्मूलनात समाज सुधारकाचे कार्य' या लेखात प्रा. राजकन्या खणखणे यांनी महात्मा फुले, कृष्णराव भालेराव, संत गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नरेंद्र दाभोळकर या समाजसुधारकांनी कशी अंधश्रद्धा दूर केली याचे विवेचन केले आहे. प्रा. मोनाली सलामे यांनी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार' या लेखात तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धेबाबतचे विचार स्पष्ट केले आहे. 'अंधश्रद्धा आणि समाजसुधारक' या लेखात प्रा.डॉ. दामोदर दुधे यांनी गाडगे महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड व सत्यपाल महाराज यांच्या विचारांचा मागोवा घेतला आहे. तर 'अंधश्रद्धा निर्मूलनात प्रा. श्याम मानव यांची भूमिका' प्रा.डॉ. उल्हास राठोड यांनी आपल्या लेखात मांडली आहे. सहा. प्रा डॉ. नीलिमा दवणे यांनी 'Raja Ram Mohan Roy's Contributions to Indian Society' या लेखात राजा राममोहन रॉय यांचे भारतीय समाजातील सामाजिक सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, राजा राममोहन रॉय यांचे पत्रकारितेतील योगदान, त्यांचे धार्मिक योगदान याबाबतची माहिती देणारा लेख लिहिला आहे.

सदर ग्रंथात लेखकांनी सादर केलेले लेख हे अतिशय अभ्यासपूर्वक असून मार्मिकरित्या मांडणी केलेले आहेत, त्यामुळे अंधश्रध्दा निर्मूलनाबाबत समाजसुधाकरांनी केलेले कार्य समाजासमोर मांडण्याचा संपादक व प्रकाशाचा छोटासा प्रयत्न आहे.

**- डॉ.प्रा.बि.एच.किर्दक**

● ● ●

# अनुक्रमणिका

१. महात्मा फुले यांचा अंधश्रद्धा निर्मूलनविषयक विचार १७
प्रा. डॉ. नारायण कांबळे / प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंधश्रद्धा निर्मूलन
विषयक कार्य ३०
डॉ. कैलास वानखडे

३. क्रांतिसूर्य म.फुले आणि अंधश्रध्दा निर्मूलन ३७
प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे

४. समाज सुधारक संत गाडगे महाराजांचे अंधश्रद्धा
निर्मूलन विषयक विचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन ४४
प्रा. डॉ. सुधा मु. खडके (कडू)

५. अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत संत गाडगेबाबा यांचे विचार
आणि समाजातील त्यांच्या विचारांची व्यवहार्यता ५२
डॉ. सागर लोकनाथ बडगे

६. अंधश्रद्धा आणि त्यावर समाजसुधारकांची शिकवण ६१
प्रा.डॉ. दिपक आनंदराव चौरपगार

७. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे
अंधश्रद्धा निर्मूलन कार्य व सुधारणा ६५
प्रा.डॉ.आर.पी. झनके

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अंधश्रद्धा निर्मूलन ७३
प्रा.डॉ. शाम दुतोंडे

९. अंधश्रद्धा निर्मुलनात नरेंद्र अच्युत दाभोळकर
यांचे योगदान ७९
सहा.प्रा.आशिष गोविंदराव बरडे

१०. संत तुकाराम महाराज व अंधश्रद्धा निर्मुलन ८६
प्रा.गणेश दा. काकडे

११. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि अंधश्रद्धा निर्मुलन
डॉ. प्रकाश श्रीराम कोल्हे ९३

१२. अंधश्रद्धा निर्मूलन आणि गाडगे महाराज १०३
दयानंद उत्तमराव राऊत

१३. संत गाडगे बाबा आणि अंधश्रध्दा निर्मुलन १०७
डॉ.सुजाता रामदासजी नाईक

१४. अंधश्रद्धा निर्मूलणात समाजसुधारकांचे कार्य ११४
प्रा. राजकन्या खणखणे

१५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा
निर्मूलन विषयक विचार १२८
प्रा. मोनाली सलामे

१६. अंधश्रध्दा आणि समाजसुधारक १३८
डॉ. दामोदर दुधे

१७ अंधश्रद्धा निर्मूलनात प्रा. श्याम मानव यांची भूमिका १४८
प्रा.डॉ. उल्हास एन.राठोड

१८. संत गाडगेबाबा आणि अंधश्रद्धा निर्मुलन १५४
डॉ. नितीन रमेश भिंगारे

१९. संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनातून
अंधश्रद्धा निर्मूलन व समाज प्रबोधन १६३
प्रा. डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे

२०. Raja Ram Mohan Roy's
Contributions to Indian Society १७३
Asst. Prof. Dr. Nilima viaj Dawane

# महात्मा फुले यांचा अंधश्रद्धा निर्मूलनविषयक विचार

**प्रा. डॉ. नारायण कांबळे**
समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरूर ताजबंद, ता. अहमदपूर, जि.लातूर, मो. : ९९२११५३१५९
**प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे**
समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले
महाविद्यालय, जालना, मो.: ९४० ५९१ ३२९७

**प्रास्ताविक :**

अज्ञान, अंधश्रद्धा आणि कर्मकांडाच्या खोल गर्तेत रुतलेल्या समाजाला विवेकाची दिशा दाखवण्याचे कार्य महाराष्ट्रातील संतांनी केले. अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा आणि अंधश्रद्धांवर समाजसुधारकांनी प्रखर टीका, केली. लेखन आणि प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी समाजाला वळण लावण्याचा प्रयत्न केला. आजच्या महाराष्ट्राचा पुरोगामी चेहरा आहे तो संत आणि समाजसुधारकांमुळेच घडलेला आहे. त्यांनी प्रज्वलित केलेली विचार प्रबोधनाची ज्योत आपणा सर्वांना प्रकाशची वाट दाखवणारी आहे. या समाजसुधारकांच्या विचाराचा आणि कार्याचा वारसा पुढे चालवण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनासंबंधीच्या दृष्टीने अंधश्रद्धा निर्मूलन चळवळी महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. भारतीय समाजात रूढ असलेल्या अनिष्ट प्रथा, रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धा यांवर महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महात्मा फुले यांनी प्रखर टीका केली आहे. समाजात बुद्धीप्रमाण्यवादी विचारपरिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न त्यांनी सातत्याने केले. समाजाला जागृत करण्याचे महान कार्य, अनेक टीकेचे प्रहार सहन करूनही त्यांनी अत्यंत कर्तव्यबुद्धीने पार पाडले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या दृष्टिकोनातून जे विचार मांडले आणि प्रत्यक्ष कार्य केले त्यांच्या सामाजिक क्रांतीच्या महत्कार्याचे एक अंग

होते. नवसमाजनिर्मिती व समताधिष्ठित समाज हेच त्यांचे साध्य होते. त्यांच्या काळातील सामाजिक सुधारक हे प्रामुख्याने जेव्हा उच्चवर्णीय व शहरी मध्यमवर्गीयांच्या कौटुंबिक सुधारणांवरच मुख्यत्वे भर देत होते, तेव्हा अशा काळात महात्मा फुलेंनी तळागाळातील शोषित, स्त्री शुद्रातिशूद्रांच्या सामाजिक प्रश्नांना हात घातला होता.

**अंधश्रद्धांचा पर्दाफाश :**

आर्यभट्टानी कृत्रिम धर्मांची रचना करून शूद्रातिशूद्रांना ज्ञानबंदी करून येथील विषम व अन्यायी समाज रचनेला बळकटी आणली. ही शोषण प्रधान समाजव्यवस्था मुळासकट उकडून फेकल्याखेरीज तिच्या जागी स्वातंत्र्य, समता, बंधुता या नवमूल्यांवर आधारित नवा समाज उभारताच येणार नाही. वरवरच्या थातूरमातूर सुधारणा करून भागणार नाहीत अशी महात्मा फुलेंची भूमिका होती. त्यामुळे जुन्या समाजाला पुष्टी देणाऱ्या सर्व अंधश्रद्धांचा पर्दाफाश त्यांनी केला.

महात्मा फुलेंच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याची दोन ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात. एक, कोणत्याही अंधश्रद्धेला केवळ मनोविकृती समजून ते तिचा कधीच प्रतिवाद करीत नाहीत. अंधश्रद्धाचे अस्तित्व माणसांच्या मनात खोलवर रूजलेल्या भ्रमांमध्ये आणि गैरसमजांमध्ये असते, हे खरे असले तरी केवळ मनं साफ करून ते संपणार नाही. काही अंधश्रद्धांचे बळी मनोरूग्ण किंवा मनोदुर्बल असतात आणि त्यांच्यावर मानसोपचार करून त्यांचे मनोबल वाढविण्याची निश्चित गरज असते. पण एवढ्यावरून सामूहिक संमोहन किंवा आत्मसंमोहन या मार्गाचा अवलंब करण्याबरोबरच अंधश्रद्धानिर्मूलनाचा हमखास उपाय ठरेलच असे नाही.

अंधश्रद्धांना बळी पडलेल्यांना त्यांनी हितोपदेश केला; पण त्यांना मूर्ख, मागासलेले व वेडगळ ठरवून त्यांच्यावर तोंडसुख मात्र कधीच घेतले नाही. त्यांच्या कार्याच्या मुळाशी या फशी पडलेल्या शोषितांबद्दल सतत कणव आणि सहानुभूतीच होती. ज्या व्यवस्थेने त्यांना निरक्षर, अज्ञानी आणि दरिद्री ठेवले त्या व्यवस्थेवर महात्मा फुलेंचा राग होता. तिच्यावर त्यांनी घणाघाती प्रहार केले आहेत. केवळ सामाजिक विकृतीवर हल्ला

करून न थांबता त्या विकृतींना प्रतिष्ठा देणाऱ्या सर्व बाबी त्यांनी टीकास्पद ठरवल्या. प्रस्थापित व्यवस्थेला पुष्टी देणारी मूल्यव्यवस्था आव्हानित केली. धर्मग्रंथाचे अपौरूषेयत्व व प्रामाण्य प्रश्नांकित केले. येथे दृढमूल झालेल्या जीर्ण, विषम व शोषणपर समाजव्यवस्थेच्या जागी जर / जेव्हा स्वातंत्र्य समताधिष्ठित नवमूल्यांवर आधारित नवसमाज उभा राहीला तर आणि तेव्हाच अंधश्रद्धांचे समूळ उच्चाटन होऊ शकेल अशी महात्मा फुलेंची धारणा होती किंबहुना समाजपरिवर्तनाच्या गतीशास्त्राचे महात्मा फुलेंना असलेले भान त्यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनार्थ केलेल्या प्रत्येक प्रयत्नातून प्रत्ययास येते.

**अंधश्रद्धांमुळे स्त्री शूद्रातिशूद्रांवर अनेक अनिष्ट परिणाम**

अंधश्रद्धांमुळे स्त्री शूद्रातिशूद्रांवर अनेक अनिष्ट परिणाम होतात. ते लुबाडले, फसवले तर जातातच शिवाय दैववादी व क्रियाशून्य होतात. स्थितिप्रिय बनतात. सामाजिक विषमतांना व विकृतींना स्वाभाविक नैसर्गिक मानून त्यांचा निमूट स्वीकार करतात. सर्वांगीण शोषण बिनतक्रार सहन करतात. या कशालाही नाकारण्याचे व त्याच्या निराकरणाचे धाडसच त्यांच्या अंगी उरत नाही. शास्त्रीय मार्गाचा अवलंब करण्याचे टाळून ते प्रसंगी आत्मघातही ओढवून घेतात. ही सगळी अरिष्टमालिका लक्षात ठेवूनच महात्मा फुलेंनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात हात घातला होता. धर्माच्या नावाने समाजात सुरू असलेल्या अनेक अपप्रकारांचा महात्मा फुलेंनी जाहीर निषेध केला होता. प्रारब्ध, पाप-पुण्य, स्वर्गनरक, मरणोत्तर सद्‌गती, दुर्गती, कर्मक्रिया इत्यादी कल्पनांमधील फोलपणा त्यांनी अनेक युक्तिवादांसह पटवून दिला. जन्मापासून मरणापर्यंतच्या अनेक प्रसंगांना चिकटवण्यात आलेले निरर्थक आणि शोषणकारी कर्मकांड, मूर्तिपूजा, फलज्योतिष, बुवाबाजी, अवतारकथा यांच्यावर महात्मा फुलेंनी केलेले तार्किक व व्यावहारिक प्रहार आजही उद्‌बोधक ठरावेत असेच आहेत.

सर्व चराचर सृष्टीचा निर्माता व नियंता असा एकच एक 'निर्मिक' असून सर्व स्त्री-पुरूष मनुष्यमात्र ही त्यांचीच लेकरे आहेत. तो सर्वांचा पोशिंदा, न्यायकर्ता व उद्धारक आहे अशी श्रद्धा महात्मा फुले बाळगून होते. पण त्याला ते कोणत्याही धर्मातील प्रचलित संबोधनाने उल्लेखित नाहीत.

तो कधी कोणाला दर्शन देतो यावर त्यांचा विश्वास नाही. आराधना, भक्ती, पूजा, नैवेद्य, नवससायास, जप, अनुष्ठान वगैरे सर्व गोष्टींचा त्यांनी निषेध केला आहे. प्रार्थनेवर त्यांचा विश्वास असला तरी मूर्तीपूजेला ते विरोध करतात. अज्ञानापोटी माणसाला निसर्गप्रक्रियांची उकल होत नव्हती त्या काळात अस्तित्वात आलेले पूजा विधी ज्ञानप्राप्तीनंतरही टिकून राहिले. याचे एकमेव कारण महात्मा फुलेंच्या मते, ऐतखाऊ पुजारी वर्गाचा स्वार्थ हेच होते. 'धातू, दगडाच्या मूर्तीस भजून! घंटा वाजवून ! स्वतः खाई !!' अशा शब्दात त्यांनी मूर्तीपूजा आणि पुरोहितांची खाबूगिरी यांची संभावना केली आहे. मूर्तिपूजा ही त्यांना भिक्षेची आधारशिला वाटते. कर्मकांडांना महात्मा फुलेंचा विरोध असण्याचे एक कारण ती निरर्थक आहेत हे तर होतेच, पण तितकेच गंभीर दुसरे कारण असे की ती मानवमात्रांत फूट पाडतात. जन्म, विवाह, ऋतूशांती, वास्तुशांती, प्रेतसंस्कार, श्राद्ध वगैरे विधी मधील तर्कदृष्टपणा आणि भिक्षूकांचे त्यामागचे पोटार्थी हेतू महात्मा फुलेंनी वारंवार स्पष्ट केले आहेत. फलज्योतिष्य हे शास्त्र आहे किंवा आकाशातील ग्रहगोलांच्या स्थिती गतीमुळे मानवमात्रास पिडा होऊ शकते, मात्र ग्रहशांती केल्यास ती टाळताही येते वगैरे कल्पनांवर ज्योतिरावांचा काडीमात्र विश्वास नव्हता. शेतकऱ्यांच्या घरी पुत्रजन्म होतात 'सोहम कोहोम' नाद करीत कुडमुडे जोशीबुवा तिथे पोहोचतात. कुंडल्या मांडून विद्याविहीन मातापित्यांना भयकंपित करतात. ग्रहपीडानाशासाठी जप अनुष्ठानादी विधी केलेच पाहिजेत हे त्या पालकांच्या मनावर बिंबवतात मग ते बिचारे दरिद्री पालक कर्ज काढून, भांडीकुंडी विकून यथाविधी सारं कर्मकांड करतात. आपल्यावरचे मोठे संकट टळले, अशा भ्रामक समाधानात ते असतात. परीणामी आपल्या मुलांच्या तब्येतीकडे ते दुर्लक्ष करतात. वेळीच वैद्यकीय उपचार न झाल्यामुळे ते मुलं मरते. कर्मकांड त्याला वाचवू शकत नाही असा एक करूण प्रसंग महात्मा ज्योतीराव फुलेंनी उभा केला आहे.

या उलट 'तृतीय रत्न' या आपल्या नाटकात अशाच प्रसंगातून जाणाऱ्या पण योग्य वेळी योग्य उपदेश लाभल्याने सन्मार्गास लागलेल्या एका माळी कुणबी दांपत्याची गोष्ट महात्मा जोतीरावांनी सांगितली आहे.

यातील स्त्री गरोदर असताना एक भिक्षूक तिला अशुभाची भीती घालतो. पिडा टाळण्यासाठी गृहशांतीचा उपाय सुचवतो. नाना प्रकारच्या लटपटी खटपटी करून भूल थापा देतो. ओसरी मिळताच पाय पसरत जातो. अज्ञानापोटी ती स्त्री व तिचा पती त्याच्या भ्रमजाळ्यात अडकत जातात. पण अशावेळी एक पाद्री तेथे येतो आणि वस्तुनिष्ठ व तर्कशुद्ध युक्तिवाद करतो. नाटकाचा विदूषक त्या पती-पत्नीला जोशी व पाद्री यांच्या म्हणण्यातील फरक दाखवून सारासार विवेक करण्यास सुचवतो आणि विचारांती त्याचे डोळे उघडतात. जोशी कसा आपल्याला ठकवत होता हे त्यांना पटते आणि ते दोघे महात्मा जोतीरावांच्या शाळेत दाखल होतात. या साध्या कथानकाच्या क्रमात जोतीरावांनी मूर्तिपूजा व फलज्योतिष याप्रमाणेच सामाजिक विषमता व शोषण यांचीही चिकित्सा केली आहे. शेवटी विद्या शिकण्याचे महत्वही मांडले आहे. स्वतःला परमेश्वराचे अवतार म्हणून समाजात वावरणारे, चमत्कार करणारे, सिद्धीचा दावा करणारे, बुवा, बाबा, महाराज, स्वामी, सद्‌गुरू, संत, महंत अशा नावांनी ओळखले जाणारे कित्येक बनावट लफंगे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला आव्हान देत असतात आणि कसोटीची वेळ आली म्हणजे एक तर पळपुटेपणा करतात किंवा तोंडघशी पडतात. त्यातल्या काही गुन्हेगारी वृत्तीच्या 'सिद्धां'ना तर तुरूंगाची हवाही चाखावी लागते. ही मंडळी अंधश्रद्ध भक्तांना पैसा अडक्याने तर लुबाडतातच. पण त्यांच्या बायकामुलींनाही नादी लावतात आणि त्यांच्या संसारांची धूळधाण करतात असा नेहमीचा अनुभव असतो. महात्मा फुलेंनी या ढोंगी गुरूजीचा खरपूस समाचार घेतला आहे.

निर्मिकाचे स्मरण मानवाने विशुद्ध स्वरूपात करावे, त्यास कोणताही मानवी व भौतिक आकार देऊ नये, यावर महात्मा फुलेंचा कटाक्ष होता. निर्मिकाचे प्रत्यक्ष दर्शन किंवा साक्षात्कार माणसाला घडूच शकत नाही, तेव्हा देवदर्शनाची कोणी आस बाळगणे किंवा आपल्याला ते झाले असल्याचे सांगत सुटणे ही महात्मा फुलेंनी शुद्ध वेडेपणाची व थापाडेपणाची उदाहरणे ठरवली आहेत. भक्तांना ईश्वरापर्यंत पोहोचवण्याचा दावा करणारे किंवा प्रत्यक्ष देवदर्शन घडवणारे सगळे धादांत खोटे बोलतात असे जोतीराव फुले म्हणतात. त्यांच्या मते एक तर भक्तांना ईश्वरापर्यंत नेण्यासाठी कोणत्याही

मध्यस्थाची मुळीच गरज नसते आणि दुसरी असे की ईश्वर कोणावरही आपला अनुग्रह दुसऱ्या कोणाच्या अनुज्ञेने करत नसतो. चमत्कार करण्याच्या आपल्या सामर्थ्याचा आपल्या चेल्याचपाटकांकरवी गाजावाजा करून घेणे हा तांत्रिक मांत्रिक, स्वामी महंतांचा नित्याचा उद्योग असतो. भोळे भाबडे व अज्ञानी शूद्र अशा बुवाबाबांच्या भजनी लागतात. त्यांचे चरणतीर्थ पिण्यात धन्यधन्य मानतात. याचे महात्मा फुलेंना दुःख होते. अशा पोटभरू भिक्षुकांचे व चमत्कारी तांत्रिक मांत्रिकांचे त्यांनी खूप वाभाडे काढले आहेत.

मंत्रतंत्र चमत्कार करणारे भोंदू मग ते ब्राह्मण असोत की ब्राह्मणेत्तर असोत महात्मा फुलेंनी त्यांना सारखेच धारेवर धरले आहे. बहुजनसमाज देव ऋषीच्या मागे लागतो याची कारणमीमांसा करताना ते लिहितात, 'आर्यब्राह्मणांनी आपले मतलब साधण्याकरिता समूळ ज्ञानहीन करून ठेविल्यामुळे त्यांच्यात सारासार विचार करण्याची ताकद नसल्यामुळे ते भुताखेतांवर भरवसा ठेवून मन मानेल त्या वीरांची सवारी अंगात घुमवून, पोरासोरांसह आपल्या अंगावरील साधणी टाकून आपले द्रव्य खराब करतात. त्यांचा औषध उपचारावर भरवसा नसल्यामुळे ते लुच्चड देवऋषीच्या नादी लागून आपल्या जीवास मुकतात. हे तथाकथित अवतारी पुरूषच काय मानव प्राण्यांपैकी कोणीही चमत्कार नावाची गोष्ट करू शकत नाही, असे ठाम प्रतिपादन महात्मा फुलेंनी केले आहे.

**मिथके उध्वस्त करण्याचे कार्य**

ज्या मिथकांचा जनमानसावर शेकडो वर्षापासून पगडा बसलेला असतो आणि ज्यामुळे त्यांच्या अंधश्रद्धांना खतपाणी मिळते. अशी मिथके उध्वस्त करण्याचे कार्य प्रत्येक काळातील अंधश्रद्धा निर्मूलकांना करावेच लागते. सत्ता, संपत्ती व विशेषाधिकार यांची समाजात परिपाठाने चालत आलेली विषम वाटणी कशी अस्तित्वात आली याचे 'ऐतिहासिक' स्पष्टीकरण आणि तीच कशी न्याय, रास्त व आवश्यक आहे अशी तिचे 'नैतिक' समर्थन करणे हे मिथकांचे सदा व सर्वत्र प्रयोजन असल्याचे आढळते. समाजव्यवस्था आहे जशी आहे तशीच टिकून राहण्यात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात ते त्या मिथकांना प्रयत्नपूर्वक जपत, जोपासत असतात.

पण ज्यांच्या दृष्टीने समाजपरिवर्तन घडवून येणे निकडीचे असते अशांना ती मिथके उलथून फेकण्याखेरीज गत्यंतरच नसते मिथके जनमनात अभंग ठेवून समाजपरिवर्तनाची कास धरणाऱ्या धुरिणांना पुढे पाऊल टाकताच येत नाही त्यांना मिथकविध्वंसन हे करावेच लागते. विष्णूच्या दशावतारांचीही अशीच भंबेरी महात्मा फुलेंनी उडवली आहे. तेथे केवळ अंधश्रद्धांची खिल्ली उडवून ते थांबत नाहीत, तर प्रत्येक अवताराशी संबंधित पुराणकथांचे त्यांच्या काळात शक्य होते तेवढे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्नही महात्मा फुलेंनी केला आहे. लोकांनी या अवतार कथांना शब्दशः प्रमाण मानून विविध अवतारांचे देव्हारे न माजवता त्या कथांमधून आपल्या इतिहासाचा वेध घ्यावा अशा शास्त्रीय दृष्टिकोनाचा प्रत्यय त्यांच्या या विवेचनात मिळतो. बुद्धीप्रामाण्यवाद, धर्माचे समाजशास्त्रीय विश्लेषण आणि इहवादी दृष्टिकोन ही महात्मा फुलेंच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्याची तत्ववैचारिक त्रिसूत्री म्हणता येईल, विश्वातील इतर सर्व पशुप्राण्यांपेक्षा मानव प्राण्यांचे वेगळेपण जर कशात असेल तर ते त्यांच्या सारासार विचार करण्याच्या क्षमतेत आहे, हे महात्मा फुलेंनी आवर्जून सांगितले आहे.

धर्मग्रंथ अपौरूषेय, ईश्वरनिर्मित किंवा ईश्वरी प्रेरणेतून निर्माण झालेले आहेत ही समजूत महात्मा फुलेंना बुद्धीप्रमाण्याशी विसंगत म्हणून ब्रह्ममूलक वाटते. धर्मासंबंधी मुळापासून बुद्धीप्रमाण्यवादी दृष्टीकोन न स्वीकारणारे ब्रह्मोसमाज किंवा प्रार्थनासमाज हे त्यांच्या मते, 'बाह्यात्कारी धर्मासंबंधी, परंतु आतून शूद्र राजकीय हेतूंनी रचलेल्या ब्रह्मगारूडावर केवळ झाकण घालण्यासाठी' अस्तित्वात आलेले होते. त्या संस्थांना जर खरोखर धर्मसुधारणा करायची असती तर त्यांनी हिंदू धर्मातील सर्व असत्ये हुडकून काढून त्या सर्वांवर हरताळीचा बोळा फिरवून उर्वरित सत्यांचा एक ग्रंथ केला असता. पण त्यांनी अशी परखड बौद्धिक चिकित्सा करण्याचे नाकारले आणि धर्मग्रंथांचे प्रामाण्य अबाधित ठेवले असा आक्षेप महात्मा फुलेंनी घेतला आहे. ऐहिक जीवनाला प्राधान्य मूर्तीपूजेने आत्म्याची उन्नती होणे तर दूरच उलट त्यास भ्रष्टता येते आणि मानवी ज्ञानालाही नीचत्व प्राप्त होते अशी महात्मा फुलेंची भूमिका होती. पवित्र देवस्थाने आणि तेथील जत्रा

यात्रा यात माणसाचे जीव, द्रव्य आणि उद्योग यांची अपरिमित हानी होत असल्यामुळे त्यास महात्मा फुलेंचा विरोध होता. आम्ही खऱ्या परमेश्वरास विसरलो आणि त्यामुळे कुकल्पनाजन्य भुताखेतांच्या भीतीने आम्हाला पछाडले. ईश्वराविषयीचा सर्व गुढवाद आणि अलौकिकवाद नाकारून त्यास मानवी आकलनाचा विषय महात्मा फुलेंनी केला आहे. ज्या सत्याचा त्यांनी पुरस्कार केला आहे ते सत्यदेखील अंतर्ज्ञानाने किंवा साक्षात्काराने वगैरे असणारे गुढसत्य नाही, तर नैसर्गिक घडामोडी आणि सामाजिक जीवनव्यवहार यांच्याकडे जागरूकतेने व जाणीवपूर्वक पाहून त्या सत्याचे कोणालाही आकलन होऊ शकते. बुद्धी आणि तर्क यांच्या मदतीने कोणालाही त्याचा शोध घेणे शक्य असते. ईश्वराचे पितृत्व आणि मानवमात्राचे भातृत्व हे असेच एक प्राथमिक सत्य असल्याचे महात्मा फुले सांगतात. ईश्वर कल्पना धर्माचरण आणि धर्मग्रंथ या सगळयांची रचना माणसांनीच केली असून ज्याने ती केली त्या वर्गाचे हितसंबंध स्वार्थी हितसंबंध त्यांच्याद्वारे सुरक्षित केले गेले आहेत. ही आज 'धर्माचे समाजशास्त्र' या नावाने ओळखली जाणारी भूमिका महात्मा फुलेंनी त्या काळात मांडली होती. महात्मा फुलेंचे असे स्पष्ट मत होते की, जगातील प्रत्येक धर्मग्रंथ हा त्या-त्या विशिष्ट काळाची निर्मिती असल्यामुळे त्यातील सत्ये कधीच त्रिकालबाधित असू शकत नाहीत. आणि दुसरे असे की ग्रंथकर्त्याचे पूर्वग्रह व स्वार्थ यापासून त्या ग्रंथातील तरतुदी कधीच मुक्त राहू शकत नाहीत.

प्रारब्ध, पापपुण्य, स्वर्ग नरक, सद्‌गती दुर्गती कर्मविषयक वगैरे कल्पनांमधील फोलपणा पटवून देताना माणसाच्या ऐहिक जीवनाचे प्राधान्य महात्मा फुलेंनी अधोरेखित केले आहे. माणसाला इथेच आणि याच आयुष्यात आपल्या बऱ्यावाईट कर्माची झाडाझडती घ्यावी लागते. त्यांच्या पापपुण्याचा ताळेबंद इथेच पूर्ण होतो. गेल्या जन्मीच्या पापपुण्याच्या आधारे या जगातील सामाजिक, आर्थिक विषमतेचे समर्थन करणाऱ्या, किंवा या जन्मातील आपल्या विपन्नावस्थेचा निमूट स्वीकार करून आणि पुढील जन्मात सुख मिळावे यासाठी आताचे दुःख बिनतक्रार पत्करून माणसाला जगायला सांगणाऱ्या कर्मविपाक सिद्धांताचा महात्मा फुले निषेध करतात. पुनर्जन्मावर

त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. त्यांच्या मते, जी उच्चनीचता जन्मसिद्ध असेल ती गुणकर्माधिष्ठित असूच शकत नाही. 'सदगुण दुर्गुण पिढीजात स्वभाव नाही' अशी शास्त्रीय भूमिका महात्मा फुलेंनी घेतली आहे. प्राक्तनात होते तैसेची घडले, बृहम्याने लिहिले खोटे नाही, अशा प्रारब्धवादी मानसिकतेला त्यांनी स्पष्ट शब्दात सोडचिट्टी दिली आहे. माणसांच्या मनात प्रारब्ध, नशीब किंवा दैववाद बळकावण्याची त्यांनी कारणमिमांसा केली आहे. माणसाची करणी आणि सामाजिक शक्ती यांच्यातील क्रियाप्रतिक्रियांचे आकलन न झाल्यामुळे माणसे या संकल्पनांवर विश्वास ठेवू लागतात असा निर्वाळा त्यांनी दिला आहे.

**धर्माविषयीचे परखड व मूर्तीभंजक चिंतन**

महात्मा फुलेंनी धर्मचिकित्सा केली. अनेक व्याख्याने दिली. वाद-विवाद केले. विविध माध्यमांचा वापर करून लोकांचा भ्रमनिरास केला. धर्माच्या नावाखाली लोकांची होत असलेली विविधांगी फसवणूक थांबावी यासाठी परोपरीने प्रयत्न केले. धर्माविषयीचे परखड व मूर्तीभंजक चिंतन महात्मा फुलेंनी केले असले तरी ते पाखंडी किंवा नास्तिक नव्हते. धर्मवर्तनाबाबत ते ढोंगीही नव्हते. सध्याही कधी न करता धर्माभिमानाचा खोटा आव आणून लोकांना चकवणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर, किंवा स्वतः सोवळे ओवळे आचरायचे नाही. जातीधर्मभेद मान्य करायचे नाहीत, तरीही केवळ लोकप्रियतेसाठी जुन्या मतांची वकिली करायची. असे दुटप्पी वर्तन करणारे टिळक यांच्यापेक्षा महात्मा फुले अगदी वेगळेच होते. त्यांनी कधी ढोंग केले नाही की कधी सवंग लोकानुरंजन केले नाही. तर्क, विवेक आणि समतेचे तत्व या निकषांवर प्रत्येक धर्मग्रंथातील तरतूद तपासण्याची शिफारस महात्मा फुलेंनी केली आहे, कारण भाराभर धर्मग्रंथ हेच या समाजातील अंधश्रद्धांचे सर्वात मोठे मूलस्त्रोत आहेत, याबद्दल त्यांना शंका नव्हती. पण याही बाबतीत आडमुठेपणा करायची महात्मा फुलेंची मुळीच तयारी नव्हती.

ईश्वर आणि धर्म यासंबंधी आपण कोणती भूमिका घ्यावी यावर आजही अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये बरीच मतमतांतरे आढळतात. ईश्वराच्या संदर्भात काहीजण स्वतःचा निरीश्वरवादाचा आग्रह

धरतात कारण त्यांच्या मते इतर सर्व अंधश्रद्धांचे मूळ ईश्वरांच्या अस्तित्वावरील विश्वासात असते ते कायम असेपर्यंत अंधश्रद्धा टिकून राहणारच. इतर काहीजण एवढी टोकाची भूमिका घेत नाहीत. आस्तिक्यवाद किंवा आज्ञेयवाद या विचारप्रणालीच्या अधलीमधली भूमिका ते मांडतात. धर्मासंबंधीही काही एक भूमिका चळवळीच्या कार्यकर्त्यांना घ्यावी लागते. कारण दरवेळी अंधश्रद्धांच्या विरोधात बोलायचे तर कोणत्या ना कोणत्या धर्माचे अभिमानी त्यांच्यावर चिडतात. आपलाच धर्म या कार्यकर्त्यांना दिसतो, दुसऱ्या धर्माच्या अंधश्रद्धांकडे मात्र ते कानाडोळा करतात अशी त्यांची तक्रार असते. या संदर्भातील चर्चा बहुदा अनिर्णितच राहते असा अनुभव आहे. महात्मा फुलेंचे ईश्वर विषयक व धर्म विषयक विचार आजच्या चळवळीला बरेच मार्गदर्शन ठरू शकते.

महात्मा फुलेंच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्यापासून आजच्या त्या क्षेत्रातील कार्यकर्त्यांना चळवळीचे नेतृत्व, चळवळीची तंत्रे व पथ्ये, संघटना बांधणी, कार्यक्रमातील समतोल अशा किती तरी गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत. कोणत्याही चळवळीचे यशापयश बव्हंशी तिला कसे नेतृत्व लाभते यावर अवलंबून असते. नेतृत्व जर दृष्टे, विचारी, विवेकी, कल्पक, संघटनकुशल, प्रबोधनचतुर, दूरदृष्टीचे आणि कालप्रवाहाची दिशा अचूकपणे ओळखणारे असेल तर सर्व प्रभावी होते. अर्थात, चळवळ एका माणसाची कधीच नसते. एकविचाराने व एकदिलाने एकत्र आलेले अनेकानेक हात चळवळ पुढे नेत असतात. कार्यकर्त्यांचा संच जमवून, त्यांची वैचारिक मशागत करायची आणि त्याला सतत कृतिप्रवण प्रमाण ठेवायचे हे कार्य प्रत्येक चळवळीला पद्धतशीरपणे पार पाडावेच लागते. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाने हे कार्य उत्तम प्रकारे केले होते. समाजाच्या विविध स्तरांमधून त्यांच्या कार्याला त्यामुळेच प्रतिसाद मिळाला होता. त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये सरकारी अधिकारी, व्यापारी, डॉक्टर, कंत्राटदार, सुशिक्षित व्यावसायिक यांच्यापासून ते शेतकरी, शेतमजूर आणि मामुली व्यापाऱ्यांपर्यंत अनेकांचा अंतर्भाव होता.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यच असे आहे की, त्यातून ज्यांचे हितसंबंध दुखावतात त्यांचा तर विरोध होतोच पण जुन्या वळणाला सरावलेला बहुजन

समाजही चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या विरोधात उभा राहतो. आजही हा अनुभव विरळा नाही. महात्मा फुलेंच्या काळात तर या दुहेरी विरोधाची धार किती तीक्ष्ण असेल याची आपण कल्पना करू शकतो. विशेषतः चळवळीच्या प्रभावाखाली येऊन जे कोणी धिटाईने रूढीबाह्य वर्तन करू लागत तेव्हा त्यांच्यावर ही समाज प्रखर रोष व्यक्त करीत असे. त्यांना बहिष्कृत करणे, किंवा त्यांचा बूद्धीभेद करणे, किंवा नव्या पद्धतीने त्यांनी लग्न व इतर विधी केल्यास त्यात गोंधळ घालणे असे प्रकार नेहमीच होत असत. अशा प्रसंगी ते समारंभ सुरळीतपणे पार पडावेत आणि चळवळीला साथ देणाऱ्यांचे नीतीधैर्य टिकून राहावे याकडे महात्मा फुले आवर्जून लक्ष देत असत. त्यासाठी गरज पडल्यास पोलिसांचे संरक्षण तर घेतच, पण आपल्या महार मांग अनुयायांचे हुकमी पाठबळ ही चळवळीच्या पाठीशी त्यांनी उभे केले होते. गं.बा. सरदार म्हणतात त्याप्रमाणे, 'आपल्यावर विश्वासून आपल्या रूढी भंजनांच्या कार्यात ज्यांनी भल्याबुऱ्या परिणामांची फिकीर न करता आपल्याला तत्परतेने साथ दिली, त्यांच्यावर जर यामुळे काही संकट ओढवले तर महात्मा फुले खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहत असत.

**सारांशः**

महात्मा फुलेंच्या काळात विस्तारत गेलेली अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ पुढे फार काळ टिकाव धरू शकली नाही. याची अनेक कारणे सांगता येतील. त्यांच्या पश्चात त्यांची चळवळ या सधन व्यापारी, राजेरजवाडे व जमीनदार वर्गाच्या हाती गेली, त्या वर्गांना महात्मा फुलेंच्या सामाजिक ध्येयवादाशी फारसे देणेघेणे वा कर्तव्य नव्हते. बहुजन समाजात जो नवशिक्षित मध्यमवर्ग पुढे आला होता. त्याला रूढी भंजनाच्या कार्यात फारशी रूची नव्हती. महात्मा फुलेंच्या चळवळीतील ब्राह्मणवर्चस्वविरोध आणि ब्राह्मणी मक्तेदारीला विरोध हेच या वर्गाला भावले. त्यांनी आपल्या राजकारणासाठी त्या मुद्यांचा वापरही करून घेतला. मात्र समाजाला धार्मिक, सांस्कृतिक गुलामगिरीच्या मगर मिठीतून सोडवायची निकड त्यांना मात्र जाणवली नाही. किंबहुना स्वतः शिक्षण घेऊन पांढरपेशा व्यवसायात प्रवेश घेऊनही हा वर्ग आपल्या अशिक्षित बांधवा इतकाच परंपराभिमानी व अंधश्रद्धाळू राहिला.

अंधश्रद्धेचे मूळ अज्ञानात आहे आणि अज्ञान दूर होताच अंधश्रद्धाचे निर्मूलन होईल असा महात्मा फुलेंचा निष्कर्ष व विश्वास होता. तो नवशिक्षित बहुजन वर्गाने खोटा पाडला किंवा असे म्हणता येईल की सुविद्य होऊनही या वर्गाची 'अविद्या' कायमच राहिली. आजही अशिक्षिताइतकीच गरज सुशिक्षितांच्या अंधश्रद्धा दूर करण्याची आढळते.

अंधश्रद्धा निर्मूलनाची नितांत गरज आहे हे खरे. अनेक शतकांच्या समजूती अज्ञानामुळे अधिकच दृढ होत जातात. वरचेवर त्या अधिक घट्ट बनविण्यासारखे आयुष्यात अपयशाचे प्रसंगी येतात. हे वास्तव लक्षात घेऊनच अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य होऊ शकेल. ते झटपट होण्यासारखे नाही. अर्थात त्याबरोबरच कार्यही चिकाटीने होणे अगत्याचे आहे. विज्ञान, त्यातून निर्माण होणारी तार्किक दृष्टी आणि प्रत्यक्ष अनुभव या सर्वांचा उपयोगही अंधश्रद्धा निर्मूलनासाठी होऊ शकतो. सामान्य माणसाला बुद्धीप्रमाण्याची कल्पना कदाचित लगेच समजू शकणार नाही. पटणार नाही. पण आपल्याला झालेला शारीरिक व मानसिक आजार केवळ कोणाच्यातरी आशीर्वादाने किंवा मंत्रतंत्राने बरा होत नाही. त्यासाठी आजाराचे योग्य निदान झाले पाहिजे आणि त्यावर योग्य उपचारही करून घेणे आवश्यक असते. ही गोष्ट सामान्य माणसालाही पटू शकेल. व मग त्याची त्या कारणापूरती तरी अंधश्रद्धा कमी होऊ शकेल. या व अशाच मार्गांनी प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी विचार व प्रचार रूजवून अंधश्रद्धा निर्मूलन होऊ शकेल. अंधश्रद्धेचे निर्मूलन करणारा कार्यकर्ता मात्र बुद्धीप्रमाण्यवादी, विवेकवादी, समाजहितबुद्धीच्या प्रेरणेने व निष्ठेने काम करणारा असला पाहिजे. रोग जुनाट आहे पण तो निश्चितपणे बरा होणारा आहे. हे आशावादी विचारसूत्र सतत लक्षात ठेवावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

१) नरके, हरी.(संपा.) १९९३. आम्ही पाहिलेले फुले. मुंबईः महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन.

२) फडके, य. दि.( संपा.) १९९१. महात्मा फुले समग्र वाड्मय. (सुधारित चौथी आवृत्ती) मुंबईः महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ.

३) सरदार, गं बा.आणि इतर (संपा.) १९९०. महात्मा फुले प्रेरणा व तत्त्वज्ञान. औरंगाबादः महात्मा फुले प्रतिष्ठान प्रकाशन मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद.

४) गर्गे, स.मा.(संपा.) १९९७. समाजसुधारक आणि अंधश्रद्धा. पुणे : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती प्रकाशन.

५) गुंदेकर, श्रीराम रावसाहेब. १९८५. महात्मा ज्योतिबा फुले संदर्भ विचार आणि वांड्मयीन कार्य. औरंगाबादः डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मराठी विभागात सादर केलेला अप्रकाशित पीएच.डी प्रबंध.

६) कीर, धनंजय. आणि मालशे (संपा.) १९८०. महात्मा फुले समग्र वाड्मय. (द्वितीय आवृत्ती) मुंबईः महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

७) मगर एन.आर.१९८५. जोतीराव फुल्यांची समाज परिवर्तनाची निती. औरंगाबादः कैलास प्रकाशन.

८) वैद्य, प्रभाकर.१९८२.महात्मा फुले आणि त्यांची परंपरा. मुंबई; लोकवांड्मय गृह प्रा. लि.

● ● ●

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कार्य

**डॉ. कैलास वानखडे**
प्रोफेसर, मराठी विभाग,
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अकोला मो. ९४२१७९२८३३

**प्रस्तावना**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे विविध पैलू आहेत. समाजसुधारणा, जाती प्रथांचे निर्मूलन, भेदाभेद निर्मूलन, वंचितांना अधिकार मिळवून देणे, देशहितासाठी सतत कार्य करणे अशा अनेक आघाड्यांवर त्यांनी मूलभूत स्वरूपाचे कार्य केले आहे. भारतीय समाजात अज्ञान आणि अंधश्रद्धा ही त्या काळात मोठ्या प्रमाणावर होती आणि आजही आहे. देवाधर्माचा मानवी मनावर, बुद्धीवर आज विज्ञान युगातही जबरदस्त पगडा आहे. माणसाच्या कर्तृत्वाचे श्रेय देवाधिकांना दिल्या जाते. माणसाच्या जीवनावर नियंत्रण करणारा कोणीतरी देव आहे, हा विचार आजही समाजमनात रूतून बसलेला आहे. अर्थात या विचातूनच अंधःपणे विश्वास ठेवण्याच्या प्रथा परंपरा समाजात रूढ झाल्या आहेत. या प्रथा परंपरांच्या निर्मूलनाचे कार्य करण्यासाठी अनेक महापुरुषांनी कार्य केले आहे. परंतु या देशांमध्ये महान व्यक्तींच्या मृत्यूनंतर साधारणतः शंभरेक वर्षांनी त्यांचा देव केला जातो. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, संत गाडगे बाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्व महापुरुष असूनही त्यांना समाजाने देव बनवलेले दिसून येते. त्यांना माणूस म्हणून न स्वीकारता देव म्हणून स्वीकारले जाते. खंडोबा, म्हसोबा, मल्हारी यासारखे याचे अनेक दाखले ज्योतिराव फुले यांनी आपल्या 'गुलामगिरी' या ग्रंथातून दिलेले आहेत. ज्या विचारांवर अंधःपणे विश्वास ठेवतो त्याला अंधश्रद्धा म्हटले पाहिजे. याविषयी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा व कार्याचा आढावा घेणे व

या अनुषंगाने त्यांच्या कार्यावर प्रकाश टकणे हाच या शोधनिबंधाचा हेतू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फार मोठे समाजचिंतक व समाजशास्त्रज्ञ होते. हिंदू धर्माचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. हिंदू धर्मामध्ये त्यांना महत्त्वाचे दोन भाग दिसले. 'धर्माचे तत्त्व' आणि 'समाजाचे आचरण' हेच ते दोन भाग आहेत. या दोघांमध्ये त्यांना प्रचंड तफावत दिसली. राजकीय व सामाजिक सत्ता कायमस्वरूपी आपल्या हातात राहावी यासाठी त्याला धर्माचे आवरण घातले. स्वर्ग-नर्क, पाप-पुण्य यासारख्या संकल्पना योजून माणसाच्या मनात धर्माची भीती रूजविली. आत्मा, पुनर्जन्म या आधारे बुद्धीला वेसन घातली. ग्रंथ प्रामाण्याला आचरण बनवल्यामुळे व त्याविरूद्ध वागणाराला बहिष्काराच्या शस्त्राने धाकात ठेवल्यामुळे, आत्मा, अवतार, चमत्कार, दैव, प्रारब्ध अशा गोंडस नावाखाली माणसाच्या मनात अंधश्रद्धांची रूजवन झाली आहे. याचा साधा अर्थ असा की समाजातील अंधश्रद्धांचे मूळ धर्माच्या तत्त्वात नसून आचरणात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अंधश्रद्धा विषयक कार्य कोणते याविषयी विचार करता आपले सर्वप्रथम लक्ष केंद्रित होते त्यांच्या धार्मिक चळवळींवर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा आत्मा, अवतारवाद, चमत्कारवाद, वेदप्रामाण्य इत्यादी विषयांवर हल्ला चढवतात तेव्हा ते अंधश्रद्धा निर्मूलनाकरिता केलेल्या प्रबोधनाचाच एक भाग असतो. या देशांमध्ये साधुसंतांनी जसे अंधश्रद्धा निर्मूलनाचे थेट कार्य केले, समाजात जाऊन कीर्तन, भजन, गायन, पोवाडे, भाषणांद्वारे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले तसे अगदी एकच विषय घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्य जरी केले नसले तरी, त्यांच्या कार्याच्या मुळाशी धर्मातील अंधश्रद्धा नष्ट करणे हेच ध्येय होते, कारण त्याकाळी समाजामध्ये अंधश्रद्धेपेक्षाही भयंकर जातीप्रथांचे आणि स्पृशास्पृश्यतेचे निर्मूलन करणे हा त्यांच्या कार्याच्या केंद्रस्थानी असलेला विषय एका अर्थाने अंधश्रद्धेचाच भाग होता कारण तो बुरसटलेल्या धर्माच्या आधारावरच पोसलेला होता.

जन्मतः सर्व मानव समान असूनही केवळ त्याचा जन्म ज्या जातीत

झाला आहे, त्यावरून त्याचा दर्जा ठरवण्याची प्रथा भारतीय हिंदू समाजात होती. शूद्रवर्णीयांना हीन मानणे, अस्पृश्यांना तर पशुपेक्षाही वाईट वागणूक देण्याची प्रथा इथे होती. हे कोणत्याही धर्माचे तत्व होऊ शकत नाही. पण समाजाचे आचरण मात्र तसेच होते. हे आचरण बदलण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी महाड इथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला, मनुस्मृति ग्रंथाचे दहन केले, अंबादेवी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह केला. शेवटी हिंदू धर्मातील लोक अस्पृश्यांना माणूस मानायला तयारच होत नाहीत म्हणून नाईलाजाने त्यांनी तो धर्म सोडून दिला व समतावादी बौद्ध धम्म स्वीकारला. ही सर्व कृती केवळ सामाजिक परिवर्तनासाठीच नव्हे, तर समाजात रूजलेल्या वेडगळ प्रथा-परंपरा, अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी होती.

माणसांच्या स्पर्शाने पाणी बाटत होते, देव बाटत होते, देऊळ बाटत होते. ही समाजात रूजलेली अंधश्रद्धाच तर होती! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची निर्मिती ब्रह्माच्या विविध अवयवांपासून झाली असे मानणे, ही समाजातील अंधश्रद्धाच तर होती! आत्मा अमर आहे, तो एका देहातून दुसऱ्यात प्रवेश करतो, आत्मा मरत नाही असे मानणे, ही सुद्धा अंधश्रद्धाच आहे. संकटकाळी देव आपल्या मदतीला धावून येतो, हे सुद्धा अंधश्रद्धाच आहे. डॉ. आंबेडकर यांनी या सर्वांचा धिक्कार केला. माणूस जन्माने नाही तर आपल्या कर्माने श्रेष्ठ होतो. हे स्वतःच्या कर्तृत्वातून दाखविले. समाजात रूढ असलेल्या चुकीच्या प्रथा परंपरांची चिकित्सा करण्याचे शिकविले. बुद्धाने आत्मा नाकारला, भेदाभेद नाकारला, सर्वांना समतेचा मार्ग दिला, तो धम्म या देशात रूजवणे हे डॉ. आंबेडकरांचे अंधश्रद्धा निर्मूलनातील सर्वात मोठे कार्य आहे.

कोणत्याही माणसाला फसवून, धाक दाखवून गुलाम बनवणे, त्याला तुच्छ समजून त्याचा छळ करणे, मानवी अधिकाऱ्यांपासून त्याला वंचित ठेवणे, त्याच्यावर अनन्वित अत्याचार करणे, हा आपला धार्मिक अधिकार समजणे व शोषित घटकाने सुद्धा 'त्यालाच' आपले नशीब म्हणून सहन करणे. हे सुद्धा अंधभावना या समाजात रूजलेली होती. डॉ. आंबेडकर यांनी या शोषितांना कायद्याचे कवच दिले, राज्यघटनेत त्यांना अधिकार

बहाल केले आणि त्यांनाही माणूस म्हणून जगण्याचे बळ दिले. हे सर्व कार्य तत्वचिंतनाच्या दृष्टीने समाजातील चुकीच्या प्रथा परंपरांच्या निर्मूलनासाठीच केलेले आहे.

धर्माचे तत्व सांगणारा समाजामध्ये सर्वोच्च मानल्या गेल्यामुळे, तो जे सांगेल तेच सत्य मानावे, त्याला विरोध करू नये. असा अलिखित नियमच समाजामध्ये त्याकाळी प्रचलित होता. आपल्या जीवनात कोणताही वाईट प्रसंग घडला की त्याचे कारण धार्मिकतेशी जोडायचे. तुम्ही अमूक केले नाही म्हणून तुमच्या घरात बिमारी आली. तुम्ही तमुक केले नाही म्हणून तुमच्या घरात सुख नांदत नाही. अशा एक ना अनेक प्रसंगांच्या माध्यमातून धर्माच्या आधाराने, देवाच्या आधाराने अंधश्रद्धा माणसाच्या डोक्यात शिरते व बुद्धीप्रामाण्यवादाचा नाश करते. हिंदूधर्मीय माणसाच्या मनात सर्वात मोठी भीती ही धर्माची असते म्हणून डॉ. आंबेडकरांनी तो धर्मच सोडून दिला, हे कार्य अंधश्रद्धा निर्मूलनाच्या दृष्टीने अत्यंत मूलगामी स्वरूपाचे आहे.

नानकचंद रत्तू हे लेखनिक म्हणून काम करीत होते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांशी त्यांची बऱ्याचदा चर्चा होत होती. या अनुषंगाने नानकचंद रत्तू हे डॉ. आंबेडकरांविषयी लिहितात ‘देव-देवता, पुनर्जन्म, आत्म्याचे दुसऱ्या शरीरात प्रवेश करणे, संमोहन, तंत्र-मंत्र आणि फलज्योतिष्य यापैकी कशावरही त्यांचा विश्वास नव्हता. त्यांच्या मते या सगळया अंधश्रद्धा असून शतकांनुशतके त्यांचा मानवी मनांवर पगडा आहे. अनेक कुटुंबे त्यांच्यामुळे उध्वस्त झाली आहेत. आजही त्यांना या ना त्या प्रकारे प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न होतच असतात. जाती धर्म जन्मावर आधारित विषमता, श्रीमंती या आधारावर भेद न करता माणसांचे योग्य संबंध  जोडण्यावर त्यांचा कटाक्ष होता. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यावर आधारित समाजव्यवस्था त्यांना उभी करायची होती. त्यांच्या तत्त्वज्ञानाचे मूळ राज्यशास्त्रात नव्हे, तर धर्मात होते आणि भगवान बुद्धाच्या शिकवणुकीतून त्यांनी ते उचललेले होते.”  त्यांना हे तत्त्व कळून चुकले होते की बौद्ध धम्म हा प्रज्ञा शिकवितो म्हणजेच अंधश्रद्धा आणि निसर्गातीततावाद यांच्या ऐवजी बुद्धीवाद शिकवतो.

डॉ.आंबेडकरांनी समाजातील अंधश्रद्धांना व्यसन घालण्यासाठी बौद्ध धर्मीयांना बावीस प्रतिज्ञा दिल्या व त्यांचे पालन करण्याची सूचना केली. या बावीस प्रतिज्ञा म्हणजे त्यांनी केलेले अंधश्रद्धा निर्मूलनाचे मूलभूत कार्यच आहे. 'या प्रतिज्ञांमध्ये कोणत्याही देव देवतांचा अपमान करण्याचा उद्देश नसून सत्य शोधण्याच्या माध्यमातून या देशातील बहुसंख्य जनतेला हिंदू धर्माच्या अंधश्रद्ध मानसिकतेतून मुक्त करण्याचा एक भक्कम प्रयत्न आहे' असे मत आंबेडकरी विचारवंत भाऊ लोखंडे यांनी आपल्या ग्रंथामध्ये नमूद केले आहे. डॉ. आंबेडकरांनी हिंदुधर्मातील या अंगाच्या विरोधात आयुष्यभर जनप्रबोधनाची वैचारिक चळवळ उभारली होती. अंधश्रद्धानिर्मूलनाची चळवळ ही गूढवादी, अगम्य अशा श्रद्धांच्या विरोधातील चळवळ आहे.

चमत्कार मानने म्हणजे एक प्रकारे अंधश्रद्धा स्वीकारणेच होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदू धर्माचा त्याग करण्यामागे त्या धर्मातील चमत्कार व अवास्तव वर्णन हे सुद्धा एक कारण होते. कृष्णाच्या सोळा हजार आठशे बायका, गणपतीचे पार्वतीच्या अंगावरील मळापासून उत्पन्न होणे, माणसाच्या देहाला हत्तीचे शिर लावणे, ब्रह्मा -विष्णू - महेश यांची निर्मिती श्री नावाच्या देवतेने तळहाताच्या फोडातून केल्याचे सांगणे, अशा अनेक चमत्कारिक गोष्टी हिंदू धर्मात मानल्या जातात. या सर्वांना मान्य करणे म्हणजे ती अंधश्रद्धाच असल्याचे डॉ. आंबेडकरांनी सुचित केले आहे. त्यामुळेच त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करून विज्ञानवादी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. हे अंधश्रद्धेच्या विरूद्ध केलेले डॉ. आंबेडकरांचे मूलभूत कार्यच आहे. डॉ. आंबेडकर हिंदुधर्माची चिकित्सा करतात तेव्हा हिंदुधर्माच्या या विविध रूपांतील अध्यात्मवादी, गूढवादी शक्तिस्थानांनाच धक्का देत असतात. बुद्धिवाद, विवेकशीलता, मानवतावाद या आधारे ते प्रश्न उभे करतात त्याचवेळी बौद्धधर्म स्वीकारण्यामागची कारणमीमांसा स्पष्ट करत जातात.

**समारोप**

भारताच्या प्रबोधन चळवळीत धर्मसुधारणेचे आग्रही प्रतिपादन करीत बाबासाहेब अग्रभागी राहतात. 'बुद्ध आणि त्याचा धम्म', 'शूद्र पूर्वी कोण होते?', 'जातिनिर्मूलन', 'रिडलस् ऑफ हिंदुइझम' अशा ग्रंथसंपदेतून त्यांनी

सनातनी ब्राह्मणी व्यवस्थेवर वैचारिक हल्ले केले. 'बहिष्कृत भारत', 'प्रबुद्ध भारत', 'जनता' यासारख्या नियतकालिकांतून हिंदुधर्म व समाजव्यवस्था, बुद्ध धम्म आणि त्याची शिकवण, अस्पृश्यता-जातिभेद आणि त्यांचे निर्मूलन यांची अखंडपणे चर्चा केली. सभा संमेलनातूनही त्यांच्या महानिर्वाणापर्यंत ते या जनसागराच्या आघाडीवर अथकपणे कार्यरत राहिले. परंतु धर्मविषयक प्रबोधनाबाबत त्यांची भूमिका केवळ विचारवंतांपुरती सीमित राहिली नाही. अस्पृश्यता, जातिभेद व स्त्रीदास्य यांना पावित्र्य प्रदान करणारा तत्त्वविचार व व्यवहार याविरोधात संघर्षाची भूमिका घेऊन त्यांनी जनलढेही उभारले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह (१९२७), काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०-३५), मुखेडचा पांडवप्रताप-सत्याग्रह (१९३२) पर्वती-सत्याग्रह अशा लढ्यांतून त्यांनी धर्मश्रद्धा व अंधश्रद्धा यासंबंधीच्या चिकित्सेच्या लाटा भारतभर उसळवीत ठेवल्या.

**निष्कर्ष**

१. अंधश्रद्धांचा प्रश्न धार्मिक श्रद्धा-व्यवहार या स्वरूपात धर्माच्या विचारव्यवहारात असतो.

२. समाजशास्त्रात तो अध्यात्मवादी प्रभावाच्या रूपाने तर साहित्यात आत्मा, ब्रह्म, चातुर्वर्ण्य, परतत्त्व या ब्राह्मणी तत्त्वांच्या उदात्तीकरणाच्या रूपाने दडलेला असतो.

३. बाबासाहेबांनी स्वीकारलेल्या बुद्ध तत्त्वाच्या वारशामुळे त्यांची भारतीय धर्मसुधारणा व प्रबोधनातील कामगिरी समकालीन समाजसुधारकांच्यापेक्षा वेगळी ठरते.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, नानाकचंद रत्तू, भाषांतर- भास्कर लक्ष्मण भोळे, प्रथम आवृत्ती १९९८, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य, संपादक - भाऊसाहेब अडसूळ, दुसरी आवृत्ती १९९६, सुगावा प्रकाशन पुणे

३. दिशा चिंतनाची : हरीश खंडेराव यांची आंबेडकरवादी साहित्य समीक्षा, संपादक-आनंद चक्रनारायण, प्रथम आवृत्ती २०२२ प्रज्ञा प्रकाशन उल्हासनगर

ठाणे
४. बावीस प्रतिज्ञा, भाऊ लोखंडे, प्रथम आवृत्ती २००५, सुधीर प्रकाशन, वर्धा
५. महामानव : आपला आदर्श आपली प्रेरणा, संपादक - वैशाली रोडे, प्रथम आवृत्ती २०१७, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई
६. सर्वदर्शी डॉ बाबासाहेब आंबेडकर, संपादक - डॉ. पी विठ्ठल डॉ. नागोराव कुंभार, प्रथम आवृत्ती २०१६, डायमंड पब्लिकेशन, पुणे
७. क्रांतीनायक : डॉ बाबासाहेब आंबेडकर, प्रा. सुरेश खोब्रगडे, प्रथम आवृत्ती २०२०, प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर
८. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, लेखक डॉ. भीमराव रामजी आंबेडकर विशेष आवृत्ती १९९७, धम्म शासन विश्व विद्यापीठ पब्लिकेशन

● ● ●

# क्रांतिसूर्य म.फुले आणि अंधश्रध्दा निर्मूलन

**प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे**
समाजशास्त्र विभाग,
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि.बुलडाणा.
इ-मेलः ubale971@gmail.com
मो.नं.९९२१८३२९९४

**प्रस्तावना**

भारतीय समाजात प्रचिन काळापासून अनेक अंधश्रध्दा रुजलेल्या आहेत. वेगवेगळ्या संस्कृतीमध्ये आणि युगामध्ये अंधश्रध्देचे वेगवेगळे अर्थ आहेत. या सर्व अर्थांना एकत्र जोडणारी गोष्ट म्हणजे अंधश्रध्दा नकारात्मक असतात. अनेक रुढी, प्रथा, प्ररंपरा, चालीरिती, धर्म परंपरा या अंधश्रध्देने ग्रासलेल्या असतात. या अंधश्रध्दा व्यक्ती हिताबरोबरच सामाजिक हिताला बाधक ठरत असतात. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या असतात. अनेक अंधश्रध्दामुळे समाजातील अनेक गटांना छळले जाते, त्यांचे शोषण केले जाते. त्यांना अमानुषतेने वागविले जाते. जेव्हा या छळाचे , शोषणाचे प्रमाण वाढत जाते. तो छळ असह्य होतो. तेव्हा त्या विरुध्द असंतोषाची आग समाजात घुमसू लागते.

हिंदू धर्मात धर्माच्या नावाखाली अनेक चालीरीती, व्रत वैकल्य, पुजा आर्चा, प्रार्थना, वर्णव्यवस्था, स्पृश्य-अस्पृष्य भावना, देव-दानव यामुळे अनेक अंधश्रध्दा पसरवून काही कर्मठ प्रवृत्तीच्या लोकांना शोषणाचे, अन्याय, अत्याचाराचे जणू हत्त्यारच मिळाले होते. आजही या अंधश्रध्दा समाजातून संपलेल्या नाहीत. २०२३ मध्ये देशाच्या संसद भवनाच्या उद्‌घाटनास देशाची राष्ट्रपती एक  आदिवासी स्त्री आहे, शिवाय ती विधवा आहे म्हणून त्यांना बोलावले जात नाही. राष्ट्रपती देशाचा प्रथम नागरीक असतो. चंद्रयान मोहिम यशस्वी झाल्यानंतर सर्व टिम देवदर्शनाला जाते. मोठ-मोठे विव्दान, राजकारणी, साधु महाराजांच्या दर्शनास जातात. त्यांच्या आशिर्वादासाठी आसूसलेले असतात.

डॉक्टर शस्त्रक्रियेसाठी जातांना देवास प्रार्थना करतात, देवाचे दर्शन घेतात. या अंधश्रध्दाच नाहीत का?

**अंधश्रध्देचा अर्थ :-**

अंधश्रध्दा ही एक लोकांची श्रध्दा किंवा सामाजिक प्रथा आहे. अंधश्रध्दा या निरक्षरतेतून उद्‌भवतात हा गैरसमज आहे. वैज्ञानिक ज्ञानाच्या समाजात प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात नसल्यामुळे परंपरेने लोकांच्या मनात घालून दिलेली भिती, बालपणापासून झालेले संस्कार, सामाजिक दबाव यामुळे या श्रध्दा माणसाच्या मनात ठाम होत जातात. देव, दानव, भूत, प्रेत, धार्मिक श्रध्दा व रुढी, मंत्र, जादूटोणा, उच्च-निच्च भावना, स्पृष्य - अस्पृष्य भावना, स्वर्ग- नरक या सारख्या अनेक अंधश्रध्दा या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केल्या जातात.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात य अंधश्रध्दांचे प्रमाण समाजात प्रचंड प्रमाणात वाढते होते. बहुजन समाज या अनिष्ट रुढी व अंधश्रध्दांनी भरडला जात होता, पिळला जात होता. मानवतेचा गळा घोटणाऱ्या सती प्रथा, केशवपन, जातीभेद, अस्पृश्यता, कर्मकांड, यज्ञ, कठोर वर्णव्यवस्था या सारख्या अनेक रुढी व अंधश्रध्दांनी समाजातील लोकांचे जीवन मरणासन्न अवस्थेत पोहचले होते. काही स्वार्थी व धूर्त लोक लोकांना या अंधश्रध्देत अडकवून स्वतःच्या व स्वजातीच्या हितात मग्न होते.

अंधश्रध्देच्या या फासामधून बहूजन समाजाला बाहेर काढण्याचे कार्य अनेक थोर महापुरूषांनी केले. मानवतावाद, पश्चात्य शिक्षण, बाह्य जगातील लोकांचे वर्तन यांचा प्रभाव या महापुरूषावर पडला होता. या महापुरूषांमध्ये स्त्रिया ही मागे नव्हत्या क्रांतीसूर्य म.फुले व क्रांतीज्योती सावित्रीफ्राई फुले यांनीही या अंधश्रध्देतून समाजाची सुटका व्हावी म्हणून आपले सर्वस्व अर्पण केले.

समाजात प्रचलित असलेल्या अनिष्ट रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा यांच्या मुळासी असलेले एकमेव कारण म्हणजे अज्ञान होत. हे राष्ट्रपिता

म.फुलेंनी ओळखले होते. समाजाची हीन दीन अवस्था पाहून फुले अस्वस्थ होते. त्यासाठी त्यांनी मुलींना शिक्षण देण्यासाठी १८४८ मध्ये शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. हाच म.फुले यांचा निर्णय समाजातील अंधश्रध्दांचा कर्दनकाळ ठरला असे म्हणावे लागेल.

म.फुल्यांनी समाजातील धार्मिक व सामाजिक गुलामगीरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नामुळे बहुजन समाजात मोठ्या प्रमाणावर जागृती झाली. हि धार्मिक व सामाजिक स्थिती ईश्वरनिर्मित आहे. त्यामध्ये बदल करणे, धार्मिक व सामाजिक नियम नाकारणे म्हणजे महापाप, दुष्कर्म समजल्या जात असे. या धार्मिक व सामाजिक गुलामगीरीला नाकारण्याचा व त्या मागील सत्य समाजाला कळण्यासाठी समाजात शिक्षण प्रसार होणे अत्यंत आवश्यक होते. घरातील स्त्री शिकली म्हणजे संपूर्ण कुटूंब शिकेल, मुलांवर योग्य संस्कार होतील म्हणून म.फुल्यानी सन १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या मुलींच्या शाळेत महिला शिक्षिका मिळत नसल्यामुळे स्वतःच्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई यांना घरी शिकवून १८७३ ला शिक्षिका बनविले. ज्या काळात स्त्रीला मनू व्यवस्थेने कोणतेच स्वातंत्र्य दिले नव्हते, 'चुल आणि मुल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र मर्यादित केले होते. स्त्रिशिक्षण पाप समजले जात होते. त्या काळात म.फुले यांच्या प्रेरणेने व सहकार्याने सावित्रीबाईंनी ज्ञान घेवून, शिक्षण घेवून शिक्षिका बनावे. हजारो वर्षापासून अज्ञानाच्या रुढीच्या अंधारात चाचपडणाऱ्या स्त्री शुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्ट भारताच्या इतिहासात अपूर्व आहे. सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या शिक्षिका, स्त्री मुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या. पददलितांच्या कैवारी व प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या होत्या. हे इतिहासाला विसरता येणार नाही.

१८ व्या शतकाच्या अगोदरपासून भारतामध्ये वर्ण व्यवस्था होती. शुद्र आणि अतिशुद्रांना वरच्या वर्गाची सेवा करण्याचे काम या व्यवस्थेत होते. त्यांना कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य व अधिकार नव्हते. ही व्यवस्था ईश्वर

निर्मित आहे ती सर्वांना मान्य असलीच पाहिजे, अशी ही अंधश्रध्दा होती. म.फुले व सावित्रीबाई फुले यांना वर्णव्यवस्थेची व्यवस्था मान्य नव्हती त्यांनी या व्यवस्थेविरुध्द बंड पुकारले, सर्वधर्मसमभावाचा व विश्वबंधुत्वाच्या तत्त्वाचा प्रचार आणि प्रसार केला. मानवी समानतेचा प्रचार करुन, गुलामगीरी, अस्पृश्यता, जातीयता, स्त्री-पुरूष असमानता या प्रवृत्तींना कडाडून विरोध केला. आपले ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी मुलींच्या शिक्षणाबरोबरच, १८५२ पासून अस्पृश्यांसाठी सुध्दा शाळा सुरू केल्या, धार्मिक व सामाजिक गुलामगीरी शिक्षणाशिवाय दूर होवू शकणार नाही. यावर म.फुल्यांचा ठाम विश्वास होता. शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे हत्त्यार आहे असे म.फुले मानत.

अस्पृश्यांना व स्त्रियांना जनावरापेक्षाही हीन व कनिष्ट मानणाऱ्या समाजव्यवस्थेत स्त्री-शुद्रांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी लढा उभारण्याचे, त्यासाठी प्रसंगी वडीलांचे घर सोडले व आपल्या ध्येयावर म.फुले व सावित्रीबाई फुले ठाम राहिले. एका मुस्लिम मित्राच्या सहकार्याने आपले कार्य पुढे नेले. अस्पृश्यांना पिण्यास पाणी मिळत नव्हते. सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना पाणी भरता येत नव्हते. अस्पृष्यांचा विटाळ मानला जात असे. त्यांच्या स्पर्शाने तलाव, विहिरी, नदी बाटत असे. अशी अंधश्रध्दा समाजात कडक स्वरुपात पाळली जात होती. अशा काळात म.फुले यांनी स्वतःच्या वाड्यातील पाण्याचा हौद (विहीर) अस्पृश्य समाजासाठी खुली करुन दिली. अस्पृश्य समाजाचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविला. अस्पृश्य समाजाला माणसात आणण्याचा व माणसाप्रमाणे त्यांना माणुसकीची वागणुक मिळावी याचा ध्यासच फुले पती-पत्नी यांनी घेतलेला दिसून येतो.

भारतामध्ये बाल विवाहाची प्रथा होती. ती एक समाजमनात अंधश्रध्दाच होती. मुलागा किंवा मुलगी अगदी एक दोन वर्षाची असतांनाच त्यांचा विवाह लावून दिला जात असे. अनेकदा मुल स्त्रिच्या गर्भात असतानाच आईच्या पोटस कुंकू लावून विवाह पक्का केला जात असे. फुले दांपत्याने या श्रध्देला कडाडून विरोध केला. बालविवाहाचे दुष्परीणाम समाजाच्या निदर्शनास आणून

दिले. म.फुलेंच्या या जागृतीमुळे समाजातून बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाले. बालविवाहाबरोबरच समाजात बालविधवांचे प्रमाण देखिल अनेक अंधश्रध्दामुळे वाढले होते.

ज्योतीराव सावित्रीबाईंच्या शाळेत जेव्हा मुली येवू लागल्या तेव्हा त्या मुलींमध्ये विधवा मुलींचे प्रमाण जास्त असल्याचे त्यांच्या लक्षात आले. साथीचे रोग, दुष्काळ, कुपोषण यामुळे बालकांच्या मृत्युचे प्रमाण वाढलेले होते. लग्न अगदी ० ते ४ या वयोगटापासून केली जात. त्यामुळे बालविधवांचे प्रमाण जास्त होते. या बालविधवांचे शोषण अनेक अंधश्रध्देतून होत होते. म.फुले यांनी या प्रश्नाचा गांभिर्याने विचार केला. हिंदू धर्मातील शुद्रातीशुद्र जातीत पूनर्विवाहाची प्रथा आहे. तेव्हा वरीष्ठ जातीत ही प्रथा सुरू केल्याने काय बिघडणार आहे? असा प्रश्न उपस्थित करुन त्यांनी समाजात पूनर्विवाहाचा प्रचार आणि प्रसार सुरू करुन बालविधवांना न्याय दिला.१८६४ ला पुण्याच्या नातू बागेत शेणवी जातीतील पहिला पूनर्विवाह त्यांनी घडवून आणला.

तत्कालीन समाजव्यवस्थेत बहुपत्नीत्वाची एक रुढी, अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात होती. एका पुरूषास चार-पाच बायका असत. या प्रथेमुळे स्त्रियांवर अनेक प्रकारचे अन्याय, अत्याचार केले जात. एक पुरूष मेल्यानंतर त्याच्या सर्व स्त्रिया विधवा होत. स्त्रियांना ही पुरुषा इतकेच हक्क व अधिकार मिळावेत. त्यांना समानेतची वागणूक मिळावी म्हणून फुले पती-पत्नींनी या बहुपत्नी प्रथेला विरोध करुन समाजात जागृती केली. विधवा स्त्रीचे केशवपन करण्याची तिला विद्रुप करण्याची अंधश्रध्दा समाजात होती. विधवा स्त्रियांचे केशवपन समाजात होवू नये म्हणून त्यांनी १८६५ मध्ये नाव्ह्यांचा संप घडवून आणला. केशवपन करण्याची ही अंधश्रध्दा समाजात ऐवढी रुजली होती की, विधवा स्त्री वारल्यानंतर तीचे केशवपन केल्याशिवाय समाजातील कर्मठ रुढीवादी तिचा अंत्यसंस्कार करण्यास तयार नसत. जिवंतपणी एखाद्या विधवेने केशवपनास नकार दिला तरी मृत्युनंतर ही तिची या अंधश्रध्देतून सुटका

नव्हती. फुले दांपत्याने या प्रथेच्या निर्मूलनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले.

या सर्व अंधश्रध्देत अत्यंत भयानक अंधश्रध्दा म्हणजे सतीप्रथा. पतीचे निधन झाल्यानंतर त्याच्या पत्नीला मृत पतीच्या चितेमध्ये जिवंत जाळले जात असे. या भयानक व क्रूर प्रथेस, अंधश्रध्देस सतीप्रथा असे गोंडस नाव दिले होते. समाजात ही अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात होती. इंग्रज सरकारने १८२७ ला कायदा करुन या प्रथेला बंदी घातली होती. राजाराम मोहनरॉय यांनी ही या प्रथेला कडाडून विरोध केला होता. तरीपण समाजातील सती जाण्याचे प्रमाण कमी झाले नव्हते. म.फुले व सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्या शाळामधून, सभा मधून या अनिष्ट प्रथेविषयी समाजात जागृती करुन समाजातील विधवांना माना सन्मानाचे जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला.

समाजात विधवा स्त्रियांना सती जाण्यास भाग पाडले जात होते. ज्या विधवा सती जात नसत त्यांचा अनेक प्रकारे छळ केला जात असे. त्यांचे केशवपन केले जात असे, त्यांना कोणत्याही कार्यक्रमात येण्यास बंदी असे. समाज त्यांना मानव समजण्यास तयार नव्हता. त्यामुळे अनेकदा या स्त्रिया आत्मघात करीत असत. अशा विधवा स्त्रियांसाठी म.फुल्यांनी अनाथाश्रम सुरू करुन त्यांची राहण्याची व जगण्याची व्यवस्था केली. अशा विधवा स्त्रिया अनेकदा पुरूषी वासनेच्या बळी ठरत. त्यांना गर्भधारणा होत असे अशा अनावरस संततीस जन्मास घालण्यापेक्षा त्या बाळाला जन्मतःच मारुन टाकत. ही गोष्ट म.फुल्यांच्या लक्षात आल्यानंतर आपल्या स्वतःच्या घरी १८६३ मध्ये बालहत्त्या प्रतिबंधक गृहाची स्थापणा केली. या गृहात सावित्रीबाईंनी सुईनीचे कार्य केले. पुण्याच्या अनेक भागात या बालहत्त्या प्रतिबंधक गृहाच्या पाट्या लावण्यात आल्या. त्यावर स्पष्ट लिहिले होते की, विधवा मातांनो आमच्या घरी येवून सुखरुप बाळांत व्हा. मुलांची हत्त्या करु नका, तुमचे बाळ तुम्हास न्यायचे किंवा नाही हे तुम्ही ठरवा, आम्ही तुमच्या बाळाची काळजी घेवू. तुमचे नाव गुप्त ठेवण्यात येईल.

जोतीराव सावित्रीबाईंनी कर्मठ जातीव्यवस्थेला ठोकरुन एक दिव्य कार्य केले. ते म्हणजे १८६५ ला केशो शिंदे यांच्या वाड्यात काशिबाई नावाची एक ब्राह्मण विधवा प्रसूत झाली. तिची प्रसूती सावित्रीबाईंनी केली. मुलाची नाळ कापली व या अनावरस मुलास कायदेशीर दत्तक घेतले, त्याचे नाव यशवंत ठेवले. त्याला वैद्यकिय शिक्षण देवून डॉक्टर केले.

हे सर्व कार्य करीत असताना म.फुल्यांसोबत म्हणजे अगदी खांद्याला खांदा लावून सावित्रीबाईंनी आपल्या पतीला शेवटच्या श्वासापर्यंत साथ दिली. १८९० ला म.फुलेचे निधन झाल्यानंतर दत्तकपुत्र यशवंतास टिटवे धरण्या नातेवाईकांनी विरोध केला. तेव्हा पतीच्या प्रेतापुढे शुर सावित्रीबाईंनी टिटवे धरले व प्रेताला अग्नी दिला.

समाजातील अत्यंत सनातनी, क्रूर व माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अंधश्रध्देच्या व रुढीच्या विरोधात बंड उभारुन बहुजन समाजाच्या व स्त्रियांच्या उत्थानासाठी आपले संपूर्ण जीवन धगधगते यंज्ञकुंड बनविणारे थोर समाजसेवक, क्रांतीकारक म.फुले व माता सावित्रीफ्राई फुले यांना शतशः प्रणाम.

**संदर्भ ग्रंथ :**

१. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ - संपादक हरि नरके
२. सावित्रीफ्राई फुले समग्र वाङ्मय - संपादक मा.गो.माळी
३. महात्मा फुले समग्र वाङ्मय - संपादक य.दि.फडके
४. स्त्री परिवर्तणाची आव्हाने - संपादक डॉ.शुभांगी गोटे/गव्हाणे.

● ● ●

# समाज सुधारक संत गाडगे महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. सुधा मु. खडके (कडू)**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, लोकनायक बापूजी अणे
महिला महाविद्यालय, यवतमाळ, मो. नं. ९८६०७४५९७८
ई-मेल –drsudhakhadke@gmail.com

**प्रस्तावना -**

गाडगेबाबा हे कीर्तनकार आणि समाजसुधारक होते. ते गावोगावी भटकत असत. विसाव्या शतकातील समाजसुधारकांमध्ये गाडगे महाराजांचे नाव फार अभिमानाने घेतले जाते. गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टीकोन असलेले समाजसुधारक होते. गाडगे महाराज कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करीत असत. म्हणूनच त्यांना अंधश्रद्धा उच्चाटन करणारे समाजसुधारक म्हणत. कीर्तनातून ते अंधश्रद्धा निर्मुलनाचा संदेश देत. देवळात देव नाही. मूर्तीपुजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, चमत्कार, भोंदूबाबा यावर विश्वास ठेवू नका. प्रखर बुद्धीप्रामाण्यवादातून समाजक्रांती घडविणारे व्यक्तीमत्व म्हणजे संत गाडगेबाबा. आज बुवाबाजीला ऊत आला आहे. अंधश्रद्धेवर प्रहार करण्याऐवजी अंधश्रद्धेपुढे नतमस्तक होणाऱ्याची संख्या वाढत आहे. समाजातील अंधश्रद्धा घालविण्यासाठी प्रयत्न करणारे स्व.नरेंद्र दाभोळकरांचा बळी गेला. कीर्तन हे समाजप्रबोधनाचे साधन असून कीर्तनाद्वारे गाडगेबाबांनी समाजजागृती घडवून आणली. म. ज्योतीबा फुले, राजश्री शाहू महाराज या समाजसुधारक परंपरेचे प्रतिनिधीत्व कर्मयोगी गाडगेबाबांनी केले.

**शोधनिबंधाचे उद्दीष्टे -**

१) समाजसुधारक संत गाडगेबाबांचे जीवन व कार्याचा आढावा घेणे

२) संत गाडगेबाबांच्या अंधश्रद्धा निर्मूलनविषयक विचारांचे अध्ययन करणे.

३) संत गाडगेबाबांनी कीर्तनाद्वारे केलेल्या समाजप्रबोधनाचा अभ्यास करणे.

**अध्ययन पद्धती -**

संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. मानव आज बुद्धीमत्तेच्या जोरावर व संशोधनात्मक लिखाणातून समाजात नवनवीन बदल घडवून आणू शकतो. या अनुषंगानेच समाजसुधारक संत गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धाविषयक केलेले कार्याचा अभ्यास करण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न आहे. त्यासाठी मी दुय्यम स्त्रोत म्हणून वर्तमानपत्र, ग्रंथ, भाषणे व गाडगेबाबावर झालेले संशोधन, विविध कीर्तने, इंटरनेट, मासिके, विविधांगी लेख, अंधश्रद्धाविषयक समाजसुधारकांची भाषणे इत्यादीचा अवलंब करून शोधनिबंध लिहिला.

**गृहीतके -**

१) संत गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा निर्मुलनाची सुरूवात स्वतःपासून केली.

२) संत गाडगेबाबा यांनी बुद्धीवादी दृष्टी, वैज्ञानिक दृष्टी समोर ठेवून कीर्तनाद्वारे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक समाजप्रबोधन केले.

३) आजच्या युवा पिढीत, समाजात, कुटुंबात, देशात समाजपरिवर्तन व समाजसुधारणा हवी असेल तर संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा अभ्यास करण्याची गरज आहे.

४) संत गाडगेबाबा थोरविचारवंत, समाजसुधारक व कृतीशिल विचारक होते.

**अंधश्रद्धा म्हणजे काय?**

आंधळेपणाने एखादी गोष्ट स्विकारणे यास अंधश्रद्धा म्हणतात. यामध्ये काळी जादू, तंत्र-मंत्र, जादूटोना, नरबळी, भूत-प्रेत, पिशाच्च याविषयी अंधविश्वास, अफवा पसरविणे व तशी कृती करणे.

अंधश्रद्धा हा एक मानसिक दुबळेपणा आहे. या संदर्भात मानसशास्त्रज्ञ स्टुअर्ट वायसे यांनी विवांधींगी संशोधन केले. बहुतेक संशोधकांनी अंधश्रद्धा तर्कहीन असल्याचे म्हटले आहे. अंधश्रध्दा मग ती देवाची भक्ती असो किंवा कोणतीही व्यक्ती असो. भारतामध्ये अंधश्रद्धेचे अनेक बळी पडलेले दिसतात. जानेवारी २०१८ मध्ये चंद्रग्रहणाच्या दिवशी हैदराबाद, तेलंगणा येथील एका व्यक्तीने आपल्या पत्नीचा दीर्घ आजार बरा करण्यासाठी तांत्रीकाच्या सांगण्यावरून आपल्या मुलाला गच्चीवरून फेकून दिले. दिल्लीमधील घटना मोक्षासाठी ११ जणांनी फाशी घेतली. या घटनेने तर संपूर्ण देश हादरला. यावरून भारतात अंधश्रद्धा किती खोलवर रूजलेली आहे हे दिसून येते.

अंधश्रद्धेचा बळी ह्या जास्तीत जास्त स्त्रियाच दिसून येतात. आपण बोलतांना नेहमी म्हणतो आता जग किती बदलयं एकेकाळी स्त्रिया ह्या बंदीस्त होत्या, पिंजऱ्यामध्ये बंद होत्या, परंतु आज पिंजऱ्याचे दार उघडले आहे. त्या आकाशात उंच भरारी घेतांना दिसत आहे. परंतु दुसऱ्या बाजूचा विचार करत असता पंखाचे खच्चीकरण केले जात आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन ही आजच्या काळाची गरज आहे. प्रत्येकाची श्रद्धा कशावर, कोणावर तरी असतेच. श्रद्धा असणे ही काही चुकीचे नाही. श्रद्धेमुळे आत्मविश्वास वाढते. बळ मिळते. त्यामुळे आपण यशस्वी वाटचाल करू शकतो. परंतु बरेचदा ही श्रद्धा जेव्हा अंधश्रद्धेकडे वाटचाल करते अशा अंधश्रद्धेमुळे आपली कामे देवच करतो अशा भावना वाढीस लागते व त्या अंधश्रद्धेचा बाबा, बुवा, ढोंगी संत फायदा घेतात व त्यातून शोषण करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. २१ सप्टेंबर १९५५ मध्ये कळंब येथील गणपती दूध पितो ही अफवा सर्व महाराष्ट्रभर पसरली व सर्वत्र गणपतीची मूर्ती दूध पिते अशा बातम्या भारतभर नाही तर जगभर पसरल्या सर्व लोक या अफवेला बळी पडले व कळंब येथे भक्तांचा महापूर आला. परंतु ही बाब मन सुन्न करणारी वाटते. कारण म. फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी विज्ञानवादी दृष्टीकोन जोपासला.

**समाजसुधारक संत गाडगेबाबा यांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कृतिशील विचार-**

गाडगेबाबांच्या विचारात प्रखर बुद्धीप्रामाण्यवाद होता. त्यांनी धर्मातील अनेक गोष्टी नाकारल्या. अरे हिच्या अंगात देवी येते यावर ते म्हणायचे देवीला काही काम धंदा नाही काय रे अशा पद्धतीने अत्यंत ताकदीनं बुद्धीप्रामाण्यवाद मांडणारे, चमत्कारांना विरोध करणारे होते. गाडगेबाबा कीर्तनात म्हणत,

"देवळात देव नसते, देव माणसाच्या मनात हायरे
ज्या माणसाले खायला भेटत नाही त्याले खायला द्यावे
ज्याले शिक्षण नसत त्याले शिक्षण द्या
ज्याले आसरा नसते त्याले आसरा द्याव"

अशा पद्धतीचा बुद्धीप्रामाण्यवाद ते मांडत.

गाडगेबाबा इतक्यावर थांबले नाहीत, तर ज्या ठिकाणी बळी दिले जात अशा ठिकाणी ते स्वतः जात. ज्या ठिकाणी मुलगा झाला म्हणून नवस फेडण्यासाठी लोक कोंबडा, बकरी यांचा बळी देत तेथे जात, देवाला प्रसन्न करण्यासाठी करत आहोत असे लोक उत्तर देत तेव्हा गाडगेबाबा युक्तीवाद करत. कोंबडं कापलं की देव प्रसन्न होते. तुह पोरगं बी देवाचं लेकरू आहे, कोंबडं बी देवाचं लेकरू आहे, मग काप तुझ्या पोराले, आण घे देवाले प्रसन्न करून अशा विविध प्रसंगातून गाडगेबाबा यांचे अंधश्रद्धा निर्मुलनात किती मोलाचे योगदान आहे हे दिसून येते.

गाडगेबाबा यांनी अंधश्रद्धा निर्मुलनाची नवी परंपरा निर्माण केली. त्यासाठी त्यांना कीर्तन हे माध्यम वापरले. महाराष्ट्रातील अलीकडच्या काळातील संतामधील शेवटची कडी म्हणजे संत तुकडोजी महाराज व संत गाडगे महाराज होय. गाडगे बाबा कीर्तनातून शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ही सांगत. शिक्षणावाचून माणूस धोंडा. शिक्षणाशिवाय आमचा उद्धार नाही. ते कीर्तनातून प्रबोधन करीत. ज्याले इद्या नाही त्याले खटाऱ्याचा बैल म्हटले

तरी बी चालेल, लोकहो आता तरी सुधरा. इव्हायाले पाहुणचार केला नाही तरी चालते, पण मुलाले शिक्षण द्या. सामाजिक तळमळीतून ते शिक्षणाचा प्रसार करीत. स्वतः निरक्षर असलेल्या गाडगेबाबांनी महाराष्ट्रातील खेडूत लोकांच्या हाती लेखणीचे शस्त्र दिले. यामुळे सामाजिक, आर्थिक विषमता दूर होईल. देवाच्या नावाने चालणारे कर्मकांड कमी होईल. महाराष्ट्रात गाडगे बाबांनी संपूर्ण ताकदीनीशी अंधश्रद्धेवर आघात केला. बुद्धीवाद कशाला म्हणतात हे माहित नसूनही बुद्धीवादी विचारांचा प्रसार, जागृती खेडोपाडी पोहचविण्याचा प्रयत्न केला.

**संतगाडगे बाबांनी कीर्तनाद्वारे केलेले समाजप्रबोधन -**

गाडगेबाबांनी समाज अधोगतीला जाऊ नये म्हणून स्वतः झाडू हाती घेऊन आष्युष्यभर अंधश्रद्धा, अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रामध्ये अनेक संतांनी सामाजिक कार्य केले. गाडगेबाबा कीर्तनात सांगत 'देव देवळात नसतो, तो माणसात असतो' परंतु अलीकडे बुवाबाजीचे आलेले पीक पाहता ते संतांनी उभारलेल्या पार्श्वभूमीवर काम करतांना दिसत नाही. एकीकडे निःस्वार्थी सेवेचे व्रत घेतलेले संत गाडगेबाबा ज्यांच्या मालकीचा एक खापराचा तुकडा, एक झाडू आणि अंगावर असलेले कपडे एवढ्याच वस्तू होत्या ते भोळ्या भाबड्या खेड्यातील लोकांना समजेल अशा भाषेमध्ये जागृती करीत. अंधश्रद्धा निर्मूलन करीत. गाडगेबाबासारखे कार्य आजच्या बाबांना जमेल काय? स्वतःच्या गळयात माळा घालून, लोकांकडून स्वतःची सेवा करून घेणारे, मोठमोठे पूजा, समारंभ घडवून आणणारे भोंदू बाबा सर्वत्र प्रगट झालेले दिसत आहे. गाडगेबाबांसारखे हातात झाडू घेऊन, कीर्तन करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करू शकतील काय?

चमत्कार, बुवाबाजी, जादुटोणा हे ढोंग आहे. हा अज्ञानी जनतेला लुबाडण्याचा धंदा आहे. यापासून सावध राहा. त्यांनी बळी देणे, शंकरपट, गायबैल कसायास विकणे या गोष्टींना आयुष्यभर विरोध केला. मुक्या

प्राण्यांचा बळी देऊ नका.याबाबत प्रबोधन केले. प्रामाणिकपणे हृदय ओतून काम करा, देवही तुम्हाला मदत करतो. त्यासाठी नशीब, जोतिष्य बघायची गरज नाही, चंद्रावरचा मंगळ, शनीपेक्षा माणसाशी व्यवहारचातुर्याने वागल्यास काम अधिक सोपे व सहज साध्य होते, हे खेड्यातील लोकांना समजावून सांगत.

अशिक्षीत बहुजन समाजात अंधश्रद्धेचा जबरदस्त पगडा होता. भोंदूबाबा लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांना फसवीत, देव अंगात येऊन लोक घुमू लागत अशा देव अंगात येणाऱ्या माणसांची खेटराने पुजा करावी, असे ते म्हणत. गरीब, भोळ्या, भाबड्या लोकांना फसविण्याचा हा प्रकार आहे. बाबांनी अंधश्रद्धा निर्मूलनावर भर दिला. तो प्रबोधनाच्या चळवळीला प्रेरणा देणारा ठरला. आज समाजप्रबोधनाची आणि अंधश्रद्धा निर्मूलनाची सुशिक्षीत समाजाला गरज आहे. गाडगेबाबांनी खराट्याच्या माध्यमातून, कीर्तनाच्या माध्यमातून राष्ट्रधर्म, समाजधर्म शिकविला. त्यांच्या प्रकट विचारांचा जीवनात प्रत्येक व्यक्तीने उपयोग केला, तर अंधश्रद्धा समूळ नष्ट होईल. गाडगेबाबांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश लोकांपर्यंत पोहचवून भोळ्या भाबड्या लोकांना लुबाडणारे भोंदू बाबांना धडा शिकवावा, समाजातील परंपरा, रूढी, धर्मकल्पना यांना तिलांजली देऊन अंधश्रद्धा नाहीशी करणे, हा गाडगेबाबांचा खरा धर्म होता. गाडगेबाबांचे कीर्तन म्हणजे समाजप्रबोधनाची प्रश्नोत्तर रूपाने चाललेली सभाच असायची, समाजधर्म म्हणजे मानवसेवा.

**समारोप**

संत गाडगेबाबा यांचे जीवन व कार्याचा विचार करता आम्हाला अध्यात्म आणि सामाजिक जबाबदारीच्या शक्तीशाली समन्वयाची आठवण होते. त्यांचे कार्य समाजसुधारणेसाठी प्रोत्साहीत करणारे ठरते. गाडगेबाबा म्हणजे चालते -बोलते विद्यापीठच होते. ग्रामीण भागातील लोकांच्या प्रगतीचे मूळ अंधश्रद्धेत आहे हे त्यांनी ओळखले. म्हणूनच त्यांनी अंधश्रद्धा दूर

करण्यासाठी आपले आयुष्य जनकल्याणार्थ झिजविले. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी, प्रबोधनासाठी त्यांनी कीर्तनाची निवड केली. गाडगेबाबा कीर्तनाच्या माध्यमातून थेट लोकांशी संवाद साधायचे. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी गाडगेबाबा यांचे योगदान अतुलनीय आहे. आपण विज्ञानवादी युगात कितीही गप्पा मारीत असलो, तरी सुद्धा कर्मकांड, नवस बोलणे, नवस फेडणे, व्रत, पूजा हे कार्य सोडायला तयार नाही. संत गाडगेबाबा शासनाने विविध उपक्रमांमधून गावोगावी पोहचविला, परंतु त्यांचे परिवर्तनशील विचार मात्र पोहचवू शकलो नाही.

**निष्कर्ष -**

१) अंधश्रद्धा निर्मूलन ही आजच्या काळाची गरज आहे.

२) विज्ञानात रोज निरनिराळे शोध लागत आहेत, परंतु माणूस अंधश्रद्धा दूर करू इच्छीत नाही. माणसाने वैज्ञानिक दृष्टीकोनांचा विचार केला पाहिजे.

३) गाडगेबाबा यांनी प्रबोधनाकरिता कीर्तनाचा परंपरागत मार्ग निवडला. त्यांचे धार्मिक विचार आधुनिक होते. कर्मकांड, अंधश्रद्धा, उपवास, व्रतवैकल्ये यांचा निषेध केला.

४) संत गाडगेबाबा यांनी धार्मिक परिवर्तनातून सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

५) अंधश्रद्धा हा एक मानसिक दुबळेपणा आहे. अंधश्रद्धा मग ती देवाची असो की कोणतीही व्यक्ती असो ती अधोगतीकडे नेते.

६) कोणत्याही प्रकारचे शिक्षण न घेतलेले संत गाडगेबाबा थोर विचारवंत, समाजसुधारक, कीर्तनकार, कृतीशिल विचारक होते.

७) ग्रामीण भागातील जनतेला भेडसावणाऱ्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर गाडगेबाबांच्या कीर्तनातून केलेल्या प्रबोधनामध्ये सापडते.

८) संत गाडगेबाबा यांचे अंधश्रद्धाविषयक विचार हे नवीन पिढीला दिशा देणारे आहे.

९) आज नवविचारांचा नवा समाज घडवायचा असेल, तर संत गाडगेबाबांचे

विचार घरोघरी पोहचले पाहिजे.

१०) आज अंधश्रद्धेवर प्रहार करण्याऐवजी अंधश्रद्धेपुढे नतमस्तक होणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**


१) रा.तु. भगत, गाडगेबाबांची काठी, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर

२) ठाकरे, प्रबोधनकार, श्री. गाडगेबाबा, श्री. गाडगेबाबा मिशन, मुबई, पृ. क्र. २

३) प्रा. कडवे रघूनाथ, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, संस्कार प्रकाशन, नागपूर.

४) दांडेकर गो.नी., गाडगेमहाराज, मेडोस्टीक प्रकाशन, मुंबई

५) प्रा. केचे मधुकर, श्री. गाडगेबाबा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

६) सावरकर सुदाम, तपोमूर्ती गाडगेबाबा, साहित्य प्रभा प्रकाशन, अमरावती.

७) डॉ. पांडे दया, संत गाडगेबाबांचे समाजशास्त्रीय विचार, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८) अखेरचे कीर्तन, प्रकाशन, श्री. महाराज मिशन, मुंबई

९) पं. जोशी, भारतीयसंस्कृती कोश, पुणे खंड -१


● ● ●

# अंधश्रद्धा निर्मूलनाबाबत संत गाडगेबाबा यांचे विचार आणि समाजातील त्यांच्या विचारांची व्यवहार्यता

**डॉ. सागर लोकनाथ बडगे**
समाजशास्त्र विभाग
मु.जे.महाविद्यालय, जळगाव
ईमेलः sagarlbadge@gmail.com

**सारांशः** कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी समाजामध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले. संत आणि समाज सुधारक या दोन्हीवृत्ती गाडगेबाबांमध्ये होत्या. वास्तविक गोष्ट समजावून सांगताना तुकारामाप्रमाणे धैर्य त्यांच्या अंगी असे, तसेच समाज परिवर्तनासाठी स्वतः पासून सुरुवात करून, समाजातील समस्या जाणून घेऊन, त्या दूर करण्यासाठीचा प्रयत्न केला जात असे, म्हणून देखील त्यांना समाज सुधारक संबोधल्या जाते.

आजच्या समस्या, अडचणी या सर्वांचा आढावा घेत असताना संत गाडगेबाबा यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनबाबतच्या विचारांची व्यवहार्यता अशी दिसून येते की, गावोगावी भजन, कीर्तन करून समाजप्रबोधनाचा नवा आविष्कार प्रस्थापित त्यांनी केला. गाडगेबाबा आपल्या कीर्तनात अध्यात्म सांगण्याऐवजी भौतिक समस्यांवर बोट ठेवून विज्ञान सांगत असत. गाडगेबाबा एकेश्वरवादी असल्यामुळे नवस यावरदेखील कडाडून हल्ला चढवत. नवस या अंधश्रद्धेविरुद्ध प्रचंड जनजागृती करून महाराष्ट्रातील ६७ खेड्यात ही बळीची प्रथा बंद करण्यात ते यशस्वी झाले. मूर्तीपूजा हे थोतांड असून सत्यनारायण, दशक्रिया विधी यांचाही त्यांनी विरोध केला. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक कार्याला त्यांनी चालना दिली. त्यांचा यामागील प्रमुख उद्देश हा की, सर्वसामान्य जनतेमध्ये शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना अंधश्रद्धा, देव-देवता, मूर्तीपूजा, व्यसनाधीनता या सर्वांपासून दूर जाण्यासाठी शिक्षण घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे मत अशिक्षित असणारे परंतु वैज्ञानिक दृष्टिकोनातून समजून

सांगणारे, संत गाडगेबाबा होते. गाडगेबाबांनी अंधश्रद्धा निर्मूलनावर जो भर दिला. तो प्रबोधनाच्या चळवळीला प्रेरक ठरणारा आहे. एक नवचैतन्य भरलेला समाज निर्माण करण्यासाठी त्यांच्या अंधश्रद्धाविषयक विचारांचे मनन व चिंतन हे झालेच पाहिजे.

आधुनिक काळातील ज्या समस्यांनी उग्ररूप धारण केले आहे. त्याबाबत गाडगेबाबांनी वारंवार आपल्या जनसमुदायाला सचेत करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा कार्याचा अभ्यास हा कधीही न संपणारा आहे. गाडगेबाबा यांच्या विचारांची व्यवहार्यता प्रत्येक भारतीय नागरिकांनी समजून घेणे अतिशय गरजेचे आहे. त्यांच्या विचारांच्या अंमलबजावणीने भारतीय समाज हा विज्ञानवादी झाल्याशिवाय राहणार नाही.

**बीजशब्द :** अंधश्रद्धा, देव-देवता, नवस, मूर्तीपूजा.

**प्रस्तावनाः**

कर्मयोगी, स्वच्छतेचे अग्रदूत, सत्यशोधनकार, समाज सुधारणावाद विज्ञाननिष्ठ, आधुनिक विचारांचा महामेरू असलेल्या कर्मयोगी संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यामधील शेंडगाव या छोट्याशा गावी झाला. त्यांच्या आईचे नाव सखुबाई व वडिलांचे नाव झिंगराजी जाणोरकर होते आणि त्यांना लहानपणी लाडाने 'डेबू' असे म्हणत होते.

त्यांच्या वडिलांचा मृत्यू इ.स. १८८६ मध्ये व्यसनाधीनतेमुळे झाला. मृत्यूच्या पहिले त्यांच्या वडिलांनी त्यांची आई म्हणजे सखुबाई यांना गाडगेबाबा विषयी एक महत्त्वपूर्ण सूचना वजा विनंती केली ती म्हणजे, आपल्या मुलाला या देवा धर्माच्या नादात लावू नको, आत्ताच्या आत्ता तो खंडोबा आणि देवळातले दगड गोटे दे फेकून. मी या देवांना कोंबडे बकरे कापण्यामध्ये आणि दारूच्या व्यसनात पडलो नसतो. तर आज हा दिवस आला नसता.

काही काळानंतर गाडगे बाबा त्यांच्या मामाच्या गावी म्हणजे मुर्तीजापुर तालुक्यातील दापुरी या गावी आले. तिथे त्यांनी गुरे राखाने व शेतीचे देखील काम केले. शेतीच्या कामासंदर्भात ते म्हणायचे 'कायावाचा मने करून केलेल्या सेवेच्या भक्तीतून बिनचूक प्रसन्न होणाऱ्या शेतीशिवाय दुसरा परमेश्वर नाही' आणि सोबतच आपल्या सवंगड्यांसह भजन, कीर्तन करीत गुराख्यांचे सहभोजनदेखील घडवून आणत असत.

सावकाराच्या तावडीतून मामाची हळप केलेली जमीन सोडवली. या प्रसंगामुळे संपूर्ण गावामध्ये गाडगेबाबा विषयीची आत्मीयता लोकांमध्ये निर्माण झाली आणि यातूनच पुढे त्यांच्या लोकसेवेच्या कार्याचा प्रारंभ झाला.

१ फेब्रुवारी रोजी आईला नमस्कार करून अंगावर एक फाटके धोतर, एक फुटके मटके व एक काठी घेऊन संपूर्ण संसाराचा त्याग करून ते समाज सेवेला निघाले. आजपर्यंत अनेकांनी संसार त्याग केला होता त्यांची कारणे हे अठराविश्व दारिद्र्य, कर्जाचे ओझे, मुलाबाळांचे मृत्यू, व्यसनाधीनता, पती-पत्नीतील वाद, कुटुंबात आणि समाजात नित्य होणारी हेटाळणी, बेरोजगारी आणि बेकारी इत्यादीपैकी कोणते ना कोणते तरी कारण होते. परंतु सर्व सुख असताना संसाराचा त्याग करणारे गाडगेबाबा हे आजच्या घडीला एकमेव संत अथवा सुधारक होते. याला अपवाद म्हणून अडीच हजार वर्षाआधी कपिलवस्तू येथील सिद्धार्थ राजपुत्राने निर्वाणाचा शोध लावण्यासाठी केलेल्या प्राचीन अजरामर इतिहासाची पुनरावृत्तीच म्हटली पाहिजे.

गाडगेबाबांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी तसेच समाजप्रबोधन करण्यासाठी कीर्तनाचे माध्यम स्वीकारले होते. पण त्यांच्या कीर्तनपद्धतीकडे जरा चिकित्सकपणे पाहिले की, बाबांचे क्रांतिकारकत्व अधिक प्रकर्षाने जाणवते. नारदीय कीर्तनपद्धती, वारकरी कीर्तनपद्धती व राष्ट्रीय कीर्तनपद्धती यामध्ये त्यांच्या कीर्तनाचा समावेश करता येत नाही. तर त्यांचे कीर्तन म्हणजे एका तळमळीचा कर्त्या सुधारकाचे मुक्त आणि प्रकट चिंतन होय. त्यांच्या कीर्तनाच्या पद्धती संदर्भात आचार्य अत्रे असे म्हणतात की, 'सिंहाला पाहावे वनात आणि गाडगेबाबांना पहावे कीर्तनात'.

**उद्देश:**

१. संत गाडगेबाबा यांच्या अंधश्रद्धेबाबतच्या विचारांची प्रासंगिकता समजावून घेणे.

२. संत गाडगेबाबा यांच्या अंधश्रद्धेबाबतच्या विचारांचे महत्त्व जाणून घेऊन त्यांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाची कास धरणे.

**संशोधन पद्धती:** वर्णनात्मक संशोधन पद्धतीच्या आधारे संत गाडगेबाबा यांचे अंधश्रद्धेबाबतचे विचार स्पष्ट करण्यात आले.

संशोधन कार्य : संरचनात्मक दृष्टिकोनातून सदर विषयाचे अध्ययन करण्यात आले.

**संशोधन स्त्रोत / माहिती :** सदर संशोधनाकरिता दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

संत गाडगेबाबा यांचे विचार जाणून घेत असताना प्रथमतः त्यांच्या दहा सूत्रीची अभ्यास करणे हे अतिशय महत्त्वाचे आहे.

१. भुकेलेल्यांना - अन्न,

२. तहानलेल्यांना - पाणी,

३. उघड्यनागड्यांना - वस्त्र,

४. गरीब मुला-मुलींना - शिक्षणासाठी मदत,

५. बेघरांना - आसरा,

६. अंध, पंगू रोगी यांना - औषधोपचार,

७. बेकारांना - रोजगार,

८. पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना - अभय

९. गरीब तरूण-तरूणींचे -लग्न,

१०. दुःखी व निराशांना - हिम्मत

या दहासूत्रीच्या आधारे गाडगेबाबा यांच्या वैज्ञानिक विचारांची प्रगल्भता मुख्यतः दिसून येते.

महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र / देवस्थानांमधील सुप्रसिद्ध देवस्थान म्हणजे शिर्डीचे साईबाबा. दिनांक २९ डिसेंबर २०२२ च्या महाराष्ट्र टाईम या वर्तमानपत्रातील बातमीनुसार साईबाबा यांच्या चरणी ४०० कोटीचे दान प्राप्त झाले. अशी बातमी दिसून येते. तसेच ३० सप्टेंबर २०२३ रोजी सकाळ या वर्तमानपत्रांमध्ये साईबाबा यांना ३ किलो सोने, ६४ किलो चांदी आणि ०५ कोटी रूपये रोकड इतके दान प्राप्त झालेले दिसून येते. या सोबतच शेगावचे गजानन, पंढरपुरातील विठ्ठल रूक्माई, वणी येथील सप्तशृंगी देवी, मुंबई येथील लालबागचा राजा आणि तुळजापूर येथील भवानी माता, इत्यादी तीर्थक्षेत्र /देवस्थानाला येणारी मोठ्या प्रमाणातील गुप्तदान याचादेखील आकडा प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये आहे. दानाचा आकडा हा कोटी आणि अरब या संख्यांमध्ये असतो.

सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनोमी एक खाजगी संस्थाच्या

अंदाजानुसार भारतातील बेरोजगारीचा दर सध्या सुमारे ७.९५ टक्के आहे. हे शहरी भारतात ७.९३टक्के आहे. तर ग्रामीण भारतात फक्त ७.४४टक्के आहे. २०२२च्या ग्लोबल हंगर इंडेक्स रिपोर्ट प्रसिद्ध झाला. यात देशांना मिळालेले रँकिंग बघता भारताची परिस्थिती त्याचे शेजारी असणाऱ्या पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ आणि बांगलादेश या देशापेक्षाही खराब आहे. या रिपोर्ट मध्ये १२१ देशांना रँक देण्यात आला आहे. या रँक मध्ये भारत १०७ व्या स्थानी आहे. तर पाकिस्तान ९९ व्या स्थानावर, श्रीलंका ६४ व्या स्थानावर, नेपाळ ८१ व बांगलादेश ८४ व्या स्थानावर आहे.

यावरील उदाहरणे पाहता गाडगेबाबा यांच्या विचारांची आणि अंधश्रद्धेविषयीची प्रगल्भता दिसून येते. गाडगेबाबांची ईश्वरावर श्रद्धा होती. ईश्वराचे नामस्मरण व भजन करा, असे ते लोकांना सांगत. पण त्यासाठी नवस, नैवेद्य देण्याची काहीही गरज नाही, हे ते स्पष्टपणे सांगत. देव आणि दैव याबाबतीतला त्याचा आचार बुद्धिवंताला लाजवणारा होता. ते ईश्वराच्या बाबतीत कर्तुत्ववादी वाटतात पण ग्रंथप्रामान्य आणि कर्मकांड नाकारतात. त्यातल्या त्यात मूर्तिपूजेला स्पष्ट विरोध करतात.

गाडगेबाबा तीर्थयात्रेबाबत मोठ्या प्रमाणात त्रागा करायचे. ते म्हणायचे अरे तीर्थाला जाता पण तुमचा देव काही बोलतो का? तुम्ही जेवले किंवा नाही याबाबत विचारपूस करतो का? अरे तुमच्या देवाला धोतरही नेसता येत नाही, त्याला नैवेद्य खाता येत नाही, असा देव तुमच्या काही कामाचा आहे का? अशा खोचक प्रश्नातून ते लोकांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करून त्यांच्या मनातील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करीत असत.

यावरून असे सांगता येईल की, देव-देवतांच्या नावावर प्रचंड मोठ्या प्रमाणात भांडवल गोळा होते. परंतु त्याचा समाज हितासाठी किती खर्च होतो, हा देखील एक मोठा प्रश्न आहे? याबाबत गाडगेबाबा प्रखरतेने आपले मत मांडताना दिसतात.

नवस फेडण्यासाठी नवरात्रात बीड ते तुळजापूर येथे एका कट्टर शिवसैनिक दंडवत घालत तुळजाभवानीला साकडं घातलं की, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होऊ दे, सोलापूर येथे एका जोडप्याला मुलं होत नव्हते. मुल झाल्यानंतर तीन वर्षांनी मुलाला नवस म्हणून तब्बल ८ किलोमीटर विवस्त्र चालवले होते. याबाबत गाडगेबाबांचे

मत जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

गाडगेबाबा ज्या ठिकाणी बळी दिले जात असे, अशा ठिकाणी जाऊन तिथे कीर्तनाच्या माध्यमांतून, लोकांना प्रश्न विचारून त्यांना अंधश्रद्धाबाबत माहिती देत असत. लोक जिथं कोंबडी, बकरी कापत असत त्यावेळी त्यांच्या बाजूला त्यांची मुलेदेखील असत आणि हा नवस बहुदा मुलांसंदर्भातच असे. तिथे उभे राहून गाडगेबाबा त्यांना प्रश्न विचारत काय रे, काय करतो आहे. तेव्हा उत्तर मिळायचं नवस फेडतो आहे. माझा मुलगा अथवा मुलगी ठीक झाले तर देवाला कोंबड किंवा बकरी कापील. तेव्हा गाडगेबाबा त्यांना प्रश्न विचारायचे. हे कोंबडं कुणाचं लेकरू आहे, तर देवाचं लेकरू आहे. अन् तुझा लेकरू? देवाचा आहे. आणि तू कोणाचं लेकरू आहे तर उत्तर मिळायचं मी सुद्धा देवाचं लेकरू आहे. अरे मग तुझं लेकरू देवाचं तू देवाचा आणि त्या कोंबडीच लेकरू सुद्धा देवाचं मग आत्ताच मला सांग देवाला तुझाच लेकरू कापून नवस फेडशील का? अशा वेळी तो घाबरून नाही म्हणायचे आणि अशा पद्धतीने ते लोकांना वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे त्यांच्या मनातील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करीत असत.

जातिवाचक घटनांचा आढावा घेत असताना दलेलचक - भागोरा बिहार हत्याकांड १९८७ मधील पीडितांचे सामूहिक अंत्यसंस्कार. या घटनेत उच्चमागास जातीच्या नेतृत्वाखाली मिलिशियाने ५० लोकांची कत्तल केली. भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावातील २९ सप्टेंबर २००६ रोजी, शेतकरी भैय्यालाल भौतमांगे यांच्या कुटुंबातील पत्नी सुरेखा, मुलगी प्रियंका, मुलगा रोशन आणि दिलीप असे पाच सदस्य होते. भौतमांगे हे शेतात असल्याने बचावले तर उर्वरित सदस्यांचा अतिशय क्रूरतेने हत्या करण्यात आली होती. भीम जयंती साजरी का केली म्हणून नांदेड येथील गोंधळ या गावात जातीवादी गाव गुंडांकडून अक्षय भालेराव या दलित तरूणाची निर्गुण हत्या करण्यात आली. त्याच बरोबर लातूर येथील रेनापुरमध्ये एका सावकाराकडून अवघ्या तीन हजार रूपयांसाठी गिरीधारी केशव तपघाले, या मातंग तरूणाची हत्या केल्याचे समोर आले.

जातीयता आणि अस्पृश्यतायाविषयी देखित गाडगे बाबा आपले प्रखर मत मांडतात. अस्पृश्यता केवळ कायद्याने जाणारी नसून मत परिवर्तन जाईल हे ओळखून अस्पृश्यतेसंबंधी आपल्या विचार कीर्तनाच्या माध्यमातून

त्यांनी खेडोपाडी आणि शहरापर्यंत पोहोचवले. यासंदर्भात ते म्हणायचे जगात जाती फक्त दोनच आणि त्या म्हणजे एक पुरूष व दुसरी स्त्री. तिसरी ही जातच नाही. जो कोणी जात विचारत असेल तर त्याला महामूर्ख असे समजावे. आणि जो कोणी जात विचारत असेल तर त्याला सांगावं मी माणूस आहे माणूस. पुढे त्यांनी म्हटले आपल्या देशातच फक्त शिवाशिव हा शब्द आहे. शिवाशिव हा शब्द रशियात नाही, अमेरिकेत नाही, चीनमध्ये नाही तर फक्त हिंदुस्थानातच आहे बाप्पा. यातून समाजाने अस्पृश्यता आणि जातीयता व त्याबाबतची अंधश्रद्धा पाळू नये हीच अपेक्षा संत गाडगे बाबा यांची होती असे लक्षात येते. अशाप्रकारे जातीभेद निर्मूलनासाठी प्रभावी प्रबोधन त्यांनी केलेले दिसून येते.

स्वच्छतेबाबत जाणून घेत असताना आपल्याला असे दिसून येते की, १. स्वच्छ परिसरामुळे आपल्याला शुद्ध हवा ऑक्सिजन मोठ्या प्रमाणात मिळते. २. आरोग्य चांगले राहते व सार्वजनिक ठिकाणी स्वतःहून घाण न करणे, कचऱ्याची कुंडी वापरणे, नदी-नाले, डोंगर, जमीन, प्रदूषण होऊ न देणे. स्वच्छतेच्या अभावामुळे प्रदूषण साथीचे आजार मोठ्या प्रमाणात वाढताना दिसून येतात. देव-देवतांच्या नावावर नदी नाले, घाण करणे, निर्माल्या स्वच्छ पाण्यात फेकणे यातून पिण्याचे पाणी मोठ्या प्रमाणात दुषित होते. तसेच कोरोना काळाची दाहकता आजदेखील आपण अनुभवतो आहे. हे अस्वच्छतेचे अनुभव आपण घेतच आहोत. परंतु स्वच्छतेबाबतचे मोल्यवान विचार गाडगे बाबांनी आपल्या दैनंदिन जीवनातून आपल्याला प्रधान केले आहेत.

स्वच्छता आणि समाजसेवेचे व्रत घेतलेले संत गाडगेबाबा यांचे विचार हे नेहमीच समाजाला प्रेरणादायी ठरतील असेच आहे. गाडगे बाबा ज्याठिकाणी कीर्तनाला जात असत तेथे सर्वप्रथम कीर्तनाची जागा खराट्याने स्वच्छ करीत असत. संत ज्ञानेश्वराचा महाराष्ट्रातील पहिले संत म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यानंतर नामदेवांनी त्यांचा भारतभर विस्तार केला. नाथांनी त्यावर इमारत बांधली आणि तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढविला. यांचे उरलेले कार्य गाडगेबाबांनी सिद्धीस नेले, म्हणून त्यांना संत मालिकेतील 'शिरोमणी' म्हणून संबोधले जाते.

सामाजिक तळमळीतून गाडगेबाबा यांनी शिक्षणाचा प्रसार केलेला

दिसून येतो. सर्व महाराष्ट्रभर त्यांनी शैक्षणिक संस्था उभारल्या. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याला सक्रिय पाठिंबा दिला. स्वतः निरक्षर असूनदेखील गाडगेबाबा यांनी महाराष्ट्रातील खेडूतांच्या हाती पाठी आणि लेखणी दिली. याच्या मागचे मुख्य कारण म्हणजे, त्यांना वाटले होते की, शिक्षणानंतर समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता कमी होईल. देव आणि देवतांचे नावाने चालणारे कर्मकांड कमी होतील. जातिभेद आणि पशुहत्या थांबेल. पण असे काहीही झालेले दिसत नाही. शिकलेल्या आजच्या माणसांनी या सर्व गोष्टींना खतपाणी घातलेले दिसून येते. म्हणजेच जी गोष्ट निरक्षर गाडगेबाबांना समजली होती ती, आजच्या सुशिक्षितांना समजू नये एवढे मोठे आश्चर्य ! म्हणावं लागेल.

गाडगेबाबाच्या कीर्तनातील विषय 'शिका आणि शिकवा' असे बाबा तन्मयतेने सांगत असत. 'बाप हो' विद्या हे मोठे धन आहे. शिक्षणामुळे माणूस, माणूस म्हणून जगू शकतो. परंतु बिनशिकलेला माणूस आणि जनावर दोन्हीही सारखेच. शिक्षणामुळे माणसाचे जीवन फुलते, विकसित होते. आपण कोण आहे हे कळाले पाहिजे, आपण काय केले पाहिजे ते समजले पाहिजे, याकरिता शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाचे संस्कार झाल्याशिवाय माणसाला माणुसकी येत नाही. महात्मा ज्योतिबा फुले हे तळागाळाच्या माणसासाठी झटणारे खरे तळमळीचे समाज सुधारक होते. त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना आधी शिक्षण दिलं आणि मुलींची शाळा काढली. कारण शिक्षणाशिवाय पर्याय नाही. 'शिका आणि आपल्या मुलांनाही शिकवा' असा संदेश ते आपल्या कीर्तनातून देत असत.

**संदर्भ :**

१.तायडे मनोज, (१९९२), कर्मयोगी गाडगेबाबा, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

२.केचे मधुकर, (२०१७), श्रीसंत गाडगे बाबा, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद.

३.मेश्राम सत्यवान, (१९९८), संत गाडगे बाबा महाराज काल आणि कर्तव्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

४.www.mpsc-online.com/sant-gadge-baba

५. www sudharak.in (गाडगे महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलन कार्य - आजचा सुधारक)

६. www.wikipedia.com (sant gadge Baba)

७. www.mpsc.marathi.com

८. www.bbcnews.com (7 April 2023 & 16 oct 2022)

९. www.esakal.com (26sep2023 & 30 sep 2023)

१०. www.akashernama.com

११. www.maharashtratime.com (29 dec 2022)

१२. www.lokmat.news18.com (1 dec 2019 & 25 Oct 2018)

● ● ●

# अंधश्रद्धा आणि त्यावर समाजसुधारकांची शिकवण

**प्रा.डॉ. दिपक आनंदराव चौरपगार**
प्रमुख समाजशास्त्र विभाग
गुलाम नबी आझाद कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, बार्शीटाकळी, जि. अकोला

**प्रस्तावना**

श्रद्धा आणि अंधश्रद्धा काय आहे यावर अनेकांचे मते-मतांतरे दिसून येतील. श्रद्धा हा शब्द आपण किती पद्धतीने वापरतो. माझी गुरूजीवर श्रद्धा आहे, तर कोणी माझी धर्मावर श्रद्धा आहे, माझी देवावर श्रद्धा आहे. किती अभिमानाने श्रद्धा हा शब्द वापरतो. 'श्रद्धा' हा शब्द अंधश्रद्धामध्ये येतो, जो पूर्ण अर्थच बदलून जातो. कारण हे समजून घेण्यासाठी आपणास पुढील तीन शब्द समजावे लागतील १) विश्वास २) श्रद्धा ३) अंधश्रद्धा. म्हणजेच यात विश्वास हे महत्त्वपूर्ण आहे. व्यक्तीचा विश्वास कोणतेही कार्य करण्यास बाध्य करतो. आज एका घरात चार भाऊ एकत्र राहू शकत नाही. या संपूर्ण समाजाला तेव्हाच्या काळात अनेक समाजसुधारकांनी या समाजासाठी खूप मोठे योगदान दिले. त्यामध्ये संत गाडगेबाबा यांचे नाव प्रामुख्याने हा सबंध समाज घेतो आहे आहे. संत गाडगे बाबा यांनी अंधश्रद्धा, बुवाबाजी अनिष्ट चालीरीती यावर घणाघाती प्रहार केला.

**गाडगेबाबाची शिकवण :** म्हणायचे 'अजी तुम्ही देव पाहिला का देव' कुठी रायतोजी ! तेव्हा ते म्हणतात, बाप हो

१) दगडधोंड्यांची पूजा करण्यात वेळ आणि पैसा याचा खर्च करू नका,

२) त्याच्यापुढे बकरा आणि कोंबड्या मारू नका,

३) तीर्थक्षेत्रांना जाऊ नका.

४) गंगास्नानाने जर पाप जातात असे म्हणणे हा धर्माचा शुद्ध काळाबाजार आहे, असे गाडगेबाबांनी आपल्या प्रत्येक कीर्तनात मग्न झालेल्या लोकांना

सांगितले. श्रोत्यांशी ते नेहमी प्रत्यक्ष संवाद साधीत. ते विचाराचे अजी “देव किती आहेत?” श्रोते म्हणत ‘एक’. “तुमच्या गांवी खंडोबा आहे का?” ‘आहेना’, ‘मग देव किती झाले’, ‘दोन’ अशी वाढवीत वाढवीत देवांची संख्या ते दहाबारावर न्यायचे. श्रोत्यांच्या डोक्यात आपोआप प्रकाश पडू लागायचा.

गाडगे बाबा पुढे ते म्हणायचे, ‘देव सोन्याचा केला तर त्याचा बाप सोनार झाला.

‘देव लोखंडाचा केला तर त्याचा बाप लोहार झाला. या दगडधोंड्यांच्या नादी लागू नका आणि वेळ बर्बाद करू नका.’ असे ते आवर्जून सांगत होते.

देवांवर, त्यांच्या मूर्तिपूजेवर हल्ला चढविताना ते तुकाराम आणि कबीर यांचे पुरावे घेत. आणि आपले म्हणणे सामान्य खेडुतांच्या गळी उतरवीत असत .

गाडगे बाबा एखाद्या गावी ते कीर्तन लावीत. खेडुतांना विचारीत, ‘कारे भाऊ तीर्थाला गेलात नाई?’

श्रोते : होय, बाबा.

बाबा : बोलला काई तुमचा देव?

श्रोते : नाई.

बाबा : इतक्या दुरून गेले तं जेवले-गिवले का, असं काईच नाई विचारलं? वारे! तुमचा देव?

देवांची आणि मूर्तिपूजेची गाडगेबाबांनी अतिशय त्वेषाने टिंगल केलेली दिसते. खेड्यापाड्यांमध्ये दगड-धोंड्याला शेंदूर माखून देव बनविले जाते. अशा शेंदूरमाखल्या देवांना त्यांनी नदीत उचलून फेकले. केवढे हे क्रांतिकारकत्व !

एका कीर्तनात ते म्हणतात, ‘कसा बापा तुमचा देव? महादेवाच्या पिंडीवर कुत्रं अभिषेक करते तं तो ‘हाडई’ म्हणत नाही.’ यापेक्षा कोणत्या शब्दांत मूर्तिपूजेवर आणि कर्मकांडांवर हल्ला करता येईल?

जगात जाती दोनच.

**इहवादी दृष्टिकोण**

गाडगेबाबांच्या चरित्रातली एक घटना अतिशय उद्‌बोधक आहे. महाराष्ट्रभर त्यांनी भ्रमंती केली. नासिकला ते गेले. तिथे एक पुरोहित

पाण्यात उभा राहून मंत्र म्हणत होता. त्यांची चेष्टा करण्याची इच्छा गाडगेबाबांची झाली. ते नदीच्या पात्रात उतरले. नदीचे पाणी ओंजळीत घेऊन ते किनाऱ्याकडे फेकू लागले. तो पुरोहित संतप्त होऊन म्हणाला, 'अरे वेड्या ! हे काय करतो आहेस ?

बाबा म्हणाले, 'काई नाई, माझ्या वावराले पानी घालतो.' वावर म्हणजे शेत.

'कुठे आहे तुझे शेत ?'

'जी वऱ्हाडात, मूर्तिजापूरपाशी दापुरा हाये तथी.'

पुरोहित म्हणाला, 'हे पाणी इतक्या दूर कसे जाणार ?'

बाबा म्हणाले, 'तुम्ही पितृमोक्ष अमावश्येला आपापल्या पितरांना अन्न स्वर्गात पाठवता मंग आम्हाला वऱ्हाडात पानी नाई पाठवता येनार काय ?'

अशा बुद्धिवादी युक्तिवादाच्या विनोदाची डूंगरे बाबांच्या चरित्रात अनेक ठिकाणी निनादताना दिसतात. गो.नी. दांडेकरांसारख्या चरित्रकारांना ती का दिसू नयेत ?

सत्यनारायणासारख्या पोथ्यांचाही गाडगेबाबांनी कडाडून निषेध केला आहे. ते म्हणतात. साधुवाण्यानी सव्वा रूपयाचा प्रसाद वाटला आणि पोथी वाचली तर कलावती का लीलावतीची बोट पाण्यात तरंगली. असं अशीन तं मंग सारे भटजी सैन्यात पाठवा. शत्रूच्या बंदुकीच्या गोळ्या परतावा म्हणा सत्यनारायणाची पोथी वाचून असे परखड विचार एका निरक्षर माणसाने मांडावे याचे कौतुक वाटते.

**शिक्षणावाचून माणूस म्हणजे धोंडा**

भारतातल्या रोख दारिद्र्याचा शोध घेताना त्यांच्या लक्षात आले. शिक्षणाशिवाय आमचा उद्धार नाही. यासंबंधी बोलताना त्यांनी अनेकवेळा म्हटले आहे 'हे लोक का गरिबीत ? ज्याले इद्या नसीन त्याले खटाऱ्याचा बैल म्हटले तरी चालेल ! आता तरी सुधरा. मुलाले शिक्षण द्या. इव्हायाले पाहुणचार करू नका. पण मुलाले शाळेत घातल्याशिवाय राहू नका.'

सामाजिक तळमळीतून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था काढल्या. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याला सक्रिय पाठिंबा दिला. स्वतः निरक्षर असलेल्या या माणसाने महाराष्ट्रातील खेडुताच्या हाती

'लेखणी' दिली. कशासाठी? त्यांना वाटले होते, शिक्षणानंतर समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता कमी होईल, देव आणि देवाचे नावाने चालणारे कर्मकांड कमी होईल, जातिभेद आणि पशुहत्या थांबेल. पण काय झाले? शिकलेल्या आजच्या माणसांनी या सर्व गोष्टींना खतपाणी घातले आहे. जी गोष्ट निरक्षर माणसाला समजली ती आम्हा सुशिक्षितांना अस्पृश्यता केवळ कायद्याने जाणारी नसून मतपरिवर्तनाने जाईल, हे ओळखून अस्पृश्यतेसंबंधी आपले स्पष्ट विचार त्यांनी कीर्तनाद्वारा खेड्यापाड्यांतून आणि शहरांतूनही जनतेपुढे मांडले.

गाडगेबाबां म्हणायचे, 'जगात जाती फक्त दोनच आहेत. एक पुरूष व दुसरी स्त्री. तिसरी जातच नाही. जो कोणी जात विचारीत असेल तो महामूर्ख होय. कोणी जात विचारलीच तर त्याला मी 'माणूस' आहे असे सांगा.

जनावरात जसे गाढव, बैल, म्हैस, कुत्रा इत्यादी जाती आहेत तशा मानवप्राण्यात नाहीत. तसे असते तर जनावरात जसा हा गाढव हा बैल असे ओळखता येते, तसेच मनुष्यजातीत हा महार, हा कुणबी, हा ब्राह्मण असे ओळखता आले असते. पुढे त्यांनी म्हटले आहे, आपल्या देशातच फक्त 'शिवाशीव' हा शब्द आहे, शिवाशीव हा शब्द रशियात नाही, अमेरिकेत नाही, चीनमध्ये नाही. फक्त हिंदुस्थानातच आहे बाप्पा! जातिभेद निर्मूलनासाठी असे प्रभावी प्रबोधन त्यांनी खेड्यापाड्यांमधून दिले.

**संदर्भसुची**

१) संत गाडगेबाबा, मधुकर केचे
२)श्री संत गाडगेबाबा, केशव शिताराम ठाकरे
३)गाडगेबाबा और उनका मिशन, सतनाम सिंह
४) देवकी नंदन गोपाला, गोपाल नीलकंठ दांडेकर

● ● ●

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे अंधश्रद्धा निर्मूलन कार्य व सुधारणा

**प्रा.डॉ.आर.पी. झनके**
इतिहास विभाग प्रमुख,
स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान
व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा
मोबाईल नंबर ९४२१४९३४६८.
Email -zankeravindra9@gmail.com

**प्रस्तावना :-**

इ.स. १८७५ ते इ.स. १९३९ पर्यंत बडोदा संस्थानचे अधिपती राहिलेले सयाजीराव खंडेराव गायकवाड यांचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी नाशिक जिल्ह्यात कौळाने येथे झाला. बडोदा संस्थानातील प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याकरिता ते विशेषत्वाने ओळखले जातात.वडिलांच्या मृत्यूनंतर दिवाण सर टी. माधवराव यांच्याकडून राज्यकारभाराचे शिक्षण घेऊन २८ डिसेंबर १८८१ पासून गादीवर आल्यावर राज्याची आर्थिक घडी सुरळीत करण्यापासून प्रारंभ केला. प्रशासनाची विभागणी करून राज्य यंत्रणेत सुरळीतपणा निर्माण केला. ग्राम प्रशासनावर पकड निर्माण करून ग्रामपंचायतीचे पुनरुज्जीवन केले. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सुरू करून अल्पकाळात ती सर्व राज्यभर लागू करणारे बडोदा संस्थान हे देशातले पहिले राज्य ठरले. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणाची सोय केली. संस्थानात गावोगावी वाचनालय स्थापन केली. फिरत्या वाचनालयाची ही सोय केली.

सामाजिक सुधारणांसाठीही सयाजीराव गायकवाड यांनी भरीव कार्य केले. पडदापद्धती बंदी, कन्या विक्री बंदी, बालविवाह बंदी, मिश्र विवाहाचा पुरस्कार, स्त्रियांना वारसाहक्क मिळवून देणे, अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह यासारख्या अत्यावश्यक सुधारणा प्रत्यक्ष अमलात आणल्या. घटस्फोटासंबंधिचा कायदा हा सर्व भारतात पहिल्यांदाच त्यांनी जारी केला.

या सुधारणांच्या प्रत्यक्ष पुरस्कारामुळे इ.स. १९०४ मध्ये त्यांना राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. महाराज सयाजीराव गायकवाड हे दातृत्वासाठी नेहमी तत्पर असत. ते फार दूरदृष्टीचे राजे होते. ते प्रजाहित दक्ष राजे होते. जनतेचे कल्याण हाच त्यांचा ध्यास होता. अनेक सुधारणा करत त्यांनी शिक्षणाला प्राधान्य दिले. इ.स. १९२७ मध्ये बडोद्यात गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली, तेंव्हा तात्काळ संपूर्ण प्रशासन कामाला लावून निराधार व बेघर लोकांना ताबडतोब मदत पुरविली. बडोदा शहर, जिल्ह्यातील सार्वजनिक इमारती व धर्मशाळा नागरिकांना खुल्या करून दिल्या. या सर्व सहकार्याने महाभयंकर पूरस्थितीतही लोकांना दिलासा मिळाला.

**राजघराण्यातील अंधश्रद्धांना मूठमाती-**

इ.स. १८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर महाराजा सयाजीराव यांच्या सामाजिक व धार्मिक सुधारणांना सुरुवात झाली. सयाजीरावांनी धार्मिक सुधारणांना प्रारंभ राजवाड्यातील देवघरापासून केला. ब्राह्मणांकडून राजघराण्यातील व्यक्तींना विविध प्रकारची अनुष्ठाणे करण्याचा आग्रह धरण्यात येई. तसेच विविध ग्रहांच्या स्थितीचा राजघराण्यातील व्यक्तींच्या आयुष्यावर वाईट परिणाम होतो, त्यासाठी ग्रहांची शांती करण्याचे प्रकारही मोठ्या प्रमाणावर होत होते. याशिवाय राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याची पद्धत ही तर कर्मकांडाचा कळस बनली होती. ब्राह्मणांनी दक्षिणेच्या हव्यासापाई राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याचे प्रसंग वारंवार घडून आणले जात. सुरुवातीच्या काळात ह्या विधींना राजघराण्यातील व्यक्तींचा पाठिंबा होता. महाराजांना सुद्धा या विधींच्या खर्चासाठी मान्यता द्यावी लागे. सयाजीरावांनी एखाद्या पुजाऱ्यास मंत्राचा अर्थ विचारल्यास राजघराण्यातील स्त्रियांकडून महाराजांची विचार इंग्रजी शिक्षणामुळे बिघडले असून त्याचा परिणाम म्हणून देवतांचा कोप होईल व राजघराण्यावर संकट येईल असा गवगवा करण्यात येई. सयाजीरावांनी राजवाड्यात होणाऱ्या सर्व धार्मिक विधींचे अर्थ सर्वांना समजण्यासाठी ते मंत्र प्रकाशित करण्याचा विचार मनात आणला. तसा आदेशही काढला. तसेच राजवाड्यात होणारी सर्व धार्मिक कृत्ये शास्त्रार्थासह तपशीलवार लिहून काढण्याचा आदेशही दिला. त्यानुसार शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ, आणि भाऊ मास्तर यांनीही जबाबदारी स्वीकारून धर्मविधीचा तपशीलवार विशद करणारा 'ऐने राज मेहेल' नावाचा ग्रंथ तयार

केला या ग्रंथातून धर्मविषयक ज्ञान सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्याबरोबरच राजवाड्यातील धार्मिक खर्चाला शिस्त लावण्याचा यशस्वी प्रयत्न सयाजीरावांनी केला. सयाजीरावांनी राजवाड्यात होणाऱ्या अनावश्यक धर्म विधीचे प्रमाण कोणाच्याही धार्मिक भावना न दुखावता कमी करण्याचे प्रयत्न केले. राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याचा विधी बंद करण्याचा आदेश काढला. धर्मविधी बंद करत असताना समाजाची मानसिकता लक्षात घेण्याची सयाजीरावांची सर्वसमावेशकता अधोरेखित होते.

**धार्मिक अंधश्रद्धांविषयी जागृती**

सयाजीराव कोणत्याही क्षत्रिय राजाप्रमाणे हिंदू धर्माभिमानी होते. आधुनिक शिक्षणामुळे हिंदू धर्मामध्ये शिरलेले काही दोष त्यांनी कटाक्षाने दूर ठेवले आणि धर्मात आधुनिकता आणण्याचा प्रयत्न केला. अनेक देशाचा प्रवास केल्याने हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व त्यांना चांगले समजले होते. पण इतरांवर धर्म लादण्याच्या ते विरूद्ध होते. तसेच इतरांनीही आमच्यावर त्यांचा धर्म लादू नये अशी त्यांची अपेक्षा होती. आणि ते तसे जागरूकही होते. धर्म जतन करणारी हिंदूंची मंदिरे संस्कृती जपणारी संस्कृत भाषा आणि ती भाषा जतन करणारे विद्वान या सर्वांचे संरक्षण करणे हाच राजधर्म असल्याचे ते मानत होते. हिंदू धर्माच्या आधुनिक ज्ञानाने त्यांना दृष्टी मिळाली. हिंदू धर्माच्या एकात्मतेचे रहस्य त्यांच्या मंदिरात आहे. निरनिराळ्या लोकांना एकत्र आणण्यासाठी आधी परमेश्वरासमोर तुम्ही सर्व सारखे आहात ही जाणीव निर्माण करण्यासाठी मंदिरासारखे दुसरे माध्यम नाही. असे सयाजीरावांना युरोपमध्ये आढळले. तेंव्हापासून लोकशिक्षणासाठी, लोककल्याणासाठी किंवा लोकजागृतीसाठी मंदिरासारखे दुसरे साधन नाही, फक्त पुजारी निवडताना त्याची परीक्षा घेऊनच निवडावा. अशी सयाजीरावांची इच्छा होती. मंदिराचे महत्त्व पटवून देण्यासाठी मुद्दाम लोकहितवादींना उद्‍घाटनासाठी आमंत्रण दिले. म्हणजेच धर्म सुधारकांनी सुद्धा धर्मश्रद्धा, मूर्तिपूजा यांची लोककल्याणाशी सांगड घालावी, याचा वैज्ञानिक विचार करावा असे त्यांना वाटत होते.

बडोद्यातील धार्मिक क्षेत्रातील अंदाधुंद कारभार थांबण्यासाठी महाराजांनी केलेले प्रयत्न खूप महत्त्वाचे आहेत. श्रावणमास दक्षिणेच्या माध्यमातून सुधारणा करत असताना परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच दक्षिणा देण्याचा नियम सयाजीरावांनी केला. यातून बचत झाली. सयाजीरावांनी

१९१५ मध्ये केलेल्या हिंदू पुरोहित कायद्यानुसार हिंदू पुरोहित परीक्षा, श्रावण मास दक्षिणापरीक्षा पास झाल्यास किंवा संस्थांकडून तशी मान्यता मिळाल्यावरच पुरोहिताचा अधिकार प्राप्त होत होता. त्याबाबतचा कायदा लागू करून जो पुरोहित या निकषात न बसता धार्मिक विधी करीत असेल तर त्यास २५ रुपये दंडाची तरतूद होती. ही बाब म्हणजे हिंदू धर्म संस्कृतीच्या इतिहासातील एक क्रांती होती.

हिंदू धर्मासोबत इतर धर्मीयांसाठीही तत्कालीन शिफारशीनुसार अनेक महत्त्वपूर्ण कायदे महाराजांनी केले. यातीलच एक कायदा म्हणजे जैन धर्मातील संन्यास दीक्षा कायदा होय. जैन धर्मियांच्या तक्रारीवरून बडोदा सरकारने एका विशेष कमिटीची नेमणूक करून तिच्या मार्फत जैन धर्मशास्त्रात संन्यास प्रथेस समर्पक आधार नसल्याची खात्री करून घेतली आणि १९३३ ला हा कायदा लागू केला. अल्पवयीन मुला-मुलींना संन्यास दीक्षा देणे हा फौजदारी गुन्हा समजला जाऊन तो गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस शिक्षेची ही तरतूद केली. इ.स. १९०१ च्या जनगणनेनुसार बडोदा संस्थानात मुस्लिमांची संख्या नऊ टक्के होती. महाराजांनी समाजोन्नतीसाठी सर्वसमावेशक प्रयत्न केले. मुस्लिम धर्मातही दानधर्म खूप होत असे. अशा देणगीसाठी विश्वस्त नेमला होता. जमाखर्चाचा हिशोब ठेवणे व धर्मदाय मिळकत उद्देशानुसार करणे ही त्याच्यावर जबाबदारी होती. परंतु बऱ्याचदा विश्वस्त धर्मदाय मिळकत आपल्याच मालकीची समजून तिचा वैयक्तिक फायद्यासाठी उपयोग करत होते. सयाजीरावांनी १९२७ साली मुस्लिम धर्मियांसाठी 'वक्फ कायदा' करून चुकीच्या आचरणाला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला.

**शैक्षणिक जनजागृती**

शिक्षणातून स्वातंत्र्याकडे अशी सयाजीरावांची गुढ श्रद्धा होती. त्यामुळे बडोदा हे प्रयोगशाळा समजून त्यांनी शिक्षणाचे सर्व प्रयोग आपल्याच राज्यात करून पाहिले. या प्रयोगासाठी त्यांना बराच विरोधी पत्करावा लागला. शिक्षणाच्या या महान कार्यात त्यांना लोकमान्य टिळकांचा पाठिंबा होता. टिळकांच्या केसरी चे नियमित वाचन आणि बापूसाहेब आठल्ये यांच्यामार्फत टिळकांचे नियमित मिळणारे संदेश यांच्यामुळे सयाजीरावांची खरी ओळख आपोआप होत होती.

सयाजीरावांना शिक्षण काळातच त्यांच्या शिक्षकाकडून याबाबतच्या

सूचना मिळाल्या होत्या. राज्यभिषेकाआधी अनेक शिक्षकांच्या साह्याने विविध विषयासंदर्भात व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. त्यातून सयाजीरावांवर योग्य संस्कार झाले होते. त्यानुसार धर्मविषयक शिक्षण हे विद्यार्थ्यांना बंधनकारक नसावे असे त्यांचे आदेश होते तसेच ग्रहणाच्या दिवशी सरकारी सुट्टी घेणे हे सुद्धा एक अंधश्रद्धा असून सयाजीरावांनी हुकूम काढून ग्रहणाची सुट्टी बंद केली. याशिवाय धार्मिक कार्य व दानधर्मावर होणाऱ्या प्रचंड खर्चाला आळा घालण्यासाठी राजवाडा विभाग ह्या विषयावर झालेल्या व्याख्यानातील शिकवणीनुसार धनदांडग्या व्यक्तीऐवजी गरजू व्यक्तींनाच खिचडी व ग्यारमीचा लाभ मिळावा यासाठी इ.स. १८९३ मध्ये सयाजीरावांनी या प्रथेत बदल केला. त्यानुसार जातीचा निकष न लावता सर्व जातीतील निराश्रीत, अंध, अपंग, विधवा स्त्रिया, लहान मुले व गरजू व्यक्तींची समितीच्या माध्यमातून निवड करून त्यांना पास देण्यात यावे, आणि पासधारक व्यक्तीलाच खिचडी ग्यारमीचा लाभ असा हुकूम सयाजीरावांनी १६ जून १८९३ रोजी काढला. त्यामुळे ब्राह्मण आणि मुसलमान व्यक्तींबरोबरच इतर जातीतील गरजूंनाही याचा लाभ मिळू लागला.

ऑगस्ट १८८५ मध्ये बरोडा कॉलेज आणि हायस्कूलच्या बक्षीस समारंभाच्या वेळी केलेल्या भाषणामध्ये आपले शिक्षण विषयक धोरण सयाजीरावांनी जाहीर केले. त्यामध्ये असलेली कलमे १) प्रतिवर्षी ३० नवीन शाळा उघडाव्यात. २) दरवर्षी शाळांच्या इमारतीसाठी ६०००० रूपये खर्च करण्यात यावे. ३) प्रत्येक विभागातील मुख्य शाळेला जोडून अभ्यासक्रमाच्या पुस्तकात उल्लेख असलेल्या वस्तूंचे एक संग्रहालय असावे.४) स्त्री शिक्षणाच्या प्रगती कडे लक्ष देऊन मुलींच्या शाळेत स्त्री शिक्षकाची नेमणूक करावी. ५) समाजातील अगदी शेवटच्या स्तरापर्यंत शिक्षणाच्या प्रसाराची तजवीज करणे.६) विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवणे.७) औद्योगिक शिक्षण देणारी शाळा सुरू करणे.८) विद्यार्थ्यांसाठी एक नवीन वाचनमाला तयार करून घेणे.९) इंग्रजी भाषेमधून देशी भाषेत ग्रंथांची भाषांतर करून घेण्याची व्यवस्था करणे. त्यासाठी विद्वान पंडितांची नेमणूक करणे.१०) जेवढी शक्य होतील तेवढी वाचनालये निर्माण करावीत. या सर्व कलमांद्वारे समाजातील उच्चनीचता कायमची दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न सयाजीरावांनी केला असून शिक्षण क्षेत्रातील सर्व अंधश्रद्धांचा

नायनाट केला.

सयाजी महाराजांना पाश्चिमात्य वैज्ञानिकांची विचार करण्याची, विचारांवर चिंतन करण्याची आणि त्यामधून एका निर्णयापर्यंत येण्याची पद्धत इलियट यांच्याकडून समजली होती. धर्म आणि राजकारण याची गल्लत केलेली कोणालाही आवडत नाही कारण अठराव्या शतकातील विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने केलेली जागृती होय. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये स्वसंरक्षणासाठी किंवा उद्धारासाठी परमेश्वरावर अवलंबून राहण्याची जरुरी नाही. सयाजीरावांना ज्ञानाच्या प्रत्येक शाखेमध्ये रस होता. आणि त्यामुळे गती होती. त्यामागील चालना देणारी शक्ती म्हणजे या ज्ञानाचा फायदा माझ्या प्रजेला आणि देशाला कसा होऊ शकेल, ही जाणीव हिंदुस्तानी प्रजा मूर्ख नाही. ती अंधश्रद्ध असेल, पण आपल्याला इंग्रजी विज्ञान तंत्रज्ञान आणि उद्योग या क्षेत्रामध्ये जाणून-बुजून मागे ठेवत आहेत आणि जपान प्रमाणे आपण आपली माणसे युरोप, अमेरिकेमध्ये धाडून हे विज्ञान आणि तंत्रज्ञान हस्तगत केले पाहिजे, या टिळकांच्या मताशी ते एकदम सहमत होते. आणि हे कशासाठी तर त्यांचीच शस्त्रे वापरून त्यांचाच पराभव करण्यासाठी. त्याकरिता सयाजीरावांनी विज्ञान हे 'परहस्त गतं धनं' समजून ते परत कसे मिळवता येईल यासाठी अतोनात प्रयत्न केले.

सयाजीराव बडोद्या पुरते अत्यंत लोकप्रिय आणि फलकेंद्रि राजे ठरले. ते हुकूमशाही मानणारे, अत्यंत स्वाभिमानी. एकलकोंडे, हट्टी पण प्रचंड बुद्धिमान राजे होते. त्यांचा कायद्याचा अभ्यास चांगला होता. इंग्रजांचा गायकवाडांशी झालेल्या कराराचा त्यांनी नीट अभ्यास केला होता. खंडेराव महाराजांनी इंग्रजांना मदत केली नसती तर बडोदे संस्थान उत्तर आणि दक्षिण भारताच्या स्वातंत्र्य युद्धाचा मध्यबिंदू होऊन इंग्रजांच्या विनाशास कारण झाले असते. जेंव्हा जेंव्हा अपेक्षाभंग होईल तेंव्हा तेंव्हा ते दुखावले जात आणि त्यांचे मन इंग्रजांविरूद्ध बंड करून उठे. इंग्रज वरकरणी सयाजीरावांशी नीट वागत असले तरी सयाजीरावांचे चित्त मूळ ध्येयापासून किंचितही विचलित झाले नाही. 'बरोडा बर्लिन करारा' सारखा टाईम बॉम्ब इंग्रजी सिंहासनाखाली ठेवून ते शांतचित्ताने मजा पाहत होते. सयाजीराव हाडाचे विचारवंत जरी नव्हते तरी त्यांची सारी भिस्त त्यांच्या उत्तम सल्लागारांवर होती. त्यांचा एक- एक सल्लागार म्हणजे हिरा होता. त्यांच्या बळावरच

बडोद्याचे शासन उत्कृष्ट रीतीने सांभाळले. अनेक सुधारणा घडवून आणल्या. नव्या प्रथा सुरू केल्या. इंग्रजी शब्द हटवून संस्कृत प्रचूर शब्द लोकप्रिय केले आणि प्रजेला सुशिक्षित, सुसंस्कारी आणि सुजान बनविले. त्यामुळे सर्व संस्थानमध्ये बडोदा संस्थानाला आदर्श संस्थान असा बहुमानाचा दर्जा त्यांनी प्राप्त करून दिला. आपल्या राज्यात विकास साधायचा असेल तर तेथे प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना मोफत आणि आवश्यक करणे जरूरीचे आहे. याचा स्पष्ट उल्लेख सयाजीरावांनी दिवाण मनीभाई जसभाई देसाई यांना लिहिलेल्या पत्रामध्ये पहावयास मिळतो. मध्यवर्ती विधानसभेमध्ये साऱ्या भारतात बडोदे राज्याप्रमाणे मोफत आणि आवश्यक प्राथमिक शिक्षण इंग्रज सरकारने सुरू करावे. असा ठराव १६ मार्च १९११ रोजी गोपाळ कृष्ण गोखले यांनी मांडला. यावरून ब्रिटिश इंडियातील बडोदे राज्य शिक्षण क्षेत्रात किती पुढे होते हे समजते. इंग्रजांवर असा नैतिक विजय मिळविणारे सयाजीराव हे एकुलते एक संस्थानिक होते.

**सारांश-**

प्रजाहित दक्षता, पुरोगामी विचारसरणी, विशाल सामाजिक दृष्टिकोन यामुळे बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्व आणि कर्तुत्व त्यांच्या समकालीन संस्थानिकांमध्ये आगळे वेगळे दिसते. स्वदेश आणि स्वधर्म यांचा मूलमंत्र मनावर बिंबलेल्या या लोकाभिमुख राजाने लोकसेवेसाठी अवघड असा ज्ञानमार्ग स्वीकारला. त्यासाठी आपल्या संस्थानात सक्तीचे आणि विनामूल्य प्राथमिक शिक्षण सर्वप्रथम सुरू केले. त्यांनी आपल्या राज्यात अस्पृश्यता निवारण्याचा कायदा करून अस्पृश्यांच्या शिक्षणाची राहण्या- जेवण्यासह सोय केली. स्त्री शिक्षणास प्राधान्य देऊन स्त्रियांना प्रशिक्षण देण्यासाठी वेगळे महाविद्यालय ही उघडले. अनेक शैक्षणिक व सामाजिक सुधारणांच्या जोडीने साहित्यिक व प्रशासन पूरक सुधारणा घडवून आणण्यातही सयाजीरावांनी पुढाकार घेतला. मिश्रविवाह, विधवा विवाह, स्त्रियांचा वारसा, पडदा पद्धतीवर बंदी, बालविवाह प्रतिबंध यासारख्या प्राकृतिक सामाजिक सुधारणा राबविणारे सयाजीराव खरोखरच 'आदर्श राजे' म्हणून गौरविले जातात.

**ग्रंथ सूची-**

१)करंदीकर अ.ज., 'क्रांतिकारक टिळक नि त्यांचा काळ', काळ प्रकाशन,

१९६९
२) केळकर न.ची.- ‘टिळक चरित्र’ खंड १
३) दाते श. रा., ‘हिंदू सभेच्या कार्याचा इतिहास’, काळ प्रकाशन, १९७५
४) नेणे वि.पा., ‘सयाजीराव यांची भाषणे’ भाग २, सावळराम, १९३७
५) टिकेकर अरुण, धनागरे द. ना., परांजपे प्र.ना.(संपादक), ‘श्रीमंत सयाजीराव गायकवाड’, श्री गंधर्व वेद प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
६) गोवंडे गं.कृ., ‘स्मृति विहार’, १९७५
७) देशपांडे राजीव (संपादक), निलोफर मुजावर, ‘महाराजा सयाजीराव आणि अंधश्रद्धा निर्मूलन’, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, राजर्षी शाहू नगर, सांगली, जुलै, २०२१

• • •

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अंधश्रद्धा निर्मूलन

**प्रा.डॉ. शाम दुतोंडे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा नारायणराव गावंडे विज्ञान
व आशालता गांवडे वाणिज्य महाविद्यालय,
साखरखेर्डा, जि.बुलडाणा. मो.: ९८५०१७११३०
ई.मेल. -shyamdutonde@gmail.com

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय

जगातील प्रचंड लोकप्रिय व्यक्तिमत्व म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बाबासाहेब म्हटले की, बालकांपासून तर वृद्धांपर्यंत सर्वांना स्फुरण चढते. ते म्हणजेच त्यांच्या विद्वत्तेचे, त्यांच्या अथांग ज्ञानाचे, त्यांच्या कार्याचे. डॉ. बाबासाहेब हे राजकिय तज्ज्ञ, विधिज्ञ, उच्च कोटीचे अर्थशास्त्रज्ञ, पत्रकार आणि सामाज सुधारक म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म १४ एप्रिल, इ.स. १८९१ महू, मध्य प्रांत, ब्रिटिश भारत (सध्या भीम जन्मभूमी, डॉ. आंबेडकर नगर, मध्य प्रदेश) येथे झाला. बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अंधश्रद्धा निर्मूलनातील भूमिकेचे अध्ययन म्हणजे प्रस्तुत शोधनिबंध होय.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अंधश्रद्धा निर्मूलन

डॉ. आंबेडकरांच्या अंधश्रद्धानिर्मूलन कार्याचा वेध घेताना त्यांच्या धर्मचिकित्सेचा आणि धर्मांतर चळवळीचा मागोवा घेणे अपरिहार्य ठरते. महाराष्ट्रात अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीची व्याप्ती प्रामुख्याने बुवाबाजी, चमत्काराचा दावा करणारे स्वामी, साक्षात्कारी असल्याचा प्रचार करणारे महाराज, झपाटणे, भानामती, वशीकरण विद्या, पुनर्जन्म, भावातीत ध्यान इ.च्या संदर्भातील प्रबोधनाची आहे. या सर्व अंधश्रद्धांची मुळे धर्माच्या तात्त्विक वा व्यावहारिक स्वरूपात आहेत. अंधश्रद्धानिर्मूलनाचा कार्यकर्ता

मर्यादित उद्दिष्टाने व्यवहारातील उघड व बोचक अंधश्रद्धेच्या विरोधात कृती करीत असतो तर धर्मसुधारक आणि धर्मपरिवर्तक अंधश्रद्धांचे शक्तिसामर्थ्य असलेल्या ईश्वरवाद, आत्मवाद, अवतारवाद, पुनर्जन्मवाद, कर्मवाद या अध्यात्मवादी प्रवृत्तींची मूलगामी चिकित्सा करीत असतो. त्याही पलीकडे जाऊन अंधश्रद्धा जाणीवपूर्वक पोसणाऱ्या, प्रसारित करणाऱ्या जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था यासारख्या भौतिक व्यवस्थांविरोधी लढेही उभे करीत असतो. भारतीय प्रबोधन चळवळीच्या इतिहासात डॉ. आंबेडकरांच्या अंधश्रद्धानिर्मूलन कार्याची अनन्यता ही आहे की अंधश्रद्धांचा पाया असलेल्या वैचारिक आणि भौतिक या दोन्ही आधारांवर कृतिशील जनलढे उभारणारे ते एकमेवाद्वितीय समाजसुधारक आहेत.

**अंधश्रद्धाविरोधी वैचारिक व व्यावहारिक संघर्ष**

या क्षेत्रात बाबासाहेब समाजवादी-साम्यवादी चळवळींनाही मार्गदर्शक ठरेल असे योगदान देतात. कोणत्याही आर्थिक वा राजकीय क्रांतीची पूर्वतयारी सामाजिक व वैचारिक क्रांतीने करणे आवश्यक असते ही त्यांची धारणा असल्याने भारताच्या प्रबोधन चळवळीत धर्मसुधारणेचे आग्रही प्रतिपादन करीत बाबासाहेब अग्रभागी राहतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्म स्वीकारताना या धर्मातील सर्व अंधश्रद्धा नाकारल्या, त्यांची शुद्धता करून त्यांनी पुरोगामी, मानवीय बौद्ध धम्माचा स्वीकार केला. त्यांना धम्माला रुजविण्याकरिता पुरेसा वेळ मिळाला नाही. पण, त्यांच्या विचारांचा-ग्रंथांचा अभ्यास केल्यास बाबांकडे जाणे, गंडेदोरे बांधणे, ग्रहताऱ्यांवर विश्वास करणे त्यांच्या विचारांच्या टोकाचे विपरीत आहे हे लक्षात येईल.

डॉ. आंबेडकरांनी तर्कशुद्ध पद्धतीने विविध धर्मांची चिकित्सा केली. हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अस्पृश्यतेची अमानवीय प्रथा त्यांना अमान्य होती. चिकित्सेअंतीच त्यांनी बुद्धधम्माची दीक्षा घेतली. बुद्धधम्मात अंधश्रद्धेला, बुवाबाजीला थारा नसणार, मानवता हेच सूत्र त्यांनी ध्यानात घेतले. आज आपण बाबासाहेबांचा धम्म विसरून कुण्या बुवाबाबाच्या, मंत्र-तंत्राच्या व गंड्या-दोऱ्यांच्या नादी लागत असू तर आपण पुन्हा त्याच वाटेवर परत जात असल्याचे म्हणावे लागेल. सत्यनारायण नाकारला म्हणून परित्राण पाठ स्वीकारायचा काय? बाबासाहेबांचा विचार पुढे नेण्याकरिता

पुरोगामित्व आणि सद्सद्विवेकबुद्धी स्वीकारणे हीच आपली खरी गरज आहे, असेही ते निक्षून म्हणाले.

'बुद्ध आणि त्याचा धम्म', 'शूद्र पूर्वी कोण होते?' 'जातिनिर्मूलन', 'रिडलस ऑफ हिंदुइझम' अशा ग्रंथसंपदेतून त्यांनी सनातनी ब्राह्मणी व्यवस्थेवर वैचारिक हल्ले केले. 'बहिष्कृत भारत', 'प्रबुद्ध भारत', 'जनता' यासारख्या नियतकालिकांतून हिंदुधर्म व समाजव्यवस्था, बुद्ध धम्म आणि त्याची शिकवण, अस्पृश्यता-जातिभेद आणि त्यांचे निर्मूलन यांची अखंडपणे चर्चा केली. सभा संमेलनातूनही त्यांच्या महानिर्वाणापर्यंत ते या जनसागराच्या आघाडीवर अथकपणे कार्यरत राहिले. परंतु धर्मविषयक प्रबोधनाबाबत त्यांची भूमिका केवळ विचारवंतांपुरती सीमित राहिली नाही. अस्पृश्यता, जातिभेद व स्त्रीदास्य यांना पावित्र्य प्रदान करणारा तत्त्वविचार व व्यवहार याविरोधात संघर्षाची भूमिका घेऊन त्यांनी जनलढेही उभारले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह (१९२७), काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०-३५), मुखेडचा पांडवप्रताप-सत्याग्रह (१९३२) पर्वती-सत्याग्रह अशा लढ्यांतून त्यांनी धर्मश्रद्धा व अंधश्रद्धा यासंबंधीच्या चिकित्सेच्या लाटा भारतभर उसळवीत ठेवल्या. बौद्ध धर्माचा स्वीकार करून व दलित जनतेचे सामुदायिक धर्मांतर घडवून हिंदू धर्माला वैचारिक व व्यावहारिक धक्का दिला. बौद्ध-धम्मपरिवर्तनाची घटना हिंदुधर्मीयांना आपल्या अंधधर्मश्रद्धांबाबत आत्मटीकेची भूमिका घेण्यास भाग पाडणारी, जातिव्यवस्था आणि त्यावर उभ्या असलेल्या धर्माबाबत अपराधभावना व्यक्त करावयास लावणारी आहे.

**अंधश्रद्धेचे शक्तिस्त्रोत कोणते?**

हिंदुधर्माची इतिहासातील विविध रूपे स्पष्ट करताना प्रा.गं.बा.सरदार 'धर्म व समाजपरिवर्तन' यात यातुविधी, वैदिक यज्ञ, देवताराधन, एकेश्वरवाद, ब्रह्मवाद इ.ची चर्चा करतात. डॉ. आंबेडकरांनी हिंदुधर्मातील या अंगाच्या विरोधात आयुष्यभर जनप्रबोधनाची वैचारिक चळवळ उभारली होती. अंधश्रद्धानिर्मूलनाची चळवळ ही गूढवादी, अगम्य अशा श्रद्धांच्या विरोधातील चळवळ आहे. डॉ.आंबेडकर जेव्हा आत्मा, अवतारवाद, चमत्कारवाद, वेदप्रामाण्य इ.वर हल्ला चढवितात तेव्हा तो अंधश्रद्धांविरोधी प्रबोधनाचा भाग असतो. हिंदुधर्मातील या वैशिष्ट्यांची रूपे म्हणून या संदर्भात समजून घेतली पाहिजेत. सृष्टीतील प्रत्येक पदार्थ, वृक्ष, प्राणी या सर्वांमध्ये यातुतत्त्व

वसत आहे. विशिष्ट क्रिया आणि मंत्रपठण यामुळे ते जागृत होते, इष्ट फलप्राप्तीची क्षमता त्याच्या ठिकाणी निर्माण होते. या यातुविधीची अभिव्यक्ती आपणास आजही मांत्रिकाच्या व्यवहारातून दिसून येते. विधिपूर्वक केलेल्या अचूक मंत्रोच्चारातून फलप्राप्ती होते, मंत्रशक्ती ही किमया आहे व पाऊस, अन्न, पशुधन, संतती, रोगनिवारण, शत्रुनाश इत्यादि गोष्टी त्यापासून उद्‌भवतात, ही वैदिक यज्ञामागील श्रद्धा आहे. आजच्या साक्षात्कारी बुवा-स्वामींच्या 'सामर्थ्या'मागे वैदिक यज्ञाची ही श्रद्धाच काम करीत असते. देवताराधन पद्धती ही वैदिक यज्ञानंतरची विकासावस्था. पदार्थपूजेतून इच्छापूर्ती करण्याचे धर्माचरण त्यातून उद्‌भवले. यज्ञीय देवतांच्या पूजा-उपासनातून इच्छित साध्य केल्याचा दावा जो करण्यात येतो, त्याला धार्मिक आधार या परंपरेत आहे. ब्राह्मवाद बुद्धिप्रामाण्य वा अनुभवप्रामाण्यावर उभा नाही तर तो आत्म्याच्या श्रद्धेवर उभा आहे. 'आत्मा' या अद्‌भुत शक्तीचे प्रकटीकरण करणे, आत्मे जागे करणे, यांसारख्या अंधश्रद्धांचा पाया आत्मवादात आहे.

डॉ. आंबेडकर हिंदुधर्माची चिकित्सा करतात तेव्हा हिंदुधर्माच्या या विविध रूपांतील अध्यात्मवादी, गूढवादी शक्तिस्थानांनाच धक्का देत असतात. बुद्धिवाद, विवेकशीलता, मानवतावाद या आधारे ते प्रश्न उभे करतात त्याचवेळी बौद्धधर्म स्वीकारण्यामागची कारणमीमांसा स्पष्ट करत जातात. 'वेद हे ईश्वरनिर्मित आहेत, अपौरुषेय आहेत, त्यांची आज्ञा मानावी', असे सांगण्यात येते. परंतु त्याला इतिहासात कोठे पुरावा नाही. ब्राह्मणांखेरीज कोणीच वेदाला प्राधान्य दिलेले नाही. 'उपनिषदांच्या या कारखान्यातील ब्रह्म व आत्मा या दोन गोष्टींकडे पाहिले तर बुद्धाने त्यांपैकी एकही गोष्ट मान्य केली नाही. बुद्धाने सांगितले मला ईश्वर नको, 'बुद्धाला वेद मुळीच मान्य नव्हते'. वर्णव्यवस्थाही बुद्धाला मान्य नव्हती. बुद्धाने चातुर्वर्ण्यावर पदोपदी प्रहार केलेले आहेत.

'बौद्ध धर्मात मोक्ष-स्वर्ग' या खुळ्या कल्पनांना स्थान नाही. उलट मानवी जीवित सुखसमाधानाने घालवायचे असेल तर मानवाने शुद्धाचरण, अहिंसा, समता, बंधुत्व या गोष्टींचा अवलंब करावा'.

डॉ. आंबेडकरांचे धर्मप्रबोधनाच्या क्षेत्रातील सर्वांत मौलिक योगदान म्हणजे बौद्ध धर्मांतराची त्यांनी उभी केलेली चळवळ.

अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीने भारतीय संदर्भात प्रेरणादायी वारसा

कोणत्या ऐतिहासिक घटना, महापुरुषांपासून घ्यावा?

अंधश्रद्धानिर्मूलन चळवळीचे तात्त्विक अधिष्ठान कोणते हवे? ब्राह्मणी वेदान्तवाद की अब्राह्मणी बौद्धवाद?

भारतीय इतिहास व संस्कृतीत वेदान्तवादाचा प्रतिकार करून विकसित झालेल्या अब्राह्मणी परंपरांतील अध्यात्मवादास नकार देऊन, या परंपरेची सामाजिक-धार्मिक पुनर्रचनेसाठी, पुनर्रचना कशी करावी?

अंधश्रद्धांचा प्रश्न धार्मिक श्रद्धा-व्यवहार या स्वरूपात धर्माच्या विचारव्यवहारात असतो. परंतु तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तो ब्रह्मवाद वा मायावाद म्हणून असतो. समाजशास्त्रात तो अध्यात्मवादी प्रभावाच्या रूपाने तर साहित्यात आत्मा, ब्रह्म, चातुर्वर्ण्य, परतत्त्व या ब्राह्मणी तत्त्वांच्या उदात्तीकरणाच्या रूपाने दडलेला असतो. या आणि इतर सर्वच क्षेत्रातील अध्यात्मवादी प्रवृत्तींशी संघर्ष देण्यासाठी कोणती अन्वेषणपद्धती स्वीकारावी?

आंबेडकरांच्या धर्मान्तर चळवळीने अशा प्रश्नांच्या संदर्भात उत्तरांचा शोध घेण्यासाठी समाजसुधारकांना-क्रांतिकारकांना मजबूर केले. डॉ. रावसाहेब कसबे त्यांच्या 'आंबेडकर व मार्क्स' या ग्रंथात बौद्ध धर्माची प्रगमनशीलता पुढील शब्दांत मांडतात-

'उपनिषदांनी जे तत्त्वज्ञान निर्माण केले होते, बुद्ध त्याच्या विरोधी होता. उपनिषदकारांनी आत्म्यावर सर्वाधिक भर दिला. आत्मा हा अभौतिक, शाश्वत व न बदलणारा आहे असे त्यांनी मानले. बुद्धाने उपनिषदांच्या विरोधात भूमिका घेऊन 'सर्व काही प्रवाही आहे' असे सांगितले. त्यामुळे जगाविषयी संपूर्ण वेगळ्या दृष्टिकोनास चालना मिळाली. कार्यकारणभावाचा वेगळा सिद्धान्त मांडणे बुद्धास भाग पडले. 'प्रतित्य समुत्पाद' या आपल्या तत्त्वाचे विवेचन बुद्ध करतो. (पृ.१४९).

चिंतनाच्या दोन परंपरांचा भेद विशद करताना भदंत आनंद कौसल्यायन बौद्ध परंपरेतील 'प्रत्यक्ष अनुमानवादा'ची, अनुभववादाची प्रशंसा करतात. 'बौद्ध परंपरा व मार्क्सवादी परंपरा अनीश्वरवादी, अनात्मवादी आणि अनित्यतावादी आहेत तर इस्लामी, इसाई आणि हिंदुपरंपरा शब्दप्रामाण्याचा स्वीकार करणाऱ्या आहेत, असे वर्गीकरण ते मांडतात. बाबासाहेबांनी स्वीकारलेल्या या वैशिष्ट्यपूर्ण वारशामुळे त्यांची भारतीय धर्मसुधारणा व प्रबोधनातील कामगिरी समकालीन समाजसुधारकांच्यापेक्षा वेगळी ठरते.

**संदर्भ**


१. ‘तिमिरभेद’ (संपादक) अंजली सोमण, या पुस्तकातून.

२. ‘डॉ.आंबेडकरांची भाषणे’, मा.फ.गांजरे, खंड ७ मधून

३. गायकवाड‘राजवंश’, डॉ. ज्ञानराज काशिनाथ (२०१६). महामानव

४. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर. कोल्हापूर, रिया प्रकाशन

५. ‘बाबासाहेब आणि धर्मांतर’. दै.लोकसत्ता

६. ‘डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धम्म’. दै.भास्कर


● ● ●

# अंधश्रद्धा निर्मुलनात नरेंद्र अच्युत दाभोळकर यांचे योगदान

**सहा.प्रा.आशिष गोविंदराव बरडे**
(संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण)
स्व.भास्करराव शिंगणे कला, प्रा नारायणराव गावंडे
विज्ञान व आशालता गांवडे वाणिज्य महाविद्यालय,
साखरखेर्डा, जि.बुलडाणा.

**प्रस्तावना**

नरेंद्र अच्युत दाभोळकर हे मराठी बुद्धिवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेसोबत काम करू लागले. १९८२ मध्ये अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही डॉ. श्याम मानव यांनी स्थापन केली. पुढे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी १९८९ मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. या संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष होते.

१९७० साली मिरज वैद्यकीय महाविद्यालयातून वैद्यकीय शाखेचे शिक्षण पूर्ण केले व त्यानंतर त्यांनी सातारा येथे वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. डॉ. नरेंद्र दाभोलकर हे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडाजगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला

बाबा आढाव यांच्या ‘एक गाव - एक पाणवठा’ या चळवळीत दाभोलकर यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्याम मानव यांच्या १९८२ साली स्थापन झालेल्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती मध्ये कार्य सुरू केले. साने गुरूजींनी स्थापन केलेल्या ‘साधना’ या लोकप्रिय साप्ताहिकाचे ते डिसेंबर १९९८ पासून मृत्यूपर्यंत संपादक होते.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी कोणत्याही धर्माला विरोध केला नाही. मात्र, धर्माच्या नावाखाली, दैवी चमत्काराच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीला,

शोषणाला, अंधश्रद्धेला विरोध केला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून भोंदूगिरी उघड करणारे अनेक प्रयोग, जनजागृतीचे प्रात्याक्षिक सादर करण्यात येतात.

डॉ. दाभोलकर यांनी अंधश्रद्धेविरोधात मुबलक लिखाणही केले. 'अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम', 'ऐसे कैसे झाले भोंदू' , 'अंधश्रद्धा विनाशाय', 'तिमिरातुनी तेजाकडे', 'प्रश्न तुमचे उत्तर दाभोलकरांचे', 'भ्रम आणि निरास' आदी पुस्तकांचे लिखाण केले आहे.

अंधश्रद्धेविरोधात आवाज उठवणाऱ्या दाभोलकर यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात मॉर्निंग वॉक सुरू असताना मोटारसायकलवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. त्यांच्या अंधश्रध्देविरूद्धच्या कार्याचा आढावा सदर शोधनिबंधात केला आहे.

२००७ साली डॉ. दाभोलकरांनी 'मागे वळून पाहताना' या मथळ्याखाली लेख लिहिला होता. त्यात त्यांनी अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या भूमिका, वाटचालीसह काही वैयक्तिक किस्सेही सांगितलेत.

या लेखात दाभोलकर सांगतात, 'वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर व्यवसाय करत असतानाच १९७१ साली 'समाजवादी युवक दल' नावानं सामाजिक काम सुरू केलं. यात काही मित्रच होतो. ७०-८० च्या दशकात अशा संघटनांच्या अनेक छत्र्या उगवल्या, त्यांना 'ॲक्शन ग्रुप' म्हटलं जाई. पण निर्माण होऊन काही काळ चमकणे आणि मग अस्तंगत होणं, अशीच वाटचाल यांपैकी अनेक संघटनांच्या वाट्याला आली. १९८२ साली 'समाजवादी युवक दल' नंही श्वास घेणं थांबवलं.'

'समता आंदोलन' नामक संघटनेत ही संघटना विलीन केली गेली. मात्र, तिची धडपडही दोन वर्षांत थांबली. दाभोलकरांना आजारी समाजाला बरं करण्यासाठी प्रवृत्त केलं, ते बी. प्रेमानंद यांनी. आता बी. प्रेमानंद हे कोण, हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. ते विवेकवादी विचारवंत होते. बुवाबाजी उघड करण्याचा त्यांनी जणू ध्यासच घेतला होता. देशभर फिरून त्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोनाचा प्रसार केला.

१९८५ च्या सुमारास पुण्यातील लोकविज्ञान संघटनेनं बी. प्रेमानंद यांना आमंत्रित केलं होतं. बी. प्रेमानंद यांनी बुवाबाजीच्या चमत्कारांची केलेली भांडाफोड पाहून डॉ. दाभोलकरांनीही काही मित्रांच्या मदतीनं पुण्यात

आणि आजूबाजूच्या परिसरात असे प्रयोग करू लागले.

बुवाबाजीचे चमत्कार आणि त्यांची भांडाफोड पाहण्यासाठी बरीच गर्दी जमत असे. महाराष्ट्रात हे काम रूजायला हवं, ती महाराष्ट्राची गरज आहे, असा विचार करून दाभोलकरांनी या कामाला स्वतःला झोकून दिलं. १९८५ नंतर दोन वर्षं दाभोलकर महाराष्ट्रभर फिरले आणि १९८९ साली त्यांनी अंधश्रद्धा निर्मुलानाच्या संस्थात्मक कामास सुरूवात केली.

**अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची अशी झाली सुरूवात**

१९८७ साली त्यांनी शाम मानव यांच्यासोबत अखिल भारतीय अंनिसच्या कामास सुरूवात केली आणि नंतर १९८९ साली वेगळे होऊन त्यांनी मुठभर कार्यकर्त्यांच्या समवेत 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'ची स्थापना केली. आणि इथून खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या त्यांच्या सामाजिक संघर्षाला सुरूवात झाली. मअंनिसच्या संघटनात्मक वाटचालित अनेक सामाजिक विषयांना टक्कर देताना त्यांच्या पुढाकाराने अनेक मोहिमा राबवल्या गेल्या.

१९९२ साली मुंबईत 'स्त्रीया आणि अंधश्रद्धा निर्मूलन' परिषद व 'शोध भंताचा, बोध मनाचा' या विषयावरील भव्य यात्रा, १९९७ साली 'भानामती प्रबोधन धडक मोहीम', २००३ साली नाशिकच्या सिहंस्थ मेळाव्याला विरोध व इचलकरंजीतील बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद, २००९ साली 'राज्यव्यापी खगोलयात्रा', २०१२ साली विवेकवाहीनीतर्फे 'राज्य युवा संकल्प परिषद' आणि अखेरच्या काळातील २०१३ मधील 'जातपंचायत विरोधी परिषद' या त्यांच्या काही भव्य आणि समाजात विधायक हस्तक्षेप नोंदवणाऱ्या मोहिमा होत्या.

**बुवाबीजाविरोधातला संघर्ष**

डॉ. दाभोलकर असं म्हणायचे की,' चमत्कारावर विश्वास ठेवणे आणि ते करणाऱ्या बाबा-बुवाला मान्यता देणे, यातील मुख्य तोटा हा की, अशी माणसे प्रयत्न आणि पुरूषार्थ यावरचा स्वतःचा विश्वास गमावतात, आणि इतरांनीही तो गमवावा असे वातावरण तयार करतात..!' आणि म्हणून या बुवाबाजीच्या जोखडात होरपळून निघालेल्या शोषितांना न्याय आणि श्रद्धेचा बाजार मांडणाऱ्या कुप्रवृत्तीला कायद्याचा धाक बसावा, म्हणून जादूटोना विरोधी कायद्या होण्यासाठीची लढाईही ते नेटाने आणि अविरत

लढत होते.

१९९५ पासून सुरु झालेल्या या कायद्याचा प्रवास विरोधकांच्या खोडकर प्रचाराच्या आणि नाहक विरोधाच्या गर्तेतून मार्ग काढत अखेर २०१३ ला दाभोलकरांच्या खूनानंतरच संपला. अखंड १८ वर्ष डॉ.दाभोलकर या विधेयकासाठी आपल्या रक्ताचे पाणी करत होते. पण जणूकाही डॉ. दाभोलकरच एक खमका कायदा म्हणून आता परिवर्तित झाले आहेत. दाभोलकरांनी सर्वच धर्मातील असंख्य भोंदू बुवाबाबांची दुकानदारी बंद पाडली.

नरेंद्र महाराजसारख्या अनेक बुवाशी ते आमने सामने भीडले. चमत्काराचा, अलौकिक शक्ती असल्याचा, भूत दाखवण्याच्या दावा करणाऱ्या बुवांचे त्यांनी सप्रमाण पुराव्यानिशी नामोहरण केले. 'चमत्कार करून दाखवा, आणि २१ लाख मिळवा' हे मअंनिसचे आव्हान आजतागायत कुणीच पेलू शकले नाहीये आणि म्हणूनच गेल्या ३० वर्षात महाराष्ट्रात चमत्काराचा उघड दावा करणारे भोंदू बाबा आता दिसतच नाही.

**अंधश्रद्धा निर्मूलनापुरतं मर्यादीत ध्येय नाही**

डॉ. दाभोलकर फक्त अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामापुरते मर्यादित नव्हते. त्यांची दृष्टी त्या पलिकडील होती. अंधश्रद्धा निर्मूलनापासून सुरु झालेला संग्राम त्यांना 'अंधश्रद्धा निर्मूलन ते वैज्ञानिक दृष्टिकोण, वैज्ञानिक दृष्टिकोण ते धर्मचिकित्सा, धर्मचिकित्सा ते धर्मनिरपेक्षता आणि धर्मनिरपेक्षता ते विवेकवादी समाजनिर्मिती' या मार्गाने पुढे न्यायचा होता.

अर्थातच, ते प्रामाणिकपणे हेही कबूल करायचे की, 'मी ज्या कार्यक्षेत्रात आहे तेथे कामाचा विचार दशकांच्या नव्हे तर शतकांच्या कालावधीत करावयास हवा, याची मला जाणीव आहे.' पण त्यांच्या लिखाणामधुन त्यांच्या अफाट वैचारिक द्रष्टेपणाची जाण आपल्याला आल्याशिवाय राहत नाही.

'प्रत्येक गोष्टीमागे कार्यकारणभाव असतो आणि तो वैज्ञानिक दृष्टिकोनाने तपासता येतो' ही मानसिकताच मुळात भारतीय समाजात अजून तितकीशी रूजलेली नाहीये. मुळात जे काम फार पूर्वी व्हायला हवं होतं त्यासाठी म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या प्रचार, प्रसारासाठी डॉ. दाभोलकरांना आपलं उभं आयुष्य वेचावं लागलं. अर्थातच हेही काम तितकं सोपं नव्हतं

आणि नाहीये.

डॉ. दाभोलकरांच्या म्हणण्याप्रमाणे 'धर्म आणि राजकारण यांच्या एकत्र करण्याच्या घातक कृतीला हिंसेची जोड देण्याचा प्रयत्न झाला, तर लोकशाही पण संपुष्टात येते !' आणि म्हणूनच, देशात एका बाजूला सारासार विवेक गहाण ठेऊन कट्टर धर्मांध शक्तीच्या धर्माधिष्टित राष्ट्राच्या संविधानद्रोही कारवाया वाढत चाललेल्या असताना दुसऱ्या बाजूला याविरोधात धर्मनिरपेक्ष, लोकशाही, विवेकवादी देशाच्या उभारणीसाठी तयार राहण्याची सुपिक जमीनीची मशागत डॉ.दाभोलकर आपल्या कामातून करत होते.

**अंधश्रद्धा निर्मुलन समितीची स्थापना**

'अंधश्रद्धा निर्मुलन' आणि 'डॉ. नरेंद्र दाभोलकर' हे शब्द जणू समानार्थी व्हावेत, इतके एकमेकांना जोडून येतात. याचं कारण डॉ. दाभोलकरांनी लोकांना अंधश्रद्धेच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याचा वसा घेतला होता. हे काम त्यांची ओळख बनली.

डॉ. दाभोलकरांनी अंधश्रद्धा निर्मुलनाचं काम खरंतर १९८१-८२ पासूनच सुरू केलं होतं. त्यावेळी ते अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मुलन समितीत कार्यरत होते. मात्र, पुढे म्हणजे १९८९ साली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीची त्यांनी स्थापना केली आणि शेवटपर्यंत ते या समितीच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मुलनाचं काम करत राहिले.

लेखक प्रभाकर नानावटी हे स्वतः बरीच वर्षं अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे सक्रीय कार्यकर्ते राहिलेत. विज्ञानविषयक पुस्तकंही त्यांनी लिहिली आहेत.

नानावटी लिहितात, 'अंधश्रद्धा निर्मुलन समितीची उभारणी केल्यानंतर चार गोष्टींवर प्रामुख्यांनी दाभोलकरांनी भर दिला-

१. शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध

२. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार आणि अंगीकार

३. धर्माची विधायक आणि कृतिशील चिकित्सा आणि

४. व्यापक समाजपरिवर्तनवादी संघटनांबरोबर सहयोग.'

नानावटी पुढे दाभोलकारंबद्दल गौरोवद्गार काढताना म्हणतात, 'या चारी सूत्रांचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण केल्यास या सूत्रांचा आशय पन्नास टक्क्यांपर्यंत तरी समाजमानसात रूजवण्यासाठी यातील प्रत्येक सूत्राचे कार्य करणाऱ्या

स्वतंत्र अशा चार संघटनांची गरज भासली असती. मात्र, डॉक्टरांनी त्यांच्यातील संघटनकौशल्यामुळे महाराष्ट्रातील तरूण वर्गाला आकर्षित करून या चारही सूत्रांच्या कार्यवाहीसाठी आपापली जात, धर्म, वर्ग सोडून एकत्रितपणे कार्य करणारे कार्यकर्ते घडविले.'

अंधश्रद्धा निर्मुलन समिती ही अग्निशामक दलासारखी कुणीतरी बोलावल्यावर बुवा-बाबांना पकडणारी संघटना होऊ नये, यासाठी दाभोलकर कायम प्रयत्नशील राहिले. जनमानसात मूळातूनच वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार करण्याची पद्धत इत्यादी गोष्टी निर्माण व्हाव्यात, असा उद्देश त्यांचा कायम राहिला.

'शोध भुताचा, बोध मनाचा', 'चमत्कार घडवा, यात्रा अडवा', 'वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प', 'विज्ञान बोध वाहिनी' इत्यादी अनेक यात्रा, उपक्रम समितीच्या माध्यमातून आतापर्यंत राबवले गेले.

बुवाबाजी, भोंदू बाबांची फसवेगिरी, जादूटोणा या गोष्टींची भांडाफोड करतानाच, धोरणात्मक पातळीवर बदल घडवण्यासाठीही दाभोलकरांनी प्रचंड प्रयत्न केले.

डॉ. दाभोलकरांनी समाजाला अंधश्रद्धेच्या 'तिमिरातून तेजाकडे' आणण्यासाठी ज्याप्रकारे वैयक्तिक आणि संघटनेच्या माध्यमातून प्रबोधनात्मक काम केलं, तसंच त्यांनी साहित्याच्या माध्यमातूनही केलं. त्यांनी श्रद्धा आणि अंधश्रद्धेतील फरक समजावून सांगण्यासाठी, वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवण्यासाठी लेखनाचा मार्ग त्यांनी अवलंबला.

राज्यासह राज्याबाहेरील संस्थांनीही दाभोलकरांना गौरवलं. भारत सरकारनं डॉ. दाभोलकरांना मरणोत्तर पद्मश्री पुरस्कारानं गौरवलं.

अमेरिकेतील महाराष्ट्र फाऊंडेशननं पहिला समाजगौरव पुरस्कार अंधश्रद्धा निर्मुलन समितीला दिला होता. अशा बऱ्याच पुरस्कारांनी डॉ. दाभोलकरांच्या कार्याचा गौरव झालाय.

डॉ. दाभोलकरांनी १९९८ पासून साने गुरूजींनी सुरू केलेल्या 'साधना' मासिकाचं संपादनही केलं. साधनाच्या संपादकपदावर दाभोलकर शेवटपर्यंत कार्यरत होते. व्यसनमुक्तीसाठीही त्यांनी अथक प्रयत्न केले.

दाभोलकरांच्या या कर्तृत्त्वाचा आलेख संपता संपणार नाही. मात्र, एक खरं की, त्यांनी प्रत्येक कामाच्या केंद्रस्थानी विवेकवादी भूमिका ठेवली.

**‘अंधश्रद्धा निर्मुलन कायदा’**

नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येनंतर महाराष्ट्र सरकारने २०१३ साली तडकाफडकी जादूटोणा, अघोरी कृती, नरबळी आणि काळी जादू याच्या विरोधात कायदा संमत केला.

या आधी हा कायदा पास व्हावा म्हणून दाभोलकरांनी २०१० पासून अनेक प्रयत्न केले होते. याच कायद्याचा मसुदा त्यांच्याच अंधश्रद्धा निर्मुलन समिती या संस्थेने तयार केला होता.

मात्र, कायदा प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संमत होण्याआधीच म्हणजे २० ऑगस्ट २०१३ रोजी दाभोलकरांची पुण्यात हत्या करण्यात आली.

उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी हा कायदा ‘हिंदू-विरोधी’ आहे असं म्हणत याला विरोध केला होता. संसदेच्या सलग सात अधिवेशनांमध्ये यासंबंधी विधेयक मांडलं गेलं होतं, पण दाभोलकरांच्या मृत्यूआधी हा कायदा पास होऊ शकला नाही.

सध्या या कायद्यात १२ कलमं आहेत. यात मारहाण, छळ, जबरदस्तीने मानवी विष्ठा खायला लावणं, भूत उतरवण्याच्या नावाखाली लैंगिक शोषण करणं, चमत्कार घडवण्याचा दावा करणं, काळी जादू केल्याचा आरोप करणं, काळी जादू केली म्हणून एखाद्याला बहिष्कृत करणं, जादूने एखाद्याचा आजार बरा करण्याचा दावा करणं अशा गुन्ह्यांसाठी शिक्षेची तरतूद आहे.

आज महाराष्ट्रात या कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत काही प्रश्न असले, तरी या कायद्यान्वये अनेक जणांची अंधश्रद्धेच्या जाचातून सुटका झाल्याचीही उदाहरणं आहेत.

**संदर्भ**

१. शैलेंद्र परांजपे (२० ऑगस्ट २०१३). ‘नरेंद्र दाभोलकरः एक तर्कवादी टू द गाभा’. डीएनए इंडिया .

२. भारतीय बुद्धिवाद, चार्वाक ते नरेंद्र दाभोलकर, २१ ऑगस्ट २०१८.

३. सत्यजित जोशी (२१ ऑगस्ट २०१३). ‘दाभोलकर हे विवेकवादाचे खरे धर्मयुद्ध होते.’ हिंदुस्तान टाइम्स.

● ● ●

# संत तुकाराम महाराज व अंधश्रद्धा निर्मुलन

**प्रा.गणेश दा. काकडे**
मराठी विभाग प्रमुख,
स्व.भास्करराव शिंगणे कला,
प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान
व आशालता गांवडे वाणिज्य महाविद्यालय,
साखरखेर्डा, जि. बुलडाणा.

**प्रस्तावना**

महाराष्ट्राच्या सुधारणावादी चळवळीत संत महात्म्यांचे अतिशय मोलाचे योगदान राहिले आहे. ज्ञान, प्रेम, करूणा, वात्सल्य, माधुर्य या गुणांनी परिपूर्ण असणाऱ्या संत मंडळी यांनी वास्तवाचा स्वीकार करत आणि अंधश्रद्धेला छेद देत समाजाला सन्मार्गाला लावले. या महान कार्य करणाऱ्या संतांविषयी वैराग्य शिरोमणी जगद्‌गुरू संत तुकोबाराय यांनी या अभंगातून सुंदर शब्दात वर्णन केले आहे. संत महात्म्यांच्या महिम्याचे गुणगान गाणारा हा अभंग आहे. वास्तविक पाहता, जगद्‌गुरू तुकाराम महाराज हे एक उच्च कोटीचे संत होते. सामर्थ्य व अधिकार प्राप्त असतानाही तुकोबाराय स्वतःला पामर समजतात. 'मज पामाराहे काय थोरपण। पायीची वहाणा पायी बरी।।' यातून त्यांचे मोठेपण आणि माऊली, नामदेवराय इत्यादी ज्येष्ठ संतांवरील त्यांची निष्ठा दिसून येते.

संत तुकाराम महाराज यांचा जन्म १६०८ चा तर मृत्यू १६५० सालचा. म्हणजे ते फक्त ४२ वर्षे जगते. ते वयाच्या ४२ व्या वर्षी मृत्यू पावले. हे वय मृत्यूचे नाही. संत तुकाराम महाराज अत्यंत तरूण असताना त्यांचा मृत्यू कसा झाला हा नेहमीच शंकेचा, वादाचा विषय राहिला आहे. संत तुकाराम महाराजांचा मृत्यू कसा झाला हे समजून घेण्यासाठी त्यांचा संघर्ष समजून घ्यावा लागेल. ते अत्यंत बुद्धिमान, प्रेमळ आणि श्रीमंत होते. त्यांनी सुमारे ५ हजार अभंग लिहिले. त्यांनी लोकांना कर्जमुक्त केले. संत तुकाराम महाराजांचा लढा विषमतेविरूद्ध होता ते म्हणतात,

भेदाभेद भ्रम अमंगल । सर्वांची एकची वीण। तेथे कैसे भिन्नाभिन्न।

संत तुकाराम महाराजानी विषमतेला विरोध करून समतेचा आग्रह धरला. वर्णव्यवस्थेवर हल्ला करताना संत तुकाराम महाराज म्हणतात.

**भेदाभेद भ्रम अमंगल ।**

**सर्वांची एकची वीण।**

**तेथे कैसे भिन्नाभिन्ना।।**

संत तुकाराम महाराजानी विषमतेला विरोध करून समतेचा आग्रह धरला. वर्णव्यवस्थेवर हल्ला करताना संत तुकाराम महाराज म्हणतात..

**वर्णा अभिमाणे**

**कोण झाले पावन ।।**

**ऐसें द्या सांगून । मजलागी ।।**

संत तुकाराम महाराजानी वर्णव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. त्यामुळे जे वर्णव्यवस्थेचे समर्थक होते, ते तुकाराम महाराजावर प्रचंड चिडले. कारण वर्णव्यवस्था हे ऐतखाऊ लोकांचे दुसऱ्याच्या श्रमावर जगण्याचे भांडवल होते.

**संत तुकाराम महाराजानी अंधश्रद्धेवर कडाडून हल्ला केला.**

**नवसे कन्यापुत्र होती । मग का करणे लागे पती ।**

**नवस सायास करू नका, प्रयत्नानेच यश मिळेल.**

**असाध्य ते साध्य । करिता सायास ।**

**कारण अभ्यास । तुका म्हणे ।**

प्रयत्नवादी व्हा, देवावर विश्वास ठेवू नका, हा संदेश संत तुकाराम महाराजांनी दिला.

सनातन्यांच्या वर्चस्वातून समाज मुक्त व्हावा, या हेतूने संत तुकारामांनी ब्राह्मणी व्यवस्थेवर कडाडून हल्ला केला.

**ऐसें कैसे झाले भोंगा। कर्म करुनि म्हणती साधू ।।**

**अंगा लावुनि राख । डोळे झाकुनि करिती पाप।।**

**दावी वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ।।**

**तुका म्हणे सांगो किती । जळो तयांची संगती ।।**

भटाची संगत सोडा हे संत तुकाराम महाराजानी निक्षून सांगितले. त्यांनी यज्ञ, होम, हवन, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये, दशक्रिय, पुरोहितगिरी, पंचांग, भविष्य

याविरूद्ध मोहीमच उघडली. त्यामुळे सनातनी वर्ग संत तुकाराम महाराजांच्या विरोधात उभा राहिला. त्यांच्या अभंगांची गाथा सनातन्यांनी इंद्रायणीत बुडवली. ते पदोपदी संत तुकाराम महाराजाना त्रास देऊ लागले आणि यातच संत तुकाराम महाराज नाहीसे झाले.

ब्राह्मणी पक्षाच्या मतानुसार ते वैकुंठाला गेले, तर अभ्यासक सुदाम सावरकर आणि संस्कृतपंडित डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या मतानुसार त्यांचा घातपात झालेला आहे. दोन्ही पक्षाचे मत पाहण्यापूर्वी संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठ, स्वर्ग याबाबत काय मत होते. ते आपण पाहू.

संत तुकाराम महाराज हे जीवनाला कंटाळलेले नव्हते. ते जगू आणि लढू इच्छिणारे हिमंतवान आणि क्रांतीकारक संत होते.

विश्वकवी, मानवतावादी संत आणि विद्रोही व्यक्तिमत्त्वाचा धनी म्हणजे आमचा तुकोबा ! धर्माला नीतीचे आणि निष्कपट भावनेचे अधिष्ठान देणारा एक डोळस भक्त ! आपले स्वतःचे सर्वस्व तर पणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात दंड थोपटणारा आव्हानवीर योद्धा ! प्रतिभावंत, भक्त आणि योद्धा या तिन्ही भूमिकांचा एकत्र मिलाफ झालेला महापुरूष म्हणजे तुकाराम !

आमचा कूळपुरूष तुकोबा... कधीतरी शाळेमध्ये असताना...

**आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने।**
**शब्दांचीच शस्त्रे करू।**
**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।**
**शब्दे वाटू धन जनलोकां ?**

जनांच्या मनामध्ये ईश्वरभक्तीबद्दल जी ओढ आणि अध्यात्माच्या नावावर जी दांभिक भक्ती सुरू होती, त्यावर चारशे वर्षांपूर्वी संत तुकारामांनी लेखणीने जे कोरडे ओढलेत, हे काम खरोखरच फक्त तेच करू शकलेत. सतराव्या शतकाच्या आरंभीच संत तुकाराम महाराजांचा जन्म एका चांगल्या सधन कुटुंबात झाला. दुष्काळ आणि नैसर्गिक आपत्तीने ओढवलेले दारिद्र्य त्यांनी अनुभवले. उणेपुरे चाळीस-एकेचाळीस वर्षांचे आयुष्य त्यांना लाभलं. त्यांच्या 'अभंगवाणीने' ते अजरामर झाले. त्यांच्या 'अभंगवाणी'तील एक-एक सुभाषित जनमानसांच्या हृदयावर कोरून ठेवले.

तुकोबारायांची सुभाषितं साध्याभोळ्या, कष्टकरी माणसापासून

विद्वानांपर्यंत सर्वांच्या मुखी वसली आहेत. खरंतर त्यांच्या रचनेला केवळ चमकदार विचार नव्हे, तर चिरंतन सत्याचे अधिष्ठान लाभले आहे. चिरंतन सत्य त्यांच्या विचारांतून जनमानसाच्या मुखी वसले आहे. उदा...

१. सुख पाहतां जवापाडे। दुःख पर्वताएवढे।।
२. ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीती।।
३. असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।
४. आली सिंहस्थ पर्वणी। न्हाव्या-भटां झाली धणी।।
५. नाही निर्मळ जीवन। काय करील साबण?।।
६. तुझे आहे तुजपाशी। परि तू जागा चुकलासी।।
७. साधू-संत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।।
८. बोलाचीच कढी, बोलाचाचि भात। जेऊनिया तृप्त कोण झाला।।
९. कोणी वंदा कोणी निंदा। आमुचा स्वहिताचा धंदा।।
१०. बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।।
११. लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा।।
१२. भिक्षापात्र अवलंबणे। जळो जिणे लाजिरवाणे।।

...अशा एकापेक्षा एक चांगल्या सुभाषितांमधून मराठी भाषेच्या श्रीमंतीला एका देहूकर वाण्याने केवढा प्रचंड हातभार लावला आहे, हे पाहिल्यावर मन विस्मित होते. सर्वांच्या चित्तवृत्तीवर सखोल परिणाम करू शकणारी समर्थ व सर्वस्पर्शी त्यांची 'अभंगवाणी' असल्यामुळे 'मराठीचा महाकवी' हे बिरूद फक्त तुम्हाला आणि तुम्हालाच शोभून दिसते. मराठीच्या कपाळावरील कुंकवाचा टिळा म्हणजे तुमची काव्यप्रतिभा होय, म्हणूनच तुकोबाराया तुम्हीच आमचे कुळपुरुष आहात.

तुकोबारायांची 'अभंगवाणी' ध्येयवादातून साकारली आहे, समाजाची बांधिलकी त्यांनी पत्करली आहे. प्रबोधन हाच त्यांच्या अंगभगाचा प्रधान हेतू राहिला आहे, म्हणून जनमानसामध्ये त्यांची वाणी तरली. त्यांच्या वाणीला मिटवण्यासाठी अनेक मंबाजी पुढे आलेत, त्यांनी तुकोबांची हस्तलिखिते 'इंद्रायणी'त बुडवली, तरीही ती नष्ट न होता लोकांच्या मनामनांत, अंतःकरणात कोरलेली असल्यामुळे लोकमानसानेच ती तारली.

**संत तुकोबा अंधश्रद्धा निर्मूलनाचे मार्गदर्शक**

प्रबोधनाच्या चळवळीत काम करणाऱ्यांना; त्यातही अंधश्रद्धा निर्मूलन

समितीचे काम करणाऱ्यांना संत तुकाराम महाराज लोकांचे मार्गदर्शक मित्रच वाटतात. कारण त्यांनी लिहून ठेवलेल्या विचारांवरच आम्ही प्रबोधनाचा वसा पुढे चालू ठेवला आहे.

त्यांनी अनेक ढोंगी, साधू, अंधश्रद्धा यांवर फार प्रखर भाष्य केलं आहे, म्हणून तुमचे शब्द उसने घेऊन आम्ही सातत्याने ठिकठिकाणी बोलत असतो. त्यांनी जे सत्य चारशे वर्षांपूर्वी मांडले आहे, तेच पुन्हा-पुन्हा मांडण्याचे काम आम्ही करीत आहोत. तसा आमचा कोणत्याही देवा-धर्माला विरोध नसतो, आमच्या संविधानानेही प्रत्येकाला आपल्या देवा-धर्माची उपासना करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे; पण देवा-धर्माच्या नावावर शोषण होणाऱ्या प्रत्येक अंधश्रद्धेला आम्ही मूठमाती देऊ इच्छितो.

तुकोबाराया तुमच्या खास पठडीतला अभंग म्हणजे..

**आली सिंहस्थ पर्वणी।**
**न्हाव्या-भटां झाली वाणी ।**
**अंतरी पापाच्या कोडी।**
**वरिवरि बोडी डोई दाढी।।**

आतल्या पापांच्या राशी जोपर्यंत नाहीशा होत नाहीत, तोपर्यंत तीर्थस्थानी जाऊन मुंडन करून घेण्याने काय साधणार आहे? ते बोडून काढले तेवढेच निघाले. मनाच्या स्वच्छतेचे काय? असे भेदक सवाल त्यांनी धर्ममार्तंडांना विचारत. निरूत्तर करणारे असे प्रश्न विचारून त्यांनी समाजाला खडसावून त्याची निर्भत्सना करून त्यांना गदागदा हलवून समाजाला विवेकी भान देण्याचे महान कार्य त्यांनी केले. यात्रा-जत्रा, जप-जाप्य यांना तसा फारसा अर्थ नाही; पण आंतरिक भक्तीचा उमाळा असेल तर तीर्थयात्रेचीही काहीच आवश्यकता नाही. तुकोबा, आमच्यासारख्या विवेकी माणसांनी आज हे सांगितले की, आम्ही धर्मबुडवे ठरतो; पण चहूबाजूंनी विरोध होत असतानाही तुकोबा विवेकी विचारांची पेरणी करीत गेलात..

**ऐसे कैसे झाले भोंदू?।।**
**कर्म करूनि म्हणती साधू।।**
**अंगा लावूनिया राख।**
**डोळे झाकूनी करिती पाप।।**
**दावुनि वैराग्याची कळा।**

**भोगी विषयाचा सोहळा।।**
**तुका म्हणे सांगो किती।**
**जळो तयांची संगती।।**

ज्यांची संगती जळो असे आपण म्हणालात, तेच साधू, बुवा, साध्वी आज आमच्या समाजातून अजुनही हद्दपार झालेले नाहीत. अजुनही कर्मकाडांने सर्वसामान्य सोडलेले नाही.

तुकोबा, चारशे वर्षांत खूप काही बदल झालेत. चारशे वर्षांपूर्वी समाजाला न पेलवणारा विचार त्यांनी मांडला, त्यासाठी आग्रह धरला, जनचळवळ उभी केली, लोकांचे प्रबोधन केले, लोकांना विवेकी बनविले. तुमच्या विचारांमुळे धर्ममहंतांच्या सत्ताकेंद्रांना हादरा बसला. त्याचेच फळ म्हणून की काय तुम्हाला आम्ही सदेह वैकुंठाला ( !) पाठविले. रंगपंचमीच्या खेळात चेहऱ्यांना वेगवेगळे रंग लावून आलेल्या खोट्या भक्तांनी तुम्हाला सदेह वैकुंठाला पाठवले. पुढे अनेक शतकांचा अंधार पार करून 'सबको सन्मती दे भगवान' म्हणणारा एक युगपुरुष आला, ज्याने तुमचे अभंग गुजरातीत अनुवादित केले होते, त्यालाही आम्ही गोळ्या मारल्या' हा सिलसिला कालपरवापर्यंत चालू आहे. समाजात विवेकी विचार मांडणाऱ्यांची आम्ही हत्याच करतो. डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. कलबुर्गी अशा व्यक्तींचे विचार संपत नाहीत, म्हणून माणसंच आम्ही संपवितो.

तुकोबा म्हणाले होते, 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग।' खरंच, अजूनही त्यांनी व्यक्त केलेली ती युध्दाची काळरात्र संपलेली नाही. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे। वनचरे' ही शिकवण अजून आम्हाला अंगीकारता आली नाही. तरी तुकोबा, जोपर्यंत चंद्र-तारे या भूतलावर आहेत, तोपर्यंत तुमची 'अभंगवाणी' जनमानसामध्ये पिढ्यानपिढ्या आत्मबळ देण्याचे कार्य करीत राहील. हे महासत्य सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्त्याची गरज नाही.

**संदर्भ ग्रंथ**


१. बेन्द्रे बा.सी., संत तुकाराम - चरित्र, कवित्व व तत्वज्ञान, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, १९६३.

२. दांडेकर षं.वा., वारकरी पंथाचा इतिहास, प्राचार्य दांडेकर धार्मिक वाड्मय मंडळ, पुणे. १९५७

३. ढेरे, रा.चिं., संत साहित्य आणि लोकसाहित्यः काही अनुबंध, श्री विद्या

प्रकाशन, पुणे,१९७८.
४. देशपांडे जयंत, अभंग तुकोबांचे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती-२००८.
५. फडकुले निर्मलकुमार, संत कवी तुकाराम : एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीय आवृत्ती, मार्च-१९९६.

● ● ●

# महाराजा सयाजीराव गायकवाड आणि अंधश्रद्धा निर्मुलन

**डॉ. प्रकाश श्रीराम कोल्हे**
ग्रंथपाल, स्व.भास्करराव शिंगणे कला,
प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान
व आशालता गांवडे वाणिज्य महाविद्यालय,
साखरखेर्डा, जि.बुलडाणा.

**श्रीमंत सयाजीराव खंडेराव गायकवाड यांचा अल्प परिचय**

महाराज श्रीमंत सयाजीराव खंडेराव गायकवाड (तिसरे), जन्मनाव गोपाळराव काशीराव गायकवाड, (जन्म : कौळाणे, ता. मालेगांव, नाशिक जिल्हा, ११ मार्च १८६३; - मुंबई, ६ फेब्रुवारी १९३९) हे इ.स. १८७५ ते इ.स. १९३९ सालादरम्यान बडोदा संस्थानचे अधिपती होते. ते अत्यंत पुरोगामी वृत्तीचे, कर्तृत्ववान संस्थानिक (कारकीर्द - १८८१-१९३९) होते. बडोदा संस्थानातील प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याकरता ते विशेषत्वाने ओळखले जातात.

शाळा न शिकलेला शेतकऱ्याचा बारा वर्षाचा हा पोरगा. योगायोगानं राजा बनतो. राजगादीवर आल्यानंतर चिकाटीनं शिकून शहाणा होतो. अचानक लाभलेल्या संधीचं स्वतःच्या कर्तृत्वानं सोनं करतो. असे जगावेगळे महाराज म्हणजे सयाजीराव गायकवाड.

शिक्षण हेच प्रगती आणि परिवर्तनाचं साधन आहे. अस्पृश्य-आदिवासी प्रजेला शिकविण्याचा पहिला राजहुकूम महाराजांनी काढला. वंचितांच्या दारी शिक्षणाची गंगा आणली. सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण, अस्पृश्यताबंदी, वेठबिगारी संपविण्याचे कायदे केले. लोककल्याणाची कामे केली. उत्तम प्रशासनाची घडी घातली. जुन्या रूढी-चालीरीतींचे उच्चाटन करून सामाजिक सुधारणांचे कायदे केले.

फुले-शाहू-आंबेडकर, ना. गोखले-गांधी-टिळक, न्या. रानडे, कर्मवीर

भाऊराव पाटील, महर्षी शिंदे सारख्या युगपुरूषांना त्यांनी मदत केली. लेखक - कलावंत - संस्था- क्रांतिकारक मंडळींना कोट्यावधींची मदत केली. जाती-पातींच्या भिंती तोडून समतेचा मार्ग दाखविला. गरजू विद्यार्थ्यांना देशात-परदेशात शिकण्यासाठी शिष्यवृत्त्या दिल्या. भीमराव आंबेडकर त्यातले एक.

प्रजेविषयी आस्था, प्रशासनातील योजकता, निर्णयातील दूरदृष्टी आणि नेमके नियोजन, हे सयाजीराव महाराजांचे वैशिष्ट्य होते. राज्याचे नवनिर्माण कसे करावे, याचा स्वातंत्र्यपूर्व काळात उत्तम आदर्श त्यांनी घालून दिला. सयाजीराव सांगून गेले, "बलसंपन्न भारत हे माझं स्वप्न आहे. येथील तरूण - तरूणीच ते पूर्ण करतील. मित्रांनो, शिक्षण हेच साधन आहे. आवश्यकता आहे तुमच्या कष्टाची, प्रामाणिकपणाची, देशप्रेमाची आणि शेजाऱ्यांशी बंधुप्रेमानं वागण्याची. ह्या चार गोष्टी तुम्ही अंगी बाळगा. आपलं स्वप्न पुरं होईलं."

गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन उच्च शिक्षणाची सोय केली. औद्योगिक कलाशिक्षणाकरिता 'कलाभुवन' ही संस्था स्थापन केली. त्यांनी 'प्राच्य विद्यामंदिर' या संस्थेच्या वतीने प्राचीन संस्कृत ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन करण्यास उत्तेजन दिले. सयाजीरावांनी 'श्रीसयाजी साहित्यमाला' व 'श्रीसयाजी बाल ज्ञानमाला' या दोन मालांमधून उत्तम ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध केली. त्यांनी संस्थानात गावोगावी वाचनालये स्थापन केली;. फिरत्या वाचनालयांचीही सोय केली. त्यांनी या काळामध्ये इंग्लंड अमेरिकेसारख्या देशांना भेट दिली. तेथील शिक्षण पद्धती आणि ग्रंथालय यांनी ते प्रभावित झाले. अशाच प्रकारची शिक्षण व्यवस्था आणि ग्रंथालये आपल्या देशातही निर्माण झाली पाहिजेत. या दृष्टीने त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी ग्रंथालय तज्ज्ञ बॉर्डन यांना भारतामध्ये आमंत्रित केले. ते दहा वर्ष बडोदा संस्थानांमध्ये ग्रंथालय प्रमुख म्हणून कार्यरत होते. बॉर्डन यांच्या मार्गदर्शनाखाली बडोदा संस्थानात ग्रंथालयाचे जाळे निर्माण करण्यात आले संस्थानांमध्ये अनेक ग्रंथालये स्थापन करण्यात आली. फिरती ग्रंथालये, ग्राम ग्रंथालये सुरू झाली. महाराज सयाजीराव गायकवाड यांनी स्वतः ग्रंथालयशास्त्राचे शिक्षण घेतले होते. खऱ्या अर्थाने ते भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक आहेत. सामाजिक क्षेत्रात सयाजीराव गायकवाडांनी केलेली कामगिरीही त्यांच्या

सामाजिक सुधारणेची साक्ष देणारी आहे. पडदापद्धती बंदी, बालविवाह बंदी, कन्याविक्रयबंदी, मिश्रविवाहाचा पुरस्कार, स्त्रियांना वारसा हक्क मिळवून देणे, अस्पृश्यतानिवारण, विधवाविवाह इ. सुधारणा प्रत्यक्ष अंमलात आणल्या. घटस्फोटासंबंधीचा कायदा हा सर्व भारतात पहिल्यांदाच त्यांनी जारी केला. हरिजनांसाठी अठरा शाळा काढल्या (१८८२). डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली आणि त्यांची संस्थानात उच्च पदावर नेमणूकही केली. सुधारणांच्या प्रत्यक्ष पुरस्कारामुळे त्यांना 'राष्ट्रीय सामाजिक परिषदे'च्या अध्यक्षपदाचा मान मिळाला (१९०४).

१८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर महाराजा सयाजीराव यांच्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या कार्यक्रमास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. सयाजीरावांनी धार्मिक सुधारणांची सुरुवात राजवाड्यातील देवघरापासून केली. राजघराण्यातील धर्मभोळया व्यक्तींचा फायदा घेत काही बाबी साध्य करण्यासाठी ब्राह्मणांकडून राजघराण्यातील व्यक्तींना विविध प्रकारची अनुष्ठाने करण्याचा आग्रह धरण्यात येई. बऱ्याचदा या धार्मिक विधींचे स्वरूप हास्यास्पद असे. मि. पेस्तनजी यांच्या हुकुमाने विनायकराव बहुलकर नावाचे गृहस्थ पुण्यातील विविध मंदिरांमध्ये बडोदा राजघराण्यातील व्यक्तींच्या नावे अनुष्ठाने करत असत. यावरून बडोदा राजघराण्यात अनुष्ठानांचे माजलेले स्तोम आपल्या लक्षात येईल. याचप्रमाणे विविध ग्रहांच्या स्थितीचा राजघराण्यातील व्यक्तींच्या आयुष्यावर पडणारा वाईट परिणाम दूर करण्यासाठी केल्या जाणाऱ्या ग्रहांच्या शांतीचा विधीदेखील मोठ्या प्रमाणावर केला जात असे.

राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याची पद्धत हा तर या तथाकथित कर्मकांडांचा कळस मानता येईल. राजघराण्यातील व्यक्तींचा इतर सर्वसामान्य जनतेशी संपर्क आल्यानंतर अथवा एखाद्या विशेष प्रसंगानंतर दृष्ट लागून त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी दृष्ट काढली जात असे. परंतु अशी दृष्ट कोणत्या प्रसंगी, किती वेळा, कोणत्या व्यक्तीने काढावी या संदर्भात कोणतेही नियम अथवा निकष निश्चित केलेले नव्हते. त्यामुळे बडोद्यातील ब्राह्मण व्यक्तींकडून याचा गैरफायदा घेतला जाई. दक्षिणेच्या हव्यासापायी राजघराण्यातील व्यक्तींची विनाकारण दृष्ट काढण्याचे प्रसंग वारंवार घडवून आणले जात. मुंग्यास साखर घालणे हा देखील अशाच

प्रकारचा एक विधी होता.

सुरुवातीच्या काळात राजघराण्यातील व्यक्तींचा या विधींना असणारा पाठींबा आणि प्रशासकीय अनागोंदी यामुळे सयाजीरावांना हे सर्व प्रकार निमुटपणे पाहावे लागत होते. या विधींसाठी होणारा खर्च आगाऊ मंजूर करून न घेता ऐनवेळी महाराजांसमोर जाऊन खर्चास मान्यता मिळवण्याची सवय प्रशासनाच्या अंगवळणी पडली होती. विधी कार्य अडून राहिलेले असल्यामुळे महाराजांना कोणतीही चौकशी न करता या खर्चाला मान्यता देणे भाग पडे. या परिस्थितीचा फायदा स्वार्थी पुजाऱ्यांकडून घेतला जात होता. प्रत्यक्ष विधिवेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांचा अर्थ सयाजीरावांनी एखाद्या पुजाऱ्याला विचारल्यास त्याला तो सांगता येत नसे. अशा वेळी देवघरातील पुरोहित वर्ग आणि राजघराण्यातील स्त्रियांकडून महाराजांचे विचार इंग्रजी शिक्षणामुळे बिघडले असून ते अधर्मी झाले आहेत व त्यांच्या अशा प्रश्नांमुळे ग्रहांचा, ब्रह्मवृंदाचा व देवतांचा कोप होऊन राजघराण्यावर संकट कोसळेल असा गवगवा करण्यात येई. परंतु एकदम अधिकाराच्या जोरावर कोणताही बदल न करता हळूहळू लोकांचे मत परिवर्तन करण्यावर भर देणाऱ्या सयाजीरावांनी याबाबतसुद्धा तेच धोरण अवलंबले.

या सर्व बाबींना आळा घालणे आवश्यक होते. परंतु वर्षानुवर्षे अलिखित मान्यताप्राप्त विधी एका रात्रीत बदलणे शक्य नव्हते. १८७७ मध्ये सयाजीरावांनी अहमदाबाद येथे सहभोजन करून अस्पृश्यता निवारणास सुरुवात केली. १८८३ मध्ये स्वतःच्या राजवाड्यातील खंडोबाचे खाजगी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. हे पाऊल उचलणारे सयाजीराव आधुनिक भारतातील पहिले प्रशासक ठरतात. १८८६ मध्ये राजवाड्यातील अस्पृश्यांसाठी वेगळ्या जेवणाच्या पंगतीची पद्धत स्वतः त्या पंक्तीला बसून महाराजांनी मोडीस काढली.

राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक विधींचे अर्थ सर्वांना समजण्यासाठी या विधींचे मंत्र अर्थासह प्रकाशित करण्याचा विचार सयाजीरावांच्या मनात आला. त्यानुसार २३ नोव्हेंबर १८८६ रोजी हु.हु.नं. ५० अन्वये सयाजीरावांनी राजवाड्यात होणारी सर्व धार्मिक कृत्ये शास्त्रार्थासह तपशीलवार लिहून काढण्याचा आदेश दिला. रा.रा. शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ आणि भाऊ मास्तर यांनी ही जबाबदारी समर्थपणे पार पाडत धर्मविधींचा

तपशीलवार शास्त्रार्थ विशद करणारा ‘ऐनेराजमेहेल’ नावाचा ग्रंथ तयार केला. या ग्रंथाविषयीची सयाजीरावांच्या मनातील आपुलकी आणि आदर विशद करताना सरदेसाई लिहितात, ‘हे पुस्तक म्हणजे महाराजांच्या नवीन प्रवृत्तीचा केवळ पाया होय. ऐनेराजमेहेलच्या अनेक आवृत्ती आजपर्यंत झाल्या आहेत आणि त्यांतील प्रकरणे पुनःपुनः चर्चा व विचार करून संपूर्ण करण्याकडे महाराजांनी इतके परिश्रम केले आहेत की, बहुधा दुसऱ्या कोणत्याही विषयावर ते केले नसतील.” धर्मविषयक ज्ञानाचा सर्वसामान्य जनतेतील प्रसारासाठीची सयाजीरावांची अगदी सुरूवातीच्या काळापासूनची धडपड यातून अधोरेखित होते.

धर्मविषयक ज्ञान सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्याबरोबरच राजवाड्यातील धार्मिक खर्चाला शिस्त लावण्याचा यशस्वी प्रयत्न सयाजीरावांनी केला. १८९२ मध्ये राजवाड्याच्या देवघरातील धार्मिक विधींच्या खर्चाचे १,००० पानांचे तपशीलवार बजेट सयाजीरावांनी छापून पुस्तकरूपाने प्रसिद्ध केले. स्वतःच्या राजवाड्यातील खासगी धार्मिक विधींचा आर्थिक लेखाजोखा जनतेसमोर पुस्तकरूपाने मांडणारे सयाजीराव कदाचित एकमेव प्रशासक ठरावेत. या पुस्तकामुळे राजवाड्यातील धर्मविधी आणि त्यावर होणाऱ्या खर्चाची अचूक स्थिती सयाजीरावांच्या लक्षात येऊन पुढील धर्मविषयक सुधारणा त्यांना शक्य झाल्याचे निरीक्षण सरदेसाईलिखित सयाजीरावांच्या खासगी वृत्तांतात आले आहे. या संदर्भात सरदेसाईलिखित सयाजीरावांच्या खासगी वृत्तांतात वर्णन केलेली १८९७ मधील घटना उल्लेखनीय आहे. बडोद्याच्या महाराजांचे कापलेले केस नर्मदा नदीच्या प्रवाहात नेऊन टाकण्याचा रिवाज पूर्वापार चालत होता. त्यानुसार सयाजीरावांचे कापलेले केस नर्मदा नदीत टाकण्यासाठीचा खर्च म्हणून १ जून १८९७ रोजी खाजगी कारभाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात ८८ रु. १२ आणे मंजूर केले. परंतु या संदर्भात मागण्यात आलेला इतर खर्च त्यांनी मंजूर केला नाही. सयाजीरावांनी धार्मिक खर्चाला लावलेल्या शिस्तीचा हा परिणाम होता.

धर्मविधींना आर्थिक शिस्त लावल्यानंतर सयाजीरावांनी राजवाड्यात होणाऱ्या अनावश्यक धर्मविधींचे प्रमाण शक्यतो कोणाच्याही धार्मिक भावना न दुखावता कमी करण्याकडे लक्ष पुरवले. राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याचा विधी बंद करण्यासंदर्भात आदेश २९ मे १९०१ रोजी म्हणजेच

आजपासून १२० वर्षांपूर्वी दिला होता. या हु. हु. नं. १८७ मध्ये, 'दृष्टी काढण्याचा रिवाज बंद करावा; परंतु देवभोळ्या समजुतीमुळे ही खास प्रसंगी कोणास दृष्ट काढल्याने सुख वाटत असल्यास तसी त्याच्या समजुतीस्तव काढण्यास हरकत नाही; मात्र होतकरू मुलांना देवभोळ्या समजुतीचा कित्ता होतां होईतोंपर्यंत देऊ नये.' असे नमूद करण्यात आले होते. धर्मविधी बंद करत असताना समाजाची मानसिकता लक्षात घेण्याची सयाजीरावांची सर्वसमावेशकता या हुकुमातून अधोरेखित होते. लहान मुलांच्या मनावर धर्मविधींचा पगडा बसू नये यासाठी काळजी घेण्याची केलेली ताकीद सामान्य जनतेचा धार्मिक दृष्टीकोन निकोप होण्यासाठीची सयाजीरावांची धडपड दर्शवते. त्याचबरोबर एवढ्या छोट्या गोष्टीबद्दल आदेश काढण्याची कृती सयाजीरावांच्या जागरूक दृष्टीचे प्रतीक आहे.

सयाजीरावांना शिक्षणकाळातच त्यांच्या शिक्षकांकडून याबाबतच्या सूचना मिळाल्या होत्या. राज्याभिषेकाआधी सयाजीरावांना सर टी. माधवराव यांनी इतर शिक्षकांच्या सहाय्याने विविध विषयासंदर्भातील व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. २० जुलै १८८१ रोजी शिक्षण विषयावर देण्यात आलेल्या व्याख्यानात सयाजीरावांना पुढील सूचना करण्यात आली होती. 'धर्मविषयक शिक्षण हे केवळ मानसिक पातळीवरील असावे. विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना कोणत्याही प्रकारच्या विशेष धार्मिक सूचना दिल्या जाऊ नयेत.' दृष्ट काढण्यासंदर्भातील सयाजीरावांचा आदेश हा या सूचनेचे प्रात्यक्षिकच आहे.

ग्रहणाच्या दिवशी सरकारी कचेरीत घेण्यात येणारी सुट्टी हादेखील सरकारी पातळीवर पाळण्यात येणाऱ्या अंधश्रद्धेचा उत्तम नमुना होता. प्रशासकीय व आर्थिक लाभ मिळविण्यासाठी ग्रहणाच्या दिवशी सरकारी कचेरी बंद ठेऊन धार्मिक विधी करण्याकडे कर्मचाऱ्यांचा कल असे. सयाजीरावांनी हुकूम काढून ग्रहणाची ही सुट्टी बंद केली. परंतु हा आदेश काढत असतानाच त्यांनी पाळलेली धार्मिक सहिष्णुता गोत्रीलिखित सयाजी चरित्रामध्ये अधोरेखित झाली आहे. गोत्री म्हणतात, 'पृथ्वीची छाया चंद्रावर पडते त्यास 'ग्रहण' म्हणतात, हे सर्व सुशिक्षित लोकांना ठाऊक आहेत; परंतु भोळे व भाविक लोक या दिवशी राहू किंवा केतू हे पापग्रह चंद्रास किंवा सूर्यास पीडा करतात, अशा समुतीने तो दिवस धार्मिक कृत्यात किंवा बहुतेक निरुद्योगत

घालवितात. ही त्यांची अज्ञान समजूत दूर व्हावी व त्यांना उद्योगाचे महत्त्व कळावे म्हणून बडोदे राज्यातील सरकारी कचेऱ्यात ग्रहणाच्या दिवशी रजा पाळीत असत, ती बंद करण्यात आली आहे व व फक्त धार्मिक कारणानेच कोणास रजा पाहिजे असेल, तर त्याने रिपोर्ट करून रजा घावी, असे ठरविले आहे. यात लोकांच्या धार्मिक समजुतीसही महत्त्व दिल्याचे दिसून येते.' या पार्श्वभूमीवर सयाजीरावांना त्यांच्या शिक्षकांकडून मिळालेले या संदर्भातील मार्गदर्शन अभ्यासल्यास त्यांची भूमिका समजून घेणे सोपे जाते.

२७ जुलै १८८१ रोजी राजवाडा विभाग या विषयावर देण्यात आलेल्या व्याख्यानात सर टी. माधवराव सांगतात, 'धार्मिक कार्ये आणि दानधर्मावर होणारा खर्च जास्त आहे. त्यामुळे या खर्चात वाढ होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी. आवश्यक आणि शक्य असेल तेव्हा या खर्चाचे पुनर्समायोजन करण्यात यावे.' या शिकवणीनुसार धनदांडग्या व्यक्तींऐवजी गरजू व्यक्तींनाच खिचडी व ग्यारमीचा लाभ मिळावा यासाठी १८९३ मध्ये सयाजीरावांनी या प्रथेत बदल केला. त्यानुसार जातीचा निकष न लावता सर्व जातीतील निराश्रित, अपंग, अंध, विधवा स्त्रिया, लहान मुले व गरजू व्यक्तींची समितीच्या माध्यमातून निवड करून त्यांना पास देण्यात यावेत आणि पासधारक व्यक्तीलाच खिचडी-ग्यारमीचा लाभ असा हुकूम सयाजीरावांनी १६ जून १८९३ रोजी काढला. त्यामुळे ब्राह्मण आणि मुसलमान व्यक्तींबरोबरच इतर जातीतील गरजूंना देखील याचा लाभ मिळू लागला. १९०५-०६ मध्ये १०४१ हिंदू व ८०८ मुसलमान व्यक्तींना हे पास देण्यात आले.

पहिल्या परदेश दौऱ्यानंतर प्रायश्चित्त घेतल्यानंतरही काही व्यक्तींना त्यांच्या जातीबांधवांकडून स्वीकारण्यात आले नाही. परंतु पुढील काही दौऱ्यांमध्ये सोबत येणाऱ्या व्यक्तींना प्रायश्चित्तासाठी सरकारकडून देण्यात येणारी मदत सयाजीरावांनी कालौघात कमी केली. १८९१-९२ च्या दरम्यान सरदेसाईंना तारेद्वारे युरोपात बोलवत असताना 'प्रायश्चित्ताचा खर्च सरकारांतून मिळणार नाही' हा सयाजीरावांनी दिलेला इशारा याचा पुरावा आहे. नंतरच्या काळात सयाजीरावांनी प्रायश्चित्त घेण्यास कायद्याने बंदी घातली. महाराजांनी भिकाचार्य ऐनापुरे यांच्याकडून १९०३ च्या हुकूमाद्वारे 'प्रायश्चित्तमयूख' हा संस्कृत ग्रंथ व त्याचे मराठी भाषांतर या स्वरूपात तयार करून प्रकाशित

केला होता. १८८८ च्या प्रायश्चित्तानंतर प्रायश्चित्ताबाबत धर्मशास्त्र काय म्हणते हे लोकांना कळावे आणि त्यातून लोकांची धर्माबाबत साक्षरता वाढावी म्हणून प्रकाशित केलेला हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या धर्मसाक्षरता अभियानाचा उत्तम नमूना आहे. सयाजीरावांनी धर्म साक्षरतेचे प्रयोग हे सर्व स्तरावर केले होते. त्यासाठी सक्षम व्यक्तीची नेमणूक, हुकूम, समजूत घालणे, लोकमत तयार होण्यासाठी वेळ देणे रचनात्मक अभियान महाराजांनी राबविले. या अभियानचा सर्वोच्च बिंदू म्हणजे धर्मविषयक ग्रंथांचे प्रकाशन. महाराजांनी प्रकाशित केलेल्या मराठी, गुजराती, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांच्या यादीवर नुसती नजर टाकली तरी धर्म साक्षरतेचे सयाजीरावांचे अभियान हे किती मुलभूत होते हे लक्षात येईल.

प्रत्येक धर्मामध्ये धार्मिक विधी करणाऱ्या पुरोहितांची एकाधिकारशाही वाढलेली आज आपल्याला पहावयास मिळते. बडोद्यातील धार्मिक क्षेत्रातील अंधाधुंदीचा कारभार थांबण्यासाठी महाराजांनी केलेले प्रयत्न हे आजच्या काळातही तितकेच महत्वपूर्ण असल्याचे जाणवते. श्रावणमास दक्षिणेच्या माध्यमातून धर्मसुधारणा करत असताना परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांनाच दक्षिणा देण्याचा नियम सयाजीरावांनी केला. यातून श्रावणमास दक्षिणेवरील खर्चात बचत झाली. या बचतीतून बडोद्यात श्रावणमास दक्षिणा फंडातून दरसाल १०,००० रुपये धर्मशास्त्रावरील पुस्तकांचे भाषांतर करण्यासाठी खर्च करण्यात येत होते.

सयाजीरावांनी १९१५ मध्ये केलेल्या हिंदू पुरोहित कायद्यानुसार हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञनिक विषयातील किंवा श्रावणमास दक्षिणा परीक्षा यापैकी कोणत्याही परीक्षेत पास झाल्यास किंवा संस्थानाकडून विशेष बाब म्हणून मान्यता दिलेल्या व्यक्तीस संस्थानाकडून परवाना मिळाल्यावरच पौरोहित्याचा अधिकार प्राप्त होत होता. १४ सप्टेंबर १९३४ ला हा कायदा संपूर्ण बडोदा संस्थानात लागू करण्यात आला. या निकषात न बसणारा पुरोहित धार्मिक विधी करत असल्यास त्याला २५ रु. पर्यंत दंडाची तरतूद होती. पण पुरोहित उपलब्ध नसल्यास सवलत दिली जात होती. ही परीक्षा पास होणाऱ्या सर्व हिंदुंना मग त्यांची जात कोणतीही असो त्याला ही परीक्षा पास झाल्यावर पौरोहित्य करता येत होते. ही बाब २,००० वर्षांच्या हिंदू धर्म-संस्कृतीच्या इतिहासातील एक मोठी क्रांती होती.

खानगी खात्याकडून करण्यात आलेल्या खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम खानगी खात्यांतर्गत येणाऱ्या हिशेबी कचेरीकडून केले जात असे. परंतु ज्याने खर्च करायचा त्यानेच त्या खर्चाची तपासणी करावी ही परिस्थिती कामकाजातील पारदर्शकतेबाबत शंका उपस्थित करणारी बाब होती. त्यामुळे सयाजीरावांनी १ मार्च १८९२ रोजीच्या हुकुमाने हिशेबी कचेरी खानगी खात्याकडून काढून अकाउंटट जनरलकडे वर्ग केले. गोविंदराव नारायण दळवी यांनी बराच काळ या कचेरीचे काम केले. अशी समज असे की संस्थानाच्या राजाचा खाजगी कारभार म्हणजे अस्ताव्यस्त, मनमानी आणि अंधाधुंद कारभार होय. परंतु सयाजीरावांनी अत्यंत प्रयत्नपूर्वक स्वतःच्या संस्थानात या दृष्टीने अनेक बदल घडवत राज्याचे उत्पन्न म्हणजे राजाची खाजगी मालमत्ता नसून त्यावर प्रजेचा सर्वाधिकार आहे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी राबवलेले धोरण आपल्या कारभाराचे मुख्य सूत्र बनवले.

हिंदू धर्मासोबतच इतर धर्मियांसाठीही तत्कालीन शिफारशीनुसार अनेक महत्त्वपूर्ण कायदे महाराजांनी केले. यातीलच एक कायदा म्हणजे जैनधर्मातील संन्यास दीक्षा कायदा होय. अल्पवयीन मुलामुलींना जबरदस्तीने किंवा फसवून संन्यास दीक्षा देण्यात येते व त्यामुळे त्यांना पुढील आयुष्यात व्यावहारिक दृष्ट्या मृतवत केले जाते. म्हणून जैन धर्मियांच्या तक्रारीवरून बडोदा सरकारने एका विशेष कमिटीची नेमणूक करून तिच्यामार्फत जैन धर्मशास्त्रात संन्यास प्रथेस समर्पक आधार नसल्याची खात्री करून घेतली आणि १९३३ ला हा कायदा लागू केला. या कायद्यानुसार अज्ञान बालकांना दिलेली संन्यास दीक्षा निरर्थक ठरवून ती दिल्याने मिळकतीवरच्या त्याच्या हक्काला कोणताही धक्का बसणार नाही असे ठरविण्यात आले. अल्पवयीन मुलामुलींना संन्यास दीक्षा देणे हा फौजदारी गुन्हा समजाला जाऊन तो गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस १ वर्षापर्यंत कारावास व ५०० रु. पर्यंत दंड अशा शिक्षेची तरतूद केली.

बडोदा संस्थानातील मुस्लिम धर्मियांची लोकसंख्या १९०१ मध्ये ९ टक्के होती. हिंदू व इतर अनेक धर्मीय समुदायांच्या उन्नतीसाठी महाराजांनी कायद्याने उपाययोजना करत असताना आपल्या मुस्लिम प्रजेकडेही दुर्लक्ष केले नाही. मुस्लिम धर्मीयांमध्ये दानधर्मासाठी दिलेल्या देणगीला 'वक्फ' असे म्हणतात. अशा देणगीची व्यवस्था करण्यासाठी नेमलेल्या व्यवस्थापकाला

'मुतवल्ली' (विश्वस्त) असे म्हणतात. या मुतवल्लींनी अशा धर्मादाय मिळकतीची व्यवस्था मूळ उद्देशाला धरून केली पाहिजे व जमा खर्चाचे हिशेब बरोबर ठेवले पाहिजेत अशी त्यांच्यावर जबाबदारी होती. परंतु बहुदा ही मुतवल्ली म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती ती धर्मादाय मिळकत आपल्या मालकीचीच आहे असे समजून तिचा वैयक्तिक फायद्यासाठी उपयोग करत होते. १९२७ चा मुस्लिम धर्मियांसाठीचा 'वक्फ कायदा' हा धर्माच्या नावाखाली होणाऱ्या चुकीच्या आचरणाला शिस्त लावण्याच्या उद्देशाने केला होता.

कर्मठ समाजाला कर्मकांडांच्या डबक्यातून बाहेर काढण्यासाठी हजारो वर्षाच्या धर्म संस्कृतीच्या प्रवाहात उत्पन्न झालेली ही कर्मकांडे अभ्यासणे, त्यातील फोलपणा लोकांच्या लक्षात आणून देणे, लोकांना कालबाह्य गोष्टींचा त्याग करण्याची सहज प्रेरणा मिळावी यासाठी प्रयत्न करणे आणि लोकांना योग्य पर्यायदेखील उपलब्ध करून देणे अशा विशाल आणि विज्ञानवादी न्यायाने महाराजांनी स्वतःच्या राजवार्षांतील खानगी कारभारात बदल घडवत धर्मसुधाराणेचा राबवलेला हा कार्यक्रम आजही आपणास दिशादर्शक ठरतो.

**संदर्भ**

१. भांड, बाबा (२०२१), सयाजीराव - चारित्र्यवान, निर्व्यसनी सार्वभौम राजा. औरंगाबादः महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था.

२. भांड, बाबा, गोष्ट महाराजा सयाजीरावांची, साकेत प्रकाशन, २०१८.

३. गाडगीळ गंगाधन, एक होता राजा, ग्रंथायन प्रकाशन, मुंबई.

४. दांडेकर वि.पां., श्रीमंत सयाजीराव महाराज, ग.ल.ठोकळ प्रकाशन, पुणे.

● ● ●

# अंधश्रद्धा निर्मूलन आणि गाडगे महाराज

**दयानंद उत्तमराव राऊत**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
सहकार महर्षी स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय,
खामगाव, जि. बुलढाणा. मोबाईल नंबर ८७ ८८१२५०३४
ई-मेल-dayanandraut45095@gmail.com

भारतीय समाजामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी अनेक विचारवंतांनी कार्य केले आहे. परंतद्द सर्वात जास्त कोणी कार्य केले असेल तर, ते म्हणजे, संत गाडगे महाराज होय. अंधश्रद्धेवर सर्वात जास्त प्रहार त्यांनीच केले. समाजातील रूढी, प्रथा, परंपरा लोकनीती आणि लोकरूढी नष्ट करण्यासाठी गाडगे महाराजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. 'तीर्थी धोंडा पाणी देव रोकडा सज्जनी' असे सांगत. त्यांनी दीनदुबळे, अनाथ, अपंगाची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगे महाराज होय. देवळात जाऊ नका, मूर्ती पूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडानी राहू नका, पोथी पुराण, तंत्र मंत्र, देवी देवता आणि चमत्कार असल्या गोष्टीवर विश्वास ठेवू नका अशी शिकवण त्यांनी आयुष्यभर लोकांना दिली. वास्तविक पाहता गाडगे महाराजांनी या देशातील रूढी, प्रथा आणि परंपरा नष्ट करून वैज्ञानिक दृष्टिकोन दिला. असे म्हणायला काहीच हरकत नाही. शैक्षणिक दृष्टिकोनातून निरक्षर असणाऱ्या व्यक्तीने अनिष्ट रूढी, वर प्रहार करून परिवर्तन स्वीकारणे ही एक मोठी क्रांती आहे. जीवनभर त्यांनी आपल्या कीर्तनातून समाजातील दांभिकपणा रूढी प्रथा परंपरा यावर टीका केली. ती उखडून फेकण्याच्या संदर्भात कार्यदेखिल केले. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भात अनेक समाजसुधारकांनी, विचारवंतांनी कार्य केले आहेत जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी, संत गाडगे महाराज आणि तुकडोजी महाराज इत्यादी. परंतु रूढी प्रथा परंपरावर सर्वात जास्त प्रहार कोणी केला असेल तर ते गाडगे महाराज होय. देव, धर्म, स्वर्ग, नरक, पाप आणि पुण्य या सर्व गोष्टी मिथ्यक ठरवून, समाजात परिवर्तनवादी विचार गाडगे महाराज यांनीच

दिला.

भारतीय समाजात अनेक प्रकारच्या सामाजिक रूढी, प्रथा आणि परंपरा आहेत. जसे की, नरबळी, भूत, प्रेत, भानामती, चेटकिन करणे, अंगात येणे, अलौकिक शक्ती, शुभ-अशुभ पाप, पुण्य, देव, दानव, नवस, मूर्तिपूजा आणि चमत्कार इत्यादी होय. अंधश्रद्धेमुळे अज्ञान वाढते आणि गुलामीची प्रक्रिया सुरू होते. याची गाडगे महाराजांना जाणीव होती. म्हणूनच गाडगे महाराज म्हणाले की, मायबाप हो, देवधर्म मूर्तिपूजा करू नका, कोंबडा बकरा कापून नवस फेडू नका, कर्ज काढू नका, यामुळे कुटुंबाची प्रगती खुंटते आणि कुटुंबाची अधोगती होते. हे न करता मुला-मुलींना शिकवा. त्याच्याकडे लक्ष द्या. 'प्रत्यक्ष कर्म हाच धर्म' या उक्ती प्रमाणे क्रियाशील बनविण्यासाठी स्वतः प्रयत्न करावा व आपले मित्र, मैत्रिणी, नातेवाईक आणि कुटुंब यांनाही हेच तत्त्व विनंतीपूर्वक सांगावे.

गाडगे महाराजांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अंधश्रद्धा निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला. वेळीच आपण गाडगे महाराजांची विचारधारा स्वीकारली असती तर, देवधर्म, जातीयता, भेदभाव ,अस्पृश्यता, स्वर्ग नरक आणि पाप पुण्य या गोष्टींना आळा बसला असता. पण हे न स्वीकारल्यामुळे आज आपण वेगवेगळ्या गटातटात विभागलो आहोत आणि एकमेकांना श्रेष्ठ - कनिष्ठ मानून भांडण झगडे करित आहोत. यासाठी गाडगे महाराजांनी खालील अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भात काही मुद्दे दिली आहेत.

**कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनः**

कीर्तनाच्या माध्यमातून गाडगे महाराजांनी आयुष्यभर समाजप्रबोधनाचे कार्य केले. वास्तविक पाहता गाडगे महाराजांच्या विचारधारेचा आपण त्याच वेळी विचार केला असता तर, आता एवढा अंधश्रद्धेचा फैलाव झाला नसता. त्यांचा दृष्टिकोन हा वैज्ञानिक होता. गाडगे महाराजांमध्ये गोरगरीब, दीनदुबळ्या यांच्यामधील अज्ञान अंधश्रद्धा अस्वच्छता याचे उच्चाटन करण्याची तळमळ होती. अंधश्रद्धा पाळू नका हे ते सतत लोकांना सांगत होते. त्यांनी समाजाला सतत परिवर्तनवादी विचार दिला. ते स्पष्टपणे म्हणत होते की, घरातील वस्तू विका पण मुलांना शिकवा.

**मूर्ती पूजा आणि अंधश्रद्धा निर्मूलन :**

गाडगे महाराज नेहमी सांगायचे की, देवळात जाऊ नका, मूर्ती पूजा

करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी पुराण, मंत्र तंत्र आणि चमत्कार या गोष्टीवर विश्वास ठेवू नका इत्यादी होय. देव देवळात नसून, देव माणसात आहे अशी त्यांची शिकवण होती. देवळात देव नसतो तर देवळात पुजाऱ्याचे पोट असते, असे गाडगे महाराज लोकांना समजावून सांगायचे. देव देवळात नाही देऊळ तयार झालं की, मूर्ती आणावी लागते, मूर्ती विकत भेटते, देव विकत भेटतो का? देव काय मेथीची भाजी आहे. ज्याला देव विकत भेटतो हे समजत नसेल तर, तो माणूस कसा? असे गाडगे महाराज म्हणायचे. मूर्ती पूजा विरोधात गाडगे महाराजांनी लिहिलेल्या कवितेच्या काही ओळी खालील प्रमाणे,

किती पुजला देव तरी
देव अजून पावला नाही।
कुठे राहतो कुणास ठाऊक
अजून पर्यंत पावला नाही।।

**पाप-पुण्य, स्वर्ग- नरक आणि अंधश्रद्धा निर्मूलन :**

पाप, पुण्य, स्वर्ग, नरक ह्या सर्व मिथ्यक भावना आहेत. समाजात लोकांमध्ये भीती निर्माण करण्यासाठी या गोष्टीचा वापर केला जातो. कोणीच कोणाच्या पाप पुण्याचा हिशोब ठेवत नाही. माणसाने चांगले कर्म केले तर, तो स्वर्गात जातो आणि वाईट कर्म म्हणजे पाप केले तर तो नरकात जातो हे सर्वस्वी खोटं आहे, असं गाडगे महाराज सांगत असतं. स्वर्ग किंवा नरक कोणीच पाहिला नाही लोकांना भीती दाखवण्यासाठी या संकल्पना चा वापर केल्या जात असे. म्हणून गाडगे महाराज म्हणतात की, मायबाप हो! माणूस मेल्यावर तो कुठे जातो, हे कोणीच सांगू शकत नाही. फक्त आपलं कर्तव्य चोखपणे पार पाडा म्हणजे झालं. गाडगे महाराज यांनी पाप पुण्याच्या संदर्भात खालील विचार सांगितला आहे,

अंघोळ करतो दुधानी
जणू सगळ्याच गाय त्याच्या बापाच्या
तोच घागरी भरतो म्हणे
पुण्य आणि पापाच्या
पाप पुण्याचा हिशोब कधी
त्यांन दावला नाही

कुठे राहतो कुणास ठाऊक
अजूनपर्यंत मला घावला नाही।।

**सारांश :**

गाडगे महाराज यांनी गावोगावी जाऊन समाज प्रबोधन केले. स्वतःच्या घरादाराचा त्याग करून त्यांनी समाजाला सत्याचा मार्ग दाखविला. शैक्षणिक दृष्टिकोनातून निरक्षर असून त्यांनी लोकांना ज्ञानाचा मार्ग सांगितला. त्यांनी डोकं पिटून-पिटून अंधश्रद्धा रूढी, प्रथा, परंपरा पाळू नका. एव्हढेच नाही तर यांनी सर्व महाराष्ट्र भर भ्रमंती करून लोकांना सांगितले की, मूर्तिपूजा करू नका, देवळात जाऊ नका, यात्रेत जाऊ नका, कोंबडं बकरा कापू नका, नवस करू नका, पाप पुण्या, स्वर्ग, नरक या सर्व गोष्टींना विचारात घेऊ नका इत्यादी. मुलांना शिकवा, स्वच्छता पाळा यामुळे तुमची, कुटुंबाची आणि समाजाची प्रगती होईल असे सतत गाडगे महाराज सांगत असत.

**संदर्भ ग्रंथ :**

१) प्रा.मेश्राम सत्यवान, संत गाडगे महाराज (काल आणि कर्तव्य ),महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९८.

२) सावंत सखाराम, गाडगे बाबा चे चरित्र.

३) केचे मधुकर, श्री संत गाडगे महाराज, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, (१९९५).

४) भगत रा.तू., श्री संत गाडगे महाराज, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, (१९९२).

५) तायडे मनोज, कर्मयोगी गाडगे महाराज, विजयश्री प्रकाशन, अमरावती, (१९९३ )

६) भोसले द. ता., लोकोत्तर गाडगेबाबा जीवन कार्य, ग्रंथाली प्रकाश, मुंबई ,(२००७).

● ● ●

# संत गाडगे बाबा आणि अंधश्रध्दा निर्मुलन

**डॉ.सुजाता रामदासजी नाईक**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ
मो. क्र. ९४२१७७०३२६

**प्रस्तावना**

गेल्या अनेक वर्षात अनेक संत व महंत होऊन गेले. त्यांनी महाराष्ट्राच्या जीवनाला नवी दिशा व प्रबोधन करण्याचे कार्य केले. मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्राला रणभूमी स्वरुप प्राप्त होऊन महाराष्ट्राचा नकाशा वेळोवेळी बदलत राहीला, संत विचारांचे योगदान, त्यामुळे होणारे सामाजिक, आर्थिक परिवर्तन अविरत चालू राहिले. महाराष्ट्रात संतांची परंपरा ज्ञानेश्वरापासून सुरु होऊन संत नामदेव- संत तुकाराम, संत कबिर व संत गाडगे बाबा यांच्यामार्फत येते. या परंपरेने महाराष्ट्राला वस्तुनिष्ठ जीवनाचे ज्ञान दिले. या संतांनी फक्त भक्तीयोग न शिकविता समाजात प्रबोधनास मोठ्या प्रमाणात चालना दिली. संत गाडगे बाबा म्हणजे संत परंपरेतील परिवर्तनाला चालना देणारे महान समाज सुधारक, लोकशिक्षक, दीनोध्दारक, दलितांचे कैवारी, सुधारणावादी अलौकीक आधुनिक संत, गाडगे बाबांनी सर्वसामान्यांच्या जीवनातील वाईट, समाजविघातक प्रथा, रुढी, परंपरा, साध्या सोप्या भाषेत कीर्तनाच्या माध्यमातून जनसामान्यांच्या लक्षात आणून देऊन समाज कार्यातून सामाजिक व आर्थिक प्रबोधनाचे कार्य सतत केले. देव देवळात नसून तो दीन दुबळ्यात, दुःखी लोकांत आहे. म्हणून देवाच्या नावाने स्त्रोत माजवून आर्थिक, सामाजिक शोषणाचे कर्मकांड करण्यापेक्षा माणसाची सेवा करा ही गाडगे बाबांची शिकवण समाजाला प्रबोधनास चालना देणारी समाजाला योग्य दिशा देणारी आहे.

आजवरच्या अनेक साधू संतांनी देवी-देवता, दान-धर्म, व्रतवैकल्ये, तिर्थयात्रा यांचे प्रचंड स्त्रोम माजवून, लोकांना देव खुळे नि धर्म वेडे बनविले. दगड मातीच्या धातूच्या मूर्तीचे लोकांना पूजक बनविले व माणसापेक्षा दगड

धेंडेच भाग्यवान ठरले. गरीब-आडल्या-नाडल्यांची आर्थिक, सामाजिक मदत करण्याऐवजी देव देवळांच्या उभारणीसाठी आणि ऐदी-बैरागी, गोसावी, भट, भिक्षूकांना निष्कारण पोसण्यासाठी प्रचंड आर्थिक खैरात चालू झाली. तिरस्कारणीय बुवाबाजीचा जन्म येथेच झाला.

माणुसकीची अवहेलना करणाऱ्या परिस्थितीला जोरदार कलाटणी देण्याचे कार्य अनेक समाजसुधारकांनी आजवर केले, पण हे कार्य खेड्यांतील लाखो लोकांपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात पोहोचलेले नाही आणि मुख्य प्रश्न तर ग्रामीण जनतेचाच होता. अशा लोकांच्या आचार विचारात क्रांती घडविण्याचे महान समाजकार्य संत गाडगे बाबांनी केले व समाजात सामाजिक, आर्थिक फार मोठा बदल घडवून आणला. तत्कालीन समाजजीवनाला चैतण्यदायी प्रेरणेने संत गाडगे बाबांनी एक नवीन वाट दाखविली. केवळ मानवी समाजालाच नव्हे, तर सृष्टीलाही गाडगे बाबांनी उपकृत केले आहे. पशूहत्या निषेध, अंधश्रध्दा निमुर्लन, नशाबंदी, शिक्षण प्रसार, हुंडा निषेध, अस्पृश्यता निवारण, कुष्ठरोग निवारण, स्वच्छता व आरोग्य इत्यादी आजच्या परवलीच्या घोषणा, आंदोलने, चळवळीविषयी जनजागृती करण्यासाठी बाबांनी आपला खराटा, खापरी आणि वाणी वापरून समाजात अनेक विधायक सामाजिक, आर्थिक प्रबोधन घडवून आणले.

संत गाडगे बाबांच्या समाजकार्याचा विचार करताना त्यांनी मानवाचे कल्याण कसे साधता येईल, त्याला दुःखमुक्त कसे करता येईल, दुःखाचे नेमके कारण काय, कशामुळे समाजाची अधोगती होत आहे, काय केले म्हणजे हा मानवी समाज सुखी होईल दुखमुक्त होईल हाच विचार गौतम बुध्दांनीही केला होता. म्हणून संत गाडगे बाबांकडे आधुनिक काळातील 'सिध्दार्थ' म्हणून पाहीले जाते. संत गाडगे बाबांनी समाजाला दिलेली शिकवण, उपदेश व बाबांची दससुत्री पुढीलप्रमाणे,

संत गाडगे बाबांची दससुत्री

| | |
|---|---|
| १. भुकेल्यांना -अन्न | २. तहानलेल्यांना - पाणी |
| ३. उघड्या नागड्यांना -वस्त्र | ४. गरीब मुलामुलींना-शिक्षणासाठी मदत |
| ५. अंध, पंगू, रोग्यांना-औषोधोपचार | ६. बेघरांना-आसरा |
| ७. पशु, पक्षी, मुक्या प्राण्यांना-अभय | ८. बेकारांना - रोजगार |
| ९. गरीब तरून तरूणींचे - लग्न | १०. दुःखी व निराशांना- हिंमत |

संत गाडगे बाबांची शिकवण व त्यांचा उपदेश समाजाला आधुनिक व विज्ञानवादी तत्वाज्ञान शिकवणारा आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन शासनाने त्यांनी उभारलेल्या चळवळीला चालना देण्यास सुरुवात केली आहे. शासनाचा ग्रामविकास मंत्रालय हा विभाग गाडगे बाबांच्या कार्यावर कार्यरत आहे. तसेच समाजिक न्याय विभाग अंधश्रध्दा निर्मुलन चळवळ व कायदा, गावगावात राबविल्या जाणारे संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान हे कार्य अधिक सक्षमपणे करण्यासाठी लोकसहभाग अधिक-अधिक मिळविण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचा उपयोग होऊ शकेल.

**गाडगे बाबांचा जीवनपट**

२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव या खेडेगाव संत गाडगेबाबांचा जन्म झाला. त्यांचे लहानपणीचे नाव डेबूजी असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव झिंग्राजी जानोकर होते, तर आईचे नाव सखुबाई होते. ते परिट जमातीत जन्मास आले असले तरी कपडे धुणे हा त्यांचा व्यवसाय नव्हता. ते व्यवसायाने शेतकरी होते. गाडगेबाबांच्या वडिलांची देवावर गाढ श्रध्दा होती. ते अंधश्रध्देच्या पूर्ण आहारी गेलेले हेते. जगाचे कालचक्र देव चालवतात. देव ऊन, वारा, पाऊस सोडतात व कमी करतात, पीकपाणी देवामूळे पिकते, त्यामुळे देवाची भक्ती केली पाहिजे. त्यांना कोंबडी, बकरे नैवेद्य म्हणून दिले पाहिजे. ते देवांना नाही दिले तर देवाचा कोप होतो. कोपिष्ठ देव अनेक रोगराई निर्माण करतात. या कोपामुळे सर्वजन मरतात असे गाडगेबाबांच्या वडिलांना वाटत असे. ते देवाच्या व अंधश्रध्देच्या आहारी गेलेले होते. देवांना कोंबडे, बकरे कापत असत. त्यांच्या आस्वादाबरोबर त्यांना दारूचे व्यसन लागले. यातच त्यांचा अंत झाला. हे सर्व पाहून गाडगेबाबा हतबल झाले होते. समाजातील अंधश्रध्दा, व्यसनाधिनता, अज्ञान, शिक्षणाचा अभाव, जातीवाद इ. दोषामुळे होणारे समाजाचे नुकसान या मधून गाडगेबाबाच्या मनात आसक्ती निर्माण झाली. त्यांना स्वत:पेक्षा समाज महत्त्वाचा वाटू लागला. अशा परिस्थितीत त्यांनी समाज सेवेचे व्रत अंगीकारले व जगाच्या कल्याणाकरिता त्यांनी गृहत्याग केला.

गाडगे महाराज हे गोरगरीब, दीनदलित यांच्यामधील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे समाजसुधारक होते. 'तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी द्या' असे सांगत दीन, दुबळे,

अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. "देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी - पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका." अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधून या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्यास कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळया समजूती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला.

**अंधश्रद्धा निर्मूलन आणि गाडगे बाबा**

गाडगे बाबांनी अंधश्रद्धेविरूद्ध आवाज उठवून ठिकठिकाणी चालत आलेल्या पशुपक्षांचे बळी घेतल्या जाणाऱ्या आघोरी प्रथा कायमचा बंद केल्या. हजारो लोकांनी त्यांचा उपदेश ऐकून हिसा करणे सोडून दिले.

१. सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी-काळूबाई येथे लोक रेड्यांना बळी देत. तेथे कीर्तन करून हत्या बंद केली.

२. जळगाव (पूर्व खानदेश) जिल्ह्यात तालुका पारूळे येथे उंदरखेडे म्हणून गाव आहे. तेथे वर्षानुवर्ष परंपरेप्रमाणे दगड-धोंड्याच्या मरी आईसमोर डुक्कर जमिनीत गाडीत. त्याला चारही बाजूंनी दोरीने बांधनू त्यावर कुत्री खायला सोडीत. या कुत्र्याच्या चाव्यामुळे डुक्कर जोरजोराने ओरडे.

ही हृदय द्रवणारी निष्ठूर पद्धत बाबांनी बंद पाडली तसेच गाभण मेंढीचा जीव घेऊन तिचा गर्भ देवापुढे नैवेद्य म्हणून दाखवीत. एका मोठ्या रेड्याला मोकळे सोडून त्याचा कुऱ्हाड, बरची, भाले, तलवारी टोचून जीव घेत. या सर्व पद्धती बाबांनी उपदेष करून बंद केल्या.

३. सामाजिक प्रबोधन करून बंद करण्याचा प्रयत्न केला.

४. गावोगावी दसऱ्याला रेडे-बकूयाचे बळी देत. ते बाबांनी कीर्तनातून बंद केले.

५. हुंड्याच्या घातक पद्धतीला आळा घातला.

६. सावकारशाही मोडून काढली.

७. बाबांचे विशेष कार्य - गाडगेबाबांनी महाराष्ट्रात धर्मशाळा, सदावर्त, पाणपोया, जनसेवा, गोरक्षण, नदीवर घाट, विहिरी, तलाव औषधालाय, कुष्टसेवा, ग्रामसफाई इत्यादी रचनात्मक कार्य केले.

८. जनजागृती - भजन, कीर्तन, संस्कार केंद्र, साहित्य प्रकाशन, प्रचार, प्रसार, अंधश्रद्धानिर्मूलन, पशुहत्याबंदी, अस्पृश्यनिवारण प्रचार, नशाबंदी प्रचार, प्रार्थना इत्यादी समाजप्रबोधन.

९. जीवन शिक्षण - आदिवासी आश्रमशाळा, भटक्या जमाती आश्रमशाळा, मागासवर्गीय मुला-मुलींची वसतिगृहे, विद्यालये, धर्मशाळा, अनाथ बालकाश्रम, बालमंदिर, निराधार बालाकश्रम, पाळणाघर, वृद्धाश्रम इत्यादींद्वारे कृतिभक्तीचे समाजोद्वाराचे कार्य.

देवाधर्माच्या नावाखाली सामान्य लोक वाईट चालीरितींचे अनुकरण करतात. नवस-सायास आदी कारणास्तव अंधपणाने पशूपक्षांची हत्या करतात. गोरगरीब माणसाच्या मदतीसाठी पुढे येण्याऐवजी लोक तिर्थयात्रेसाठी अमाप पैसा खर्च करतात. यातमून काहीच साध्य होत नाही. तीर्थयात्रेला जाणे म्हणजे पैशाची धुळधानी करणे आहे. कोणत्याही तीर्थाला गेले तर तेथे दगडाचा देव आहे. लोक दगडाच्या देवाची भक्ती करतात, पण वंचित, गरीब, दुःखी माणसास कुणी मदत करीत नाही म्हणून गाडगे बाबा लोकांना आर्थिक प्रबोधीत करतात. अंधश्रद्धेचा निषेध करतात. एखादे वास्तव, कटूसत्य लोकांसमोर मांडताना ते निर्भिड वाईट गोष्टींवर हल्ला करून पोट भरणाऱ्या देवांचा बाजार आपल्या देशात भरलेला आहे. आणि ही सर्व तीर्थस्थळे सामाजिक, आर्थिक शोषणाची केंद्र आहेत. असा मोलाचा विचार लोकांना

देतात व सामाजिक, आर्थिक प्रबोधन करण्याचे कार्य करून समाजाला योग्य तो मार्ग आचरणात आण्याचा उपदेश करत होते.

**चमत्कार व जादूटोणाचा विरोध**

चमत्कार व जादूटोण करणाऱ्यांची व त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांची बाबा कीर्तनातून टर उडवत. 'ज्या मानसाले मंत्राद्वारा दुसऱ्याचा धुव्वा उडवता येते तो तर देवापेक्षाही मोठा म्हटला पाहिजे. अशा या जादूटोणे करणाऱ्या माणसाईले लढाईच्या मैदानात नेले पाहिजे आणि समोरच्या सैनिकांवर मूठ मारून त्यांचा फडशा पाडाया सांगितले पाहिजे म्हणजे आपल्याला तोफा-बंदूकांची व अनुबॉम्बची गरजच पडणार नाही.'

चमत्कार करणाऱ्यांवरही बाबा हल्ला चढवित. आताच येथे होता. आणि आता त्या दूरच्या गावात दिसला असे सांगणाऱ्यांचा खरपूस समाचार घेत. हे सारे खोटे आहे. यावर विश्वास ठेवू नका असे आवाहन ते लोकांना करीत. लोक चुकीच्या अफवा उठवतात व लोकांना चमत्काराच्या नादी लावतात हे बाबांना माहीत होते. पोथ्या-पुराणातही चमत्कार आहेत. याचीही बाबांना जाणीव होती म्हणून लोकांना या चमत्कारांच्या मागे न धावण्याचा ते सल्ला देतात लोकांनीच गाडगे बाबांच्या मागेही हे चमत्काराचे लचाड लावून दिले होते. बाबांच्या पायाला हात लावले की आपले दारिद्र्य दूर होते अशी खोटी धारण लोकांमध्ये पसरवून देण्यात आली होती. यामुळे लोक गाडगे बाबांच्या पाया पडायासाठी धडपड करीत, परंतु गाडगे बाबा कुणालाही पाया पडू देत नसत. बाबा कीर्तनानंतर गायब होतात व लगेच दुसऱ्या गावी अवतरतात अशीही अफवा पसरविण्यात आली होती. लोक यालाही चमत्कार मानायला लागले होते. यामुळे गाडगे बाबांना या लोकांना पटवून द्यावे लागले की, मी कोणताही चमत्कार करीत नाही, आणि गायबही होत नाहीत तर तुमच्यापासून सुटका करण्यासाठी कीर्तन झाल्यानंतर बाजूलाच कुठेतरी घोंगडी पांघरून बसून राहाते. लोकांना या चमत्कारापासून व जादूटोण्यापासून मुक्त करण्यासाठी बाबासारखे त्यांना कीर्तनातून उपदेश करून त्याचे प्रबोधन साधण्याचा प्रयत्न करत होते.

**सारांश**

संत गाडगे बाबा म्हणजे अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे

आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेश असे. त्यामुळेच लोक त्यांना 'गाडगेबाबा' म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रूजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ**

१. ठाकरे प्रबोधनकार, श्री गाडगेबाबा, श्री गाडगेबाबा प्रकाशन समिती, मुंबई.

२. सावरकर सुदाम, तपोमूर्ती श्री गाडगेबाबा, साहित्यप्रभा प्रकाशन, अमरावती.

३. तायडे मनोज (१९९२), कर्मयोगी गाडगेबाबा, लोकवाड्मयगृह, सयानी रोड, मुंबई.

४. भगत रा.तु. (२०००), घरोघरी गाडगेबाबा, सिध्दराज प्रकाशन, पुणे.

५. केचे मधुकर, संत गाडगेबाबा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

६. मेहता देवव्रत, महाराष्ट्र, जुलै १०, १९७७, संत गाडगेबाबा जनशताब्दी विशेषांक, सुचना व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

● ● ●

# अंधश्रद्धा निर्मूलणात समाजसुधारकांचे कार्य

**प्रा. राजकन्या खणखणे**

महाराष्ट्र हे एक प्रगत राज्य अशी ओळख असण्याबरोबरच पुरोगामी राज्य अशी ठाशीव ओळखही या राज्याची आहे. गेल्या सातशे वर्षापासून वारकरी संप्रदायाच्या समतावादी चळवळीने ही ओळख निर्माण केली आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखोबा, संत सावता माळी, संत जनाबाई तसेच संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज हे संत या भूमीत होवून गेलीत. सोबतच समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींनी समाजामध्ये सुधारणा व समता प्रस्थापित करण्याकरिता, तसेच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न केले. समाजामध्ये धर्माच्या विरूद्ध असलेल्या समजुती,ज्याला अंधश्रद्धा म्हणून ओळखले जाते. आंधळेपणाने एखादी गोष्ट स्वीकारणे म्हणजे 'अध्दश्रद्धा' (आंधळा विश्वास) किंवा विचाररहित किंवा विवेकशून्य श्रद्धा. ज्या समाजातील लोकांना त्रासदायक आहेत, ज्यामुळे समाजातील लोकांची फसवणुक होते. त्यांना लुबडल्या जाते, त्यांचे शोषण होते. अशा गोष्टी त्यांचे समाजातून निर्मुलन होण्याकरिता ह्या संतानी तसेच समाजसुधारकांनी खूप प्रयत्न केलेत, अंधश्रध्दा हा शब्द श्रध्देशी जोडलेला आहे आणि सर्वसामान्यांच्या मनात श्रध्दा या शब्दाची घट्ट सांगड धर्मश्रद्धा अशीच असते. यामुळे अंधश्रद्धा निर्मुलनात समाजसुधारकांनी प्रखरपणे धर्मचिकित्सा केलीली आपल्याला दिसून येते.

महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची व्याप्ती प्रामुख्याने बुवाबाजी चमत्कारचा दावा करणारे स्वामी, साक्षात्कारी असल्याचा प्रचार करणारे महाराज, झपाटणे, भानामती, वशीकरण, विद्या, पुनर्जन्म, भावातीत ध्यान इत्यादिच्या संदर्भातील प्रबोधनाची आहे. समाजात वर्षानुवर्षे ज्या चुकीच्या रूढी-परंपरांचा पगडा आहे त्याबद्दल या समाजसुधारकांनी आपले विचार मांडलेत.

**महात्मा फुले**

नवसमाजनिर्मितीसाठी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक व आर्थिक न्याय आणि शोषणरहितता या मुल्यांवर आधारित नवी समाजव्यवस्था जर निर्माण करायची तर जुन्या, विषम व शोषणप्रधान समाजव्यवस्थेला तिच्या पायाभूत मूल्यांसह उखडून टाकलेच पाहिजे, अशी ज्योतीरावांची ठाम धारणा होती. ज्योतीरावांनी अंधश्रध्दावर कठोर प्रहार केले. ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामान्य यांची मगरमिठी सोडवून बुद्धिप्रामाण्याची व विवेकनिष्ठेची महती त्यांनी गायिली. महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचे असूड', 'तृतीयरत्न', 'इशारा', 'धर्माचे गारूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' इत्यादी ग्रंथातून लेखन केले. 'तृतीयरत्न' हे त्यांचे एकमेव व पहिले नाटक या नाटकामधून माळ्या- कुणब्याचे शोषण धर्ममिषाने कसे केले जाते याचे दर्शन घडविलेले आहे. ते म्हणतात, 'शेतकऱ्याची बायको गरोदर राहिली की, जोशी तिथे जावून तिला ग्रह, नक्षत्रांची भीती घालतो आणि काही धन उपटतो. पुढे शेतकऱ्याची पत्नी घाबरते आपल्या नवऱ्याला सांगते व नवराही पुरोहित सांगेल त्याप्रमाणे कर्ज काढून ब्राह्मण भोजनादि धार्मिक विधी करित राहतो. यामध्ये शेतकरी अज्ञानी असल्यामुळे तो या पुरोहितांना बळी पडतो व पुरोहित त्यांचे आर्थिक शोषण करित राहतो.' शिक्षण नसल्यामुळे शुद्रातिशुद्रांचे शोषण होणे हे म. फुले यांनी अनेक ठिकाणी लिहिले आहे, 'शेतकऱ्याचा असूड'च्या उपद्घातातील

**विद्याविना मती गेली, मतीविना निती गेली,**
**नितिविना गती गेली। गतीविना वित्त गेले,**
**वित्त विना शूद्र खचले,**
**इतके अनर्थ एका अविदयेणे केले.**

हे सूत्रबद्ध विवेचन त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन प्रकट करतो.

शुद्रातिशुद्राना गुलामीसदृष्य परिस्थिती का प्राप्त झाली? आणि त्यांच्या वाट्याला एवढे दुःसह जीवन का आले? याचा ते या ग्रंथातून शोध घेत आहेत. धर्माचे गारूड हा त्यांच्या शोषणाला कारण असून इतिहास काळात आर्यानी अनार्यांना जिंकून गुलाम केले आणि सर्वार्थाने त्यांना नागविण्यासाठी धर्माचे गारूड उभे केले असे त्यांना वाटते. म्हणजे निर्माण झालेल्या ब्राह्मणी संघाचा अपरिहार्य परिपाक म्हणजे ब्राह्मणी शोषक धर्म

होय असे त्यांना वाटते. हे सिद्ध करण्यासाठी ते वेद, मनुस्मृति, रामायण, महाभारत, पुराण- वाड्मय या सगळ्यांचा धांडोळा घेतांना कठोर तर्क आणि आंत्यातिक बुद्धिनिष्ठदृष्टी यांचा ते अवलंब करतात. विशेष म्हणजे आध्यात्माची झालर उतरवून ते या सगळ्या कथाकडे पाहतात. धर्म पुस्तकांतील खोट्यानाट्या गोष्टी ते उघड करण्याचा प्रयत्न करतात.

**कल्पनेचे देव कोरिल उदंड । रचीले पाखंड ।**

**हितासाठी, किन्नर गंधर्व ग्रंथ नाचविले ।**

**अस फसविले । कृत्रिमाने, निर्लज्य सोवळे त्याचे अधिष्ठान ।**

**भोंदिती निदान । शुद्धादीक.**

**ब्राह्मणांनी नित्य होऊनी स्वनिःसंग । शूद्र केले नंगी, जोति म्हणे.**

धर्माचे दांभिक रूप प्रकट करतानाच ढोंगी, गुरु, भोई, पुरोहित, जादूटोणा करून समाजाला फसविणारे यांच्या संबंधीही ते उपहासाने लिहितात. 'सत्यशोधक समाजोक्त मंगळाष्टकासह सर्व पुजाविधी' (१८८७) या पुस्तिकेतून त्यांनी पुरोहिताशिवाय विवाहाची अभिनव कल्पना मांडली आहे, तसेच वास्तुशांती, दशपिंड यासाठी पर्याची विधी दिलेली आहेत. अर्थातच पुरोहितांशिवाय लग्नविधीतून पुरोहितांना दूर करण्यासाठी म. फुले यांनी मुंबई उच्च न्यायालयापर्यंत लढा दिला होता. 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' म्हणजे सत्यशोधकांचा आचारधर्मच होय. परंतु हा आचारधर्म कर्मकांडाच्या पातळीवर नाही तर एकूण मानसाला सुखाकडे नेणारा, विचारशक्तीला प्राधान्य देणारा, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मुल्यांना केंद्रवर्ती स्थान देणारा असा आहे. महात्मा फुले म्हणतात की, 'एकदंर सर्व धर्मपुस्तकात स्वर्ग आहे म्हणून लिहितात, परंतु या पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एका तरी गृहस्थास स्वतः हा स्वर्ग पाहिला म्हणून सांगता येईल काय? एखादा मनुष्य स्वर्ग पहाण्यास गेला व तो परत आला, अशी कधी तरी गोष्ट घडून आली आहे काय? व अशा प्रकारचा मनुष्य तरी भूभागावर सापडेल काय?' असा प्रश्न ते विचारतात. कुठल्याही कृतीला धर्म कसे म्हणता येणार नाही हे महात्मा फुले यांनी उदाहरण देवून सांगितले की, यज्ञाच्या व श्राद्धाच्या निमित्ताने ताज्यातवान्या गायगुरांचा निर्दयतेने वध करून खाणे हा आर्यभट्ट ब्राह्मणांचा धर्म नव्हे, तर त्यांची ही मांसाहाराची गोडी होय? अशी टीका ते ब्राह्मणावर करतात.

'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथात महात्मा फुले लिहितात की, आर्यब्राह्मण

ग्रंथकारांनी आपले मतलबी धर्मांचे लिगांड शेतकऱ्याच्या मागे इतके सफाईने लावले की, शेतकरी जन्मास येण्याच्या पूर्वीच त्यांच्या आईस जेव्हा ऋतू प्राप्त होतो तेव्हा तिच्या गर्भाधानादि संस्कारापासून तो हा मरेपर्यंत कित्येक गोष्टींनी लुटला जातो. इतकेच नव्हे तर हा मेला तरी याच्या मुलास श्राध्दे वगैरे मिषानें धर्माचे ओझे सोसावे लागते. भटब्राह्मण जपानुष्ठान व त्यासंबंधीत ब्राह्मण भोजनाचे निमित्याने शेतकऱ्यांकडून पैसे लुबाडतात. याप्रसंगाकरिता ते एकटेच येत नाही तर स्वतःचे नातेवाईक मित्र घेऊन ते शेतकऱ्यांकडे पुरणपोळी, तूप तसेच दक्षिणा मागून शेतकऱ्यांची लुबाळनुक करतात व त्या बदल्यात शेतकऱ्यांच्या स्त्रियांना आशिर्वाद देवून शनिवार किंवा चतुर्थी करावयास सांगतात, तसेच रूईच्या पानांच्या माळा मारूतीच्या गळ्यात घालवून व गवताच्या जुडया गणपतीचे माथ्यावर रचून शिधेदक्षिणा घेतात. तसेच लग्नप्रसंगी सुद्धा शेतकऱ्यांची अशीच फसवणूक हे भटब्राह्मण करतात. शेतकऱ्यांना ही सर्व ब्राह्मणांची व्रत- वैकल्ये पूर्ण करित असताना पोटभर आमटी, पोळी मिळण्याची सुध्दा मारामार पडते.

महात्मा फुले दैवाविषयी सुद्धा लिहितात, ते म्हणतात, दैवास नशीब, प्रालब्ध, प्राक्तन, संचित, रति, सुकृत, लल्लाटरेषा ब्रह्मलिखित असे अनेक प्रतिशब्द आहेत. याविषयी उदाहरण देताना ते म्हणतात, एखाद्या आईबापाने आपल्या मुलास विद्या शिकण्याची गोडी नसतां, त्यास दुराग्रहाने त्याच्या मनाविरूद्ध शाळेत घालून त्यास अभ्यास करावयास लाविले; परंतु त्या मुलाला मुळातच विद्या शिकण्याची मुळीच गोडी नसल्यामुळे, तो अविद्वान निपजल्याबरोबर त्याच्याविषयी सर्व लोक असे म्हणू लागतात की, विद्या शिकणे हे त्याच्या दैवातच नव्हते. अशाप्रकारे महात्मा फुले अनेक उदाहरणे देवून हे स्पष्ट करतात की, दैव काहीही नसते. ही सर्व फळे आपल्या दुष्कर्माची किंवा सुकर्माची असतात.

आकाशातील ग्रह, ताऱ्यांचा मानवावर परिणाम होतो हे ते उदाहरणासहित स्पष्ट करतात की, या सर्व विस्तीर्ण पोकळीत अनंत तारे आहेत, त्यापैकी आपल्या अति जवळचे सूर्य आणि चंद्र हे उभयता या पृथ्वीवरील एकंदर सर्व जलचर, भूचर आणि वन-वरांसह वनस्पतीचे प्राण जीवन आहेत, म्हणून निर्विवाद आहे. कारण सूर्यप्रकाश नसता तर वनस्पतीला स्वतःचे अन्न तयार करता आले नसते व ते आपल्यालापण मिळाले नसते.

व तसेच बाकी शनी वगैरे ग्रह एकट्या मानव स्त्री- पुरूषास पीडा देतात म्हणून सिद्ध करता येत नाही. तसेच शनि वगैरे ग्रहांच्या क्रमणाच्या संबंधाने एखादया वेळी या आपल्या पृथ्वीवरील एकंदर सर्व प्राणीमात्रांस कांही एक तऱ्हेचे हित अथवा अनहित होण्याचा जरी संभव आहे; तरी ते एकदंर सर्व प्राण्यांपैकी फक्त मानव स्त्रिस अथवा पुरूषास त्रास देतात; म्हणून सिद्ध करता येणार नाही. कारण शनीवरील एकंदर सर्व प्रदेश इतका विस्तिर्ण आहे की, त्याच्या निर्वाहाकरिता चार चंद्र आहेत व त्यास आपला सर्वांच्या निर्मिकाने नेमून दिलेले

उद्योग एके बाजूला ठेऊन तो या भूमंडाळावरील एखादया व्यक्तीस पीडा 'देण्यास येतो; आणि ती पीडा टाळण्यासाठी अज्ञानी लोकांनी धूर्त आर्यभट जोशांस भक्कम दक्षिणा दिल्याने दूर होते, ही सर्व पोटखाऊ म्हणजे पोटाची खडगी मेहनत न करता भरण्यासाठी केलेले थोतांड आहे असे महात्मा फुले म्हणतात. दैव - देवशरणता, फलज्योतिष, जारण-मारन, भूतबाधा, कर्मकांड, सोहळेपणा, विधी - संस्कार, बुवाबाजी वगैरे अंधश्रद्धाचे विविध आविष्कार कसे तर्क दुष्ट व खुळचटपानाचे आहे हे परोपरीची उदाहरणे देऊन जन सामान्यांना पटून दिले.

**कृष्णराव भालेराव**

काळाची पावले ओळखणारा विचारवंत म्हणून ज्यांची ओळख आहे ते म्हणजे कृष्णराव भालेराव, महात्मा फुले व कृष्णराव भालेराव यांच्यामध्ये मतभेद झालेले होते. तरी महात्मा फुले यांच्या विचारांचा, कार्याचा आणि त्यांच्या अन्वेषण दृष्टीचा फार मोठा परिणाम कृष्णराव भालेकरांच्या व्यक्तिमत्वावर होता. त्यांचे लेखन, पाहताना त्याच्या एकूण जीवनदृष्टीवर म. फुले यांचा प्रभाव होता हे जाणवत. भारतातील शूद्रातिशुद्रांच्या दुःखास ब्राह्मणी धर्मशास्त्र हे कारण आहे हा विचार त्यांच्या लेखनात पुन्हा पुन्हा येतो. शेतकऱ्यांनी डोळे उघडा या त्यांच्या गाजलेल्या भाषणामध्ये देव, ही कल्पना कशी थोतांड आहे हे ते मोठ्या पोटतिडिकेने सांगतात. तुम्ही आपले नशीब भीक मागे कराल तर ते तुम्हास भीक मागावयास लावील, तुम्ही आपले नशीब उद्योगी बनवाल तर ते तुम्हास उद्योगी बनवील, नशीब -नशीब करीत बसाल तर, तेही तुमच्या छातीवर 'नशीब नशीब करीत बसेल. दुसऱ्या देशांनी लोक नशीबावर खोगीर घालून स्वार झाले आहेत आणि तुम्ही

नशीबाला बोकाळी घेऊन बसला आहात!.

तीर्थक्षेत्रे ही बहुजनांच्या लुटीची क्षेत्र आहेत असे त्यांचे मत होते. त्यांनी आपल्या 'निराश्रित हिंदू आणि ब्राह्मण क्षत्रिय' या छोट्याश्या टिपणामध्ये तीन प्रश्न उपस्थित केले आहेत.

तीर्थाची ठिकाणे आणि तेथील ढोंग किती वाढले आहे? देवस्थानांच्या आधारे किती पुजाऱ्यांची पोटे भरतात? आणि अनुष्ठाने, पुराणे, शकून, अपशकून यांचा धंदा किती वाढला आहे. अशाप्रकारे कृष्णराव भालेराव त्यांचे अंधश्रध्देविषयी मत मांडतात.

**संत गाडगेबाबा**

संत गाडगेबाबा यांनीही आपल्या कीर्तनातून अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य केले. ते म्हणतात, 'घरी नवीन मुल जन्माला आले म्हणून त्यांच्या बारश्याला बकरू कापायचे नाही. दारूमुळे सर्व कुटुंबाचा नाश झालेला आहे. बकरू कापल नाही म्हणून देवीचा कोप होत नाही तसेच नवस देणे व त्याकरिता देवींना (मरी, माय, माता माय) यांच्यापुढे कोंबडे, बकरे कापणे यामुळे कोणचेही भले होत नाही. 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' असे ते मानतात. देव देव आहे तरी कुठे? तो राउळात असतो की तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी? तो वैकुंठात असतो की मठ-मंदीराच्या चार भिंतीमध्ये? खरंच तो कुठे असेल? तुकोबाराय म्हणतात की, 'तीर्थी धोंडापाणी । देव रोकडा सज्जनी ।। देव जनता जनार्दनातच वास करतोय 'जनी जनार्दन'हेच देवाचे ठिकाण आहे, असे गाडगे महाराजांचे मत आहे. मग या व्यापक जनी जनार्दनालाच देवस्वरूप मानून जनसेवचं व्रत डेबुजींनी अंगीकारल. संत गाडगे महाराज म्हणतात, देव दगडधोंड्यांची पुजा करण्यात काळाचा नि पैशाच व्यय करू नका. गंगास्नाने पाप जातात असे म्हणणे धर्माचा शुद्ध बाजार आहे. बाबांचे कीर्तन एकण्यासाठी आलेल्या श्रोत्यांनाच ते देव समजत. शिक्षण, समता, पशुबळी, जातीयता, अंधश्रद्धा, नवस, उपास-तापास, स्वच्छता, हिंसाबंदी या गोष्टी विषयी कीर्तनातून ते लोकांना प्रबोधन करित होते.

या महाराष्ट्रात खूप मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा पसरली होती. देवदेवतांच्या नावावर कोंबड्यां- बकऱ्यांचा बळी दिले जात होते. पशुबळीतून रक्ताचे पाट वाहात होते. कोंबडे कापतांना त्यांची सगळी मान कापू नये. अर्धीच कापावी, प्राण जात असता आकान्त करीत कोंबड्याने उंच उड्या

माराव्यात, तशा स्थितीत त्याला देवापुढे आणले जात होते व त्याच्या गळ्यावाटे उडणारे रक्ताचे थेंब देवावर उडाले की मग नवस पुरा झाला असे समजत असे. देवासमोर खड्डा खणावा. त्यात बकरी, डुकरे गळ्यापर्यंत पुरावीत. मग त्यांना भाल्याने टोचून हालाहाल करून त्यांचे प्राण घेतले की, नवस पुरा झाला. देवाधर्माच्या नावावर चालेल असले क्रूर, हिंस्त्र प्रकार आणि त्यांनी बरबटलेली देवडे पाहून बाबांच्या मनास अतिशय वाईट वाटत होते.

वाई तालुक्यातील मांढरदेवी, वरवंडची मरीआई, देवदहीठणचा खंडोबा, वडणीचा पीर, शेंगोळ्याचा पीर, दोनद बुद्रुकची आसरामाय, वऱ्हाडचा बहिरमबुवा, खेडीचा वेताळबुवा, कान्हूर पठारची मेसाई, अशा डोंगदऱ्यातल्या विविध देवतांच्या जत्रेमध्ये हजारो जिवांचे बळी पडत असे. बाबांनी या क्रूर कृत्याविरूद्ध उभे राहण्याचा निर्णय घेतला. ह्या कृत्याविरूद्ध आवाज उठविण्यासाठी त्यांच्याजवळ शस्त्र होते ते कीर्तनाचे, कीर्तनातून ते जनलोकांना विनवणी करीत, प्रार्थना, त्यांच्या भावनांना आवाहन, आणि शेवटी या तळमळतून केलेल्या या कृत्यांचा धिक्कार अशाप्रकारे त्यांनी त्यांचे अनुयायी व स्वतः महाराष्ट्रभर फिरून त्यांनी पशू, पक्षांना बळी देण्यापासून रोखले. देवाविषयी ते म्हणत, 'देव देव पाहिला काय? त्याच्या पुढचा नैवैध कुत्रा खातो तरी तो कुत्र्याला हाकलत नाही, त्याच्या पुढे चोर चोरी करतो तरी तो त्याला मारत नाही, त्याच्या पुढे स्त्रियांच्या अब्रु लुटल्या जाते तरी तो त्या व्यक्तीला थांबवत नाही. देव जेव्हा सोन्या-चांदीचा असतो तेव्हा तो स्वतः चोरीला जातो तरीही तो काही करत नाही. असे उघड-उघड ते लोकांना आपल्या कीर्तनातून सांगत. 'पोथी - पुराने, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टीवर विश्वास ठेवू नका' अशी शिकवण त्यांनी लोकांना आयुष्यभर दिली.

**डॉ बाबासाहेब आंबेडकरः**

भारतीय प्रबोधन चळवळीच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अंधश्रद्धानिर्मूलन कार्याची अनन्यता ही आहे की अंधश्रध्दांचा पाया असलेल्या वैचारिक आणि भौतिक या दोन्ही आधारांवर कृतिशिल जनलढे उभारणारे ते एकमेवाद्वितीय समाजसुधारक आहे. त्यांना दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाला जो आपल्या अधिकारपासून कोसो मैल दूर आहे जो हिंदूच्या

अधिपत्याखाली पिचलेला आहे अशा दलित समाजाच्या व्यक्तींना, मनुष्याचा दर्जा देणं, त्यांचा आत्मसन्मान वाढविणे तसेच आत्मोद्धार करण्यासाठी समर्थ करणे ही त्यांची उदिष्ट्ये होती. त्यासाठी त्यांनी 'बुद्ध आणि त्याचा धम्म', 'शूद्र पूर्वी कोण होते?', 'जातीनिर्मुलन', 'रिडल्स ऑफ हिंदुइझम' अशा ग्रंथसंपदेतून त्यांनी सनातनी ब्राह्मणी व्यवस्थेवर वैचारिक हल्ले केले. 'बहिष्कृत भारत', 'प्रबुद्ध भारत', 'जनता', 'मुकनायक' यासारख्या नियतकालिकांतून हिंदू धर्म व समाजव्यवस्था बुद्ध धम्म आणि त्यांची शिकवण अस्पृश्यता - जातिभेद आणि त्यांचे निर्मूलन यांची अखंडपणे चर्चा केली. अस्पृश्यांचे प्रश्न सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी ही नियतकालिके चालविली. त्यांनी जनलढे ही उभारलेत. महाडचा चवदार तळ्याचा सत्यागृह (१९२७), काळाराम मंदिर सत्याग्रह (१९३०-३५), मुखेडचा पांडवप्रताप सत्याग्रह (१९३२) पर्वती - सत्याग्रह अशा लढयातून त्यांनी धर्मश्रद्धा व अंधश्रद्धा यासंबंधीच्या चिकित्सच्या लाटा भारतभर उसळवीत ठेवल्या. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहावेळी जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिवतरकर हे मंदिराबाहेर पडलेत तेव्हा मंदिराधिपतीला गोमुत्राने मंदिर शुद्ध करावे लागले. जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पतित पावलांनी केले नाही ते पशुच्या मुत्राने केले! धन्य तो मंगळ देव नि पवित्र धर्मराज! याठिकाणी अस्पृश्य माणसांच्या स्पर्शाने मंदिर निशुद्ध होते. तर जी गाय नरक खाते त्या नरक खाणाऱ्या गायीच्या मुत्राने मंदिर शुद्ध होते. याठिकाणी हिंदूचा देव बाटतो म्हणून अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश दिला गेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शूद्राकडून अतिशूद्रावर होणारे अत्याचार पाहिले होते. म्हणूनच ते महाडच्या सत्याग्रहावेळी ब्राह्मणांना विरोध करण्यापेक्षा ब्राह्मण्याला विरोध करतात. कारण विषमतावादी ब्राह्मण्य हे केवळ ब्राह्मणातच नसते. कोणत्याही, वर्ण, जात वर्चस्वादी जात मानसिकतेने असू शकते, अशी त्यांची धारणा होती. 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहून बुद्ध धर्मातरित विविध पंथामुळे बुद्ध धर्माला चिकटलेली दुष्ट प्रथा व अभौतिकवादी तत्त्वे झुगारून त्याचे आध्यात्मिक, कर्मकांडी- रूप नाहीसे करून त्याला भौतिकवादी आणि विज्ञानवादी रूपे दिले.,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धर्म स्विकारतात, बौद्ध - धर्म

स्विकारण्याची घोषणा ते १९३५ साली करतात व त्यानंतर २१ वर्षानंतर ते बौद्ध धर्म स्विकारतात. ते सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करतात. त्यामध्ये त्यांना बौद्ध धर्माची तत्त्वे आवडतात. बुद्धाचे तत्त्वज्ञान अनित्यतावादी, भौतिकवादी आहे. वर्णव्यवस्थेचे ते महत्तम विरोधक आहे आणि समतेचे महत्तम पुरस्कर्ते होते. बुद्ध अनीश्वरवादी होते. आत्मा, पुनर्जन्म, कर्मविपाक, स्वर्ग-नरक यासारख्या गोष्टी बौद्ध धर्मात नाही. बुद्ध वेदाला मानत नाहीत. हिंदूधर्मातील आत्मावाद हा बहुजन समाजाच्या दारिद्र्य, अज्ञान आणि शोषणास कारणीभूत आहे. तर बुद्धाने हा आत्मावाद नाकारून शोषित समूहांना पारतंत्र्यातून मुक्त केले. बौद्ध तत्त्वज्ञान मानसशास्त्र व अभिधम्मानुसार कर्ता, कर्म, शरीर, मन (नाम, रूप, स्कब) याच्यांमध्ये सतत परिवर्तन होत असते म्हणून सर्वच परिवर्तनशील असल्याने 'आत्मा' नावाची अपरिवर्तनीय समजली जाणारी वस्तू शरिरात राहूच शकत नाही. धम्मपदानुसार सब्बेधम्मा अनन्तातियदा पर्त्यय पस्सती। अन निब्बिन्दती, दुक्खे एस मग्गो विसुदिध या' म्हणजे निर्माण झालेले सर्व जीव अशाश्वत आहेत. ज्याला याची जाणीव होते, तो दुःखाने डगमगत नाही. ही भौतिकवादी भूमिका बुद्धाने डार्विनच्या पूर्वी हजारो वर्षे अगोदर मांडली. म्हणून बुद्ध धर्म हा विज्ञाननिष्ठ आहे.

डॉ.बाबासाहेबांनी बुद्ध धम्मातील अनात्मवादी सिद्धांतांला क्रांतिकारक आणि मूलभूत मानले व कर्मवाद आणि पुनर्जन्माची भौतिकवादी मीमांसा केली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी घोषणा केली की, मी माझ्या जुन्या धर्माचा त्याग करून आज पुन्हा नवीन जन्म घेत आहे. तो धर्म असमानता आणि छळवणूक याचा प्रतिनिधी होता. अवतार कल्पनेवर माझा विश्वास नाही. मी कोणत्याही हिंदू देवदेवतेचा भक्त उरलो नाही, मी बुद्धाने सांगितलेला अष्टांग मार्ग कसोशीने पाळीण व त्यांनी बुद्ध धर्म स्विकारून व सोबतच लाखो अनुयायांना बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. अस्पृश्यांना ते म्हणत, तुमची ही दुर्दशा देवनिर्मित नाही किंवा ईश्वरी संकेतानुसार आहे असे नाही. तुमची ही स्थिती मानवनिर्मित आहे. गुलामगिरी जर गुलामाला नष्ट करायची असेल तर गुलामाने स्वतःच पेटून उठायला पाहिजे, असे त्यांचे विचार होते.

१९५६ च्या धर्मांतरानंतर लाखो अस्पृश्य लोकांमध्ये सुधारणा घडून आली. अस्पृश्यांनी त्यांच्या पारंपरिक व्यवसाय करणे सोडून दिले. ते मिळेल

तो व्यवसाय सरू लागले कोणत्याही वस्तूला स्पर्श करणे गुन्हा नाही तो आपला हक्कच आहे. हे लोकांना कळू लागले व ते नंतर सार्वजनिक पाणवठा, मंदिरामध्ये प्रवेश या गोष्टी करू लागलेत बाबासाहेबांनी त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्यामुळे ते शिक्षणाकडे वळले शिक्षण मिळाल्यामुळे लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण आला पाप-पुण्य, रूढी-परंपरा, कर्तव्य-अधिकार या गोष्टी शिक्षणामुळे समजल्या व त्यामुळे बऱ्याच प्रमाणात अंधश्रद्धेचा नायनाट झाला.

**डॉ. नरेन्द्र दाभोलकर**

डॉ. दाभोलकर हे बुद्धीवादी, सामाजिक कार्यकर्ते अशी त्यांची ओळख. विवेकवादी आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी झटणारे. ते अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामापुरते फक्त मर्यादित नव्हते. ते स्वतः वैद्यकशास्त्राचे अभ्यासक असल्यामुळे त्यांना मानसाच्या मानसिकतेचा चांगला अभ्यास होता. त्यामुळे एखादी गोष्ट घडते? यामागील ते पुराव्यांनिशी वैज्ञानिक कारणे सांगतात व त्यावरील उपाय सुध्दा ते सांगतात. अंधश्रद्धा निर्मूलनापासून सुरु झालेला संग्राम त्यांना अंधश्रद्धा निर्मूलन ते वैज्ञानिक दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन ते धर्मचकित्सा धर्मचिकित्साने धर्मनिरपेक्षता आणि धर्मनिरपेक्षता विवेकवादी समाजनिर्मित मार्गाने पुढे न्यायचा होता. डॉ. नरेन्द्र दाभोलकर हे १९७० साली एम.बी.बी.एस. झालेत. सन १९८२ पर्यंत त्यांनी दोन दवाखाने चालविली. १९८२ साली त्यांनी त्यांचे दोन्हीही दवाखाने बंद केले व रूग्णालय ही बंद केले. आणि 'अंधश्रद्धा निर्मूलन' चळवळीचे काम पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून केले.

१९८७ साली डॉ. दाभोळकर हे कार्याध्यक्ष म्हणून अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या महाराष्ट्र राज्य शाखेत दाखल झाले. १९९० साली डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांनी 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' नावानेच नवी समिती निर्माण करून कामाला सुरूवात केली. १६ डिसेंबर २००५ रोजी विधानसभेत जादूटोणा विरोधी बिल संमत झाले. डिसेंबर २०१३ च्या अधिवेशनात दोन्ही सभागृहात जादूटोणा विरोधी कायदा सर्वपक्षीय संमतीने संमत झाला आणि माणसाच्या सर्वांगांना स्पर्श करणारा एक क्रांतीकारी प्रभावी कायदा करण्यात पुरोगामी महाराष्ट्र राज्य यशस्वी झाले. जादुरोणा विरोधी कायद्याचा प्रसार होणे सुद्धा महत्त्वाचे आहे, कारण जादुटोणाविरोधी कायद्याचा प्रसार

कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत, नागरिकांपर्यात वैज्ञानिक दृष्टिकोन पोहचविता येईल आणि महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने जर महाराष्ट्राच्या प्रत्येकामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची बीजे रोवण्यात आपण यशस्वी झालो तर खऱ्या अर्थाने महाराष्ट्र पुरोगामी राज्य ठरेल आणि त्याची आर्थिक व इतर आघाडीवरदेखील अधिक प्रगती होऊ शकेल. असे त्यांना वाटत होते. मानवी जीवनात शिक्षण आणि विज्ञान या दोन्हींचा प्रकाश जसजसा येईल आणि जसजसा त्यांचा प्रसार होईल, तसतसा अज्ञान आणि अंधश्रध्दा यांचा अंधकार नाहीसा होईल. त्यासाठी वेगळं काही करण्याची गरज नाही, अशा स्वरूपाचा विचार त्यांनी मांडला.

२५ जानेवारी १९५० रोजी जी घटना स्वीकृत केली त्यामध्ये फक्त नागरिकांचे हक्क होते म्हणजे पाहिजे ते बोलू शकतो, देशात कुठेही फिरु शकतो, अभिव्यक्तीचा हक्क आहे. मालमत्ता धारण करण्याचा हक्क आहे, मी मालमत्ता खरेदी करू शकतो. परंतु मुलं मोठी झाल्यावर आपण त्यांना जसं सांगतो की, तुम्हाला हक्क मिळतील, पण तुम्हाला कर्तव्यही पार पाडावी लागतील, त्याच पद्धतीने १९७६ साली देशाच्या घटनेमध्ये वाढ करून तिच्यामध्ये नागरिकांच्या कर्तव्यांचा समावेश करण्यात आला त्यातलं एक महत्वाचं कर्तव्य म्हणजे - It is a duty of every indian citizen to Promote Scientific temperament, म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार, प्रसार आणि अंगीकार करणं, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचं कर्तव्य आहे. १९८७ साली देशाचं नवं शैक्षणिक धोरण आलं. या शैक्षणिक धोरणामध्ये 'वैज्ञानिक मनोभावाची निर्मिती' या महत्त्वाच्या गाभाघटकाचा समावेश केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये मूल्यशिक्षण शिकवल जातं. शालेय शिक्षणामध्येही 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचा' समावेश आहे. आपण विज्ञानयुगात जगतो त्याचा पाया 'वैज्ञानिक दृष्टिकोन' आहे. आपण जे विज्ञानच शिक्षण घेतो, त्याचं तत्त्वज्ञान 'वैज्ञानिक दृष्टिकोण' हेच आहे, हा वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय? असा प्रश्न अनेकांना पडतो. तर वैज्ञानिक दृष्टिकोन याचा एका शब्दामध्ये अर्थ कार्यकारणभाव तपासणं, डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणतात की, प्रत्येक कार्याच्या मागे कारण असतं . ते कारण आपल्या बुद्धीला समजू शकतं. जगातल्या सगळयाचं कार्याची मागची कारण समजतात असं नाही; पण ती ज्या वेळी समजतील त्या वेळी ती कशी समजतील हे कार्यकारणभावामुळे

आपल्याला समजतं. सर्वोत्तम ज्ञानप्राप्तीचा माणसाला लाभलेला हा सर्वात खात्रीचा मार्ग आहे. 'वैज्ञानिक दृष्टिकोन, म्हणजे प्रत्येक गोष्टी - मागील कार्यकारणभाव समजेपर्यंत माणूस या सृष्टीमधला दुबळा प्राणी होता. माझ्या आयुष्यामध्ये जे-जे काही घडतंय ते- ते घडण्यामागे देव आहे; दैव आहे; नशीब आहे; प्राक्तन आहे; संचित आहे, प्रारब्ध आहे; कर्मविपाक आहे; मागच्या जन्मीच पाप-पुण्य आहे; जन्माची वेळ आहे. या गोष्टी कार्यकारणभाव कळत नव्हता; तोपर्यंत माणसाला वाटत होत्या.

डॉ. नरेन्द्र दाभोलकर यांनी, प्रत्येक गोष्टीमागील शास्त्रोक्त कारणे सांगितलेली आहे. फलज्योतिष हे शास्त्र नाही किंवा फलज्योतिष हे थोतांडच आहे, हे पटवून देताना ते म्हणतात, 'जसजसा विज्ञानाचा प्रकाश फाकला, त्याचा प्रसार झाला, तसतसं खगोलशास्त्र हे पूर्ण शास्त्र बनलं, आणि हे पूर्ण शास्त्र बनल आणि फलज्योतिष शास्त्राला मात्र शास्त्राचा दर्जा मिळाला नाही. मात्र, तोपर्यंत फलज्योतिषामध्ये अनेकांचे हितसंबंध तयार झाले होते. प्रत्येक कार्याच्या मागे कारण असतं आणि ते विशिष्ट पद्धतीने तपासता येतं, ज्या पध्दतीने भानामती, जादूटोणा, करणी, चेटूक यांच्यामागे कोणताही कार्यकारणभाव सिद्ध झालेला नाही. त्याच पद्धतीने फलजोतिषामागचाही ज्याला लोक शास्त्र म्हणतात, कार्यकारणभाव सिद्ध झालेला नाही. ज्योतिष या शास्त्रात आपला हायपोथिसिस किंवा गृहीतकच अजून जाहीर केलेलं नाही. कुठलीही गोष्ट शास्त्र असल्याचा दावा करण्यासाठी एक गृहितक मांडाव लागतं आणि जर ते गृहीतक काटेकोर तपासण्यामधनं वारंवारं तावून सुलाखून सिद्ध झालं, तरच त्याचं शास्त्रीय सिद्धातामध्ये रूपांतर होत.

ज्योतिष्य ज्यांच्या आधारे व्यवहार करतात त्यामध्ये पहिली गोष्ट म्हणजे आकाशस्थ ग्रहगोलाचे मानवी जीवनावर सतत आणि अखंड परिणाम होत असतात. दुसरी गोष्ट म्हणजे व्यक्ती जन्माला येतात त्या जन्मवेळेवर हे परिणाम अवलंबून असतात आणि तिसरी गोष्ट म्हणजे यामुळे माणसाचं नशीब ठरतं किंवा बदलंत पण ही तीन गृहीतक नीट तपासली, तर 'फलज्योतिष शास्त्र नाही' या प्रतिपादना मागच सत्य आपल्याला चांगल्या प्रकारे समजू शकते. आपल्या जीवनावर प्रभाव टाकणारे गृह- राशी - नक्षत्र याचं निरीक्षण करण्यासाठी तीच तीच स्थिती. परत यावी लागते, आणि एवढं सगळं अफाट विश्व जर आपल्याभोवती सतत फिरत असेल तर आकाशस्थ गोष्टीचा

एकूण पसारा तिच तीच स्थिती परत येणं ही गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे असे डॉ नरेन्द्र दाभोलकर यांचे मत आहे.

तसेच बुवाबाजी विषयी सुद्धा ते आपलं मत मांडतात . 'जो या व्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या दुःखाची कारणे उपाय विवेकवादी विचारसरणीशी विसंगत अशा देवासारख्या भ्रामक कल्पना, अनेकविविध अवैज्ञानिक चुकीचे मार्ग दाखवितो व सर्वांगाने फसवणूक व शोषण करतो, तो म्हणजे बुवा आणि त्यांची कार्यप्रणाली म्हणजे बुवाबाजी. बुवाबाजी या शब्दाची व्याप्ती खूप मोठी आहे. कथित बुवा-बाबा, स्वामी, महाराज, मांत्रिक, देवऋषी, संत-महंत असे सर्व जन स्वतःच्या आध्यात्मिक, दैवी शक्तीचा छुपेपणाने व खुलेपणाने प्रसार करत लोकांची दिशाभूल करण्याचा धंदा करत असतात. भूत उतरवणारा बाबा, करणी काढणारा मांत्रिक, हातातील कुंकवाचा बुक्का करणारी, अंगात देवी आलेली बाई, शरीरात नसलेली कुंडलिनी जागृत करणारी निर्मलमाता आणि स्वतःला चमत्काराचा अवतार म्हणवून घेणारा सत्यसाईबाबा यंत्र-तंत्र सर्वत्र, सर्व पातळयावर सर्व समाजघटकात, सर्व आर्थिक स्तरात महिला, पुरूष, युवक यांच्यात चाललेला बुवाबाजीचे स्वरूप चक्रावून टाकणारेच आहेत. बुवाबाजीची मानसिकता रूजविण्यासाठी ज्या दोन बाबींचा प्रामुख्याने वापर केला जातो त्यातील एक म्हणजे प्रारब्धकल्पना व दुसरे म्हणजे चमत्कार. त्यासाठी ते कर्मसिद्धात सांगतात. बुवाबाजीला जास्त चालना मिळण्याचे कारण म्हणजे या देशाच्या मनोभूमीची मशागत नियती, विधिलिखित दैव, नशीब, प्रारब्ध या कल्पनांनी केली आहे. मनुष्याला आपल्या कर्माची उचित फळे (सत्कर्माची गोड फळ आणि दुष्कर्माची कटू फळे) भोगावी लागतात यालाच कर्मसिद्धांत म्हणतात व या कर्मसिद्धांताला जास्तीत जास्त भारतीय लोक बळी पडतात.

भारतीयांची मानसिकता कर्मसिद्धांताला अनुरूप अशी झालेली आहे व त्यामुळेच ते बुवाबाजीला बळी पडतात. परंतु डॉ नरेन्द्र दाभोलकर भारतीयांच्या या मानसिकता दूर करण्यासाठी बाबाकडे गेल्यानंतर बरे कसे वाटते? हे वैज्ञानिकदृष्ट्या पटवून सांगतात. बाबाकडे गेल्यानंतर अनेकदा बरे वाटते. त्यांचा संबंध प्रत्यक्षात प्रश्न सुटण्याशी नसतो तर त्यामागे अनेकविध कारणे असतात.

१) **विरेचन :** शरीराची व मनाची दमछाक करण्याची पद्धती.

२) **एन्डॉरफीन :** हे जैवरासायनिक द्रव्य मेंदूमध्ये स्त्रवणे व त्याने बरे वाटण्याची भावना येणे.

३) **सूचनावर्तित्व :** मनोशारीरिक आजार मनाला सूचना मिळून बरे होणे व त्याचे श्रेय बाबांना मिळणे

४) **मानसिक परिणाम (प्लासिबो इफेक्ट ) :** बाबांच्या कृपाप्रसादाने उपचार मिळाला आहे मार्ग सापडण आहे, या भावनेतून बरे वाटणे,

५) **स्वयंनियंत्रित आजार (सेल्फ क्यूरेबल डिसीज) :** काही आजार स्वताहूनच काही कालावधीनंतर बरे होणारे असतात. या कालावधीत बाबांचा आशीर्वाद घेतला असेल, तर त्यांचे श्रेय बाबांना जाते.

६) **समुपदेशनः** बांबांची सल्लामसलत, बोलणे हे एक प्रकारचे समुपदेशन असते. या काऊन्सेलिंग'चा परिणाम होतो, त्यांचे श्रेय बांबाच्या दैवी सामर्थ्यान मिळते.

७) **स्पॉन्टेनियस रिलेशन :** अचानक रोगप्रतिकार शक्ती वाढते. त्यामधून रोगाला अटकाव होतो अशा या वेळी कथित चमत्काराचे कारण बाबाच्या प्रभावाला- कृपाप्रसादाला जोडले जाते.

८) **मनुष्याची समुदायप्रियता :** समुदायात माणसाची चिकित्सक वृत्ती मंदावते काय, याचा निवाडा करणारी विवेकबुद्धी लोप पावतो.

अशाप्रकार डॉ. नरेंद्र दाभोळकर हे विविध घटना घडण्यामागे वैज्ञानिक दृष्टीकोन असे ते मत सांगतात.

प्रत्येक गोष्टी मागे कार्यकारणभाव असतो आणि तो वैज्ञानिक दृष्टीकोणणे तपासता येतो ही मानसिकताच मुळात भारतीय समाजात अजून तितकिसी रुजलेली नाही त्यामुळे चमत्कार, बुवाबाजी फलज्योतिषशास्त्र या आणि अशाप्रकारच्या विविध गोष्टींना समाजातील लोकांनी खतपाणी घातल्याने त्या समाजात पसरतात व त्याचा वाईट विपरित परिणाम हा समाजावर होत असलेला आपण पाहातो. कोणत्याही समस्येवर या बाबाकडे उपचार घेण्यात वेळ घालविण्यामुळे अयोग्य उपचाराअभावी कितीतरी रोग्यांचे जीव गमावल्याचे देखील आपण समाजामध्ये पाहातो. तर या सर्व अंधश्रद्धा समाजातून घालविण्यासाठी सद्सद्विवेकबुद्धीने विचार करून वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगून राहायला पाहिजे.

● ● ●

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार

**प्रा. मोनाली सलामे**
गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लो. बा. अणे महिला महाविद्यालय यवतमाळ
ईमेलः- salamemonali@gmail.com

**प्रस्तावना -**

महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी व समाजसुधारक म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. १९०९ मध्ये वैशाख शुद्ध सप्तमीला तुकडोजी महाराज यांचा जन्म झाला. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर करून जनप्रबोधन केले. तुकडोजी महाराज हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करत असत. धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. स्वातंर्त्याच्या चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना कारावासही भोगावा लागला. अखिल भारतीय पातळीवर त्यांनी साधु संघटनेची स्थापना केली. सन १९३५ मध्ये मोझरी येथे गुरूकुंज आश्रमाची स्थापना केली. गुरूकुंज आश्रमाच्या उपशाखा स्थापन करून त्यांनी शिस्तबद्ध सामाजिक कार्यकर्त्यांची एक फळीच निर्माण केली. गुरूकुंजाशी संबंधित असलेले सर्व निष्ठावंत कार्यकर्ते वर्तमान काळातदेखील त्यांचे कार्य अखंडव्रतासारखे चालवीत आहेत. तुकडोजी महाराज त्यांच्या कार्यामुळे ते राष्ट्रसंत बनले. आश्विन कृष्ण पंचमी शके १८९० अर्थात दि. ११ ऑक्टोबर १९६८ रोजी गुरूकुंज मोजरी जिल्हा अमरावती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे महानिर्वाण झाले. आजही त्यांच्या विचारांच्या प्रसिद्धीचे काम अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाद्वारे मोठ्या प्रमाणात केल्या जाते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांची वर्तमान काळातील गरज

पाहता त्यांचे अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचार जाणून घेण्याच्या हेतूने सदर शोधनिबंध प्रकाशित केलेला आहे.

**बिजशब्द -**

अंधश्रद्धा, निर्मूलन, राष्ट्रसंत, ग्रामविकास, ग्रामोन्नती, आत्मसंयम

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा अल्प परिचय अभ्यासणे.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जीवन चरित्र जाणून घेणे.
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्थापन केलेल्या गुरूकुंज आश्रमाबद्दल माहिती घेणे.
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार समजून घेणे.
५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार व कार्य अभ्यासणे.
६. वर्तमान काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचारांचे महत्त्व अभ्यासणे

**संशोधनाचे गृहितके -**

१. तुकडोजी महाराजांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना राष्ट्रसंत हा बहुमान देण्यात आला.
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी संपूर्ण आयुष्यभर समाजसेवा आणि समाज प्रबोधनासाठी कार्य केले.
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या विचारांचा ठेवा ग्रामगीतेमध्ये संपादित करून ठेवलेला आहे.
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून होते.
५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा विषयी विचार हे दूरदृष्टीकोनवादी होते.

**संशोधनाचे महत्त्व -**

आज एकविसाव्या शतकात भारत प्रगतीच्या शिखरावर असतानादेखील देशाच्या विविध भागातील जनता अंधश्रद्धा व अज्ञानाने ग्रासलेली आहे. परंतु राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी विसाव्या शतकात अंधश्रद्धा निर्मूलन विषयक आपले विचार मांडून जनतेला अंधश्रद्धेपासून दूर ठेवून खरी श्रद्धा कोणावर ठेवावी हे स्पष्ट केलेले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी

महाराजांनी आपले विचार ग्रामगीतेच्या माध्यमातून अतिशय सोप्या शब्दात समाजापुढे मांडलेले आहे. निर्मात्यावर खरी श्रद्धा असावी यावर ते ठाम होते परंतु अंधश्रद्धा नसावी. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे हे परिवर्तनवादी, विज्ञानवादी विचार आजही समाजाला पूरक आहे ते विचार जाणून घेण्याच्या दृष्टीने सदर शोधनिबंध महत्वाचा आहे.

**विषय विवेचन -**

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. समाजातल्या सर्व घटकांतील लोकांचा उद्धार कसा होईल? याविषयी त्यांनी अहर्निश चिंता केली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूतस्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात? याविषयी उपाययोजनाही सुचविल्या आहे.

मराठी व हिंदी भाषांमध्ये तुकडोजी महाराजांनी काव्यरचना केली. स्वातंत्र्य लढ्यात आणि राष्ट्रकार्यात हिरीरिने सहभागी झाले. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे मुख्य वैशिष्ट्य होते. तुकडोजी महाराजांनी सुमारे ५० ग्रंथांची निर्मिती केली असून, त्यांचे अप्रकाशित वाड्मयही बरेच आहे. त्यांच्या संपूर्ण साहित्यामधून आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ज्यामध्ये मांडले ते म्हणजे ग्रामगीता. जी अतिशय महत्त्वाची आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अल्प परिचय -**

तुकडोजी महाराजांचा जन्म महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यात असलेल्या यावली शहीद या गावी ३० एप्रिल १९०९ रोजी झाला. त्यांचे खरे नाव माणिक बंडोजी इंगळे आईचे नाव मंजुळाबाई बंडोजी इंगळे हे होते. त्यांच्या घराण्याचे कुलदैवत पंढरपूरचा विठोबा असल्याने लहानपणापासूनच भजन, कीर्तन, भक्ती, नीती यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. त्यामुळे त्यांना ध्यान, भजन, पूजन या गोष्टींची आवड निर्माण झाली. तिसरीपर्यंत शिक्षण झाल्यावर त्यांनी शाळा सोडली. वरखेडला आजोळी असताना आडकूजी महाराजांना त्यांनी गुरू केले. ते अभंगात कीर्तनात खंजिरी वाद्याचा वापर करीत असत. त्यांचा आवाजही मधूर होता. पुढे कीर्तन, भजनासाठी ते

स्वतःच कविता रचू लागले. एके दिवशी गुरू महाराजांनी त्यांना 'तुकड्या' म्हणून हाक मारली. 'तुकड्या म्हणे', असे म्हणत जा, असे सांगितले. 'तुकड्या म्हणे' या वाक्याने संपणारे असंख्य अभंग त्यांनी लिहिले. यामुळे ते तुकडोजी महाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी 'ग्रामगीता', 'अनुभवसागर', 'समाज संजीवनी', 'लहरकी बरखा' अशा मराठी व हिंदी ग्रंथरचना केल्या आहेत. त्यांचे भजन कीर्तन ऐकण्यास सर्व जाती धर्मांचे लोक येत असत. त्यातूनच ते समाज प्रबोधनही करीत असत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागाच्या पुर्ननिर्माणावर पुन्हा एकदा लक्ष केंद्रित केले. त्यांनी 'अखिल भारतीय श्री गुरूदेव सेवा मंडळाची' स्थापना केली. एकीकृत ग्रामीण विकासासाठी अनेक कार्यक्रम विकसित केले. तुकडोजी महाराज विश्व हिंदु परिषदेचे संस्थापक उपाध्यक्ष होते. तुकडोजी महाराजांच्या मते, अनुभवाविण सांगणं व्यर्थ, होते म्हणूनच त्यांनी जे लिहिलं वा सांगितलं ते प्रथम अनुभवलं होतं. महाराजांच्या सर्व भजनात समाजजागृती, लोकशिक्षणाचं सूत्र आहे. तुकडोजी महाराजांची क्रियाशिलता आणि वैचारिकता एवढी प्रभावशाली होती की, त्यावेळेचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत' या उपाधीने सन्मानित केले.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे सामाजिक विचार -**

तुकडोजी महाराजांनी आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान आंदोलनातही सहभाग घेतला होता. भारत हा खेड्यांचा देश आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की, राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची श्रद्धा व विचारसरणी होती. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. खेडेगाव स्वयंपूर्ण कसे होईल, याविषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सुचविली होती, ती अतिशय परिणामकारक ठरली. देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. सर्वधर्मसमभाव हेही या राष्ट्रसंताच्या विचारविश्वाचे एक वैशिष्ट्य होते. तुकडोजी महाराज हे विवेकनिष्ठ जीवनदृष्टीतून एकेश्वरवादाचा पुरस्कार करीत असत. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले.

तुकडोजी महाराजांच्या कार्याचा काळ हा स्वातंत्र्य लढ्याचा होता. काळाची पावले ओळखून केवळ समाजाला प्रबोधन न करता आपले जीवन राष्ट्रकार्यात समर्पित केले. १९३० साली महाराजांनी व्यक्तिगत सत्याग्रह केला. 'भारत छोडो' आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदवला. ब्रिटिशांच्या अमानवीय मुस्कटदाबीचा त्यांनी जोरदार विरोध केला. त्यामुळे तुकडोजी महाराजांना अटक करून नागपूर व रायपूर येथील कारागृहात कैदी म्हणून ठेवण्यात आले होते. १९३६ साली महात्मा गांधीजींच्या सहवासात राजेंद्र बाबू, पं. जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद आदी राष्ट्रनेत्यांशी त्यांचा परिचय झाला. भारत सेवक समाजात त्यांनी गुलझारीलाल नदाजींबरोबर काम केले.

सन १९५५ मध्ये तुकडोजी महाराज विश्वधर्म व विश्वशांती परिषदेसाठी जपानला गेले. त्यांच्या भजनाने अनेक पाश्चात्य व पौर्वात्य विद्वान अत्यंत मोहीत झाले. सर्व धर्म, पंथ, जाती यांच्या पलीकडे असलेल्या ईश्वराचे स्वरूप ते आपल्या भजनांतून प्रकट करत असत. स्वातंर्त्यानंतरही राष्ट्रहितासाठी त्यांनी अनेक स्तरावर कार्य केले. बंगाल येथील दुष्काळ, चीन युद्ध, पाकिस्तान युद्ध, कोयना भूकंपामुळे उडालेला हाहाःकार या घटनांमध्ये प्रभावित ठिकाणी रचनात्मक मदत कार्याकरिता या सगळ्या मोहिमांवर महाराज स्वतः जात होते.

**अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार व कार्य -**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता नावाची समाज प्रबोधनपर साहित्य निर्मिती आठ भागात एकेचाळीस अध्यायामध्ये केलेली आहे. या ग्रामगीतातेमध्ये त्यांनी आदर्श मानवी जीवन जगण्याचे सरळ सोपे मार्ग दाखवत कर्मकांडावर कठोर टीका केलेली आहे. ग्रामगीतेच्या सातव्या भागात एकतिसावा अध्याय त्यांनी संत चमत्कार म्हणून लिहून ठेवलेला आहे. या अध्यायामधून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन केलेले आहे. आणि खरे संत हे समाजहिताचा विचार करतात हे स्पष्ट केले. चमत्कार करणाऱ्याला जादूगार म्हणावे हे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामगीतेच्या सातव्या भागात एकतिसावा अध्यायामधील ह्या ओळी वाचल्यानंतर तुकडोजी महाराजांच्या अंधश्रद्धाविषयक विचारण्याची कल्पना येते त्या पुढील प्रमाणे आहेत.

'कोणी गुरूची सेवा करी । जीवन वाही चमत्कारावरि ।

अडक्याचे साधन साधूनि झुगारी । आयुष्यरत्न।।५९।।
पैसा देवोनि नावेतूनि जावे। तेथे तपाने पाण्यावरि चालावे ।
शेवटी अहंकारे भ्रष्ट व्हावे । यात थोरवी कशाची? ।।६०।।
परि हे जनांसि कळेना । संतांपासूनि इच्छा नाना ।
करिती, देवोनि दान-दक्षिणा । लोभासाठी ।।६१।।
लोकांचिया या ओळखोनि भावा। अनेक दांभिक येती गावा ।
लुटती जनासि ढोंगी बुवा । मागे लावोनिया।।६२।।
ही बुवाबाजी भुलवी जना । भ्रष्ट करी ग्रामजीवना ।
फसवोनि भोळ्या- बापड्यांना । भलत्या छंदा लाविती।।६३।।
मग पाहती मागे फिरोन । काही देती शेती-धन ।
हे तव आहे वेडेपण । आपुल्या स्वार्थांधतेचे।।६४।।
काही वर्गणी करोनि गोळा । गावी करिती भक्ति- सोहळा ।
भिकारी करोनि स्त्रिया- बाळा । ठेविती कोणी ।।६५।।
प्रयत्नांचा मार्ग सोडिती । अल्पायासे लाभ इच्छिती ।
चमत्कारांच्या थापेत जाती । गारूडियांच्या ।।६६।।
लोक चमत्कारावरि भुलती। मागाहुनि पश्चाताप करिती ।
काही भुरळ पाडली म्हणती । आम्हावरि।।६७।।
वास्तविक संत नव्हे जादुगार । करावया चमत्कार।
हा तो चालत आहे व्यवहार । पोटभऱ्यांचा ।।८।।
चमत्कार तेथे नमस्कार । तेणे जादुगिरीस चढे पूर ।
खऱ्या संतास ओळखीना नर । चमत्काराअभावी ।।६९।।'

वरील ओळी वाचल्यानंतर तुकडोजी महाराजांचा विज्ञानिष्ठ स्वभाव समजून येते.

'सबके लिये खुला है मंदिर ये हमारा' असं म्हणत तुकडोजी महाराजांनी मानवतेची वैश्विक पूजा केली. संत तुकारामांनी ढोंगी, भोंदू लोकांवर सडकून टीका केली आणि 'मोजुनी माराव्या पैजारा' असंही सांगितलं. कारण काळानुसार समाजाचं मानसशास्त्र बदलत जाते हे त्यांना माहीत होत. म्हणून तुकडोजी महाराजांनी विसाव्या शतकात जीवन जगणाऱ्या मानवाची नाडी जाणून घेत. प्रगत समाजातील प्रश्न पाहून विज्ञानाची घोडदौडही जाणून घेतली. संत परंपरेचा मूळ धागा न सोडता त्यांनी 'अध्यात्म और

विज्ञान से सब हो सुखी, सहयोग क्षमतासे यह सृष्टी बने स्वर्गही',
अशी गुरूदेवाला प्रार्थना केली.

या जगात सत्धर्म -सूर्याचा प्रकाश सर्वत्र पसरवून शांतता नांदावी, अशी त्यांची इच्छा होती. महाराजांचा गुरूदेव म्हणजे एखादी मूर्ती नव्हती, तर एक महान शक्ती होती. त्याचीच त्यांनी आयुष्यभर उपासना केली. ज्या शक्तीनं सारं ब्रह्मांड व्यापून टाकलं आहे. ती शक्ती प्रत्येकाजवळ ओतप्रोत भरलेली आहे, असं आपल्या ग्रामगीतेत ते म्हणतात,

'आपणांचे झाला धराधव
उरला भरूनी महीवर
अणुरेणुतुनी करीशी संचार
विश्वनाटक नटावया
गुरू हाडामांसाचा नोहे
गुरू नोहे जाती संप्रदाय
गुरू शुद्ध ज्ञानतत्त्वची आहे अनुभवीयांचे।।'

तुकडोजी महाराज ज्ञानतत्त्वाचे पुजारी होते. गीतेत ज्ञान आणि विज्ञान हे दोन शब्द पुन्हा-पुन्हा आलेले आहेत. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, 'मी कोण आहे' याची अनुभूती आणि विज्ञान म्हणजे साऱ्या सृष्टीचं ज्ञान, कालचक्राचं ज्ञान. काही लोक म्हणतात, विज्ञान जिथे संपतं तिथे ज्ञान सुरू होतं. परंतु संतांना हे अभिप्रेत नाही. ज्ञान आणि विज्ञान हे वेगळे नाही. तर त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एवढेच नव्हे, तर ज्ञानाशिवाय विज्ञान आणि विज्ञानाशिवाय ज्ञान परिपूर्ण असूच शकत नाही. तप करीत असताना तुकडोजी महाराजांना ज्ञानाच्या अफाट, अमर्याद शक्तीची जाणीव झाली. म्हणूनच
'म्हणुनिया मागे फिरलो, द्वारी झोपडीत शिरलो'
असं त्यांनी म्हटलं आहे. तर, मग 'माघारली पूजा मंदिरं, दिसू लागली जिवंत शरीरं', असंही सांगितलं. आपलं ध्येय स्पष्ट करताना ते म्हणतात,
'अंतिम ध्येय अखंड शांती, मित्रत्व वाढो त्रभुवनी तुकड्या म्हणे ध्येय हेचि'.

या ध्येयासाठी त्यांनी विज्ञानाची कास धरायला लावली. आजवरच्या संतांच्या भूमिकेत भावनेला, श्रद्धेला महत्त्व होते. तुकडोजी महाराजांनी भावना आणि बुद्धी यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. विवेकाला जागृत ठेवून कार्य करण्याची प्रेरणा दिली. विज्ञानाच्या कसोटीवर प्रत्येक गोष्ट

घासून पाहावी आणि आत्मज्ञानाची जोड देऊन जीवनात उतरवावी, यासाठी त्यांनी प्रबोधन केले. तुकडोजी महाराजांनी गोरक्षणाचा विषय हाताळून समाजप्रबोधन केलं. गोहत्येमुळे देशाची आर्थिक हानी कशी होणार, हे त्यांनी पटवून सांगितलं. सर्व रोगराईचं मूळ हे अस्वच्छतेत आहे, असं सांगताना त्यांनी जगरहाटी सुरू होण्याआधीच पहाटे उठून ग्रामसफाई केलीच पाहिजे, असा आग्रह धरला. अंधश्रद्धेवर तुकडोजी महाराजांनी घणाघाती प्रहार करून समाजात जागृती केली.

**अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचारांचे वर्तमानकालीन महत्त्व -**

श्रद्धा आणि अंधश्रद्धा या दोहोंमधील सीमारेषा तशी पुसटशी आहे पण देव मानणारे तसे सर्वच सश्रद्ध. त्याचाच लाभ उठविणारी साखळी आपल्याकडे तयार झाली आहे. त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणत श्रद्धेचा व्यापार करणाऱ्यांपासून रीतसर अंधश्रद्धा पसरवून त्याद्वारे सर्वसामान्यांचे शोषण करणाऱ्यांपर्यंत सर्वच जण या साखळीचा एक भाग होत आहे. ही साखळी खंडित करण्याचा प्रयत्न अनेकदा झाला आणि आजही होतो आहे. समाजातील अज्ञान दूर करतानाच भक्तीपरंपरेतील अनेक संतांनी या साखळीवर प्रहार केला आणि खऱ्या भक्तीकडे जाण्याचा मार्गही सांगितला. यामध्ये विसाव्या शतकात होऊन गेलेले अगदीच अलीकडचे संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज. यांनी समाजाला खऱ्या श्रद्धेचे शिकवण देत अंधश्रद्धा दूर करण्याचे मार्ग सांगितले. त्यांच्या मते, देव हा मंदिरात नाही तर आपल्या सर्वांमध्ये वसतो. परंतु त्यांच्या विचारांना विसरून लोक अंधश्रद्धेचे बळी ठरू लागले. नरबळी आणि पशुबळी देवू लागले त्यामुळे समाज हितासाठी काही विज्ञाननिष्ठ समाजकर्ते आले आणि अंधश्रद्धा निर्मूलन विषयक कार्य हाती घेतले.

समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन विघातक वृत्तीकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी महाराष्ट्राने २०१३ साली कठोर कायदा केला आहे. याचे संक्षिप्त नाव महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायदा, २०१३ असे आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर, शाम मानव अशा सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शासनाला हा कायदा करावा लागला. ज्याद्वारे समाजातील अंधश्रद्धा दूर करता येईल.

**निष्कर्ष -**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजाला सांगतात की, अध्यात्म म्हणजे डोळस श्रद्धाच आहे. नैतिक मूल्यांचं जतन व त्यानुसार कृती अध्यात्मामुळेच शक्य होते. त्यामुळे भरकटणारी माणसं योग्य मार्गावरून चालतात. म्हणून आध्यात्मिक श्रद्धांचा माणसांवर लगाम हवाच. सद्वर्तनामुळेच माणसा-माणसांतील राक्षसीवृत्ती कमी होत जाते. सर्वसामान्य माणसांसाठी सगुणभक्तीचा मार्ग योग्यच आहे. मात्र, त्याला कर्मकांडांचा आणि अंधश्रद्धांचा विळखा मात्र असू नये. विज्ञानाच्या प्रगतीमुळे व अनेक शोधांमुळे खरे तर या अंधश्रद्धांना आळा बसायला पाहिजे; पण अनेकांना श्रद्धा व अंधश्रद्धा यातील सीमारेषाच कळत नाहीत. खुळचट आणि बुद्धीला न पटणाऱ्या समजुती म्हणजे धर्म नाही. मात्र, पाखंडी, दांभिक लोक धर्माच्या नावावर जनतेची दिशाभूल करतात.

तुकडोजी महाराजांच्या मते, अध्यात्माचा अगदी साधा आणि सोपा आशय आहे. अध्यात्माचा एकमात्र निकष म्हणजे ज्यामुळे प्रेम, परोपकार करूणा, बंधुता, सहनशीलता अशा मूल्यांची जोपासना होते ते खरे अध्यात्म होय. वैज्ञानिक दृष्टिकोन हा ज्ञानाचा पाया असावा या विचाराने ते समाज प्रबोधन करून अंधश्रद्धेला पायमल्ली करण्याचा पर्यंत करीत होते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१. तुकडोजी महाराज, सावरकर, स्व. सुदामजी (संपा.) - ग्रामगीता, प्रकाशक, श्री गुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान, गुरुकुंज आश्रम, जि. अमरावती. ३१ ऑक्टोंबर २००७.

२. कडवे, प्रा. रघुनाथ - मानवतेचे महापुजारी राष्ट्रसंत तुकडोजी (जीवन व कार्य), अमोल प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, ११ ऑक्टोबर २०१२.

३. गिरिधारी, डॉ. भास्कर - राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे जनजागरण कार्य, विभा प्रकाशन, पुणे, ८ एप्रिल २०१६.

४. साबळे, सुरेश - परिवर्तनवादी चळवळी : चिंतन आणि प्रबोधन, प्रकाशन, अन्फोएज्युकेट पुणे, जून २०२२.

लेख -

१. निरंकारी, श्रीकृष्णदास (बापू) - अंधश्रद्धा व जातिभेद निर्मूलनास प्रभावी कीर्तन !, पुरोगामी एकता, ११ ऑक्टोबर २०२२.

२. फडके, देवेश - ग्रामविकास व राष्ट्रनिर्माणासाठी झटणारे तुकडोजी, महाराष्ट्र टाइम्स, ३० एप्रिल २०२३.
३. मुंढे, राजेंद्र - ज्ञानतपस्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, आत्मभान त्रैमासिक, एप्रिल, मे, जून २०२२.
४. लांजेवार, नरेंद्र - या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, अंधश्रद्धा निर्मूलन मासिक, ऑक्टोंबर २०२२.
५. सोनाने, प्रा. राजकुमार - भक्ती आणि अंधश्रद्धा, महाराष्ट्र टाइम्स, २ नोव्हेंबर २०१०.

● ● ●

# अंधश्रध्दा आणि समाजसुधारक

**डॉ. दामोदर दुधे**
सहयोगी प्राध्यापक,
श्रीमती सविताबाई उ. देशमुख महाविद्यालय, दिग्रस
Email Id :- damodardudhe20d@gmail.com

**प्रास्ताविक :-**

अंधश्रध्दा म्हणजे काय? तर आंधळेपणाने एखादी गोष्ट स्विकारणे होय अंधश्रदेचे विविध प्रकार आहेत. त्यामध्ये काही जादूतंत्र, मंत्र, जादूटोणा, नरबळी, नजररोड, तसेच भूतप्रेत या संबंधीत अंधविश्वास, अफवा पसरविणे व कृती करणे तसेच या कृतीचाही इतर प्राणी जीवनावर परिणाम होतो. समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन विघातक वृत्तीकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी महाराष्ट्र राज्याने २०१३ साली कठोर कायदा केला आहे. याचे संक्षिप्त नाव महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष , अनिष्ट व अघोरी प्रथा व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध कायदा, २०१३ असे आहे. अंधश्रध्दा निर्मूलन करण्यासाठी महाराष्ट्रात 'अंधश्रध्दा निर्मुलन वार्तापत्र' या मासिकाची स्थापना करण्यात आली आहे. अंधश्रध्दा निर्मुलन मुखपत्र असलेले हे मासिक ग्रामीण तसेच शहरी भागात मोठ्या प्रमाणात वाचले जाते.

अंधश्रध्देमुळे विविध समाजात विशेषतः महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अत्याचार महिलांवर तसेच बालकांवर पुर्वापर पासुन चालत आलेले आहे. त्याचे दुष्परिणाम विविध घटकांवर झालेले आहे. ही अंधश्रध्दा महाराष्ट्रामधून नष्ट व्हावी, लोकांच्या मनात असलेले अंधश्रध्देविषयीचे असलेले गैरसमज दूर व्हावेत, या करिता महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे मोठे योगदान आहे.

**गाडगे महाराज आणि अंधश्रध्दा निर्मुलन :-**

गाडगे महाराज आपल्या वेगवेगळ्या प्रकारच्या कीर्तनामधून वेगवेगळ्या

प्रकारचे उदाहरण देवून अंधश्रध्देविषयी जनजागृती करीत असतं. अंधश्रध्देविषयी लोकांच्या मनात आलेले गैरसमज दूर करण्याचा ते सतत प्रयत्न करीत असत.

गाडगेबाबांचे कीर्तन एकदा बांद्र्याच्या पोलीस ठाण्याजवळ झालं होतं. हे त्यांचचं शेवटचंच कीर्तन होते. दिवस होता शनिवारचा आणि तारीख होती ८ नोव्हेंबर १९५६! कीर्तनाला तुफान गर्दी लोटली होती. पोलीस मंडळींनी सत्यनारायणाची पुजा केली होती. तिर्थप्रसाद आणि गाडगेबाबांच कीर्तन असा कार्यक्रम होता. विजेच्या रोषणाईचा लखलखाट केलेला होता. रंगीबेरंगी झिरमाळ्या, पताका लावलेल्या होत्या. एकूण उत्साहाची धमाल उडालेली होती! गाडगेबाबांनी पाहिलं ,चोहीकडे दृष्टी टाकली आणि कीर्तनातच बोलता बोलता विचारलं, "आज काय आहे इथ?"

श्रोत्यांनी उत्तर दिलं, "महापुजा!"

बाबांनी पुन्हा विचारलं, "पोलीस लायनीत पूजा?" सत्यनारायण आहे का रे?

लोकांनी सांगितलं, "होय"

बाबा म्हणाले, 'सत्यनारायण कोण करते माहित आहे का?" लोभी लोक. मुलं नाही - सत्यनारायण पाव ! गाडी नाही - सत्यनारायण करू. पैसा हातात मिळत नाही - सत्यनारायण करू. ती वरली जागा मला कधी मिळंल? -सत्यनारायण करीन ! ..... लोभी लोक ! देवाची भक्ती नाही - सत्यनारायण करतात!"

'गोपाला गोपाला, देवकी नंदन गोपाला' - भजनाचा दणका "सत्यनारायणाच्या पोथीमध्ये असं आहे की, साधुवाण्यानं परसाद नाही घेतला, आन सत्यनारायण नाही केला, त्यांची करोडो रूपयाची नौका पाण्यात बुडाली!"

"मग, अडीच रूपयाचा सत्यनारायण केला अन् परसाद वाटला, परसाद घेतला अन् करोडो रूपयाची नौका बुडाली ती वर आली!"

"आं.ऽऽऽआं? वर आली"... नाही नाही, हे खर नाही! ज्या साली लढाई झाली, त्या साली लढाईच्या साली समदद्रात एकेक आगबोट पन्नास

पन्नास लाख रूपयाची पार तळाला गेली. पत्ता नाही. अशा किती आगबोटी बुडाल्या, गणती नाही ...”

सत्यनारायण करणाऱ्या महाराज म्हणावं, अडीच रूपये घेऊन एवढी बडबड कशाला करता? अडीच लाख रूपये घ्या, अडीच कोट रूपये घ्या समुद्राच्या किनाऱ्यावर एक सत्यनारायण करा अन् एक आगबोट आणा बरं! जमेल का?'

लोकांनी उत्तर दिलं, “नाही”

असंच एकदा मुंबईत अपोलो बंदराजवळच्या भागात गाडगेबाबांच कीर्तन होतं. कीर्तन करताना बाबांना मार्ग अपोलो बंदरात 'रामदास' नावाची बोट बुडाली होती, या घटनेचं स्मरण झालं. त्यांनी पुढे बसलेल्या श्रोत्यांना विचारलं, “या इकडं समुद्रात बोट बुडाली म्हणतात?”

“हो”

“मग अजून काढली का नाही?”

“सरकारी साधन वगैरे येतील, मग काढतील”

“काय आहे सरकार! बोट काढयाले यंत्र कहाले पायजे?”

“मग?”

“सोपी तर गोष्ट आहे. भटजीले बलवा अन् सत्यनारायणाची पोथी वाचा, की आपसुक बोट वरती येते. अरे, ते त्या पोथीत नाही काय? कोण ती लीलावती की कलावती... तर ती बोट बुडाली अन् सत्यनारायणाची पोथी वाचल्याबरोबर वर आली. तर मग रामदास बोटदेखील वर येईलना! सगळ्या मराठी मुलखातले भटजी बलवा. केळीचे खांब लावा. पाट चौरंग मांडा, पोथ्या आणा... पुरणार नसतील तर आणखी छापा, मी देतो पैसे, लागतील तेवढे, आता मला सांगा ती पोथी वाचल्यावर बोट वरती येईल काय?”

“नाही”

“मग काहून बापहो, ती पोथी वाचता?”

लोकांच्या अध्यश्रध्देवर, खुळ्या समजुतीवर, भोळ्या विश्वासावर, अज्ञानावर गाडगेबाबा अशी खरमरीत टीका करीत असतं. कुणाच्या भावना

दुखावतील का कुणाला वेदना होतील, याची पर्वा ते करीत नसतं. खराखुरा तळमळीचा समाजसुधारक हा निर्भय असतो. लोकनिंदेला किंवा लोकांच्या रोशाला तो मानत नसतो. त्याची भाषा परखड आणि सडेतोड असते, ती बुळबुळीत किंवा गोलमोल नसते, तुकोबांनी सुध्दा ढोंगांची लक्तरं टरकवताना अशीच परखड भाषा वापरलेली आहे. ढोंगी आणि भुरट्या संतांविषयी तर त्यांना म्हटलं आहे. "तुका म्हणे ऐसे संत, जिते घालावे मातीत।।" तसेच त्यांना अधम पापाबद्दल म्हटलं आहे, "तुका म्हणे ऐशा नरा, मोजुनी माराव्या पैजारा।।" गाडगेबाबा तुकाराम बोवांच्या गोत्रातलेच होते!

**महाराजा सयाजीराव आणि अंधश्रध्दा निर्मुलन :-**

महाराजा सयाजीराव या समाजसुधारकांनी सुध्दा अंधश्रध्दा निर्मुलनाविषयी मोठे योगदान आहे. १८८१ मध्ये राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतर महाराजा सयाजीराव यांच्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या कार्यक्रमास खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. सयाजीरावांनी धार्मिक सुधारणांची सुरूवात राजवाड्यातील देवघरापासून केली. राजघराण्यातील धर्मभोळया व्यक्तींचा फायदा घेत काही बाबी साध्य करण्यासाठी ब्राह्मणाकडून राजघराण्यातील व्यक्तिंना विविध प्रकारची अनुष्ठाने करण्याचा आग्रह धरण्यात येई. बऱ्याचदा या धार्मिक विधीचे स्वरूप हास्यास्पद असे. मि. पेस्तनजी यांच्या हुकूमाने विनायकराव बहुलकर यावरून बडोदा राजघरण्यातील अनुष्ठानांचे माजलेले स्तोम आपल्या लक्षात येईल. याचप्रमाणे विविध ग्रहांच्या स्थितींचा राजघराण्यातील व्यक्तींच्या आयुष्यावर पडणारा वाईट परिणाम दूर करण्यासाठी केल्या जाणाऱ्या ग्रहांच्या शांतीचा विधीदेखील मोठ्या प्रमाणावर केला जात असे.

राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याची पध्दत हा तर या तथाकथीत कर्मकांडाचा कळस मानता येईल. राजघराण्यातील व्यक्तींचा इतर सर्वसामान्य जनतेशी संपर्क आल्यानंतर अथवा एखाद्या विशेष प्रसंगानुसार दृष्ट लागून त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी दृष्ट काढली जात असे. परंतु अशी दृष्ट कोणत्या प्रसंगी, किती वेळा, कोणत्या व्यक्तीने काढावी या संदर्भात कोणतेही नियम अथवा निकष निश्चित केलेले नव्हते.

त्यामुळे बडोद्यातील ब्राह्मण व्यक्तीकडून यांचा गैरफायदा घेतला जाई. दक्षिणेच्या हव्यासापायी राजघराण्यातील व्यक्तींची विनाकारण दृष्ट काढण्याचे प्रसंग वारंवार घडवून आणले जात. मुंग्यास साखर घालणे हा देखील अशाच प्रकारचा एक विधी होता.

सुरूवातीच्या काळात राजघराण्यातील व्यक्तींना या विधींना असणारा पाठींबा आणि प्रशासकीय अनागोंदी यामुळे सयाजीरावांना हे सर्व प्रकार निमूटपणे पाहावे लागत होते. या विधीसाठी होणारा खर्च आगाऊ मंजूर करून न घेता ऐनवेळी महाराजांसमोर जाऊन खर्चास मान्यता मिळवण्याची सवय प्रशासनाच्या अंगवळणी पडली होती. विधी कार्य अडून राहिलेले असल्यामुळे महाराजांना कोणतीही  चौकशी न करता या खर्चाला मान्यता देणे भाग पडे. या परिस्थितीचा फायदा स्वार्थी पुजाऱ्याकडून घेतला जात होता. प्रत्यक्ष विधिवेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांचा अर्थ सयाजीरावांनी एखाद्या पुजाऱ्याला विचारल्यास त्याला तो सांगता येत नसे. अशा वेळी देवघरातील पुरोहीत वर्ग आणि राजघराण्यातील स्त्रियांकडून महाराजांचे विचार इंग्रजी शिक्षणामुळे बिघडले असून ते अधर्मी झाले आहेत व त्यांच्या अशा प्रश्नामुळे ग्रहांचा , ब्रह्मवृंदाचा व देवतांचा कोप होऊन राजघराण्यावर संकट कोसळेल असा गवगवा करण्यात येई. परंतु एकदम अधिकाराच्या जोरावर कोणताही बदल न करता हळूहळू लोकांचे मत परिवर्तन करण्यावर भर देणाऱ्या सयाजीरावांनी याबाबत सुध्दा तेच धोरण अवलंबले. सयाजीरावांनी राजवाड्यात होणाऱ्या अनावश्यक धर्मविधींचे प्रमाण शक्यतो कोणाच्याही धार्मिक भावना न दुखावता कमी करण्याकडे लक्ष पुरवले. राजघराण्यातील व्यक्तींची दृष्ट काढण्याचा विधी बंद करण्यासंदर्भात आदेश २९ मे १९०१ रोजी  म्हणजेच आजपासून १२० वर्षापूर्वी दिला होता. या  हु.हु.नं. १८७ मध्ये "दृष्टी काढण्याचा रिवाज बंद करावा, परंतु देवभोळया समजुतीमुळे ही खास प्रसंगी कोणास दृष्ट काढल्याने सुख वाटत असल्यास तसी त्यांच्या समजुतीस्तव काढण्यास हरकत नाही, मात्र होतकरू मुलांना देवभोळया समजुतीचा कित्ता होतां होईतोपर्यंत देऊ नये" असे नमूद करण्यात आले होते. धर्मविधी बंद करत असताना समाजाची मानसिकता लक्षात घेण्याची सयाजीरावांची

सर्वसमावेशकता या हुकूमातून अधोरेखित होते. लहान मुलांच्या मनावर धर्मविधीचा पगडा बसू नये" असे नमूद करण्यात आले होते. धर्मविधी बंद करत असताना समाजाची मानसिकता लक्षात घेण्याची सयाजीरावांची सर्वसमावेशकता या हुकूमातून अधोरेखित होते. लहान मुलांच्या मनावर धर्मविधीचा पगडा बसू नये यासाठी काळजी घेण्याची केलेली ताकीद सामान्य जनतेचा धार्मिक दृष्टीकोन निकोप होण्यासाठीची सयाजीरावांची धडपड दर्शवते. त्याचबरोबर एवढ्या छोट्या गोष्टीबद्दल आदेश काढण्याची कृती सयाजीरावांच्या जागरूक दृष्टीचे प्रतीक आहे. सयाजीरावांना शिक्षणकाळातच त्यांच्या शिक्षकांकडून याबाबतच्या सूचना मिळाल्या होत्या. राज्याभिषेकाआधी सयाजीरावांना सर टी. माधवराव यांनी इतर शिक्षकांच्या सहाय्याने विविध विषयासंदर्भातील व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. २० जुलै १८८१ रोजी शिक्षण विषयावर देण्यात आलेल्या व्याख्यानात सयाजीरावांना पुढील सूचना करण्यात आली होती. 'धर्मविषयक शिक्षण हे केवळ मानसिक पातळीवरील असावे. विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना कोणत्याही प्रकारच्या विशेष धार्मिक सुचना दिल्या जाऊ नयेत.' दृष्ट काढण्यासंदर्भातील सयाजीरावांना आदेश हा या सुचनेचे प्रात्याक्षिकच आहे. ग्रहणाच्या दिवशी सरकारी कचेरीत घेण्यात येणारी सुट्टी हा देखील सरकारी पातळीवर पाळण्यात येणाऱ्या अंधश्रध्देचा उत्तम नमूना होता. प्रशासकीय व आर्थिक लाभ मिळविण्यासाठी ग्रहणाच्या दिवशी सरकारी कचेरी बंद ठेऊन धार्मिक विधी करण्याकडे कर्मचाऱ्यांचा कल असे. सयाजीरावांनी हुकूम काढून ग्रहणाची ही सुट्टी बंद केली. परंतु हा आदेश काढत असतांनाच त्यांनी पाळलेली धार्मिक सहिष्णूता गोत्रीलिखित सयाजी चारित्रामध्ये अधोरेखित आली आहे. गोत्री म्हणतात, "पृथ्वीची छाया चंद्रावर पडते त्यास 'ग्रहण' म्हणतात." हे सर्व सुशिक्षित लोकांना ठाऊक आहेत, परंतु भोळे व भाविक लोक या दिवशी राहू किंवा केतू हे पापग्रह चंद्रास किंवा सूर्यास पीडा करतात, अशा समजूतीने तो दिवस धार्मिक कृत्यात किंवा बहुतेक निरूद्योगत घालवितात. ही त्यांची अज्ञान समजूत दूर व्हावी व त्यांना उद्योगाचे महत्त्व कळावे म्हणून बडोदे राज्यातील सरकारी कचेऱ्यात ग्रहणाच्या दिवशी रजा पाळीत असत. ती बंद करण्यात आली

आहे व फक्त धार्मिक कारणानेच कोणास रजा पाहिजे असेल, तर त्याने रिपोर्ट करून रजा द्यावी असे ठरविले आहे. यात लोकांच्या धार्मिक समजुतीसही महत्त्व दिल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर सयाजीरावांना त्यांच्या शिक्षकांकडून मिळालेले त्या संदर्भातील मार्गदर्शन अभ्यासल्यास त्यांची भूमिका समजून घेणे सोपे जाते.

पहिल्या परदेश दौऱ्यानंतर प्रायश्चित घेतल्यानंतरही काही व्यक्तींना त्यांच्या जातीबांधवांकडून स्वीकारण्यात आले नाही, परंतु पुढील काही दौऱ्यामध्ये सोबत येणाऱ्या व्यक्तींना प्रायश्चित्तासाठी सरकारकडून देण्यात येणारी मदत सयाजीरावांनी कालौघात कमी केली. १८९१-९२ च्या दरम्यान सरदेसाईना तारेद्वारे युरोपात बोलवत असतांना 'प्रायश्चित्ताच्या खर्चा सरकारातून मिळणार नाही' या सयाजीरावांनी दिलेला इशारा याचा पुरावा आहे. नंतरच्या काळात सयाजीरावांनी प्रायश्चित घेण्यात कायद्याने बंदी घातली. महाराजांनी भिकाचार्य ऐनापूरे यांच्याकडून १९०३ च्या हुकूमाद्वारे 'प्रायश्चित्तमुख' हा संस्कृत ग्रंथ व त्याचे मराठी भाषांतर या स्वरूपात तयार करून प्रकाशित केला होता. १८८८ च्या प्रायश्चितानंतर प्रायश्चिताबाबत धर्मशास्त्र काय म्हणते हे लोकांना कळावे आणि त्यातून लोकांची धर्माबाबत साक्षरता वाढावी म्हणून प्रकाशित केलेला हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या धर्मसाक्षरता अभियानाचा उत्तम नमूना आहे. सयाजीरावांनी धर्म साक्षरतेचे प्रयोग हे सर्व स्तरावर केले होते. त्यासाठी सक्षम व्यक्तीची नेमणूक, हुकूम, समजूत घालणे, लोकमत तयार होण्यासाठी वेळ देणे रचनात्मक अभियान महाराजांनी राबविले. या अभियानच्या सर्वोच्च बिंदू म्हणजे धर्मविषयक ग्रंथाचे प्रकाशन, महाराजांनी प्रकाशित केलेल्या मराठी, गुजराती, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांच्या यादीवर नुसती नजर टाकली तरी धर्म साक्षरतेचे सयाजीरावांचे अभियान हे किती मुलभूत होते हे लक्षात येईल.

सयाजीरावांनी १९१५ मध्ये केलेल्या हिंदू पुरोहित कायद्यानुसार हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञनिक विषयातील किंवा श्रावणमास दक्षिणा परीक्षा यापैकी कोणत्याही परीक्षेत पास झाल्यास किंवा संस्थांनाकडून विशेष बाब म्हणून मान्यता दिलेल्या व्यक्तीस संस्थानाकडून परवाना मिळाल्यावरच

पौरोहित्याचा अधिकार प्राप्त होत होता. १४ सप्टेंबर १९३४ ला हा कायदा संपूर्ण बडोदा संस्थानात लागू करण्यात आला. या निकषात न बसणारा पुरोहित धार्मिक विधी करत असल्यास त्याला २५ रू. पर्यंत दंडाची तरतूद होती. पण पुरोहित उपलब्ध नसल्यास सवलत दिली जात होती. ही परीक्षा पास होणाऱ्या सर्व हिंदूना मग त्यांची जात कोणतीही असो त्याला ही परीक्षा पास झाल्यावर पौरोहित्य करता येत होते. ही बाब २,००० वर्षाच्या हिंदू धर्म संस्कृतीच्या इतिहासातील एक मोठी क्रांती होती.

खाजगी खात्याकडून करण्यात आलेल्या खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम खानगी खात्यांतर्गत येणाऱ्या हिशेबी कचेरीकडून केले जात असे. परंतु ज्याने खर्च करायचा त्यानेच त्या खर्चाची तपासणी करावी ही परिस्थिती कामकाजातील पारदर्शकतेबाबत शंका उपस्थित करणारी बाब होती. त्यामुळे सयाजीरावांनी १ मार्च १८९२ रोजीच्या हुकूमाने हिशेबी कचेरी खानगी खात्याकडून काढून अकाउंट जनरलकडे वर्ग केले. गोविंदराव नारायण दळवी यांनी बराच काळ या कचेरीत काम केले. अशी समज असे की, संस्थानच्या राजाचा खाजगी कारभार म्हणजे अस्ताव्यस्त, मनमानी आणि अंधाधूंद कारभार होय. परंतु सयाजीरावांनी अत्यंत प्रयत्नपूर्वक स्वतःच्या संस्थानात या दृष्टीने अनेक बदल धडवत राज्याचे उत्पन्न म्हणजे राजाची खाजगी मालमत्ता नसून त्यावर प्रजेचा सर्वाधिकार आहे, हे छत्रपती शिवाजी महाराजांनी राबवलेले धोरण आपल्या कारभाराचे मुख्य सूत्र बनवले.

हिंदू धर्मासोबतच इतर धर्मियासाठीही तत्कालीन शिफारशीनुसार अनेक महत्त्वपूर्ण कायदे महाराजांनी केले. यातीलच एक कायदा म्हणजे जैनधर्मातील संन्सास दीक्षा कायदा होय. अल्पवयीन मुलामुलींना जबरदस्तीने किंवा फसवून संन्यास दिक्षा देण्यात येते व त्यामुळे त्यांना पुढील आयुष्यात व्यावहारीक दृष्ट्या मृतवत केले जाते. म्हणून जैन धर्मियांच्या तक्रारीवरून बडोदा सरकारने एका विशेष कमिटीची नेमणूक करून तिच्यामार्फत जैन धर्मशास्त्रात संन्यास प्रथेस समर्पक आधार नसल्याची खात्री करून घेतली आणि १९३३ चा हा कायदा लागू केला. या कायद्यानुसार अज्ञान बालकांना दिलेली संन्सास दीक्षा निरर्थक ठरवून ती दिल्याने मिळकतीवरच्या त्यांच्या

हक्काला कोणताही धक्का बसणार नाही असे ठरविण्यात आले. अल्पवयीन मुलामुलींना संन्यास दीक्षा देणे हा फौजदारी गुन्हा समजाला जाऊन तो गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस १ वर्षापर्यंत कारावास व ५०० रू. पर्यंत दंड अशा शिक्षेची तरतूद केली.

बडोदा संस्थानातील मुस्लिम धर्मियांची लोकसंख्या १९०१ मध्ये ९ टक्के होती. हिंदू व इतर अनेक धर्मीय समुदायांच्या उन्नतीसाठी महाराजांनी कायद्याने उपाययोजना करत असताना आपल्या मुस्लिम प्रजेकडेही दुर्लक्ष केले नाही. मुस्लिम धर्मीयामध्ये दानधर्मासाठी दिलेल्या देणगीला 'वक्फ' असे म्हणतात. अशा देणगीची व्यवस्था करण्यासाठी नेमलेल्या व्यवस्थापकाला 'मुतवल्ली (विश्‍वस्त) असे म्हणतात. या मुतवल्लींनी अशा धर्मादाय मिळकतीची व्यवस्था मूळ उद्देशाला धरून केली पाहिजे व जमा खर्चाचे हिशेब बरोबर ठेवले पाहिजेत अशी त्यांच्यावर जबाबदारी होती. परंतु बहूदा ही मुतवल्ली म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती ही धर्मादाय मिळकत आपल्या मालकीचीच आहे, असे समजून तिचा वैयक्तिक फायदयासाठी उपयोग करत होते. १९२७ चा मुस्लिम धर्मियासाठीचा 'वक्फ कायदा' हा धर्माच्या नावाखाली होणाऱ्या चुकीच्या आचरणाला शिस्त लावण्याच्या उद्देशाने केला होता.

कर्मठ समाजाला कर्मकांडाच्या डबक्यातून बाहेर काढण्यासाठी हजारो वर्षाच्या धर्म संस्कृतीच्या प्रवाहात उत्पन्न झालेली ही कर्मकाडे अभ्यासणे, त्यातील फोलपणा लोकांच्या लक्षात आणून देणे, लोकांना कालबाह्य गोष्टीचा त्याग करण्याची सहज प्रेरणा मिळावी यासाठी प्रयत्न करणे आणि लोकांना योग्य पर्यायदेखील उपलब्ध करून देणे अशा विशाल आणि विज्ञानवादी न्यायाने महाराजांनी स्वतःच्या राजवाड्यातील खानगी कारभारात बदल शडवंत धर्मसुधाराणेचा राबवलेला हा कार्यक्रम आजही आपणास दिशादर्शक ठरतो.

**सत्यपाल महाराज आणि अंधश्रध्दा :-**

सध्या महाराष्ट्रात कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या अंतःकरणाला भिडणारे प्रबोधन करण्याचे कार्य करणाऱ्या कीर्तनकारांमध्ये सप्तखंजिरीवादक सत्यपाल महाराज अगदी आघाडीवर आहे. सुस्पष्ट भूमिका, प्रभावशैली व सामाजिक बांधिलकी अशा विविध गुणांमुळे आज संपूर्ण महाराष्ट्रात ते

लोकांची मने विधायक दिशेने वळविण्याचे काम अखंडपणे करीत आहेत. सात खंजिरी वाजविणारे कीर्तनकार म्हणून असलेल्या त्यांच्या प्रारंभीच्या प्रतिमेला आता अनेक नवी परिणामे प्राप्त झाली आहेत. त्यांच्या कीर्तनाला खेड्यापाड्यातील लोक एखाद्या जत्रेला जावे त्याप्रमाणे अगदी बैलगाड्या जुंपूनही येत असतात. त्यांचे कीर्तन इतर परंपरागत कीर्तनकारांपेक्षा वेगळ्या धाटणीचे असते. आपल्या कीर्तनातून सामाजिक प्रबोधन करत असतानाच ते परिवर्तन संदेशही देत असतात.

अंधश्रध्देविरूध्द बोलताना हे रोखठोक शब्दात विचारतात एखादा बुवा हवेतून अंगठी काढतो तर शेतकऱ्यासाठी ट्रॅक्टर काढत नाही? चक्रधर स्वामी, संत रविदास, संत गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च-नीच भावनेचे उच्चाटन केले खरा चमत्कार होय, असे ते निक्षून सांगतात.

**निष्कर्ष :-**

एकंदरीत महाराष्ट्रामध्ये वर्षानुवर्ष लोकांमध्ये असलेल्या अंधश्रध्देविषयी गैरसमज दूर व्हावेत याकरीता अनेक समाजसुधारकांनी आपले प्रयत्न सतत चालू ठेवले. वेगवेगळया पध्दतीने अंधश्रध्दा निर्मुलन करण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये गाडगे महाराज, महाराजा सयाजीराव, सत्यपाल महाराज यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

**संदर्भग्रंथ सुची**

१) श्रध्दा - अंधश्रध्दा - नरेंद्र दाभोलकर

२) गाडगेबाबांच्या गोष्टी - राजा मंगळवेढेकर

३) राजर्षी शाहू वसा आणि वारसा - ॲड. गोविंद पानसरे

४) अंधश्रध्दा निर्मूलन वार्तापत्र :- महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे मुखपत्र डिसेंबर, २०१८

५) समतेचे निर्मिक महात्मा ज्योतीराव फुले समग्र वाड्मय खंड- १ - सुभाष खैरे, अस्मिता चांदणे

● ● ●

# अंधश्रद्धा निर्मूलनात प्रा. श्याम मानव यांची भूमिका

**प्रा.डॉ. उल्हास एन.राठोड**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
शिवरामजी मोघे महाविद्यालय,
केळापूर (पांढरकवडा), जि. यवतमाळ
मो. क्र.- ९९२१५५७३९८
ई मेल.- drulhasrathodsmc@gmail.com

**प्रस्तावना**

आपल्या देशात सगळ्याच धर्मांनी श्रद्धा मानली आहे. ज्याच्यावर श्रद्धा आहे त्याला श्रेष्ठ मानायचे, त्याच्यावर शंका घ्यायची नाही, त्याचा शब्द प्रामाण्य मानायचा, अशी व्याख्या श्रद्धेची केली जाते. परंतु श्रद्धेचे रूपांतर अंधश्रद्धेमध्ये केव्हा होते, हे आपल्याला कळत नाही. त्यामुळे माणसाने श्रद्धा ठेवावी, पण ती डोळस असावी, असे प्रतिपादन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव यांनी केले. 'अध्यात्माला विज्ञानाचे नियम लागू होत नाही, हे लहानपणापासून आपल्याला सांगितले जाते. त्यामुळे आपली गोची होते,' असे सांगून प्रा. मानव म्हणाले, 'विज्ञानाला वैश्विक मान्यता आहे. ती अध्यात्मालाही लागू होते. निसर्गातून नियम समजून घेत मानवाने विविध वस्तू निर्माण केल्या. त्यालाच आपण वैज्ञानिक प्रक्रिया म्हणतो. आज काही बाबा जे चमत्कार दाखवतात ते मी १९८२ पासून दाखवत आलो आहे. विज्ञानाचे नियम वापरून असे प्रयोग करणे सहज शक्य होते. परंतु, सामान्य जनता असे चमत्कार पाहून भुलते. त्यांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.'

अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समिती १९८२ पासून संपूर्ण महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, मध्यप्रदेश, छत्तिगड, उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान

इ. प्रदेशात जनप्रबोधनाचे कार्य सातत्याने करीत आहे. याच माध्यमातून समितीने आजवर शकुंतला देवी, पायलट बाबा, कृपालु महाराज, 'बोलका पत्थर' पटवर्धन, मारेस सेरेल्लो, बेबी राठोड, गुलाब बाबा, शेळके बाबा, रज्जाक बाबा, मोईनधीन शामसुधीन कादरी, रोफ बाबा, विदेशी पादी, संदरदास महाराज, नैनोदचा बाबा, आनंदी माता, परी अम्मा यासह हजारो बुवा-बाबा, मांत्रिक, भगत, ज्योतिष्यी यांचा जाहीर भंडाफोड करून त्यांचं पितळ जनतेसमोर उघड केलं आहे.

महाराष्ट्राला संत आणि समाजसुधारकांची एक परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत कबीर, संत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांचे सह ज्योतिबा फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि.दा.सावरकर, आगरकर या समाजसुधारकांनी तत्कालीन समाजातील घातक रूढी, अंधश्रध्दा यांना विरोध करून निकोप समाजनिर्मितीचा प्रयत्न केला. हेच विचार लोकांपुढे मांडण्याचे काम समिती सातत्यानं करीत आहे.

**प्रा. श्याम मानव यांचा परिचय**

श्री श्याम मानव हे एका संपन्न पण कर्मठ व खूप मोठ्या घरात जन्माला आले व वाढले. ते इंग्लिश घेऊन एम.ए. आहेत. नंतर ते बहुधा युक्रांदमध्ये गेले. नास्तिक झाले. किंवा मुळातच तसे असल्याने तिथे गेले. तिथे त्यांच्या नास्तिक विचारांना अनेक पैलू पडले, चमक आली. तिथेच त्यांना जीवनसाथी सम विचारसरणीची मिळाली.

त्यांनी सुरुवात जूनियर कॉलेज म्हणजे अकरावी बारावीला इंग्लिश शिकवून केली. तीसुद्धा काही काळच. नंतर त्यांनी अंनीसच्या कार्यात झोकून घेतले. ते काही काळ 'स्व व पर संमोहन' शिकवत असत.

**अंधश्रद्धा निमूर्लना संदर्भात प्रा. श्याम मानव यांचे प्रबोधन**

माणसाची सेवा म्हणजे देवाची सेवा करणे होय. उपाशी माणसाला खायला देणे, निरक्षर माणसाला शिक्षण देणे, ज्याला कपडे नाही, त्याला कपडे म्हणजेच माणसाची सेवा करणे होय. यातून देवाची सेवा घडते. देव देवळात नव्हे, तर माणसाच्या मनात राहते, हे संत गाडगेबाबा देत ते उदाहरण

देऊन अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक आणि समितीचे सहअध्यक्ष प्रा. श्याम मानव हे प्रबोधन करीत असत

प्रा. मानव यांच्या मते, आपल्या देशात अनेक संत झाले. त्यांनी कधीही जादू केल्याचे आपल्या साहित्यात उल्लेख केला नाही. संत गाडगेबाबा यांची दोन उदाहरणे त्यांनी दिली. ते म्हणाले, गाडगेबाबा सांगायचे देव देवळात नव्हे, माणसाच्या मनात राहतो, देवळात देव राहत नाही, देवळात फक्त पुजाऱ्यांचं पोट राहतं. माणसाची सेवा म्हणजेच देवाची सेवा करणे होय. यावेळी प्रा. मानव यांनी सत्यसाईबाबा कसे चमत्कार करून दाखवत होते. त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले आणि त्यामागील हातचलाखीही सांगितली. हवेतून सोन्याची चेन काढणे, सोन्याची अंगठी निर्माण करणे, यज्ञाचा अग्नी प्रज्वलित करणे आणि त्यामागील हातचलाखी समजावून सांगितली. लहान मुलांना व्यासपीठवर बोलावून भूत कसे काढले जाते, याचे प्रात्यक्षिकही करून दाखवले. एका तांब्याच्या गडव्यामध्ये तांदूळ भरून त्यात एक त्रिशूळ टाकून संपूर्ण तांब्या उचलला गेला. यामागील विज्ञान त्यांनी सांगितले.

चिमुकल्यांकडूनही ते करवून घेतले. एकूणच छोट्या छोट्या गोष्टींमधून प्रा. मानव यांनी चमत्कार व अंधश्रद्धा दूर केली. शासनाचा जादूटोणा विरोधी कायदा नेमका काय सांगतो, याबाबत सांगितले. तसेच जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले. चमत्कारालाच नमस्कार करण्याची पद्धत आहे. त्यामुळे भारतात ढोंगीबाबांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. ढोंगीबाबांचे चमत्कार आणि अंधश्रद्धा मानवी मनात खोलवर रूजल्या आहेत. परंतु, एखादा बाबा हवेत हात फिरवून कुठलीही वस्तू कशी निर्माण करतात, आपल्या मंत्रोच्चाराने अग्नी कसा प्रज्वलित करता येतो. इतकेच नव्हे, तर एखाद्याच्या अंगात शिरलेले भूत कसे उतरवण्याचे सोंग केले जाते, हे प्रा. मानव यांनी प्रात्यक्षिकांसह सादर करीत होते. मानव यांचे प्रबोधन आणि त्यांचे शास्त्रोक्त प्रात्यक्षिक पाहिल्यावर उपस्थित नागरिकांच्या डोक्यातील भूतही पळाले. जिल्हाधिकारी कवडे यांनी आज जादूटोणा विरोधी कायद्याची किती गरज निर्माण झाली आहे, याचे महत्त्व सांगितले. कायद्याबाबत जागृती

नसेल, तर कुठलाही कायदा प्रभावीपणे अंमलात येऊ शकत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट करीत.

**दारिद्र्य दूर करणे ही मोठी समस्या**

स्वामी विवेकानंद यांचे उदाहरण देताना प्रा. मानव म्हणतात, विवेकांनदांना देवाबाबत विचारले असता, ते म्हणाले, देव त्यांचीच मदत करतो. जे स्वतःची मदत करतात. देशातील सर्वात मोठी समस्या दारिद्र्य दूर करणे ही आहे. धार्मिक माणसांनी धर्मकार्य, देवकार्यात खर्च होणारा वेळ दारिद्र्य दूर करण्यासाठी, खर्च करण्यासाठी केला, तर देशातील दारिद्र्य दूर होईल.

**अंधश्रद्धा निर्मूलनसाठी त्यांनी पुढील बाबींवर भर दिला**

१. शिक्षण : अंधश्रद्धा दूर करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे शिक्षण. अचूक माहिती प्रदान करून आणि गंभीर विचार कौशल्ये शिकवून, व्यक्ती वस्तुस्थिती आणि काल्पनिक कल्पनेत फरक करण्यास शिकू शकतात. वर्गातील विदयार्थ्यांमध्ये असलेल्या विविध अंधश्रद्धा व देवभोळेपणा समजून घ्याव्यात व उपक्रम आखावेत.

२. वैज्ञानिक विचारांना प्रोत्साहन द्याः लोकांना वैज्ञानिकदृष्ट्या विचार करण्यास प्रोत्साहित करणे, अधिकारांवर प्रश्नचिन्ह लावणे आणि पुराव्यांद्वारे समर्थित नसलेल्या दाव्यांबद्दल साशंक असणे. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या ग्रहण, रोगांच्या साथी, नवस, अंगात येणे इत्यादींबाबतीतील भ्रामक समजुती प्रयोगांच्या साहाय्याने दूर करण्याचा प्रयत्न करावा.

३. निसर्गातील चमत्कारिक घटनांमागील वैज्ञानिक कारणे समजावून सांगण्याचा प्रयत्न करावा. उदा., माशांचा पाऊस पडणे, गंगा अवतरणे.

४. कठोर परिश्रम व पद्धतशीर प्रयत्न यांनीच आतापर्यंतचे सर्व वैज्ञानिक शोध लागले आहेत. नवस वा चमत्कार यांनी नव्हेत, हे पटवून देण्याचा प्रयत्न करावा

५. हुंडा, देवदासी, वाघ्या-मुरळी (देवाशी लग्न लावणे) या अनिष्ट प्रथांबद्दल शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधन करावे.

६. समाजात घडणाऱ्या विविध घटनांमागील कार्यकारणभाव जाणून

घेण्याविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. (उदा., भानामती, अंगात येणे इत्यादी.)

७. 'प्रत्यक्ष कर्म, हाच धर्म' या उक्तीप्रमाणे क्रियाशील बनण्यासाठी स्वतः प्रयत्न करावा व आपले मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, कुटुंबीय यांनाही हेच तत्त्व विनंतिपूर्वक सांगावे.

८. जागरुकता वाढवा: अंधश्रद्धेच्या नकारात्मक प्रभावांबद्दल जागरूकता वाढवा, जसे की भेदभाव आणि लोकांच्या काही गटांना उपेक्षित करणे.

९. संवादाला प्रोत्साहन द्या: अंधश्रद्धा आणि त्यांचा समाजावर होणारा परिणाम याबद्दल खुले आणि प्रामाणिक संवादाला प्रोत्साहन द्या.

१०. संशोधनाला प्रोत्साहन द्या: अंधश्रद्धा आणि त्यांच्या मूळ कारणांवर संशोधनाला प्रोत्साहन द्या, त्यांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी.

११. माध्यमांचे प्रतिनिधित्व : माध्यमांमध्ये अंधश्रद्धेचे अचूक प्रतिनिधित्व करण्यास प्रोत्साहन द्या आणि सनसनाटी किंवा दिशाभूल करणाऱ्या कव्हरेजला परावृत्त करा.

१२. पर्यायी विश्वासांना समर्थन द्या: लोकांना अध्यात्म किंवा तत्त्वज्ञान यांसारख्या पर्यायी श्रद्धा शोधण्यासाठी प्रोत्साहित करा जे त्यांना अंधश्रद्धेचा अवलंब न करता अर्थ आणि उद्देशाची जाणीव देऊ शकतात.

**सहज करता येण्यासारखे काही उपक्रम**

१. परिसरातील लोक कोणकोणत्या अंधश्रद्धांना बळी पडतात त्याची माहिती गोळा करणे. त्यानुसार उपाययोजना, प्रात्यक्षिके, व्याख्याने, पथनाट्ये यांच्या आधारे जनजागृती करणे.

२. भूकंप, वादळे, ग्रहणे, ज्वालामुखी यांच्या निर्मितीची भौगोलिक कारणे स्पष्ट करणारी चित्रे, आकृत्या, माहितीपत्रक यांची रचना करून व्याख्याने, प्रदर्शने भरवणे.

३. आपल्या वर्गातील / परिचयातील दहा मुलांच्या जन्मकुंडल्या घेऊन त्यांतील सुमारे दहा वर्षांपर्यंतचे भाकीत आणि त्या मुलांच्या सुमारे दहा वर्षांपर्यंतचे प्रत्यक्ष जीवन यांचा तुलनात्मक तक्ता तयार करणे.

**सारांश**

सन १९८० पूर्वी महाराष्ट्रात रॅशनॅलिस्ट असोसिएशन, बुध्दिप्रामाण्यवादी मंच, मानवीय नास्तिक मंच, लोक विज्ञान संघटना जमेल त्याप्रमाणे व आपल्या विचारांना अनुकूल वाटेल तेवढे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य करीत होत्या.

या पार्श्वभूमीवर या विविध संघटनांमधील काही समविचारी मंडळींचे सहकार्य घेऊन प्रा. श्याम मानव यांनी अखिल भारतीय अंधश्रध्दा निर्मूलन समितीची स्थापना १९८२ साली नागपूर येथे केली. त्यांनी प्राध्यापक व पत्रकारितेची नोकरी सोडून पूर्ण वेळ या कार्यास वाहून घेतल्यामुळे पूर्ण ताकदीने व तडफेने काम करता आले. विविध संघटनामधल्या शेकडो मित्रांचे व नव्याने सामील झालेल्या हजारो कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभत गेले. अगदी चळवळ सुरू करण्याच्या पहिल्या दिवसापासूनच देवावर व धर्मावर हल्ले न करता, मानवी जीवन सुसह्य करणाऱ्या देवावर व धर्मावर हल्ले न करता, उघड अंधश्रध्दा व देवाच्या, धर्माच्या नांवावर लोकांना लुबाडणाऱ्या दलालाविरुध्द लढा द्यायचा असा आम्ही निश्चय केला होता. सुरूवातीला आमच्यातील विविध पुरोगामी विचारांच्या लोकांना ‘देवा-धर्माला’ विरोध न करण्याची भूमिका पचवणे फारच जड गेले. त्यावर वादविवाद होत गेले. पण जसजसे चळवळीचे यश वाढत गेले. जनतेचा प्रतिसाद वाढत गेला, कोणत्याही विचारांची पार्श्वभूमी नसलेले नवखे हजारो कार्यकर्ते चळवळीत सामील होत गेले. तसतशी ही भूमिका कमी विवाद्य बनत गेली व चळवळीचा अपरिहार्य भाग बनली.

**संदर्भ**


- https://new.abans.org.in/about-us/prof_shyam_manav
- www.wikipedia.com


● ● ●

# संत गाडगेबाबा आणि अंधश्रद्धा निर्मुलन

**डॉ. नितीन रमेश भिंगारे**
मु. म. महाविद्यालय दारव्हा
मो. न. ९८९०२९२८७९
ई-मेलः nrbhingare@gmail.com

**प्रस्तावना :**

विदर्भातील कर्मयोगी संत गाडगेबाबा हे कर्ते समाज सुधारक होते. वारकरी संप्रदायातील अतिशय ताकदीचा संत म्हणून गाडगे बाबांचा नामोल्लेख करावा लागतो. महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतांमध्ये गाडगेबाबांचे कार्य पराकोटीचे आहे. बाबांचं शिक्षण म्हणजे अक्षरांचीही तोंड ओळख नव्हे, तर ते अज्ञानीच! तरीही या गाडगेबाबांनी उच्च दर्जाचं समाजप्रबोधन केलं. आपल्या कर्तबगारीने आणि भाषाशैलीच्या आधारे लोकांमध्ये असलेली अंधश्रद्धा व धर्माविषयीची भ्रामकता सहजरीतीने लोकांना पटवून देत असत. गाडगेबाबा अज्ञानी असले तरीही डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, शिक्षक आणि डॉक्टर झालेल्या सुशिक्षितांना लाजवेल एवढे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगाढ होतं. संत गाडगेबाबा म्हणजे चालते बोलते विद्यापीठ होते. अज्ञानी माणूस तरीही त्यांच्या बोलण्यातील धाडस वाकबगारपणा, एकनिष्ठता त्यांच्या अंगी दिसून येते. ग्रामीण भागातील लोकांच्या प्रगतीचे मूळ अज्ञान व अंधश्रद्धेत आहे हे त्यांनी प्रथम ओळखले होते. म्हणूनच या देशातील लोकांमध्ये असलेली अंधश्रद्धा, अज्ञान, धर्मभोळेपणा हे दूर करण्यासाठीच आपले सर्वस्वी आयुष्य जनकल्याणार्थ झिजविले. संत गाडगेबाबांनी लोकांमध्ये असलेली अंधश्रद्धा दूर करण्यासाठी गावागावात जाऊन कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करून उद्‌बोधनपर मार्गदर्शन करीत होते. गाडगेबाबा अतिशय विलक्षण माणूस! संत परंपरेतील असूनही देव आणि धर्म, व्रत-वैकल्य, नवस बोलणे आणि फेळणे इत्यादी विषयांवर अतिशय प्रखरपणे ते बोलायचे.

ग्रामीण भागातील लोक अंधश्रद्धेच्या विळख्यात अडल्याने त्यांच्या

विकासाच्या सर्वच वाटा खुजा झाल्या आहेत हे गाडगेबाबांनी जाणलं होतं. समाजपरिवर्तनासाठी व प्रबोधनासाठी गाडगेबाबांनी कीर्तनाचीच निवड केली होती. जनतेचे प्रबोधन करताना किती सहजपणे त्यांच्या अंतर्मनात प्रवेश करतात व तार्किकपणे आपले विचार त्यांच्या गळी उतरवतात याचा उत्कृष्ट पुरावा संत गाडगेबाबांच्या मांडणीत सापडतो. संत गाडगेबाबा जाहीर कीर्तनातून लोकांशी थेट संवाद साधायचे. कालांतराने कीर्तनात तल्लीन झाल्याचे पाहून लोकांना सहज प्रश्न विचारायचे लोकही जाहीरपणे बाबांच्या विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं द्यायचे. संत गाडगेबाबांचे अख्खं कीर्तनच एक संवाद असायचा. आजही कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या विचाराची गरज विज्ञानयुगात आहे. त्यांच्या कीर्तनाचा परामर्श घेऊन त्यांचे अंधश्रद्धा याबाबतीत केलेले प्रबोधन प्रस्तुत लेखामधून मांडले आहे. त्यांच्या वाणीतून झालेले अंधश्रद्धा निर्मुलन त्यांच्या बुद्धीप्रामाण्यावादाची साक्ष देत आहे.

**बळी प्रथेला विरोध :**

संत गाडगेबाबांच्या प्रबोधनाची पद्धतही फार विलक्षण होती ते तीर्थक्षेत्री उपस्थित जनसमुदायांच्या समोर विचारायचे, तुम्ही हे कोंबड कापले आणलं हे कोणाचे लेकरू हाय? लोक म्हणायचे देवाचे लेकरू व्हय! मंग गाडगेबाबा ज्यांचा नवस फेडायला आणलं त्या पोराकडे बोट दाखवून विचारायचे, हे पोरगं कुणाचं आहे? बाप होणार म्हणायचा, महा व्हय! मग तू कोणाचा आहे? गाडगेबाबा म्हणायचे माझ्या बापाचा! लोक म्हणायचे तुझा बाप कोणाचा- गाडगेबाबा बापाच्या बापाचा- लोक बापाचा बाप कोणाचा- गाडगेबाबा देवाचा लोक म्हणायचे म्हणजे तू बी देवाचं लेकरू अन् तूहं पोरगं बी देवाचं लेकरू गाडगेबाबा हो,जी' लोकं म्हणायचे अरे वा रे वा ! तूह पोरगं बी देवाचं लेकरू अन् कोंबडं देवाचं लेकरू तू म्हणतं का देवाचं लेकरू कापलं का देव प्रसन्न होते मंग घे काप तूहं पोरगं अन् घे देवाले प्रसन्न करून. एवढे मार्मिकपणे देवाच्या संदर्भात बोलणारे संत गाडगेबाबा सुशिक्षितांना का समजले नाहीत? हा प्रश्न खरा चिंतनाचा आहे. देशात ईश्वरोपासना दिवसेंदिवस वाढत आहे. आज अंधश्रद्धेचं स्तोम सुशिक्षितांमध्ये अधिक आढळून येते. अंधश्रद्धेच्या निर्मूलनार्थ ज्यांनी आपली सबंध हयात घालविली त्यात संत

गाडगेबाबांचे योगदान राष्ट्रहिताच्या दृष्टीने अतुलनीय आहे. आपण विज्ञान युगात वावरत असतांना विज्ञानाच्या कितीही गप्पा मारीत असलो तरी कर्मकांड, नवस बोलणे- फेडणे, व्रत- वैकल्ये देवी- देवता पुजणे, तुळस पुजणे हे कार्य अंगवळणी आजही विद्यमान आहेत. भारताने विज्ञानात कितीही प्रगती केली असली तरी त्याचे श्रेय दैवी चमत्काराकडे लादले जाते. पंतप्रधान, राष्ट्रपती, खासदार आमदार, मंत्री, अभिनेते, अभिनेत्री इत्यादी देवी- देवतेकडे साखळे घालतांना दिसतात हे कशाचे द्योतक समजायचे? शासनाने संत गाडगेबाबा गावागावात पोहोचवला पण त्याचे परिवर्तनशील विचार मात्र जागीच विरलेत. गावागावात ग्रामपंचायतचे प्रवेशद्वार स्वागत करीत आहेत. अमरावती विद्यापीठला संत गाडगेबाबांचे नाव देण्यात आले म्हणजे त्यांचे विचार कृतीत उतरवले असे होते काय? संत गाडगेबाबांचे विचार आचरणात आणतो की, त्यांच्या विचारांचे धिंडवडे उडवतो असा संभ्रम निर्माण झाला आहे.

**मूर्तिपूजेचा निषेध :**

दगडधोंड्यांची पूजा करण्यात काळाचा आणि पैशाचा व्यय करू नका, त्याच्यापुढे बकरा आणि कोंबड्या मारू नका, तीर्थक्षेत्रांना जाऊ नका. गंगास्नानाने पापे जातात असे म्हणणे हा धर्माचा शुद्ध काळाबाजार आहे, असे त्यांनी प्रत्येक कीर्तनात सांगितले. श्रोत्यांशी ते प्रत्यक्ष संवाद साधीत. ते विचारीत, 'देव किती?' श्रोते म्हणत 'एक'. तुमच्या गांवी खंडोबा आहे का? आहेना, मग देव किती झाले, 'दोन' अशी वाढवीत वाढवीत देवांची संख्या ते दहाबारावर न्यायचे. श्रोत्यांच्या डोक्यात आपोआप प्रकाश पडू लागायचा. पुढे ते म्हणायचे, 'देव सोन्याचा केला तर त्याचा बाप सोनार झाला. लोखंडाचा केला तर त्याचा बाप लोहार झाला. या दगडधोंड्यांचा नादी लागू नका आणि वेळ बर्बाद करू नका.' असे ते आवर्जून सांगत. देवांवर, त्यांच्या मूर्तिपूजेवर हल्ला चढविताना ते तुकाराम आणि कबीर यांचे पुरावे घेत. आणि आपले म्हणणे सामान्य खेडूतांच्या गळी उतरवीत.

एखाद्या गावी ते कीर्तन लावीत. खेडुतांना विचारीत 'तीर्थाला गेलात नाई?'

श्रोते : होय,

बाबा : बोलला काई तुमचा देव ?

श्रोते : नाई.

बाबा : इतक्या दूरून गेले तं जेवले-गिवले का, असं काईच नाई विचारलं? वारे! तुमचा देव ?

देवांची आणि मूर्तिपूजेची गाडगेबाबांनी अतिशय त्वेषाने टिंगल केलेली दिसते. खेड्यापाड्यांमध्ये दगड-धोंड्याला शेंदूर माखून देव बनविले जाते. अशा शेंदूरमाखल्या देवांना त्यांनी नदीत उचलून फेकले. केवढे हे क्रांतिकारकत्व!

एका कीर्तनात ते म्हणतात, 'कसा बापा तुमचा देव? महादेवाच्या पिंडीवर कुत्रं अभिषेक करते तं तो 'हाडई' म्हणत नाही.' यापेक्षा कोणत्या शब्दांत मूर्तिपूजेवर आणि कर्मकांडांवर हल्ला करता येईल?

**जगात जाती दोनच :**

अस्पृश्यता केवळ कायद्याने जाणारी नसून मतपरिवर्तनाने जाईल, हे ओळखून अस्पृश्यतेसंबंधी आपले स्पष्ट विचार त्यांनी कीर्तनाद्वारा खेड्यापाड्यांतून आणि शहरांतूनही जनतेपुढे मांडले. ते म्हणायचे 'जगात जाती फक्त दोनच आहेत. एक पुरूष व दुसरी स्त्री. तिसरी जातच नाही. जो कोणी जात विचारीत असेल तो महामूर्ख होय. कोणी जात विचारील तर त्याला मी 'माणूस' आहे असे सांगा. जनावरात जसे गाढव, बैल, म्हैस, कुत्रा इत्यादी जाती आहेत तशा मानवप्राण्यात नाहीत. तसे असते तर जनावरात जसा हा गाढव हा बैल असे ओळखता येते, तसेच मनूष्यजातीत हा महार, हा कुणबी, हा ब्राह्मण असे ओळखता आले असते.' पुढे त्यांनी म्हटले आहे, 'आपल्या देशातच फक्त 'शिवाशीव' हा शब्द आहे, शिवाशीव हा शब्द रशियात नाही, अमेरिकेत नाही, चीनमध्ये नाही. फक्त हिंदुस्थानातच आहे बाप्पा!' जातिभेद निर्मूलनासाठी असे प्रभावी प्रबोधन त्यांनी खेड्यापाड्यांमधून दिले. गाडगेबाबा खेडूतांच्या मनातील अंधश्रद्धेचा मळ जसा खरडीत होते तसेच भोवतीचा कचराही साफ करीत होते. सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन ते ज्या ठिकाणी गेले त्या ठिकाणी त्यांनी रस्ते झाडले, नाल्या

साफ केल्या. खेड्यातले अनेक आजार, व्याधी ह्या अस्वच्छ राहणी आणि कुपोषण यातून निर्माण होतात हे गाडेबाबांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी स्वच्छतेवर भर दिला. या 'खराटाधर्माने' त्यांनी 'सार्वजनिक आरोग्य' आणि 'श्रमप्रतिष्ठा' अशा दोन साध्यांची प्राप्ती केली. महात्मा गांधींनी 'चरख्यातून स्वराज्य' दिले तसे गाडगेबाबांनी 'खराट्यातून सुराज्य' सांगितले.

खेड्यातली माणसे अस्वच्छ राहणीमुळे अनेक साथीच्या रोगांना बळी पडतात. आणि आजारी झाली की मांत्रिक, देवऋषी यांचा आश्रय घेतात हे गाडगेबाबांनी हेरले होते. 'आजारपणात डॉक्टरकडे जा. अंगारे-धूपारे, नवसतापास करू नका' असा कळकळीचा सल्ला खेडूतांना द्यायला ते कधी विसरले नाहीत. 'अंगात येणे' या ढोंगाचा तर त्यांनी अनेकवेळा आपल्या कीर्तनात नक्कल करीत-करीत निषेध केला.

**इहवादी दृष्टिकोण :**

गाडगेबाबांच्या चरित्रातली एक घटना अतिशय उद्‌बोधक आहे. महाराष्ट्रभर त्यांनी भ्रमंती केली. नासिकला ते गेले. तिथे एक पुरोहित पाण्यात उभा राहून मंत्र म्हणत होता. त्यांची चेष्टा करण्याची इच्छा गाडगेबाबांची झाली. ते नदीच्या पात्रात उतरले. नदीचे पाणी ओंजळीत घेऊन ते किनाऱ्याकडे फेकू लागले. तो पुरोहित संतप्त होऊन म्हणाला, 'अरे वेड्या! हे काय करतो आहेस? बाबा म्हणाले, 'काई नाई, माझ्या वावराले पानी घालतो.' वावर म्हणजे शेत. 'कुठे आहे तुझे शेत?' 'जी वऱ्हाडात, मूर्तिजापूरपाशी दापुरा हाये तथी' 'पुरोहित म्हणाला, 'हे पाणी इतक्या दूर कसे जाणार?' बाबा म्हणाले, 'तुम्ही पितृमोक्ष अमावश्येला आपापल्या पितरांना अन्न स्वर्गात पाठवता मंग आम्हाला वऱ्हाडात पानी नाई पाठवता येनार काय?, अशा बुद्धिवादी युक्तिवादाच्या विनोदाची डूंगरे बाबांच्या चरित्रात अनेक ठिकाणी निनादताना दिसतात. गो.नी. दांडेकरांसारख्या चरित्रकारांना ती का दिसू नयेत?

सत्यनारायणासारख्या पोथ्यांचाही गाडगेबाबांनी कडाडून निषेध केला आहे. ते म्हणतात. साधुवाण्यानी सव्वा रूपयाचा प्रसाद वाटला आणि पोथी वाचली तर कलावती का लीलावतीची बोट पाण्यात तरंगली. 'असं अशीन

तं मंग सारे भटजी सैन्यात पाठवा. शत्रूच्या बंदुकीच्या गोळ्या परतावा म्हणा सत्यनारायणाची पोथी वाचून'. असे परखड विचार एका निरक्षर माणसाने मांडावे याचे कौतुक वाटते.

**शिक्षणावाचून माणूस म्हणजे धोंडाः**

भारतातल्या दारिद्र्याचा शोध घेताना त्यांच्या लक्षात आले. शिक्षणाशिवाय आमचा उद्धार नाही. यासंबंधी बोलताना त्यांनी अनेकवेळा म्हटले आहे 'हे लोक का गरिबीत? ज्याले इद्या नसीन त्याले खटाऱ्याचा बैल म्हटले तरी चालेल! आता तरी सुधरा. मुलाले शिक्षण द्या. इव्हायाले पाहुणचार करू नका. पण मुलाले शाळेत घातल्याशिवाय राहू नका.' सामाजिक तळमळीतून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. महाराष्ट्रभर शिक्षणसंस्था काढल्या. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक सामाजिक कार्याला सक्रिय पाठिंबा दिला. स्वतः निरक्षर असलेल्या या माणसाने महाराष्ट्रातील खेडुताच्या हाती 'लेखणी' दिली. कशासाठी? त्यांना वाटले होते, शिक्षणानंतर समाजातील सामाजिक, आर्थिक विषमता कमी होईल, देव आणि देवाचे नावाने चालणारे कर्मकांड कमी होईल, जातिभेद आणि पशुहत्या थांबेल. पण काय झाले? शिकलेल्या आजच्या माणसांनी या सर्व गोष्टींना खतपाणी घातले आहे. जी गोष्ट निरक्षर माणसाला समजली ती आम्हा सुशिक्षितांना समजू नये हे केवढे आश्चर्य?

आपले कोणी शिष्य नाही. आपल्या कुटुंबीयांना कोणतीही सवलत मिळू नये हे आपल्या मृत्युपत्रात गाडगेबाबांनी आवर्जून लिहायला लावले. त्यांच्या कुटुंबीयांनी बाबांची त्यागीवृत्ती निष्ठेने जोपासली. त्यांच्या शिष्यांनी मात्र मिशन स्थापन केले. या मिशनने काय केले? जेवणाची सदावर्ते काढली. आश्रमशाळा काढून सरकारी अनुदाने मिळविली. गोरक्षणे काढून धनिकांची मर्जी संपादन केली. पण त्यांच्या क्रांतिकारी विचारांचे मिशन स्थापन करता आले नाही. तसे करणे गैरसोयीचे असावे. कारण धनिकांना भिकाऱ्यांविषयी, प्राणिमात्रांविषयी दया दाखविणे आवडते पण मुळात या विषमतेची चिकित्सा केलेली आवडत नाही. देववाद, दैववाद, अज्ञान, आरोग्यविषयक बेपर्वाई हे सर्व गेल्याशिवाय बहुजन ग्रामीणसमाज प्रगती

करूच शकणार नाही. असंख्यांच्या अज्ञानी राहण्यातच मूठभरांचे शहाणपण टिकून असते. अशा मूठभरांना गाडगेबाबांच्या नावाने अशा ‘मलमपट्टया’ करणे सोयीचे वाटते, त्यांनी दाखविलेल्या मार्गाने मुळावर आघात घालणे नाही.

**चमत्काराला विरोध :**

अरे संत ज्ञानेश्वरांनी, तुकारामांनी सांगितलेय देव माणसात असते, तरी तुमी हित आले ‘देव चरा - चरात आहे अस म्हनता’ आणि चंद्रभागेत आंघोळ करून हित वाळवंटात लोटे घेवून बसता ‘सगळ वाळवंट घाण करून टाकता. हे साफ कोण करणार रे?’ ते विठोबाचे हात कमरेवर हैत.. तुमचे पण हात कमरेवर हैत.. ते कमरेवरचे हात काढा .. हातात झाडू घ्या .. माझ्यासोबत हे वाळवंट झाडून काढा ..अस म्हणणारे गाडगे महाराज लोकांना स्वच्छतेच आणि आरोग्याचे महत्त्व लोकांना पटवून सांगायचे. आणि म्हणायचे,

देवळात देव नसते, देव माणसाच्या मनात ऱ्हायते!
ज्या मानसाले खायला भेटत नसन त्याले खायला द्याव!
ज्याले शिक्षण नसन त्याले शिक्षण द्यावं!
ज्याले आसरा नसन त्याले आसरा द्यावं!

देव माणसाच्या मनात राह्यते, देवळात रहात नायी, देवळात फक्त पुजाऱ्याचे पोट ऱ्हायते!

मित्रांनो - हा ताकदीचा बुद्धीप्रमाण्यवाद आपण समजून घेतला पाहिजे.

चमत्कार होत नाहीत असे सांगणारे गाडगे महाराज लोकांच्या / महिलांच्या अंगात देव्या येण्यासंमंधी म्हणायचे -

‘अरे हिच्या अंगात देवी येते सात सात दिवस आंग नाय धूत आनि हिच्या अंगात देवी येते काय देवीला काम धंदा नाय काय रे? घूस हिच्या अंगात घूस तिच्या अंगात!

**पोथी पुरान करण्याला विरोध :**

या सत्यनारायण कथेचा उपयोग करून गाडगे महाराज विचारायचे - अरे पोथीत लिवलय ना, सत्यनारायण केला की नाव वर येते? मंग आता

करा सात्यनारायण आणि बुडालेली नाव वर काढा! आपल्या देशाला लई सोनं भेटन! देशाच भलं होऊन जाइल! ह्यावर लोक गप्प बसायचे. मग ह्या गप्प बसलेल्या लोकांना गाडगे महाराज डिवचून म्हणायचे - 'काउन रे एका सत्यनारायणान होत नाही काय? मंग दहा दहा सत्यनारायण घाला! धा सत्यानारायनान होत नसन तर दहा हजार सत्यनारायण घाला! इथून सत्यनारायण पावत नसन तर ममैय (मुंबई) च्या समुद्राजवळ जा 'पैसे मी देतो' तिथ सत्यनारायण करा पण बुडालेली नाव वर काढा!' अस म्हटल्यावर लोक गप्प बसायचे मग चिडल्याचा आविर्भाव आणून म्हणायचे - 'दहा हजार सत्यनारायण घालून जर ते नाव वर येत नायी! तर कायले ती खोट्टारडी पोथी वाचता? कायले तो खोट्टारडा सत्यनारायण करता? आणि वरून त्याले सत्यनारायण म्हणता?' वरून ते असही म्हणायचे, 'चालले बह्याड बेल्हे, सत्यनारायण करायले! "काउन रे तुमी सत्यनारायण करता ना? मग सत्यनारायण केल्यावर पोथिमदे लिवलय ना - बुडालेली नाव वर येते ! मग आता सत्यनारायण कराव, जे आता इंग्लंडची नाव पाण्यात बुडाली, तीच्यावर लई मोठ सोनं है, अरे सत्यनारायण करा ते नाव वर काढा, आपल्या देशाच लई भलं होऊन जाइल!' असं म्हटल्यावर लोक गप्प रहायचे कारण लोकांना माहित होत की सत्यनारायण करून नाव काही वर येणार नाही.

**निष्कर्ष :**

संत गाडगे महाराजांनी समाज हा अधोगतीला जाऊ नये म्हणून स्वतः हाती झाडू घेऊन आयुष्यभर अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता या त्रिसूत्रावर आधुनिक समाज घडवण्यासाठी अनेक विषयांवर अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत खूप समाजप्रबोधन केलं. आणि समाजाला एक नवीन मार्ग देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. देव देवळात नाही तर तो माणसाच्या मनात आहे असा संदेश देणारे संत म्हणजे गाडगे बाबा. त्यांनी आयुष्यभर दीन, दुबळयांची सेवा केली. लोकांना नैतिक मूल्य शिकविण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्च केले. त्यांचे विचार आणि कार्य प्रेरणादायी आहेत. आज संत गाडगे बाबांचे नाव अमरावती विद्यापीठाला दिले आहे. केवळ नाव देऊन चालणार नाही तर त्यांचे विचार तळागाळात पोचविण्याचे कार्य

प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीकडून होणे गरजेचे आहे. आजही भारतामध्ये अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता याबाबत गाडगे बाबांच्या प्रबोधनाची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी गाडगेबाबांनी दाखविलेला मार्ग आपण सर्वांकरिता प्रेरणादायी आहे. देशाच्या विकासाकरिता गाडगेबाबांची दशसुत्री आवश्यक असून त्यानुसार कार्य कारणे गरजेचे आहे. मूर्तीपूजा, अंधश्रद्धा, निरक्षरता, भोंदू बुवा ह्या समस्या आजही कमी झाल्या नाहीत. त्याकरिता गाडगेबाबांचा बुद्धिवाद महत्वाचा ठरतो.

**संदर्भ -**


१. टीम प्रबुद्ध भारत, २० डिसेंबर, २०२२

२. अंधश्रद्धेचा कर्दनकाळ : संत गाडगेबाबा, प्रा.डॉ. मदन रामटेके

३. लेख संकलन : मंगेश म कदम

४. संकलन - विवेक घाटविलकर


● ● ●

# संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनातून अंधश्रद्धा निर्मूलन व समाज प्रबोधन

**प्रा. डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे**
श्रीमती नानकीबाई वाधवाणी
कला महाविद्यालय, यवतमाळ
Email- vishakhadere@gmail.com
मोबा. नं. - ९८९०९१८५५७

संत गाडगे महाराज हे महाराष्ट्रातील थोर संत आणि कर्मयोगी. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील सेनगाव, तालुका दर्यापूर येथे २३ फेब्रुवारी १८७६ ला त्यांचा जन्म झाला. सुरूवातीला १८ वर्षे प्रपंच केल्यानंतर त्यांनी गृहस्थाश्रमाचा परित्याग करून १ फेब्रुवारी १९०५ रोजी पहाटे ३ वाजता घर सोडले. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हे व्रत अंगिकारले स्वतः गाडगे महाराज आपल्या उभ्या आयुष्यामध्ये एकाही देवळात गेलेले नाहीत. पंढरपूरच्या विठोबाच्या देवळात त्यांनी पाउलही टाकले नाही. 'सोडोनिया खऱ्या देवा करी म्हसोबाची सेवा' ही दगडधोंड्याच्या देवाकडे पाहण्याची तुकोबांची दृष्टी होती आणि तोच गाडगेबाबांचा त्यांच्याबद्दलचा दृष्टिकोण आहे. गाडगेबाबांसारखा मूर्तिपूजेचा जळजळीत निषेध हिंदुद्वेष्ट्या मुसलमानांनी सुद्धा कधी केला नसेल. दगडधोंड्याची पूजा करण्यात काळाचा नि पैशाचा व्यय करू नका. त्यांच्यापुढे बकऱ्या आणि कोंबडया मारू नका, तीर्थक्षेत्रांना जाऊ नका. गंगास्नानाने पापे जातात असे म्हणणे हा धर्माचा शुद्ध काळा बाजार आहे. कर्ज काढून सण समारंभ करू नका, हा उपदेश बाबांच्या प्रत्येक कीर्तनात शिगोशीग भरलेला असतो. पण हा उपदेश करताना कोणत्याही जातीचा किंवा वर्गाच्या द्वेषाचे एक अक्षरसुद्धा गाडगेबाबाच्या तोंडून कधी निघत नाही. सर्वांच्या प्रेमावर आधारलेल्या समतावादी तत्त्वज्ञानाचा प्रचार कसा करावा याचा सोज्वळ आणि सात्विक आदर्श बाबांच्या कीर्तनामध्येच

पहावयाला मिळतो. या देशात अनेक धर्म, अनेक जाती, अनेक पंथ व येथे विविधता पाहवयास मिळते. यामुळे या देशातील असंख्य निरक्षर व साक्षर या दोन्ही वर्गातील लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात देवभोळेपणा आढळून येतो. येथे फक्त अडाणी व निरक्षरच अंधश्रद्धाळू आहेत असेही नाही. उलट शिकल्या सवरल्यामध्ये हे प्रमाण जास्तीत जास्त वाढत आहे अनेक तीर्थक्षेत्रे येथे असून या प्रत्येक ठिकाणी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या ही लाखात नसून कोटीत येईल यातून सर्वसामान्यांना कोणती स्फूर्ती मिळते हे समजणे कठीण आहे आणि अशा देवभोळयापणा विरूद्ध एक अडाणी माणूस आपले आयुष्य लोकांना अंधश्रद्धेपासून परावृत्त करू इच्छितो. त्या महामानवाचे नांव म्हणजे संत गाडगे बाबा होय.

भारतात मंदिराच्या व मस्जिदीच्या तुलनेत दर्जेदार शाळा, महाविद्यालये, दवाखाने कमी आहेत, प्रत्येक खेड्यात जा शाळा, दवाखाने असतीलच असे सांगता येणार नाही, परंतु मंदिर, मस्जिद निश्चित आढळून येतील. ही सत्य परिस्थिती आहे. बाबांनी मनोमन एक बाब ताडली होती की हा देश फक्त कृषीप्रधान तर आहेच तसाच तो देवप्रधानही आहे. येथील मुसलमान, ख्रिश्चन, हिंदू, शिख, पार्शी हे सारे दैववादी आहेत. बाबांना पक्क उमजलं होतं की, दगडाचा देव प्रसन्न होणं अशक्य आहे. याउलट बाबांच असं मत झालं होतं की हजारो वर्षापासून मूर्तीची पूजा करुन येथील भक्ताची मनही दगडासारखीच बनली आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात संत गाडगेबाबा यांच्या अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विज्ञानवादी विचार अभ्यासले आहे.

**शोध निबंधाचा उद्देश :-**

१. संत गाडगेबाबा यांचा अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचारांचा अभ्यास करणे

२. संत गाडगेबाबा यांचा कीर्तनाचा उद्देश विज्ञानवादी आहे त्याचा अभ्यास करणे..

**गृहीतके :-**

१. अंधश्रद्धेच्या माध्यमातून देवावर ठेवलेला विश्वास हा समाजास घातक

आहे.

२. अंधश्रद्धेमुळे समाजात परिवर्तन घडवून येत नाही.

**अध्ययन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्य संकलन करताना द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. यासाठी संत गाडगेबाबा यांच्यावरील संबंधित ग्रंथ त्यांची कीर्तने, मासिके इ. चा वापर माहिती संकलनासाठी करण्यात आला.

**संत गाडगे बाबांचा वैज्ञानिक दृष्टीकोन :-**

संत गाडगेबाबांचा अंधश्रद्धा आणि कर्मकांडाला विरोध होता, विज्ञानाचा आधार असलेला बुद्धिवादी दृष्टीकोन त्यांनी लोकांपर्यंत पोहचविला. आपले तत्त्वज्ञान लोकांना समजेल अशा भाषेमध्ये त्यांनी मांडले. यादृष्टीने लोकांना कळतील अशा प्रकारची उदाहरणे देऊन आपल्या विचारांचा प्रभाव अधिक दृढमूल केला. सत्यनारायणाची पोथी वाचल्याने आपल्या इच्छा पूर्ण होत नाही हे पटवून देण्यासाठी त्यांनी सत्यनारायणाच्या पोथीमधील उदाहरण दिले. साधुवाण्याने सत्यनारायणाचा प्रसाद खाल्ला नाही म्हणून त्याची बोट समुद्रामध्ये बुडाली आणि प्रसाद खाल्ला तर समुद्रातून वर आली, या गोष्टीवर लोकांना ते विचार करायला लावतात. सत्यनारायणाची पूजा केल्यानंतर जर बुडालेली बोट वर येत असेल तर महायुद्धाच्या काळामध्ये बुडालेल्या आगबोटी शोधण्याची आवश्यकता नाही. समुद्राच्या किनाऱ्यावर सत्यनारायणाची पूजा घालून सर्व आगबोटी वर येऊ शकतात. त्यासाठी सत्यनारायणाची पूजा करणाऱ्या पुरोहितांना समुद्राच्या काठी पाठविले पाहिजे, अशा उपहासगर्भ शैलीमध्ये ते सत्यनारायणाच्या कथेचा समाचार घेतात आणि लोकांना विचार करायला भाग पाडतात. आपल्या कीर्तनामध्ये लोकांना प्रश्न विचारून लोकांना ते कीर्तनामध्ये सहभागी करून घेतात आणि त्यांनाच उत्तरे द्यायला लावून वस्तुस्थितीची जाणीव करून देतात. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी दैवी चमत्कारांना विरोध केला आणि आपले बुद्धीवादी तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचवून प्रबोधनाचे कार्य केले आहे. पशुहत्या, व्यसनमुक्ती संदर्भात प्रबोधन देवाच्या नावावर कोंबड्या-बकऱ्यांची होणारी हत्या कशी

चुकीची आहे, यांचे प्रबोधन गाडगेबाबा करतात. देवाच्या नावावर आपणच आपले पोट भरतो. आपण लहान लेकराप्रमाणे त्यांचा सांभाळ करतो आणि त्यांच्याच मानेवर आपण सुरी चालवतो हे कसे अयोग्य आहे आणि संवेदनाशून्य आहे. या संदर्भात ते लोकांना जाग करतात. ईश्वर हा जीवन देणारा आहे. जीव घेणारा नाही आणि जो हत्या करायला सांगतो तो ईश्वर कसा असेल? संत गाडगे बाबा कबीराचा दाखला देत पटवून सांगतात.

'तिरथ जाव काशी जाव चाहे जाव गया।
कबीर कहे कमालकु सबसे बड़ी दया'

अशापध्दतीने लोकांना शिकवण देत आणि विचार करायला लावून ते त्यांना पशुहत्या थांबविण्याचा संदेश देतात. व्यसनामुळे प्रगती होत नाही त्याचबरोबर संसारामध्ये कटकटी वाढतात, यासाठी सर्व प्रकारचे व्यसन हे सोडायला हवे. व्यसनांमुळे दारिद्र्य वाढते. व्यसनापासून दूर राहून शिक्षणावर खर्च करावा, बाप दारू पिऊन येत असेल तर त्याला मार्गावर आणण्यासाठी त्याच्या मुलाने आणि बायकोने त्याचा समाचार घेऊन मार्गावर आणले पाहिजे, असा सल्लाही ते देत. समाजातील प्रश्न हे अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसन, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा, कर्मकांड, देवभोळेपणा यातून निर्माण झालेले आहेत आणि त्यामुळेच लोकांचे संसार सुखाचे होत नाहीत, त्यांची प्रगती नाही, त्याची पुरेपूर कल्पना असल्यामुळेच ते अतिशय तळमळीने लोकांना जाग आणतात, त्यांना कल्याणाचा मार्ग दाखवतात.

आपल्या अवतीभवतीचा समाज, त्याची व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा त्यांनी पाहिलेला होता. त्यामुळे गाडगे बाबा कर्ज काढून सण साजरे करू नका, तीर्थयात्रा करू नका असा उपदेश लोकांच्या हितासाठी करतात. शेतकरी हा वर्षभर राबराब शेतामध्ये राबतो आणि हाती आलेले पीक हे सावकाराच्या घरामध्ये कर्जरूपाने घालतो. कर्ज काही करता फिटण्याचे नाव घेत नाही आणि या कर्जापायी जमिनी आणि घरसुद्धा गहाण ठेवण्याची वेळ त्यांच्यावर येते. हे सारे समाजामध्ये घडत होते म्हणून लोकशिक्षकाच्या भूमिकेतून त्यांनी व्यवहाराचे गणित समाजाला समजावून सांगितले, अंधःकारात झोपी गेलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखविला. दगड म्हटला की

त्यातून माणुसकीचा पाझर फुटणं शक्य आहे काय? मुळीच नाही आणि याच करिता बाबांनी आपलं जीवन वेचले, बाबा म्हणत की, भाविक माणसं मूर्तीपुरतेच आस्तिक असतात आणि तीच माणसे आपल्याच घरातील भावंडासाठी नास्तिक असतात म्हणून बाबांनी आपल्या कीर्तनातून लोकांना कळकळून सांगत की, 'देवाबद्दल भलभलत्या कल्पना असतात माणसांच्या मनात देव कसा असेल, देव कधी भेटेल, देवाला कधी पाहू शकेन ? अशा कल्पना ज्या माणसाच्या मनात असतात ना ते बयाड, भ्रमिष्ट असतात पृथ्वी पैदा झाली तेंव्हापासून देव कोणी पाहिला नाही आणि तो कोणाला दिसणार नाही. देव पाहण्याची वस्तू नाही. देवळात देव, नदीवर देव, इकडे देव, तिकडे देव सारा, देवाचा बाजार ज्याला देव म्हणतात, परमेश्वर म्हणतात तो आजवर कोणी पाहिला नाही आणि तो पुढेही कधीच कोणाला दिसणार नाही. हे वाचल्यानंतर बाबा किती ज्ञानवान व विद्वान होते हे समजायला वेळ लागणार नाही. पण लोक भोळे असतात, भाबडे असतात त्यांना वाटतं साधूनी देव पाहिलाय. देव प्रत्यक्ष पाहिला असं सांगणारे साधू नसतात, असतात भोंदू ही अंधश्रद्ध माणसं त्या भेंदूच्या नादी लागून स्वतःचा सत्यानाश करून घेतात.

लोक म्हणतात आम्ही अनेक तीर्थक्षेत्राला गेलो त्यावर बाबा म्हणतात देवाने तुम्हाला बलावलं होतं का? बरं गेलात तर त्याने तुमची काही विचारपूस तरी केली का? का हो, कुठून आलात? किती जण आहात? जेवले की नाही? चहा पिले का नाही? बोलला होता का देव तीर्थात म्हणजे तीर्थात देव नाही. पैशाचा नाश आहे. लोक म्हणतात, का हो, माझा बाप तुम्ही कधी पाहिला होता का स्वप्नात? नाही - म्हणजे जे पाहिलं नाही ते दिसतच नाही. तुम्ही जो फोटो पाहता ना, त्या फोटोतलाच देव दिसतो तुम्हाला खरा देव नाही दिसत. देव दिसायची वस्तूच नाही. म्हणजे तीर्थात देऽव. नाही आणि देवळातही देव नाही देऊळ तयार झालं. मूर्ती आणावी लागते की नाही? होय. मूर्ती इकत आणता की फुकट? इकत. देव इकत भेटत असतो? देव काय मेथीची भाजी आहे. का कांदे बटाटे आहेत? देव इकत भेटत नाही हेही समजत नाही ज्या माणसाला, त्याला माणूस म्हणावं

का? बरं चला, आले देव. बसवले देवळात. तुमच्या देवाला आंग धूता येतं का? नाही धोतर नेसता येते का? नाही ज्याला अंग धूवायचीबी अक्कल नाही त्याला देव म्हणता? तुम्ही देवापुढे नैवेद्य ठेवला अन् त्याला भिडलं कुत्रं तर देवाला कुत्रं हाणता येतं का? नाही. कुत्र्याला हाड करायची ज्याच्या अंगात ताकद नाही त्याला देव म्हणता? मग देव देव करणं हे आपलं चुकलं रे चुकलं. भुललो रे भुललो. आपण सारे भलतेच करू लागलो. तुकोबाराय म्हणतात...

देव दगडाचा केला । गवंडी त्याचा बाप झाला
देव सोन्याचा घडविला । सोनार त्याचा बाप झाला

देवाची मूर्ती बनवणारे पाथरवट आणि सोनार हेच तुमच्या देवांचे बाप झाले हे कसं नाही शिरत बळक्यात तुमच्या? चुकलाच, आपला रस्ता साफच चुकला हा! आपण खड्ड्यामध्ये चाललो आहोत आपलं सगळ कसं फसत चाललंय ते आता पाहा. माझ्या प्रश्नांची बरोबर उत्तरं द्या.ह ? संत गाडगे बाबा म्हणतात ,

जगात देव किती आहेत? एक
आपल्या गावी खंडोबा आहे की नाही? आहे.
आपल्या गावी भैरोबा आहे की नाही? आहे.
आपल्या गावी मरीआई आहे की नाही? आहे.
अरेच्या, आधी तुम्ही म्हणाला होता एकच आहे देव.
आता देवाचा तर कारखानाच सुरू झालेला आहे

संत गाडगे बाबा प्रमाणेच एकनाथ महाराज म्हणतात,

नारळ आणि शेंदूर यांचा भडिमार ।
तेल रांधा मागती मलिदा वरती काजळ कुंकू।
फजीतखोर ऐसे देव तयांचे तोंडावर थुंकू।

एका तोंडाने म्हणायचं की, देवाने आपणा साऱ्यांना आणि जगाला निर्माण केलं आणि गावोगाव पाहाव तर दगडांना शेंदूर फासून हज्जारो, लाखो देव तयार करण्याचा कारखाना आम्हीच चालू ठेवलाय. कशाला इतकी देवळं बांधली? एकच बांधाच होतं आणि त्यातल्या देवाला म्हणायचं होतं, राहा

बाप्पा इथेच भूईला एवढा भार कशाला करून ठेवलाय उगीच? लोकहो, दगड धोंड्यांना नुसता शेंदूर फासून जर त्याचा देव होत असेल आणि तो नवसालाही पावत असेल तर मग एक चांगला डोंगर पाहून, त्याला सपाटेबाज शेंदूर फासून त्याचा टप्पोरेबाज भला मोठा देव बनवता येईल.

संत गाडगेबाबा म्हणतात, पुर्थईवर परमेश्वर आहे, जगात जनार्दन आहे. देव आपल्या या दुनियेतच आहे. त्याचं नाव आहे गरीब आणि पीडित. गरिबावर दया करा, जगाची सेवा करा. आपल्या पोराला विलायतेला पाठवायची इच्छा करता, अन् साल्यांनो गरिबाला १२ आण्याची वही देण्याची आपल्या पोटात बुद्धी होत नाही? आपण माणसंच नाही आहोत. तुकोबाराय तर अशा माणसांना चक्क गाढव म्हणतात.

आर्तभूतान घाली पाण्याची चूळ । न मागे त्यासी हवाली साखरगूळ
तुका म्हणे तो गाढवपशू । लाभेविण केला आयुष्यनाशु
आयुष्या असा नाश करू नका हो।
लोकहो, देव तीर्थात किंवा मूर्तीत नाही.
दरिद्रीनारायणाच्या रूपाने तो तुमच्यासमोर प्रत्यक्ष उभा आहे.

दीनदुबळ्यांच्या डोळ्यातला एक अश्रू पुसला की देवाला एक अभिषेक घडतो हो
गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला ......

यावरून संत गाडगेबाबांचा साधेपणा व समजून पटवून देण्याचे कौशल्य लक्षात येईल, त्यांनी वर वर्णन केल्याप्रमाणे जे सांगितले ते शंभर टक्के सत्य. देव दगडाचा! त्याला अंघोळ करता येत नाही, कुत्रा हाकालताही येत नाही हेही सत्य, परंतु ज्या देवळात कुत्र्यांना, मांजरांना, उंदरांना सर्रास प्रवेश मिळाला, परंतु या देशात माणसाला म्हणजे अस्पृश्य माणसाला कर्मठ माणसांनी माणसालाच शत्रू माणून त्याला पशूपेक्षाही वाईट वागणूक दिली व त्यावर संत गाडगे महाराजांनी ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ यांचा हवाला देवून उदाहरण देऊन सामान्य लोकांच्या डोक्यामधील वेडगळपणा सोप्या शब्दांत सांगून कानउघडणी केली व देव मूर्तीत नाही तो गरीब जनतेत आहे व माणसातच आहे हे सिद्ध करुन दाखविले डोक्यावर खापर आणि हातात

खराटा घेऊन बाबा अक्षरशः पन्नास वर्षे हिंडताहेत. कोणत्याही गावात त्यांनी पाउल टाकाने की पहिल्याने हातातला झाडू चालू लागतो मग लोक जागे होतात आणि हातात खराटे घेऊन धावतात. सकाळी गावातली घाण झाडूने साफ मग संध्याकाळी लोकांच्या डोक्यातील घाण आपल्या कीर्तनाने ते साफ करतात. हे गाडगेबाबांच्या जीवनाचे आणि सेवेचे तंत्र आहे. हा महान समाजसेवक जनतेच्या कल्याणासाठी चंदनासारखा झिजतो आहे, आपल्या देहाचे कण रात्रंदिवस घासतो आहे; पण सुशिक्षित महाराष्ट्राला त्याची जाणीव नाही. कोणत्याही वर्तमानपत्रात त्यांच्या कीर्तनाची बातमी नाही, त्यांच्या उपदेशाचा सारांश नाही, त्यांच्या कार्याची ओळख नाही. सुशिक्षीत महाराष्ट्राला दोरे, गंडे, ताईत नि गुरुमंत्र देणारे अन् चमत्कार करणारे बाबा अन् महाराज लागतात. कोणाला पोरे पाहिजे असतात कोणाला पैसे पाहिजे असतात, कोणाला कांही, कोणाला कांही. अशा लोकांना गाडगेबाबा जवळ स्थान नाही. कीर्तनाखेरीज त्यांच्याजवळ जनतेला देण्यासारखे दुसरे कांही नाही. कोणी त्यांच्या पायाला हात लावला की त्याच्या पाठीत ते खराटा मारतात, त्यांना कोणी नमस्कार करण्याच्या आधीच हात जोडून ते त्यांच्यासमोर लोटांगण घालतात. चमत्काराचा नि गाडगेबाबांचा कांही एक संबंध नाही

**निष्कर्ष -**

संत गाडगेबाबा यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्यांनी त्यांच्या हयातीत नुसते घाटच बांधले नाहीत तर अनेक संस्था वेगवेगळया गावात उभ्या केल्या. त्यांनी अनेक ठिकाणी शाळा, धर्मशाळा, आश्रमशाळा बांधून त्या सर्वांना एका माळेत गुंफून श्री गाडगेमहाराज मिशनची स्थापना केली. यावरून त्यांच्या कार्याची विशालता दिसून येते. संस्था न काढता त्यांनी या सर्व संस्था सर्व धर्मातील लोकांकरिताच काढल्या यावरून बाबा है सर्वधर्मसमभाव मानतात बाबांनी हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध असा भेद केंव्हाही केला नाही. देव जसा मंदिरात नाही तसा तो मस्जिदीतही नाही, चर्चमध्येही नाही तो प्रत्येकाच्या हृदयातच आहे हे आपल्या कीर्तनातून बाबांनी वेळोवेळी कळवळून नमूद केले आहे व म्हणूनच त्यांनी संस्था सर्व धर्माकरिताच उभ्या केल्या. यातूनच बाबांचे थोरपण व त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात

केलेल्या कार्याचे दर्शन पावलोपावली घडते. गाडगेबाबांनी समाजातील भोंदूगिरी, देवभोळेपणा, विषमता, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा याचा अनुभव त्यांनी घेतला. समाजातील रंजल्यागांजल्यांचे दुःख दारिद्र्य, दैन्यावस्था पाहून समाजाच्या प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले. समाजामध्ये असलेली जातीयता, विषमता आणि देवविषयक चुकीच्या कल्पना दूर करण्यासाठी कीर्तनाचे तंत्र त्यांनी अवलंबिले आणि ग्रामस्वच्छतेबरोबर सुधारणाविषयक विचारांचे धडे त्यांनी समाजमनाला दिले. त्यांच्या सुधारणाविषयक विचार आणि वैज्ञानिक दृष्टीने मानवाच्या कल्याणाचा धडा दिला. त्यांचे समाज कल्याणकारी कार्य मानवजातीला प्रेरणादायी ठरणारे आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य, समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याचे कार्य संत गाडगेबाबा यांनी केले आहे.

शिक्षण हे मूठभर लोकांच्या हाती असले तर समाजाची प्रगती होणार नाही, त्यासाठी शिकून शहाणा झाला पाहिजे याची जाणीव त्यांना होती शिक्षणामुळेच समाज हा पुढे जाईल, समाजाची प्रगती होऊन अज्ञान, अंधश्रद्धा दूर होईल. जीवनाचा खरा अर्थ लोकांना कळेल, विकासाचा मार्ग कळेल आणि म्हणून शिक्षणाचे महत्त्व जनसामान्यांच्या मनावर बिंबवण्याचे काम त्यांनी केले. एक भाकरी खायची तर अर्धी खावी. कपड्यांवर खर्च कमी करावा पण मुलांना मात्र शिक्षण द्यावे असा संदेश गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून देतात.

आईवडील जसे आपल्या मुलांच्या हिताचा, कल्याणाचा विचार करतात. त्यांच्यासाठी आपले आयुष्य वेचतात. गाडगेबाबा यांची सुद्धा समाजाच्या कल्याणासाठी अशीच तळमळ दिसते. सर्वसामान्यांप्रमाणे संसार न करता संपूर्ण समाजाच्या हिताचा संसार त्यांनी केला. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून विज्ञानप्रसाराचे कार्य त्यांनी केले. लोकांना स्वच्छतेचे धडे दिले. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे ते स्वतः ग्रामस्वच्छतेचे काम करीत असत. येथे सुद्धा संत तुकाराम महाराजांच्या 'तुका म्हणे नाही आले अनुभवा, आधीच मी देवा कैचा नाचू किंवा 'अनुभवाशिवाय नाही मी बोलत' या वचनांचा प्रत्यय येतो. आणि त्यादृष्टीने त्यांनी केलेले प्रबोधनाचे कार्य लोकशिक्षकाच्या भूमिकेतून होते हे आपल्या लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. श्री. गाडगे महाराज गौरव ग्रंथ, भगत रा.तु., चैतन्य प्रकाशन कोल्हापुर-१९९२

२. गाडगेबाबा- पोतदार वसंत- अक्षर प्रकाशन मुंबई-१९९९

३. लोकराज्य संत गाडगेमहाराज प्र. के. अत्रे, १ जुलै १९७७

४. लोकोत्तर गाडगेबाबा जीवन आणि कार्य- भोसले द. ता.- ग्रंथाली मुंबई-२००७

५. कर्मयोगी गाडगेबाबा- तायडे मनोज- लोकवाङ्मय गृह मुंबई-१९९२

६. वैखरी भाग २ आवृत्ती पहिली - डॉ. केशव फाले - जळगाव २०१२

● ● ●

# Raja Ram Mohan Roy's Contributions to Indian Society

**Asst. Prof. Dr. Nilima Vijay Dawane**
Head of the sociology Department
Lokmanay Tilak mahavidyalay
Wani 445304 Dist.: yavatmal M. 9405968687
Email. Id : nilimadawane117@gmail.com

**Abstract**

One of the most famous Bengali and Indian philosophers of all time, Raja Ram Mohan Roy was a leader of the Renaissance. When superstition, poverty, harassment-neglect-oppression of women, the collapse of Indian education, and other social ills dominated Bengali and India's entire societies in the eighteenth century, Ram Mohan Roy emerged. The social position, rights, and education of women have all deteriorated as a result of the lengthy period of Muslim dominance in India. There were many problems under the East India Company's rule, despite the fact that the colonial rulers established some schooling to support their rule and trade. The caste system was surrounded by an air of untouchability, and the social structure was split into several castes, races, and faiths. The caste system, both high and low, affected women's lives and educational opportunities. This essay aims to demonstrate that Ram Mohan Roy was influential at the time and helped to break down discrimination in the traditional culture and create a modern one. On the other side, he was able to effect a groundbreaking transformation in India's educational system as well as the preservation of women's lives and rights. The study's objective is to

describe and evaluate Raja Ram Mohan Roy's contributions to Indian society. The study used an analytical and documentary approach to come at a conclusion.

Keywords: Social Reform, Political reform, Educational reform, Religion

**Introduction**

The "Father of Modern India's Renaissance," Raja Ram Mohan Roy, was a tireless social reformer. In India, he is credited for ushering in a new era marked by enlightenment and liberal change. He is frequently referred to as the "father of modern Indian renaissance" because of the important contributions he made to India's growth in the 18th and 19th centuries. Every aspect of Indian culture is enriched by these developments. Few people in Raja Ram Mohan Roy's time had a clear grasp of the significance of the new age, however. Interdependence between people and nations rather than independence in isolation should be the objective of human civilization, and this should apply to individuals as well as nations.

**Raja Ram Mohan Roy Contribution: Social Reforms**

Bengali culture was saddled by a number of evil rites and laws in the late 18th century (sometimes referred to as the Dark Age). Numerous ceremonies and strict moral rules were imposed, most of which were incorrectly translated and adapted from ancient cultures. Common social norms that hurt women included child marriage, polygamy, and Sati. The most perverse ofthese customs was the Sati Parthia. At theirhusband's burial pyre, the widows would self-immolate aspart ofthe rite. The Governor-General, Lord Bentinck, understood Roy's

motivations and feelings, and as a result, the Bengal Sati Regulation, also known as Bengal Code Regulation XVII, A. D. 1829, was passed in spite of strong opposition from the orthodox religious community. Anyone found practising Sati Doha in Bengal Province would be punished under the law, which forbade it. Raja Ram Mohan Roy will be remembered as a major benefactor of women, not only for aiding in the abolition of the Sati ritual but also for advocating for equal inheritance rights for women and speaking out against child marriage and polygamy. He also vehemently opposed the strict caste differences of his period.

**Brahmo Samaj: India's first Reform Movement**

**Raja ram Mohan and Brahmo samaj**

In the year 1828, the reformist movement that would later be known as Brahmo Samaj was started in Calcutta by Raja Ram Mohan Roy. Another noteworthy contribution made by Raja Ram Mohan Roy is exemplified by this one. It was the first movement of its kind in India, and its major goal was to reform the Indian community and make the genuine teachings of the Vedas, Upanishads, and other Hindu scriptures accessible to the common man. This movement was the first of its kind in India. In the 1840s, a considerable number of influential political personalities, such as Debendranath Tagore and Keshub Chunder Sen, were active members of the Samaj.

**Raja Ram Mohan Roy Contribution: Educational Reforms**

Traditional languages such as Sanskrit and Persian were a focus of Ram Mohan Roy's studies. Later in life, he was exposed to the English language and made the decision to become fluent in it in order to

advance his career with the British. However, due to his talent as a writer, he devoured works of English literature as well as publications in order to take in as much information as possible. In spite of the fact that ancient texts such as the Vedas, Upanishads, and the Quran instilled in him a profound reverence for philosophy, he came to the realization that his education was lacking in scientific comprehension and logical reasoning. He came to this realization despite the fact that ancient texts instilled in him a profound reverence for philosophy. He campaigned for the construction of an English Education System in the region, which would include the study of scientific subjects like as mathematics, physics, chemistry, and even botany. Specifically, he wanted to see these subjects taught in English. In the year 1817, he and David Hare built Hindu College, which went on to become one of the most prominent educational institutions in the world.

**Raja Ram Mohan Roy Contribution: Journalistic Contributions**

He was a staunch supporter of the principles of free expression and the right to speak one's own. Ram Mohan Roy He took a stand in defence of the vernacular press's right to freedom of expression. In addition, he was the publisher of the Bengali monthly "Sambad Kaumudi" and the Persian newspaper "Mirat Ul- Akhbar," which together translate to "the Mirror of News" (the Moon of Intelligence). Back then, news pieces and stories could not be distributed until the government gave its permission to do so. According to Ram Mohan, there shouldn't be any restrictions placed on the media, and the government also shouldn't be able to cover up the truth simply because they don't want it to be publicized.

**Raja Ram Mohan Roy Contribution:** Religious Contributions Ram Mohan Roy was adamantly opposed to the needless ritualism and idol worship that was Encouraged by the priests of his time, and he voiced this opposition often. After conducting research on the Holy Scriptures of a number of different religions, he came to the conclusion that Hindu Scriptures, such as the Upanishads, provided evidence in favour of the idea of monotheism. In addition to that, he had studied the Bible. This served as the impetus for him to search for a religious upheaval that would return the teachings of ancient Vedic scriptures to their original, unaltered state. Specifically, he was looking for this. In 1928, he laid the Groundwork for what is now known as the Atmiya Sabha, and on August 20 of that same Year, the religion that had just been birthed held its inaugural gathering. After some internal Rearranging, the assembly that was once known as the Atmiya Sabha was rechristened the Brahma Sabha.

**CONCLUSION**

Roy lived during the time of the revolutionaries and freedom warriors. He never openly called for India's independence, but he did fight for the civil rights of Indians and criticized the idea that Europeans were a superior race. Dwaraka Nath Tagore oversaw Brahmo Samaj for a while after Roy's passing. Indians still cherish and remember Roy's inspirational comments. Raja Ram Mohan Roy was a strong and logical thinker who provided innovative and integrative thought to light up the dim nineteenth-century Indian civilization. Bengal is therefore seen as one of the renaissance's founders. He is still respected for being a pioneer in Indian society, culture,

and education. Ram Mohan Roy thus “inaugurated the modern period in India,” according to Rabindranath. Ram Mohan is the prophet of the new India, according to a different foreign biographer who has written about him. The quote from Mrs. Cole on Raja Ram Mohan Roy, “His role was that of an Enlightener,” is crucial. His contribution to society’s general development will always be cherished. He aimed to create a prosperous and healthy India. Her views on women’s rights and education have given rise to a new perception of Bengali society, culture, and religious change. In the eyes of enlightened future generations, he represents India. Due to his remarkable accomplishments, Raja Ram Mohan Roy was referred to as a “Bharatpathik” by Rabindranath Tagore. Therefore, Ram Mohan Roy’s contributions to India society and the rest of the globe are still very relevant today.

**Reference Book**

1. Social thinkers and Maharashtra : Roshan kathale new delhi publication 2014

2. Indian thinkers and thought sainath publication Nagpur 2015

3. Waghmare, N. (2017). Raja Ram Mohan Roy and Brahma Samaj.

● ● ●

अंधश्रद्धा ही एक अशी समस्या आहे ज्याचे निराकरण डोळ्यासमोर असूनही दूर आहे. ती पोकळ आहे पण त्यांची मुळे मजबूत आहेत जी समजून घेऊनही कोणीही स्वीकारू इच्छित नाही. यामागे अनेक कारणे असू शकतात, ज्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे भीती! वर्षानुवर्षे चालत आलेल्या गोष्टी, त्यांना कुठलाही आधार असो वा नसो, पिढ्यानपिढ्या चालत असतात, त्यामुळे अंधश्रद्धा वाढतच जातात. अशा अनेक अंधश्रद्धा आहेत ज्याचा आज प्रत्येक तिसरा माणूस बळी पडला आहे, मग तो सुशिक्षित असो वा अशिक्षित. अंधश्रद्धा ही कोणत्याही धर्मातून आली नसून, माणसाने माणसाच्या मनाला प्रभावित करायला वापरलेली युक्ती आहे. त्यामुळे आंधळेपणाने त्यावर विश्वास ठेवून स्वत:चे आणि इतरांचे

Also Available in
e-Book

मुक्ता पब्लिकेशन

ISBN 978-81-946091-8-6
9 788194 609186